रयत शिक्षण संस्था, सातारा



अमृतपर्व

लोकनेते मा. रामशेठ ठाकूर अमृत महोत्सवी गौरव ग्रंथ

* संपादन समिती *

अध्यक्ष

श्री. चंद्रकांत नारायण दळवी IAS (Retd.)
चेअरमन, रयत शिक्षण संस्था, सातारा

संपादक

श्री. विकास विश्वासराव देशमुख IAS (Retd.)
सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा

सहसंपादक

प्रिं. डॉ. शिवलिंग गंगाधर मेनकुदळे
श्री. बंडू नारायण पवार
प्रिं. डॉ. राजेंद्र सायबू मोरे

सदस्य

श्री. प्रदीप बबन हिवरकर
श्री. राजेंद्र भाऊसाहेब वाघ
सौ. श्रावणी रोहित बर्गे
श्री. अमोल एकनाथ कोळेकर
डॉ. राजेंद्र कुबेरदास तांबिले
श्री. सुनिल हिंदुराव देसाई

अमृतपर्व

Amrutparv

प्रकाशक :
श्री. विकास विश्वासराव देशमुख IAS (Retd.)
सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा
कर्मवीर समाधी परिसर, पोवई नाका, सातारा
दूरध्वनी : २३४५६६, २३३८५७,२३२४४४,२२८५६६,२३४८५७
Website : www.rayatshikshan.edu
E-Mail : secretary@rayatshikshan.edu

मुखपृष्ठ :
सुरभि सुनिल देसाई
'सुरभि' प्लॉट नं. ३८, अक्षर कॉलनी,
विलासपूर, सातारा. ८२०८०९२८२५

प्रथमावृत्ती :
१३ जून २०२६

मुद्रणस्थळ :
डी.एस.प्रिंटर्स
सी-१७, जुनी एम.आय.डी.सी., सातारा

साहित्य प्रकार :
लेख संग्रह

प्रतींची संख्या : १०००

पृष्ठ संख्या : १२४

खाजगी वितरणासाठी

रयत शिक्षण संस्था, सातारा



संस्थापक
पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील
डी.लिट.



रयत माउली
त्यागमूर्ती सौ.लक्ष्मीबाई भाऊराव पाटील




शुभ संदेश

रामशेठ ठाकूर यांचा जीवनप्रवास पाहिला, की कष्ट, कर्तृत्व आणि समाजाप्रती असलेली बांधीलकी यांचा एक सुरेख संगम अनुभवायला मिळतो. रायगड जिल्ह्यातील न्हावा या छोट्याशा गावात, खाडीच्या सान्निध्यात आणि निसर्गाच्या आव्हानांशी संघर्ष करीत वाढलेल्या रामशेठ यांनी आयुष्याच्या प्रारंभीच प्रतिकूल परिस्थितीचा सामना केला. औपचारिक शिक्षणाची संधी न लाभलेल्या त्यांच्या पालकांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखले आणि मुलाने शिकून मोठे व्हावे, हा संस्कार त्यांच्यावर केला. त्या प्रेरणेने त्यांनी शिक्षणासाठी साताऱ्याची वाट धरली. कर्मवीरांच्या 'कमवा आणि शिका' योजनेतून शिक्षण घेत असताना त्यांनी केवळ पदवी प्राप्त केली नाही, तर आयुष्याकडे पाहण्याची व्यापक दृष्टी आणि समाजाप्रती असलेल्या उत्तरदायित्वाची जाणीवही आत्मसात केली. पुढे उद्योग, शिक्षण, राजकारण आणि समाजकारण या क्षेत्रांत त्यांनी उल्लेखनीय कार्य उभे केले; मात्र यशाच्या शिखरावर पोहोचल्यानंतरही रयत शिक्षण संस्थेशी जोडली गेलेली नाळ ते कधीच विसरले नाहीत. अनेक शैक्षणिक संस्था, विद्यार्थी, गरजू घटक आणि सामाजिक उपक्रमांना त्यांनी दिलेला आधार हा केवळ दातृत्वाचा विषय नाही, तर सामाजिक बांधीलकीची प्रामाणिक अभिव्यक्ती आहे. त्यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य लाभावे आणि समाजहिताची त्यांची प्रेरणादायी वाटचाल अशीच अविरत सुरू राहावी, ही मनःपूर्वक सदिच्छा.

शरद पवार

खा. शरद पवार
अध्यक्ष
रयत शिक्षण संस्था, सातारा



मनोगत

समाजजीवनाच्या पटावर काही व्यक्तिमत्त्वे अशी उदयास येतात, की त्यांच्या कार्याचा प्रकाश केवळ त्यांच्या समकालीन काळालाच उजळून टाकत नाही, तर पुढील अनेक पिढ्यांच्या वाटचालीलाही दिशा देत राहतो. अशा व्यक्तिमत्त्वांचे जीवन हे केवळ वैयक्तिक यशाची गाथा नसते, ते समाजनिष्ठ मूल्यांचे, कर्तृत्वशील नेतृत्वाचे, दानशूरतेचे आणि मानवतेच्या अखंड उपासनेचे जिवंत प्रतीक असते. रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे ज्येष्ठ सदस्य, शिक्षणप्रेमी आणि लोकाभिमुख नेतृत्व लाभलेले मा. रामशेठ ठाकूर यांचे व्यक्तिमत्त्व याच परंपरेतील एक उज्ज्वल दीपस्तंभ आहे.

त्यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त त्यांच्या जीवनकार्याचा गौरव करण्याचे भाग्य रयत शिक्षण संस्थेला लाभत आहे, ही बाब संस्थेसाठी अभिमानाची आणि आनंदाची आहे. व्यक्तीचे मोठेपण हे तिच्या वयावर नसते, तर ते त्यांच्या विचारांच्या व्यापकतेत, कार्यामध्ये आणि समाजाच्या मनात निर्माण झालेल्या विश्वासात असते. या सर्व निकषांवर मा. रामशेठ ठाकूर साहेब यांचे जीवन विलक्षण प्रेरणादायी ठरते. त्यांनी संघर्षातून यश संपादन केले; परंतु त्या यशाला समाजसेवेची आणि लोककल्याणाची जोड देत त्याला अधिक अर्थपूर्ण बनविले.

पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्थापन केलेली रयत शिक्षण संस्था ही केवळ शिक्षण देणारी संस्था नसून सामाजिक परिवर्तनाची चळवळ आहे. समाजातील वंचित, उपेक्षित आणि दुर्बल घटकांना शिक्षणाच्या माध्यमातून उन्नतीची संधी उपलब्ध करून देण्याचे महान कार्य संस्थेने शतकभर सातत्याने केले आहे. रयत शिक्षण संस्थेच्या विचारधारेत समाजासाठी जगणाऱ्या, स्वतःच्या यशाचा उपयोग इतरांच्या प्रगतीसाठी करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांचा गौरव करण्याची उदात्त परंपरा आहे. मा. रामशेठ ठाकूर यांचा सत्कार हा त्या परंपरेचाच एक भाग आहे.

'कमवा आणि शिका' या कर्मवीरांच्या जीवनदायी योजनेतून शिक्षण घेतलेल्या रामशेठ ठाकूर यांनी स्वतःच्या जीवनातील संघर्षाला संधीमध्ये रूपांतरित केले. शिक्षण, उद्योग, समाजकारण आणि लोकसेवा या विविध क्षेत्रांत त्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले. मात्र त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य हे त्यांच्या यशात नसून त्या यशामागील संवेदनशीलतेत आहे. समाजातील गरजू व्यक्तींच्या अडचणी जाणून घेणे, त्यांच्या मदतीसाठी तत्परतेने पुढे येणे आणि कोणत्याही प्रसिद्धीची अपेक्षा न ठेवता लोककल्याणासाठी योगदान देणे, ही त्यांची जीवनशैली बनली आहे.

दानशूरता हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा केवळ एक स्थायीभाव नाहीतर ती त्यांच्या जीवनमूल्यांची

अभिव्यक्ती आहे. अनेक शैक्षणिक संस्था, सामाजिक उपक्रम, सांस्कृतिक चळवळी आणि लोकहिताच्या योजनांना त्यांनी वेळोवेळी दिलेले पाठबळ हे त्यांच्या समाजाभिमुख दृष्टिकोनाचे द्योतक आहे. अनेक विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक स्वप्नांना आकार देण्यात, अनेक संस्थांच्या प्रगतीला चालना देण्यात आणि असंख्य कुटुंबांच्या जीवनात आशेचा किरण निर्माण करण्यात त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण राहिले आहे. त्यांच्या सहवासात आलेल्या प्रत्येक व्यक्तीला त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील साधेपणा, आत्मीयता आणि माणुसकीचा स्पर्श अनुभवायला मिळतो. मा. रामशेठ ठाकूर यांच्या वागण्या-बोलण्यातून व्यक्त होणारी आत्मीयता आणि प्रत्येक माणसाचा सन्मान करण्याची त्यांची वृत्ती त्यांना सर्वसामान्यांच्या मनात विशेष स्थान प्राप्त करून देते.

मा. रामशेठ ठाकूर यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त प्रकाशित होत असलेली 'अमृतपर्व' ही स्मरणिका त्यांच्या जीवनकार्याचा केवळ गौरवग्रंथ नाही. ती त्यांच्या संघर्षमय प्रवासाची, बहुआयामी कर्तृत्वाची, मूल्यनिष्ठ, जीवनदृष्टीची आणि समाजासाठीच्या अखंड बांधीलकीची नोंद घेणारा एक महत्त्वपूर्ण सामाजिक दस्तऐवज आहे. या स्मरणिकेतून त्यांच्या सहकाऱ्यांनी, मित्रपरिवाराने, विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी आणि त्यांच्या कार्याचा जवळून अनुभव घेतलेल्या व्यक्तींनी व्यक्त केलेले मनोगत पुढील पिढ्यांसाठी प्रेरणास्रोत ठरेल. आजच्या वेगवान आणि स्पर्धात्मक युगात यशाबरोबर सामाजिक उत्तरदायित्व, संपत्तीबरोबर दानशूरता आणि नेतृत्वाबरोबर मानवता जपणाऱ्या व्यक्तिमत्त्वांची समाजाला अधिक आवश्यकता आहे. मा. रामशेठ ठाकूर यांचे जीवन या मूल्यांचा आदर्श आहे म्हणूनच त्यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त हा सोहळा केवळ एका व्यक्तीचा गौरव नसून मूल्यनिष्ठ जीवनाचा उत्सव आहे. या स्मरणिकेच्या माध्यमातून आम्ही त्यांच्या कार्याला कृतज्ञतापूर्वक अभिवादन करीत आहोत. त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य लाभो आणि त्यांच्या अनुभवसंपन्न मार्गदर्शनाचा लाभ समाजाला, रयत शिक्षण संस्थेला व भावी पिढ्यांना निरंतर मिळत राहो, हीच सदिच्छा.

श्री. चंद्रकांत दळवी IAS (Retd.)
चेअरमन, रयत शिक्षण संस्था, सातारा

अमृतपर्व



प्रास्ताविक

रयत शिक्षण संस्थेच्या शतकभराच्या वैभवशाली परंपरेत अनेक कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्वांनी आपल्या कार्याचा ठसा उमटविला आहे. शिक्षण, समाजकारण, उद्योग, संस्कृती आणि लोककल्याण या विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींचा गौरव करणे, ही संस्थेची जपलेली उदात्त परंपरा आहे. समाजहितासाठी आपले संपूर्ण जीवन समर्पित करणाऱ्या अशा व्यक्तिमत्त्वांचा सन्मान म्हणजे मूल्यनिष्ठ जीवनाचा गौरव होय.

आज आम्हाला विशेष आनंद आणि अभिमान वाटतो, की रयत शिक्षण संस्थेचे ज्येष्ठ मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, थोर शिक्षणप्रेमी आणि लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त प्रकाशित होत असलेल्या 'अमृतपर्व' स्मरणिकेच्या माध्यमातून त्यांच्या जीवनकार्याला कृतज्ञ अभिवादन करण्याची संधी लाभत आहे.

मा. रामशेठ ठाकूर यांचा जीवनप्रवास हा संघर्ष, परिश्रम, जिद्द आणि समाजनिष्ठेचा प्रेरणादायी प्रवास आहे. रयत शिक्षण संस्थेच्या 'कमवा आणि शिका' या योजनेतून शिक्षण घेतलेला एक विद्यार्थी पुढे जाऊन यशस्वी उद्योजक, लोकनेता आणि समाजहिताचा ध्यास घेतलेला दानशूर व्यक्ती म्हणून उभा राहतो, ही बाब रयतच्या शिक्षणतत्त्वज्ञानाची यशोगाथाच म्हणावी लागेल. त्यांनी आपल्या यशाचा उपयोग केवळ वैयक्तिक उन्नतीसाठी न करता समाजाच्या प्रगतीसाठी केला, ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची सर्वात मोठी ओळख आहे.

शिक्षण क्षेत्राविषयीची त्यांची आस्था आणि सामाजिक बांधीलकी विशेष उल्लेखनीय आहे. ग्रामीण, दुर्गम आणि आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी त्यांनी उदार हस्ते योगदान दिले. अनेक शैक्षणिक संस्था, शाळा, महाविद्यालये, क्रीडा संकुले, सभागृहे आणि विद्यार्थीहिताच्या विविध उपक्रमांना त्यांनी दिलेले पाठबळ समाजपरिवर्तनाच्या कार्याला बळ देणारे ठरले आहे. त्यांच्या दानशूरतेमुळे हजारो विद्यार्थ्यांच्या जीवनात आशेचा किरण निर्माण झाला आहे.

उद्योग, समाजकारण, शिक्षण, कला, क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रातील त्यांचे योगदान बहुआयामी आहे. मात्र या सर्व यशामागे असलेली त्यांची माणुसकी, साधेपणा आणि आत्मीयता हीच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची खरी ताकद आहे. समाजातील प्रत्येक घटकाशी जिव्हाळ्याचे नाते जोडत त्यांनी लोकांच्या मनात आदराचे आणि विश्वासाचे स्थान निर्माण केले आहे. यशाच्या सर्वोच्च शिखरावर पोहोचूनही आपल्या मातीशी, संस्कारांशी आणि रयत शिक्षण संस्थेशी त्यांनी जपलेली निष्ठा अनुकरणीय आहे.

मा. रामशेठ ठाकूर यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त प्रकाशित होत असलेली 'अमृतपर्व' ही स्मरणिका त्यांच्या बहुआयामी कार्याचा, जीवनदृष्टीचा आणि समाजहितासाठीच्या अविरत ध्यासाचा दस्तऐवज आहे. त्यांच्या सहकाऱ्यांनी, मित्रपरिवाराने आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी व्यक्त केलेल्या भावना व आठवणी या स्मरणिकेला अधिक समृद्ध करतील.


मा. रामशेठ ठाकूर यांना अमृतमहोत्सवानिमित्त हार्दिक शुभेच्छा अर्पण करीत त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि निरंतर समाजसेवेसाठी मनःपूर्वक शुभकामना व्यक्त करतो. त्यांच्या कार्याचा प्रकाश पुढील अनेक पिढ्यांना प्रेरणा देत राहो, हीच सदिच्छा.

श्री. विकास देशमुख IAS (Retd.)
सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा

अमृतपर्व

अनुक्रमणिका

• रयत संस्कारातून घडलेला कल्पवृक्ष : मा.रामशेठ ठाकूर	श्री.चंद्रकांत दळवी	११
• मा. रामशेठ ठाकूर मैत्र जीवांचे !	ॲड. भगीरथ शिंदे	१८
• 'रयत' के पास रामशेठ है...	डॉ. अनिल पाटील	२१
• माननीय रामशेठ ठाकूर : एक धनवंत योगी	श्री. विकास देशमुख	२४
• समाजकारण, शिक्षण आणि दातृत्वाचा महामेरु : मा. लोकनेते रामशेठ ठाकूर	डॉ. ज्ञानदेव म्हस्के	३१
• ऋणानुबंध	प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे	३४
• मूर्तिमंत दातृत्व : लोकनेते रामशेठ ठाकूर	श्री. बंडू पवार	४१
• 'शेठ'पणापलीकडचा माणूस : मा. रामशेठ ठाकूर	प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे	४४
• आदरणीय रामशेठजी ठाकूर	श्रीमती मीनाताई जगधने	४७
• दातृत्वाचा दीपस्तंभ	डॉ. विठ्ठल शिवणकर	५०
• राम ते लोकनेते रामशेठ ठाकूर	प्रा. प्रदीप बबन हिवरकर	५६
• रयतेचा आधारवड	प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर	६०
• ममत्व आणि दातृत्वाची कवचकुंडले लाभलेला लोकनेता : मा. खा. रामशेठ ठाकूर	प्रो.(डॉ.) अनिलकुमार वावरे	६३
• कर्मवीरांच्या स्वप्नातील विद्यापीठाचे हितचिंतक : मा. लोकनेते रामशेठ ठाकूर	प्रो.(डॉ.) विजय कुंभार	६८
• श्री. रामशेठ ठाकूर साहेब : शिक्षण क्षेत्रातील द्रष्टे नेते	प्राचार्य डॉ. सिध्देश्वर गडदे	७२
• ६२ वर्षांच्या ऋणानुबंधाच्या गाठी	श्री. वाय. टी. देशमुख	७६
• माणसे जोडणारी प्रयोगशाळा	प्रा. डी. ए. माने	८२
• कृतज्ञतेचा महामेरु : दानशूर आणि रयतनिष्ठ मा.लोकनेते रामशेठ ठाकूर	प्राचार्य डॉ. ए. सी. अत्तार	८५
• लोकनेते रामशेठ ठाकूर : सामाजिक बांधीलकी मानणारे यशस्वी उद्योजक	श्री. देववृत जाधव	८९
• शिक्षणविकासाचे उदार पुरस्कर्ते : लोकनेते मा.श्री.रामशेठ ठाकूर	प्राचार्य डॉ. वैशाली जाधव	९४
• शब्दाला जागणारे नेते : लोकनेते रामशेठ ठाकूर	सौ. सुनिता वाघमारे	९९
• मा.रामशेठ ठाकूर : परोपकार, कृतज्ञता आणि समाजसेवेचा आधुनिक कर्ण	प्रो. (डॉ.) भगवान लोकडे	१०१
• समाजरत्न ... रामशेठ ठाकूर	श्री. रघुराज मेटकरी	१०५
• सर्वसामान्यांचा आधारवड : लोकनेते, दानशूर रामशेठ ठाकूर	डॉ. अरुणकुमार सकटे	१०९
• समाजसेवेची बांधीलकी अन् मातीशी नाळ जपणारा दानशूर	प्रा. डॉ. राजेंद्र तांबिले	१११
• रयत युगातील कर्ण : रामशेठ साहेब	प्राचार्या सौ. मंगल पाटील	११४
• मी जवळून बघितलेले रामशेठ ठाकूर	श्री. राजेंद्र काकुळते	११७
• आपले साहित्यिक : लोकनेते रामशेठ ठाकूर	प्रो. (डॉ.) सुभाष वाघमारे	११९



रयत संस्कारातून घडलेला कल्पवृक्ष : मा. रामशेठ ठाकूर

श्री. चंद्रकांत दळवी IAS (Retd.)
चेअरमन, रयत शिक्षण संस्था, सातारा

महाराष्ट्राच्या सामाजिक, शैक्षणिक, औद्योगिक आणि राजकीय क्षेत्रात आपल्या दूरदर्शी नेतृत्वाने, कर्तृत्वाने आणि लोकाभिमुख कार्यशैलीने अढळ स्थान निर्माण करणारे ज्येष्ठ समाजसेवक, उद्योगपती आणि शिक्षणप्रेमी मा. रामशेठ ठाकूर हे आधुनिक महाराष्ट्राच्या विकासगाथेतील एक प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात. ग्रामीण भागातील सर्वसामान्य कुटुंबातून पुढे येत त्यांनी आपल्या अथक परिश्रम, दूरदृष्टी आणि समाजहिताच्या अखंड ध्यासाच्या बळावर विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान दिले आहे.

शिक्षण हेच समाजपरिवर्तनाचे एकमेव प्रभावी साधन आहे, या विचारावर त्यांची दृढ श्रद्धा राहिली आहे. याच भावनेतून त्यांनी शिक्षण क्षेत्राच्या उन्नतीसाठी सातत्याने कार्य केले. विशेषतः महाराष्ट्रातील सर्वसामान्य, ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांपर्यंत गुणवत्तापूर्ण शिक्षण पोहोचावे यासाठी त्यांनी विविध स्तरांवर महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. रयत शिक्षण संस्थेसारख्या अग्रगण्य शैक्षणिक संस्थेच्या कार्याला त्यांनी वेळोवेळी मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन दिले असून कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या 'स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद' या विचारधारेवर त्यांची निष्ठा राहिली असून संस्थेच्या शैक्षणिक, पायाभूत, भौतिक आणि गुणात्मक विकासासाठी त्यांनी दिलेले योगदान उल्लेखनीय आहे.

समाजातील असामान्य व्यक्तींचा जीवन प्रवास हा केवळ त्या व्यक्तींचा राहत नाही, तर तो एका संस्कार परंपरेचा किंवा एका सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीचा एक हुंकार होऊन जातो. लोकनेते मा. खा. रामशेठ ठाकूर साहेब हे असेच दुर्मीळ आणि विलक्षण व्यक्तिमत्त्वांपैकी एक आहेत. आजच्या भौतिकतावादी युगात संपत्ती मिळवणे हे यशाचे प्रतीक मानले जाते; परंतु संपत्ती कमावताना संवेदनशीलता जपणे, यशाच्या शिखरावर पोहोचल्यावरही माणुसकीचे भान टिकवून ठेवणे आणि समाजातील वंचित घटकांच्या उन्नतीसाठी आयुष्य समर्पित करणे, हे फार थोड्या लोकांच्या वाट्याला येते. रामशेठ ठाकूर यांचे जीवन हे अशाच विलक्षण समतोलाचे उदाहरण आहे. रायगड जिल्ह्यातील समुद्रकिनाऱ्यावर वसलेल्या न्हावाखाडी या छोट्याशा गावात त्यांचा जन्म झाला. समुद्राच्या भरती-ओहोटीशी झुंज देणारे, निसर्गाच्या अवकृपेशी सामना करणारे आणि उदरनिर्वाहासाठी संघर्ष करणारे हे गाव त्यांचे प्रेरणास्थान ठरले. प्रतिकूलतेने भरलेल्या त्या वातावरणाने त्यांच्या मनात कष्टाची, जिद्दीची आणि संघर्षाची बीजे रुजवली. अनेक वेळा स्थलांतर, दारिद्र्य, अस्थिरता आणि भविष्याबद्दलची अनिश्चितता अशा विदारक परिस्थितींमध्ये त्यांच्या बालमनाला घडवले. न्हावा खाडीतील फुटलेल्या बंधाऱ्याची कथा ही केवळ एका गावाची शोकांतिका नाही, ती रामशेठ ठाकूर यांच्या व्यक्तिमत्त्वाची पहिली शाळा आहे. समुद्राचे खारे पाणी जेव्हा गावात शिरले, शेती उद्ध्वस्त होणे आणि लोकांना गाव



सोडण्याची वेळ येते, तेव्हा एका बालकाच्या मनात जीवनाचा पहिला कठोर धडा कोरला जातो. संघर्ष टाळता येत नाही; परंतु संघर्षाला शरणही जाता कामा नये, हा जीवनमंत्र त्यांनी याच काळात आत्मसात केला.त्यांच्या वडिलांनी दिलेला एक संस्कार पुढे त्यांच्या संपूर्ण आयुष्याचा पाया ठरला. कष्टाने कमावलेली कोणतीही गोष्ट वाया जाऊ देऊ नकोस. हा संदेश केवळ आर्थिक काटकसरीचा नव्हता, तो मूल्यनिष्ठ जीवनाचा आधार होता म्हणूनच पुढे आयुष्यभर मिळालेली संपत्ती त्यांनी स्वतःसाठी नव्हे, तर समाजासाठी वापरण्याचा संकल्प केला.

गव्हाणच्या शाळेतील त्यांचे शिक्षण हा त्यांच्या जीवनातील दुसरा महत्त्वाचा टप्पा ठरला. त्या काळातील शिक्षक हे केवळ ज्ञानदाते नव्हते, ते चारित्र्यनिर्माते होते. वि. चा. म्हात्रे गुरुजी, सोलकर गुरुजी यांसारख्या ध्येयवादी शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या मनावर संस्कारांची बीजे पेरली. त्या काळात शिक्षण हे नोकरी मिळवण्याचे साधन नव्हते, ते व्यक्तिमत्त्व घडवण्याचे माध्यम होते. या शिक्षकांच्या सहवासातून रामशेठ ठाकूर यांच्या मनामध्ये शिक्षणाविषयी नितांत आदर निर्माण झाला. कुटुंबातील श्रमसंस्कार, शिक्षकांकडून मिळालेली मूल्यशिक्षणाची परंपरा आणि रयत शिक्षण संस्थेचा सामाजिक समतेचा विचार. या तिन्ही प्रवाहांचा संगम त्यांच्या जीवनात घडला आणि त्यातून एक सर्वस्पर्शी लोकनेता निर्माण झाला.

साताऱ्यातील छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील त्यांचा काळ हा त्यांच्या आयुष्याचा परिवर्तनबिंदू होता. 'कमवा आणि शिका' योजनेतून त्यांनी केवळ शिक्षण घेतले नाही, तर सामाजिक समतेचे तत्त्वज्ञान आत्मसात केले. विविध जाती-धर्मातील विद्यार्थ्यांसोबत राहून त्यांनी भारतीय समाजाच्या विविधतेचे सौंदर्य अनुभवले. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांचा प्रभाव त्यांच्या मनावर इतका खोलवर झाला, की पुढे आयुष्यभर त्यांनी शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन मानले. प्राचार्य बापूसाहेब उनउने, प्राचार्य आर. डी. गायकवाड यांसारख्या शिक्षकांनी त्यांच्या जीवनाला दिशा दिली. विशेषतः उनउने सरांकडून त्यांनी देण्याचा संस्कार घेतला. हे देणे केवळ आर्थिक नव्हते, तर विश्वासाचे आणि माणुसकीचेही होते म्हणूनच पुढे जेव्हा त्यांच्या आयुष्यात संपत्ती आली, तेव्हा त्यांनी ती समाजासाठी खर्च करण्यातच समाधान मानले. रामशेठ ठाकूर साहेबांच्या व्यक्तिमत्त्वाचे सर्वात महत्त्वाचे रूप म्हणजे त्यांचा शिक्षक ते उद्योजक हा प्रवास. सामान्यतः उद्योजकतेकडे वळल्यानंतर समाजकारण दुय्यम ठरते, परंतु त्यांच्या बाबतीत तसे झाले नाही. शिक्षकाची

संवेदनशीलता आणि उद्योजकाची दूरदृष्टी यांचा विलक्षण संगम त्यांच्या व्यक्तिमत्त्वात दिसून येतो.

सिडकोच्या माध्यमातून रायगड आणि नवी मुंबई परिसरात विकासाची नवी दालने खुली होत असताना त्यांनी विकास आणि स्थानिक समाज यांच्यातील दुवा म्हणून काम केले. विकासाच्या प्रक्रियेत स्थानिकांचा सहभाग असावा, त्यांना न्याय मिळावा आणि औद्योगिकीकरणाचा लाभ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचावा, ही त्यांची भूमिका होती. त्यामुळे त्यांचे कार्य केवळ आर्थिक विकासापुरते मर्यादित राहत नाही; ते लोकाभिमुख विकासाचे उदाहरण ठरते. त्यांच्या सामाजिक कार्याचा विचार करताना एक गोष्ट विशेषत्वाने जाणवते. त्यांनी दानाला कधीही प्रसिद्धीचे साधन बनवले नाही. त्यांच्या दारात येणारी कोणतीही गरजू व्यक्ती रिकाम्या हाताने परत जात नाही, ही जनमानसातील धारणा सहजपणे निर्माण झालेली नाही, तर त्यामागे अनेक दशकांचे निःस्वार्थ सेवा कार्य आहे.

रयत शिक्षण संस्थेशी असलेले त्यांचे नाते हे कृतज्ञतेच्या सर्वोच्च अभिव्यक्तीचे उदाहरण आहे. ज्या संस्थेने त्यांना घडवले, त्या संस्थेला त्यांनी कोट्यवधी रुपयांची मदत केली. पनवेल महाविद्यालयातील इमारती, सभागृहे, विविध शाखांचा विकास, ग्रामीण आणि आदिवासी भागातील शैक्षणिक सुविधांची उभारणी या सर्व कार्यातून त्यांनी शिक्षण क्षेत्राला नवे बळ दिले. विशेषतः मोखाड्यासारख्या दुर्गम आदिवासी भागातील महाविद्यालयासाठी त्यांनी केलेले कार्य सामाजिक न्यायाच्या संकल्पनेला प्रत्यक्ष आकार देणारे आहे. विकासाची फळे समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचली पाहिजेत, हा त्यांच्या विचाराचा गाभा आहे. रामशेठ ठाकूर साहेबांनी जनार्दन आत्माराम भगत शिक्षण संस्थेची स्थापना करून कोकणात शिक्षणाचा एक नवा दीप प्रज्वलित केला. गुणवत्तापूर्ण आणि मूल्याधिष्ठित शिक्षणाचा आदर्श त्यांनी उभा केला. त्यांच्या शैक्षणिक संस्थांनी हजारो विद्यार्थ्यांच्या आयुष्याला दिशा दिली आहे.

रयत शिक्षण संस्थेचा संख्यात्मक आणि गुणात्मक विकास हा मा. रामशेठ ठाकूर साहेब यांच्या जीवनकार्याचा अत्यंत जिव्हाळ्याचा आणि श्रद्धेचा विषय राहिला आहे. सन १९८९ मध्ये रायगड विभागाचे प्रतिनिधी या नात्याने संस्थेच्या जनरल बॉडीचे सदस्य म्हणून त्यांना कार्य करण्याची संधी मिळाली तेव्हापासून त्यांनी अखंडपणे संस्थेच्या सेवेमध्ये स्वतःचे जीवन समर्पित केले आहे. संस्थेच्या कार्यातच आपला आनंद आणि जीवनाचे सार्थक शोधणारे रामशेठ ठाकूर साहेब हे रयत परिवारातील एक समर्पित, दूरदर्शी आणि कर्तृत्ववान नेतृत्व म्हणून ओळखले जातात. सन १९९९ ते २००५ या कालखंडात रायगड विभागाचे विभागीय अध्यक्ष म्हणून कार्य करताना त्यांनी शिक्षणापासून वंचित असलेल्या गोरगरीब, शेतकरी, कामगार आणि बहुजन समाजातील विद्यार्थ्यांच्या चंद्रमौळी झोपडीपर्यंत ज्ञानाची गंगा पोहोचविण्याचे उल्लेखनीय कार्य केले. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या 'शिक्षणाद्वारे समाजोन्नती' या विचारांचा अवलंब करून त्यांनी आपल्या कृतीतून त्या तत्त्वज्ञानाला मूर्त स्वरूप दिले. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत संस्थेचे अध्यक्ष आदरणीय शरदरावजी पवार यांनी त्यांना सन २००५ मध्ये मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य, तसेच सन २००८ पासून एक्झिक्युटिव्ह कमिटीचे सदस्य म्हणून जबाबदारी दिली. या पदांवर त्यांनी आपल्या कार्याचा वेगळा वैचारिक ठसा निर्माण केला आहे. संस्थेच्या शैक्षणिक धोरणांची समीक्षा आणि अंमलबजावणीमध्ये त्यांची अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका राहिली आहे.

आदरणीय पवार साहेबांच्या दूरदृष्टीला आणि कर्मवीरांच्या विचारांना कृतीची जोड देत त्यांनी बहुजन



समाजातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उत्थानासाठी अविश्रांत परिश्रम घेतले. रयत शिक्षण संस्था हा त्यांच्या जीवनाचा श्वास बनला असून आजही ते संस्थेच्या प्रत्येक उपक्रमात तितक्याच निष्ठेने आणि उत्साहाने योगदान देतात. त्यांचे योगदान रयत परिवारासाठी प्रेरणादायी आणि अभिमानास्पद आहे. समाजजीवनाच्या प्रदीर्घ प्रवासात काही व्यक्तिमत्त्वे अशी उदयास येतात की त्यांचे कार्य अनेक पिढ्यांसाठी प्रेरणेचे दीपस्तंभ बनते. अशी माणसे स्वतःचे जीवन घडवताना समाजाचेही भविष्य घडवतात. त्यांचे जीवन हे केवळ यशोगाथा नसते, तर ते संघर्ष, मूल्यनिष्ठा, लोकसेवा आणि कर्तव्यपरायणतेचे जिवंत विद्यापीठ असते. लोकनेते मा. खा. रामशेठ ठाकूर साहेब हे अशाच दुर्मीळ आणि विलक्षण व्यक्तिमत्त्वांपैकी एक आहेत. रायगडच्या मातीतून उगवलेला हा असामान्य कर्तृत्वाचा वटवृक्ष आज महाराष्ट्राच्या सामाजिक, शैक्षणिक, औद्योगिक आणि लोकसेवेच्या विश्वात भव्यतेने उभा आहे. त्यांच्या जीवन प्रवाहाचा विचार करताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते. त्यांनी कधीही यशाला अंतिम ध्येय मानले नाही; उलट यशाला समाजसेवेचे साधन बनवले.

जागतिकीकरणाच्या वाऱ्यांनी देशाच्या आर्थिक धोरणांना नवी दिशा दिली होती. महाराष्ट्राच्या किनारपट्टीवर औद्योगिकीकरणाचे नवे पर्व सुरू होत होते. रायगड, ठाणे आणि पालघर परिसरात विकासाच्या असंख्य शक्यता निर्माण होत होत्या. सिडकोच्या माध्यमातून नवी मुंबईचा विस्तार घडत होता; परंतु विकासाच्या या प्रवाहासमोर स्थानिकांच्या प्रश्नांचे मोठे आव्हान उभे होते. भूमिपुत्रांच्या हक्कांसाठी आंदोलने सुरू होती. शासन आणि स्थानिक समाज यांच्यात विश्वासाचा अभाव होता. विकास आणि जनहित यांच्यातील संघर्ष तीव्र होत चालला होता. याच निर्णायक टप्प्यावर रामशेठ ठाकूर हे व्यक्तिमत्त्व पुढे आले. तेव्हा ते व्यावसायिक नव्हते; ते एक आदर्श शिक्षक होते. समाजात विश्वासार्हता आणि नैतिक अधिष्ठान असलेला तरुण म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली होती. शासन यंत्रणेला असा व्यक्ती हवा होता जो विकासाची भाषा आणि जनमानसाची वेदना दोन्ही समजू शकेल. ठाकूर साहेबांनी ही भूमिका स्वीकारली आणि एका नवीन पर्वाची सुरुवात झाली. ती एका नवीन युगाची नांदी होती. स्थानिकांचा विश्वास संपादन करताना त्यांनी विकासाची

दिशा दाखवली. भूमिपुत्रांच्या प्रश्नांना न्याय देत औद्योगिक प्रगतीचा मार्ग खुला केला. याच प्रक्रियेत त्यांना पहिला ठेका मिळाला. दहा हजार रुपयांचे ते काम आर्थिकदृष्ट्या लहान असले, तरी त्यातून घडलेला आत्मविश्वास मात्र अमूल्य होता.

संधी ओळखण्याची क्षमता हा रामशेठ ठाकूर यांच्या व्यक्तिमत्त्वातील एक विलक्षण गुण स्पष्ट दिसतो. अनेकांना परिस्थिती अडथळा वाटते; परंतु काही जण त्याच परिस्थितीत संधी शोधतात. ठाकूर साहेबांनी विकासाच्या प्रक्रियेत स्वतःचा मार्ग शोधला. शिक्षकाचा पगार ३४२ रुपये असताना एका कामातून अडीच हजार रुपयांचा नफा मिळणे हा आर्थिक टप्पा होता. हळूहळू त्यांनी उद्योगक्षेत्रात पाऊल टाकले. प्रामाणिकपणा, विश्वासार्हता, वेळेचे भान आणि कामाप्रती निष्ठा या गुणांमुळे ते यशस्वी उद्योजक म्हणून उदयास आले. अनेक प्रकल्प त्यांच्या नेतृत्वाखाली पूर्ण झाले. उद्योगांचा विस्तार झाला. संपत्ती निर्माण झाली; परंतु त्यांच्या जीवनातील सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे संपत्तीने त्यांच्या मनाचा ताबा कधीच घेतला नाही. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे मूल्यांकन करताना हे लक्षात घ्यावे लागेल, की त्यांनी उद्योगाला केवळ नफा कमावण्याचे साधन मानले नाही. उद्योग हा समाजपरिवर्तनाचा आधार बनू शकतो, हा त्यांचा दृष्टिकोन होता. त्यामुळेच उद्योग वाढत असताना समाजकारणही त्याच वेगाने वाढत गेले.

उत्पन्नातील ठरावीक हिस्सा समाजासाठी राखून ठेवण्याचा त्यांनी घेतलेला निर्णय हा सामाजिक उत्तरदायित्वाचा आदर्श नमुना आहे. आज कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटीची चर्चा होते; परंतु ठाकूर साहेबांनी अनेक दशकांपूर्वीच त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू केली होती. गरजू विद्यार्थ्यांना मदत, शालेय साहित्य वाटप, फी भरणे, गणवेश उपलब्ध करून देणे अशा उपक्रमांतून त्यांनी समाजातील वंचित घटकांना आधार दिला. त्यांच्या जीवनातील दुसरे महत्त्वाचे पर्व म्हणजे रयत शिक्षण संस्थेशी पुनर्भेट. साताऱ्याच्या मातीत ज्या संस्थेत त्यांनी शिक्षण घेतले, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला कर्मवीरांच्या विचारांनी आकार दिला, त्या संस्थेच्या विकासासाठी त्यांनी पुन्हा स्वतःला झोकून दिले.

प्राचार्य आर. डी. गायकवाड यांच्या माध्यमातून पनवेल महाविद्यालयाशी त्यांचा संबंध दृढ झाला. १९८९ मध्ये त्यांनी जनार्दन भगत पंत हॉल उभारून दिला. ही केवळ इमारत नव्हती, ती त्यांच्या कृतज्ञतेची मूर्त अभिव्यक्ती होती. पुढे १९९५ मध्ये आणखी एका भव्य इमारतीची उभारणी करून त्यांनी शिक्षण क्षेत्रातील आपली बांधीलकी अधोरेखित केली. रयत शिक्षण संस्थेच्या विविध समित्यांवर काम करताना त्यांनी दिलेल्या देणग्या हा भारतीय शिक्षण इतिहासातील उल्लेखनीय अध्याय आहे. ती एका व्यक्तीच्या शिक्षणावरील श्रद्धेची साक्ष आहे.

मोखाड्यासारख्या आदिवासी भागातील महाविद्यालयाचा विकास असो किंवा ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी सुविधा निर्माण करणे असो, ठाकूर साहेबांनी शिक्षणाला सामाजिक न्यायाचे साधन मानले. त्यांच्या दृष्टीने शिक्षण हे समाजातील विषमता कमी करण्याचे प्रभावी माध्यम होते. याच विचारातून जनार्दन आत्माराम भगत शिक्षण संस्थेची स्थापना झाली. कोकणात रयतच्या विचारांची नवीन पारंबी रोवण्याचा हा प्रयत्न होता. आज या संस्थेच्या विविध शाखा गुणवत्तेचे मानदंड ठरल्या आहेत. चांगू काना ठाकूर महाविद्यालयाचे A++ मानांकन असो किंवा त्याची स्वायत्त महाविद्यालय म्हणून ओळख असो, या सर्वामागे गुणवत्तापूर्ण शिक्षणावरील त्यांची निष्ठा दिसून येते. रामशेठ ठाकूर यांचे शैक्षणिक कार्य हे केवळ

संस्थाबांधणीपुरते मर्यादित नाही. त्यांनी शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाच्या व्यापक प्रक्रियेशी जोडले. ग्रामीण, आदिवासी आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देणे हे त्यांच्या कार्याचा केंद्रबिंदू राहिले.

मा.रामशेठ ठाकूर साहेबांविषयीची एक आठवण माझ्या मनाच्या गाभाऱ्यात कायमस्वरूपी कोरली गेली आहे. माझ्या निढळ या जन्मगावी असलेल्या संस्थेच्या हनुमान विद्यालयाचे रूपांतर आधुनिक तंत्रज्ञानसंपन्न, गुणवत्तापूर्ण आणि प्रेरणादायी शिक्षणकेंद्रामध्ये व्हावे, ही माझी अनेक वर्षांची मनोमन जपलेली इच्छा होती. त्या स्वप्नाला वास्तवाचे रूप देण्यात मा. रामशेठ ठाकूर साहेब यांचे योगदान अत्यंत मौलिक आणि अविस्मरणीय आहे. आज ही शाळा केवळ आकर्षक भित्तीचित्रांनी सजलेली वास्तू नाही, तर अत्याधुनिक इंटरॅक्टिव्ह पॅनल्स, सुसज्ज संगणक प्रयोगशाळा, रंगीबेरंगी आणि विद्यार्थीकेंद्री आसनव्यवस्था तसेच निसर्गाच्या सान्निध्यात वसलेले रमणीय परिसर यांमुळे ज्ञान, संस्कार आणि नवोपक्रम यांचे अद्वितीय केंद्र बनली आहे. याचा उद्घाटन सोहळा २०२३ मध्ये आदरणीय शरदरावजी पवार साहेब यांच्या हस्ते व्हावा, अशी माझी आणि निढळ ग्रामस्थांची मनस्वी इच्छा होती. सुदैवाने ती पूर्ण झाली.

उद्घाटनाच्या दिवशी सकाळीच मा. रामशेठ ठाकूर साहेब निढळ येथे आले. त्यांनी गावातील विविध विकासकामे, पाणलोट क्षेत्र, भौतिक आणि सामाजिक पायाभूत सुविधा यांची प्रत्यक्ष पाहणी केली. गेली चार दशके गावाच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या प्रयत्नांचे त्यांनी मनःपूर्वक कौतुक केले. त्याप्रसंगी आदरणीय शरद पवार साहेब माझ्या निवासस्थानी आले आणि संपूर्ण कार्यक्रम एका अविस्मरणीय आनंदसोहळ्यात परिवर्तित झाला.

हनुमान विद्यालयाच्या नूतनीकरण आणि आधुनिकीकरणामध्ये रामशेठ ठाकूर साहेबांनी दिलेल्या मोलाच्या पाठबळामुळेच आज ही शाळा सातारा जिल्ह्यापुरती मर्यादित न राहता संपूर्ण महाराष्ट्रातील आदर्श



शाळांपैकी एक म्हणून गौरवली जात आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना महानगरांतील विद्यार्थ्यांप्रमाणे उच्च दर्जाच्या शैक्षणिक आणि भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्याचे माझे स्वप्न साकार झाले, त्यामागे रामशेठ ठाकूर साहेब यांच्यासारख्या सहृदय, दूरदर्शी आणि शिक्षणप्रेमी व्यक्तिमत्त्वाची उदार साथ लाभली, हीच या यशाची खरी गुरुकिल्ली आहे. या सर्व स्मृतींना उजाळा देताना माझ्या मनात त्यांच्या विषयी केवळ कृतज्ञतेची, आदराची आणि ऋणानुबंधाची भावना दाटून येते. त्यांच्या सहकार्यामुळेच अनेकांच्या आयुष्यात ज्ञानाचा दीप प्रज्वलित झाला असून त्यांचे हे योगदान काळाच्या प्रवाहात सदैव स्मरणात राहील.



कोरोना महामारीच्या काळातील त्यांचे कार्य त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे सर्वोच्च शिखर मानावे लागेल. जेव्हा लाखो कामगार अन्न, निवारा आणि रोजगाराच्या संकटात सापडले होते, तेव्हा त्यांनी आपली संपत्ती लोककल्याणासाठी खुली केली. हजारो नव्हे, लाखो कुटुंबांना आधार देण्याचे कार्य त्यांनी केले. अशा संकटकाळात केलेली मदत ही दानधर्माची नव्हे, तर मानवी संवेदनशीलतेची सर्वोच्च अभिव्यक्ती असते. विशेष म्हणजे इतक्या मोठ्या कार्यानंतरही त्यांच्या वर्तनात अहंकाराचा लवलेश आढळत नाही. 'मी कर्तव्य म्हणून हे करतो', हे त्यांचे वाक्य त्यांच्या संपूर्ण जीवनतत्त्वज्ञानाचे सार आहे. समाजासाठी केलेले कार्य हे प्रसिद्धीसाठी नसते, तर ते अंतःकरणाच्या समाधानासाठी असते, या विचाराचे ते जिवंत उदाहरण आहेत.

आज महाराष्ट्राच्या सामाजिक आणि शैक्षणिक इतिहासाकडे पाहताना रामशेठ ठाकूर साहेबांचे कार्य एका वटवृक्षाप्रमाणे दिसते. त्या वटवृक्षाच्या सावलीत हजारो विद्यार्थी, शेकडो संस्था, असंख्य कुटुंबे आणि लाखो सर्वसामान्य नागरिक आश्रय घेत आहेत. त्यांच्या जीवनाचा अभ्यास केल्यावर एक गोष्ट स्पष्ट होते, ते केवळ यशस्वी उद्योजक नाहीत, केवळ लोकप्रतिनिधी नाहीत, केवळ शिक्षणप्रेमी नाहीत, तर ते आधुनिक महाराष्ट्रातील लोककल्याणाच्या परंपरेचे जिवंत प्रतीक आहेत. संपत्तीच्या शिखरावर उभे राहूनही ज्यांच्या अंतःकरणात करुणा आहे, सत्तेच्या केंद्रस्थानी राहूनही ज्यांच्या वर्तनात नम्रता आहे आणि यशाच्या सर्वोच्च टप्प्यावर पोहोचूनही ज्यांचे पाय मातीत घट्ट रोवलेले आहेत.

सामाजिक क्षेत्रातही मा. रामशेठ ठाकूर यांचे कार्य अत्यंत व्यापक आणि लोककल्याणकारी स्वरूपाचे आहे. समाजातील वंचित, दुर्बल आणि गरजू घटकांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी विविध शैक्षणिक, सामाजिक उपक्रम राबविले. आरोग्य, शिक्षण, महिला सक्षमीकरण आणि सांस्कृतिक संवर्धन या क्षेत्रांमध्ये त्यांनी केलेले कार्य समाजासाठी दिशादर्शक ठरत आहे. समाजातील विविध घटकांना एकत्र आणून विकासाच्या मुख्य प्रवाहात सहभागी करून घेण्याची त्यांची भूमिका नेहमीच महत्त्वपूर्ण राहिली आहे.

मा. रामशेठ ठाकूर यांचे व्यक्तिमत्त्व हे शिक्षण, समाजसेवा, राजकारण आणि उद्योग या चारही क्षेत्रांचा सुंदर संगम आहे. त्यांचे जीवनकार्य हे समाजहित आणि मूल्याधिष्ठित नेतृत्व यांचे प्रेरणादायी उदाहरण असून भावी पिढ्यांसाठी ते सदैव मार्गदर्शक आणि प्रेरणास्रोत राहील. त्यांच्या बहुआयामी योगदानाचा गौरव करणे म्हणजे समाजविकासाच्या एका उज्ज्वल परंपरेचा सन्मान होय.



मैत्र जीवांचे !

ॲड. भगीरथ शिंदे
व्हा.चेअरमन, रयत शिक्षण संस्था, सातारा

रामशेठ यांची यशोगाथा खूप मोठी आहे व ती सर्व व्यक्त करणे कोणालाही शक्य नाही. कारण रामशेठ यांच्या या यशोगाथेचे सूत्र समजणे मुळात अवघड आहे. रामशेठ हे अतिशय निर्मळ मनाचे आहेत. रामशेठ यांच्याकडे खूप वैभव आहे आणि असे सर्व वैभव असूनही त्यांचे चारित्र्य अतिशय संपन्न आहे. त्यांच्या संपूर्ण आयुष्यात त्यांच्या चारित्र्यावर कोठेही साधा ओरखडा दिसत नाही. रामशेठसारखा दानशूर माणूस अतिशय विरळ. रामशेठ राजकारणात कोठेही असले, तरी कर्मवीर अण्णांचे पुरोगामी संस्कार विद्यार्थीदशेपासून त्यांच्यावर झालेले असल्याने त्यांच्या बोलण्यात व आचरणात हा पुरोगामी विचार पदोपदी जाणवतो. रामशेठ राजकारणात अतिशय क्रियाशील होते; पण राजकारणात राहून त्यांनी समाजकारणच जास्त केले व करीत आहेत. त्यामुळे त्यांचे सामाजिक व कौटुंबिक नाते घराघरात तयार झाले आहे म्हणूनच ते खऱ्या अर्थाने लोकनेते आहेत. त्यांच्या याच समाजकारणामुळे त्यांची सर्व राजकीय पक्षांच्या लोकांशी मैत्री आहे आणि त्यांची ही मैत्री ही निखळ मैत्री आहे. रामशेठ यांनी रयतमध्ये शिक्षण घेतले आहे, त्याचे सामाजिक भान पदोपदी त्यांच्या आचरणातून दिसते. रामशेठ यांना गरिबीचा कधीही विसर पडलेला नाही.

रयतेचे गेल्या काही दशकांपासून ३ आधारस्तंभ आहेत. पहिला मा. शरद पवार साहेब व त्यांचा सर्व पवार परिवार. दुसरा रामशेठ ठाकूर साहेब व तिसरा पतंगराव कदम साहेब ! रयत वाढली, मोठी झाली. तिने समाजाला व महाराष्ट्राला खूप काही दिले आहे. त्यात या त्रिमूर्तीचे मोठे योगदान आहे व ही बाब कोणालाही विसरता येणार नाही. रामशेठ ठाकूर साहेब यांना राजकारण, समाज, शिक्षण व उद्योग क्षेत्रात अनेकांनी जवळून पाहिले आहे. त्यातही समाजकारणात, राजकारणात, शिक्षणक्षेत्रात ज्यांचे मोठे योगदान राहिले आहे ते स्व. दि. बा. पाटील, माजी मुख्यमंत्री बॅरिस्टर अंतुले, एन. डी. पाटील, विलासराव देशमुख, पतंगराव कदम, रावसाहेब शिंदे या सर्वांनी रामशेठ यांना जवळून पाहिले. ओळखले. स्वीकारले व खुल्या मनाने त्यांनी रामशेठ यांचे कौतुक केले आहे. परंतु या सर्वात जास्त मा. शरद पवार साहेब यांनी रामशेठ यांना जे जवळून पाहिले, ओळखले, स्वीकारले कौतुक केले; तितके कोणीही केले नाही. मा. शरद पवार साहेब व रामशेठ यांच्या राजकीय प्रवासात एक काँग्रेस पक्षाचा पाच एक वर्षांचा कालावधी सोडला, तर जेथे ते दोघेही एकत्र आणि एकाच पक्षात काम करीत होते. बाकी आयुष्यात दोघांचेही राजकीय पक्ष आणि राजकीय विचार वेगवेगळे होते व आहेत. असे असूनही मात्र रामशेठ साहेबांनी त्यांच्या जीवनात दोन गोष्टींमध्ये कोणतीच तडजोड स्वीकारली नाही. एक म्हणजे रयत शिक्षण संस्था व दुसरे म्हणजे मा. शरद पवार साहेब. रयत शिक्षण संस्था व मा. शरद पवार साहेब या दोघांचीही प्रतिमा खराब होईल, असे कोणतेही कृत्य रामशेठ यांनी स्वतः कधीही केलेले तर


नाहीच; परंतु इतर कोणीही असे कृत्य करू नये याची पदोपदी दक्षता व काळजी रामशेठ घेत असतात. यातून त्यांचे रयत शिक्षण संस्थेवर व मा. शरद पवार साहेब यांच्याविषयी असलेले प्रेम व आदर व्यक्त होतो. रामशेठ ठाकूर साहेबांच्या या विचारांचा महत्त्वाचा धागा म्हणजे रयतमध्ये ते विद्यार्थी म्हणून शिक्षण घेत असताना कर्मवीर अण्णांच्या विचारातून स्वीकारलेला पुरोगामी विचार. त्यामुळे रामशेठ साहेब आज राजकीयदृष्ट्या कोणत्याही पक्षात असले, तरी कर्मवीर भाऊराव पाटलांचा पुरोगामी विचार त्यांच्यात ठासून-ठासून भरला आहे व त्यामुळेच रामशेठ हे एक आगळेवेगळे व्यक्तिमत्त्व समाजात आपल्याला दिसत आहे. रामशेठ ठाकूर साहेब हे समाजात एकमेव असे रत्न आहे. की ज्यांनी अतिशय बिकट परिस्थितीत रयतमध्ये 'कमवा व शिका' या योजनेत शिकले, ते आजही रयतला विसरलेले नाहीत म्हणून रामशेठ हे देशात असे एकमेव व्यक्तिमत्त्व आहे की ज्यांनी रयत शिक्षण संस्थेला वेळोवेळी एकूण ११० कोटी रुपयांपेक्षा जास्त देणगी दिली आहे. म्हणून रयत शिक्षण संस्थेसाठी अलीकडच्या काळात सर्वात जास्त त्याग आणि त्यातही आर्थिक मदत रामशेठ यांनी केलेली आहे रामशेठ यांनी संस्थेसाठी जो त्याग व मदत केली व करीत आहेत, ते पाहून संस्थेच्या एकूण ४४ महाविद्यालयांपैकी एखाद्या महाविद्यालयास रामशेठ साहेबांचे नाव द्यावे, अशी सूचना व आग्रह पवार साहेब यांचा होता व ती जबाबदारी त्यांनी माझ्यावर सोपवली. त्या काळात संस्थेत काम करीत असताना मोखाडा कॉलेजच्या व्यवस्थापन कमिटीवर आम्ही दोघेही एकत्र काम करीत होतो आणि तेथे ते स्वतः ६७ कोटी रुपये खर्च करून त्या महाविद्यालयाच्या इमारतीचे बांधकाम करण्यासाठी मदत करीत होते म्हणून मी त्या महाविद्यालयाला रामशेठ यांचे नाव द्यायचे आहे, असे जेव्हा त्यांना सांगितले तेव्हा त्यांनी स्पष्ट शब्दांत त्यास



नकार दिला 'मी माझ्या नावासाठी 'रयत' मध्ये काम करीत नाही. कर्मवीर अण्णांसाठी हे सर्व करीत आहे,' असे त्यांनी सांगितले. अनेक प्रयत्न करूनही ते तयार होत नव्हते. शेवटी पवार साहेब यांना मी हा नकार सांगितल्यावर त्यांनीच रामशेठ यांना न विचारता मोखाडा कॉलेजला त्यांचे नाव देण्याचा निर्णय जाहीर केला. त्यामुळे मोखाडा कॉलेजच्या इमारतीचा व नामकरणाचा अतिशय दिमाखदार आणि मोठा सोहळा पवार साहेब व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला. रामशेठ यांचे रयतच्या अनेक शाखांसाठी मोठे योगदान आहे. परंतु त्यातही छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा व मोखाडा कॉलेजसाठी त्यांनी दिलेले योगदान कोणालाही विसरता येणार नाही. रामशेठ ठाकूर साहेब हे रयत शिक्षण संस्थेत 'कमवा व शिका' या योजनेतून शिकले. अतिशय गरीब परिस्थितीतून केवळ कर्मवीर अण्णांमुळे आपण शिक्षण घेऊ शकलो व आज जे आहोत ते केवळ रयत व कर्मवीर अण्णांमुळे आहोत हे ते कधीच विसरले नाहीत. त्यामुळे जातीपाती व राजकारणापलीकडे जाऊन गरीब माणसाला सातत्याने ते मदत करीत आले आहेत. ज्यांना खूप कौटुंबिक अडचण आहे, अशी शेकडो माणसे सकाळी दिवस उगवल्यापासून त्यांच्या दारात बसलेली असतात व रामशेठ प्रत्येकाला मदत करीत असतात. त्यामुळे ज्या माणसाने 'कमवा व शिका' या योजनेखाली खडी फोडण्यापासून अनेक कामे केली, तोच माणूस आज त्या खडीच्या ठिकाणी 'डॉलर' लोकांना व समाजाला दान करीत आहे. रामशेठ तन मन धनाने रयतमध्ये व त्यांच्या स्वतःच्या शैक्षणिक संस्थेत काम करतात. रामशेठ कोणालाही मदत करणारे आहेत. त्यामुळे ते घेणारे नसून देणारे आहेत ही त्यांची प्रतिमा समाजात उभी राहिली आहे. थोडक्यात रामशेठ हे तत्त्वनिष्ठा, चारित्र्यनिष्ठा, सामाजिक निष्ठा यांचा संगम आहेत. ते स्वतः नेहमी बोलतात, 'मी आज जो काही आहे तो रयतमुळे.' रामशेठ यांचा एक फार मोठा गुण आहे तो म्हणजे कोणत्याही कामात गुणवत्ता व दर्जा यात ते कोणतीही तडजोड स्वीकारत नाहीत. त्यांच्या कृतज्ञ जीवनाचे हे सार आहे. समाजात श्रीमंत लोक बरेच आहेत; पण पैशाच्या श्रीमंतीबरोबर मनाने श्रीमंत असणारे फार थोडे, त्यापैकी रामशेठ हे एक आहेत. कोणत्याही कामात समर्पित भावनेने काम करणे हा त्यांचा स्वभाव आहे. त्यामुळे रामशेठ व आमच्यात बंधुभावाचे नाते आहे. मोकळेपणाने ते नेहमी माझ्याशी नेहमी बोलत असतात. दानशूरपणाचा मानदंड म्हणून पाहावं असं त्यांचं व्यक्तिमत्त्व आहे. त्यांची माया अशीच रयतेवर व आपल्या सर्वांवर राहो, ही प्रार्थना.

('रामशेठ नाबाद ७५' ग्रंथातून साभार)





'रयत' के पास रामशेठ है...

डॉ. अनिल पाटील
संघटक, रयत शिक्षण संस्था, सातारा

स्वतःची शिक्षण संस्था नावारुपास आणली असताना, ज्या शाळेत व संस्थेत आपण शिकलो त्याचे काहीतरी देणे लागतो. या कृतज्ञतेच्या विचारावर व कर्मवीर अण्णांच्या त्यागाच्या भावनेवर माजी खासदार रामशेठ ठाकूर रयत शिक्षण संस्थेला भरभरून मदत करत आहेत. आज आम्हास कोणी विचारले रयत शिक्षण संस्थेजवळ काय आहे ? तर आम्ही अभिमानाने सांगतो 'रयत' के पास रामशेठ है । अशा दानशूर रामशेठ यांचा अमृत महोत्सवी वाढदिवस रयत शिक्षण संस्थेमार्फत साजरा केला जात आहे. ईश्वर त्यांना आरोग्यदायी जीवन देवो, हीच संस्थेकडून मनःपूर्वक शुभेच्छा !



रामशेठ ठाकूर कोट्यवधी रुपयांचे दातृत्व करूनही हवेत नसणारा माणूस, एवढे मोठे दान करुन ज्यांचे पाय जमिनीवरून कधीच सुटले नाहीत, त्यांनी कधीही मोठेपणा मिरवला नाही, उजव्या हाताने केलेले दान डाव्या हातालाही कळू दिले नाही, असा हा भला माणूस. या अजातशत्रू माणसाचे आणि रयत शिक्षण संस्थेचे वेगळे नाते आहे. १९६४ साली रामशेठ ठाकूर यांनी रयतच्या गव्हाण येथील हायस्कूलमध्ये शिक्षणास सुरुवात केली. 'कमवा आणि शिका' या योजनेत सातारा येथील शिवाजी कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. शिवाजी कॉलेजशी त्यांचे नाते १९६८ ला जडले ते आजपर्यंत कायम आहे. त्यांच्या गव्हाण या जन्मगावातील शाळेशी नाते नसेल, तेवढे ते सातारच्या शिवाजी कॉलेजशी जोडले गेले. पदवीनंतर त्यांनी बी.एड. केले व शिक्षक झाले. त्यानंतर व्यवसायात ते अप्रतिम यश मिळवत गेले, तरीही त्यांचे रयतशी नाते कायम राहिले. रामशेठ ठाकूर यांचे कार्यक्षेत्र असणारा रायगड हा रयत शिक्षण संस्थेचा लहान विभाग होता. रयतमध्ये पूर्वी रायगडला अंदमान मानले जात होते. कोणाला शिक्षा द्यायची असेल, तर त्याची बदली रायगडला केली जात असे. आज उलट परिस्थिती आहे. प्रत्येक जण रायगडच्या बदलीसाठी मागे लागतो. त्याचं कारण एकच, रामशेठ. तेथे रामशेठची सुरक्षितता असते, पाठबळ असते, नवीन काहीतरी करण्याची संधी मिळते. रयतचे ऑटोनॉमस कॉलेज होण्याचा मान मिळवला तो वाशी येथील कॉलेजने, रामशेठ यांच्या प्रयत्नामुळेच. रयतच्या

नावावर पेटंट मिळण्याची सुरुवात याच कॉलेजमधून झाली. जे निर्माण करायचे ते गुणवत्तादायक व दर्जेदारच ! हा रामशेठ यांचा आग्रह, त्यामुळेच रयतच्या इंग्रजी माध्यमाच्या शाळा गुणवत्तेत अग्रेसर आहेत. रयत शिक्षण संस्थेबरोबर त्यांची स्वतःची संस्थाही सुरू आहे. दोन्ही संस्थांच्या शैक्षणिक दर्जात त्यांनी अजिबात तडजोड केलेली नाही. म्हणूनच, दोन्ही संस्थांचे कॉलेज व इंग्रजी माध्यमाच्या शाळा लौकिकप्राप्त बनल्या आहेत. शिक्षणासाठी कर्मवीर अण्णांकडून समर्पण आणि त्याग हे गुण रामशेठनी घेतल्याचे अधोरेखित होत आहे.

शिक्षणाच्या खासगीकरणामुळे या क्षेत्राचा व्यवसाय बनला आहे. यात बदलत्या काळानुसार बदल करुन जो गुणवत्ता टिकवेल तोच टिकेल. बदलासाठी भांडवलाची आवश्यक्ता असते, नाहीतर शिक्षण संस्था मागे पडणारंच ! रयत शिक्षण संस्थेचे जाळे प्रामुख्याने ग्रामीण व दुर्गम भागात विस्तारले आहे. त्यामुळे या संस्थेत एखादा साधा बदल करायचे म्हटले तरी कोट्यवधी रुपयांची गरज लागते. शिक्षण संस्थेत मुलांना शिक्षणासाठी संगणक घ्यायचे हा विषय आला, त्यावेळी निधी कसा उभा करायचा यावर चर्चा सुरू होती. या प्रोजेक्टला १ कोटी रुपये लागणार होते. संस्थेची आर्थिक स्थिती एवढा मोठा निधी उपलब्ध करण्यासारखी नव्हती. १ मे च्या कार्यक्रमावेळी हा विषय अजेंड्यावर होता. बैठकीत आदरणीय शरद पवार साहेबांनी रामशेठ ठाकूर यांच्याकडे पाहून ''रामशेठ काय?'' असे विचारले. यावर रामशेठनी एक कोटी रुपये देण्याचे जाहीर केले. मोखाडा या आदिवासी भागातील कॉलेजचा नॅकचा प्रस्ताव प्रलंबित होता, तिथे तीन कोटी रुपये लागणार होते. पवार साहेबांनी, पवार चॅरिटेबल ट्रस्टकडून एक कोटी रुपये देतो सांगितले व रामशेठ यांच्याकडे पाहिले, रामशेठनी लगेच एक कोटी रुपये देऊ केले.

सातारा येथील शिवाजी कॉलेजची इमारत बांधण्याचे ठरले, तेव्हा रामशेठनी एक कोटी रुपये देतो, असे सांगितले. फक्त सांगितले नाही, तर स्वतःच्या देखरेखीखाली तेवढे बांधकाम पूर्ण करून घेतले व आणखी एखादा मजला वाढवण्याचे सुचवले. त्यावेळी आम्ही पैशांची अडचण असल्याचे सांगितले. त्यांनी आणखी एक कोटी देतो, असे सांगितले व दिले. त्यामुळे बांधकाम सुरू राहिले. पुन्हा एका महिन्यानंतर बांधकामाची पाहणी करण्यासाठी ते आले, ''अरे व्वा ! छान झालंय बांधकाम !'' अशी टिप्पणी केली. आता सगळेच बांधकाम पूर्ण करतो, असे सांगून शिवाजी कॉलेजसाठी त्यांनी चार कोटी रुपये खर्च केले. आज शिवाजी कॉलेजची सुंदर वास्तू उभी आहे, ती रामशेठ यांच्यामुळेच ! संस्थेनेही त्याला 'रामशेठ भवन' असे नाव दिलंय. 'जिथं मी शिकलोय, ते कॉलेज देशातलं सर्वोत्कृष्ट कॉलेज व्हावं,' ही रामशेठ यांची भावना निश्चितपणाने संस्थाही सार्थ करून दाखवेल. सहज बोलता-बोलता चणेफुटाणे वाटल्यासारखे ते निधी देतात. केवढं मोठं



दातृत्व त्यांच्याकडे आहे. संस्थेसाठी वाहून घेणारा रामशेठ ठाकूर सरळ आणि साधा माणूस आहे. कर्मवीर अण्णांच्या पश्चात संस्थेसाठी पूर्णपणे वाहून घेणारे हाताच्या बोटांवर मोजण्याएवढेच लोक आहेत, त्यात रामशेठ यांचं नाव अग्रणी आहे. मोठमोठे उद्योजक आपल्या कंपन्यांचा सीएसआर फंड आपल्याला हवा तसा वापरण्यासाठी फाउंडेशनची स्थापना करतात. मात्र, रामशेठ एकमेव अशी व्यक्ती आहे, ज्यांनी संस्थेला सीएसआर फंड दिला. मात्र, खर्ची टाकण्याचे सर्वाधिकार संस्थेस दिले. केवढे मोठे दातृत्व ! रामशेठ यांच्या या दातृत्वास सलाम !

संस्थेविषयी तळमळ कशी असते, याचा एक किस्सा... वाशी हायस्कूल हे शासनाकडून मिळालेले. त्यावेळी सीआरझेडचा नियम नव्हता. तो नंतर आला. नियमाच्या अधीन राहून काही रक्कम शासनाकडे भरायची होती. ती भरायची राहून गेली होती. काही कोटीत ती रक्कम असल्यामुळे संस्थेस भरणं शक्य नव्हतं. रक्कम भरली नसती, तर लिलावाची नामुष्की होती. कोणत्याही परिस्थितीत या प्रकरणास स्टे मिळवणं गरजेचं होतं आणि हे काम फक्त मुख्यमंत्रीच करू शकत होते. मुख्यमंत्र्यांच्या भेटीपासून ते स्टे मिळेपर्यंत रामशेठ अस्वस्थ होते. मुख्यमंत्र्यांची वेळ व भेटीसाठीचे सर्व सोपस्कार रामशेठनी पार पाडले. रामशेठ असल्यामुळे मुख्यमंत्र्यांनीही जागेवर स्टे देऊन टाकला. त्याक्षणी रामशेठ यांच्या चेहऱ्यावरील भाव, संस्थेविषयीची आस्था अधोरेखित करून गेले. यावरुन एकच सांगावेसे वाटते, संस्थेची अडचण ही आपली स्वतःचीच अडचण असे समजून रामशेठ संस्थेसोबत उभे राहतात. त्यांनी निर्माण केलेली संस्थाही नावारूपास आणली आहे. तेथील शिक्षण दर्जेदार असल्यामुळे प्रवेशासाठी प्रतीक्षा करावी लागते. नावलौकिकप्राप्त स्वतःची शिक्षण संस्था असताना, केवळ आपण शिक्षण घेतलेली संस्था व ग्रामीण भागात जाळे असल्यामुळे महाराष्ट्राच्या तळागाळात दर्जेदार उच्च शिक्षण पोहोचावे, ज्यांची विकत शिक्षण घेण्याची ऐपत नाही, अशी गरीब मुले शिक्षणापासून वंचित राहू नयेत, हीच भावना रामशेठ यांची स्पष्ट होते. अशा दानशूर माणसाला उत्तम आयुरारोग्य लाभो, संस्थेची शंभरी साजरी केली, तशी त्यांचीही शंभरी साजरी करण्याचे भाग्य संस्थेस मिळो ही सद्भावना !





माननीय रामशेठ ठाकूर : एक धनवंत योगी

श्री. विकास देशमुख IAS (Retd.)
सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा

माझ्या प्रशासकीय कारकिर्दीत मी अनेक लोक पाहिले. सर्व क्षेत्रातली आणि सर्व तऱ्हेची माणसं जवळून बघण्याची संधी मला मिळाली. स्वतःच्या व्यक्तिगत फायद्यासाठी वाट्टेल ते करण्याची तयारी असणारी महत्त्वाकांक्षी आणि आत्मकेंद्रित माणसांची संख्या आपल्या समाजात काही कमी नाही, हे सतत जाणवत होते. विशेषतः प्रशासनात काम करताना मोठमोठे उद्योगपती, राजकारणी, व्यावसायिक यांच्याशी सातत्याने संबंध येत असतोच. त्यामुळे या धनिक वर्गाचे जगणे, वागणे आणि व्यवहाराची पद्धत मला चांगलीच माहीत होती. आजूबाजूचे हे जीवन व्यवहार पाहिले, की नेहमी वाटत असे आपण ज्या महापुरुषांची नावे घेतो, ज्यांचे विचार भाषणांमधून अळवतो त्या माणसांचे आदर्शवादी जीवन कुठे, आणि आपल्या आजूबाजूला सुरू आहे ते सगळे कुठे! सत्तेचा लोभ, आर्थिक लाभासाठी सुरू असणारी अखंड धडपड, सतत गुणाकाराची गणिते आणि भावनाशून्य जगण्याची पद्धती. या सगळ्याचे नित्याचेच दर्शन होत असल्यामुळे 'माणसं अशीच असतात', अशी माझी भावना झाली होती. त्यामुळे माझा दृष्टिकोन धनिकांकडे किंवा श्रीमंतांकडे बघताना फारसा स्वच्छ नव्हता.

परंतु माझ्या प्रचंड मोठ्या जीवनपटावर माझी ही धारणा बदलणारी काही माणसे आली आणि मी खरोखरच हरखून गेलो. विशेषतः प्रशासकीय सेवेतून निवृत्त झाल्यानंतर माझे जीवन बरेचसे निवांत झाले होते. परंतु आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेबांनी अचानकपणे रयत शिक्षण संस्थेच्या सचिव पदाच्या जबाबदारीसाठी विचारले आणि आयुष्यात एका नव्या अध्यायाचे लेखन सुरू झाले. कारण प्रशासकीय सेवेतल्या जीवन अनुभवांनी काहीसे करपून गेलेले भावजीवन रयत शिक्षण संस्थेतील जबाबदारीच्या बरोबर पुन्हा नव्याने बहरून आले. 'रयत' म्हटले की ज्ञानयोगी बहुजन उद्धारक तीर्थरूप अण्णांचा एखाद्या तपस्वीसारख्या रुबाबदार, भलीमोठी दाढी असणारा चेहरा माझ्या मनपटलावर तरळून गेला. त्याबरोबर त्यांनी स्वतःच्या आयुष्याची माती करून त्या मातीतून बहुजन समाजाचे उत्थान करणाऱ्या पिढ्यानपिढ्यांची काढलेली पिके आठवली. निःस्वार्थ व त्यागपूर्ण जीवनाचा वस्तुपाठ म्हणजे कर्मवीरांचे चरित्र. महाराष्ट्राच्या शिक्षण व्यवहारातील एक तीर्थक्षेत्र म्हणजे रयत शिक्षण संस्था! माणूस म्हणून उन्नत झालेली उच्च दर्जाचा ध्येयवाद असणारी माणसे, जी स्वार्थाच्या, लोभाच्या आणि वैयक्तिक उत्कर्षाच्या पलीकडे विचार करतात अशांची ही संस्था आहे.

रयत शिक्षण संस्थेच्या सचिव पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर सचिव पदाच्या खुर्चीवर बसताना माझ्या अंगावर क्षणभर शहारे आले होते. कारण इस्माईलसाहेब मुल्ला यांच्यासारख्या त्यागी सत्पुरुषाने या खुर्चीवर बसून काम केले होते. कर्मवीर अण्णांचा खरा वारसा पुढे चालवला होता. मुल्ला साहेब काय किंवा बॅरिस्टर

पी.जी. पाटील काय किंवा शेतकऱ्यांचे कैवारी भाई एन. डी. पाटील काय! आभाळा एवढ्या माणसांची ही किती मोठी परंपरा म्हटली पाहिजे. आज ही माणसे हयात नाहीत. परंतु त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा सुगंध मात्र सर्वत्र दरवळत असतो. याच परंपरेतल्या एका नावाने मी मागे नमूद केले त्याप्रमाणे प्रशासकीय क्षेत्रातले माझे सगळे अनुभव बाजूला सारून माझ्या मनात विशेष घर केले, ते म्हणजे लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर साहेब.

ठाकूर साहेबांचे नाव मी प्रशासनात असतानादेखील अनेकदा ऐकले होते. काही छोट्या-मोठ्या कामांच्या निमित्ताने थोडाफार संपर्कही आला होता; परंतु खूप जवळून त्यांचे काम पाहता आले नव्हते. रयतच्या सचिव पदावर आल्यानंतर मात्र ठाकूर साहेबांचा आणि आमचा नित्याचाच सामना होऊ लागला. त्यांच्या दानशूरपणाबद्दल मी ऐकून होतो; पण रयतमध्ये आल्यानंतर प्रत्यक्ष त्यांच्या निःस्पृह वृत्तीचे दर्शन होत राहीले. अजूनही होत आहेच.



आज काळ खूप बदलला आहे. काळाबरोबर माणसं बदललेली आहेत. एखाद्याबद्दलची निष्ठा, कृतज्ञतेची भावना हे सर्व आता विरळ झाले आहे; पण असे असताना कधीकाळी आपण ज्या महाविद्यालयात शिकलो, त्या महाविद्यालयाबद्दल त्या संस्थेबद्दल आणि तिथल्या माणसांच्याबद्दल मनात जिव्हाळा ठेवून आयुष्याच्या संध्याकाळीदेखील कृतज्ञतेच्या भावनेने पुढे येत राहणे हे ठाकूर साहेबांचेमाझ्या बघण्यातील एकमेव उदाहरण आहे. अहो माझ्याच काय, वाचकांच्या बघण्यात तरी असे उदाहरण असेल का? रयत शिक्षण संस्थेविषयी ठाकूर साहेबांच्या मनात असणारा कृतज्ञतेचा हा निर्मळ झरा आयुष्यभर कधीही आटला नाही. इतकेच नव्हे, तर या झऱ्याला प्रेमाचा, मायेचा पूरच येत राहिला आहे.

रयत शिक्षण संस्थेशी ठाकूर साहेबांचे ऋणानुबंध कसे जुळले, ही एक रोमांचकारी कथा आहे. सुमारे अर्धशतकापेक्षा पूर्वीचा काळ. तत्कालीन कुलाबा जिल्ह्यातील पनवेल तालुक्यात समुद्रकिनाऱ्यावर वसलेल्या न्हावाखाडी या छोट्याशा गावात या गोष्टीची सुरुवात झाली. शतकानुशतके निसर्गावर अवलंबून असणारा आणि त्याच्यावर प्रेम करत स्वतःचा उदरनिर्वाह करणारा आगरी कोळी समाज, या समाजात ठाकूर साहेबांचा जन्म झाला. घरची परिस्थिती मोठी बेताची होती. अक्षर ओळखीचा प्रश्नच नव्हता. त्यात समुद्राच्या काठाला गाव असल्यामुळे भरती ओहोटी सुरू असायची. थोडीफार शेती होती आणि त्या जोडीला समुद्रातून रेती काढण्याचा जोडधंदा. समुद्राचे पाणी गावात येऊ नये म्हणून गावकऱ्यांनी एकत्र येऊन पूर्वीच्या पिढ्यांमध्ये एक मोठा बांध बांधला होता. काळाबरोबर त्या बांधावर पाण्याचा परिणाम होऊन तो फुटू लागला. गावकऱ्यांनी पुन्हा पुन्हा तो बांधून पाणी अडवण्याचा प्रयत्न केला. निसर्गासमोर माणसाचा टिकाव कसा लागेल? शेवटी तो बांध फुटला. समुद्राचे पाणी गावात शिरले. शेती पाण्याखाली गेली. माणसांच्या जगण्याचा प्रश्न निर्माण झाला.

शेवटी गाव अक्षरशः रिकामा होऊ लागला. अशा आणीबाणीच्या प्रसंगात ठाकूर कुटुंबाचे देखील मोठे हाल झाले.

घरातले शिकलेले नसतील, तरी शिक्षणाचे महत्त्व जाणणारे होते. त्यामुळे पारंपरिक व्यवसायात या लहानग्या रामला अडकवून ठेवण्यापेक्षा त्याची शाळा चालू राहिली पाहिजे याचा अट्टाहास वडिलांनी केला. शाळेसाठी भटकंती सुरू झाली. सुरुवातीला गावातल्याच शाळेत पहिलीत घातले होते. पुढे एका मामेभावाकडे माणगावला ठाकूर साहेबांना पाठवलं गेलं. काही काळ माणगावला राहिल्यानंतर त्या मावसभावाची बदली उणेगावला झाली. विंचवाचे बिऱ्हाड पुन्हा भावाबरोबर त्याच्या पाठीमागे फिरत राहिलं. शेवटी सगळीच परिस्थिती प्रतिकूल झाल्यानंतर पुन्हा न्हावा खाडीला येऊन रामने काही वर्ष काम केलं. शेवटी गाव सोडण्याचा निर्णय कुटुंबाने घेतला आणि ही सर्व मंडळी गव्हाणला आली. तिथे एका माळरानावर शिवाजीनगर नावाने वसाहत वसवून तिथे राहू लागली. गव्हाणच्या शाळेत ठाकूर साहेबांचे शिक्षण सुरू झाले. शेतीचे साधन हाताशी नसल्यामुळे ठाकूर साहेबांच्या वडिलांनी रेती व्यवसायावर पूर्ण लक्ष दिले होते. सुट्टीच्या काळात वडिलांबरोबर रेती काढण्यासाठी तेदेखील लहानपणापासून जात होते. कष्टाची जाणीव त्यांना होतीच. म्हणजे पन्नास-साठ वर्षांपूर्वीच्या त्या काळात भौतिक साधनांची वाणवा असताना देखील केवळ आंतरिक ऊर्मीने सर्व प्रकारच्या संकटांवर मात करून या छोट्या मुलाने शिक्षण घेतले. कुटुंबाची परिस्थिती ओळखून पडेल ती कामे केली. घरकामाला हातभार लावला. कष्टाला पर्याय नाही हेही त्यांनी ओळखले.

याच काळात रयत शिक्षण संस्था आपली पाळेमुळे कोकणापर्यंत घेऊन गेली होती. डॉ. एन. डी. पाटील साहेब स्वतः शिक्षण प्रसाराचे कार्य कोकणात व्हावे यासाठी संस्थेच्या माध्यमातून प्रयत्नशील होते. कोकणातील कर्त्या मंडळींची त्यांना साथ मिळत होती. त्या भागातली पहिली शाळा रयत शिक्षण संस्थेच्या वतीने उरण पनवेल विभागात सुरू झाली. या कामात जनार्दन भगत, दत्तूशेठ पाटील, दि. बा. पाटील अशा निष्ठावंत पुढाऱ्यांचा सहभाग होता. गव्हाणला संस्थेचे छत्रपती शिवाजी विद्यालय सुरू झाले. धर्मा ठाकूर नावाच्या एका कार्यकर्त्याच्या घरात वर्ग भरत होते. ठाकूर साहेब सातवी पास होऊन त्या शाळेत आठवीला गेले. या शाळेत त्यांचे पडलेले पाऊल केवळ शाळेशी नाते जोडणारे नव्हते तर सबंध रयत शिक्षण संस्थेची ठाकूर परिवाराशी जोडली जाणारी ती नाळ होती. कारण इथूनच दहावी, अकरावी पूर्ण करून ते पुढील शिक्षणासाठी साताऱ्याला आले.

त्या काळात पश्चिम महाराष्ट्र काही प्रमाणात पुढारलेला होता. त्यामुळे बहुतांश शिक्षक पश्चिम महाराष्ट्रातून कोकण भागात गेलेले असत. पगार नावाची गोष्ट आणि आज दिसणारा चंगळवाद त्या काळात नव्हता. शिक्षक तरीही निष्ठेने ज्ञानदान करत होते. ठाकूर साहेबांना पश्चिम महाराष्ट्रातल्या पाटील नावाच्या शिक्षकाने पुढील शिक्षणासाठी साताऱ्याला येण्याचा रस्ता दाखवला. स्वराज्याचे संस्थापक असणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने कर्मवीर अण्णांनी सुरू केलेल्या रयत शिक्षण संस्थेच्या पहिल्या कॉलेजमध्ये ऍडमिशन घेण्याचा मार्ग त्यांना दिसला. शिवाय जगप्रसिद्ध कमवा आणि शिका या योजनेचाही आधार त्यांना लाभला. पूर्वीच्या सात पिढ्यांमध्ये कोणीही शिक्षण घेतलेले नसताना शिक्षणाच्या ओढीने शेकडो मैल प्रवास करून अनोळख्या मुलखात येणाऱ्या राम ठाकूर या विद्यार्थ्यांचा आदर्श आजही विद्यार्थ्यांनी घेण्यासारखा आहे.

साताऱ्याला आल्यानंतर लोकशिक्षक बापूसाहेब उनउने हे प्राचार्य म्हणून ठाकूर साहेबांना लाभले. रयत

शिक्षण संस्थेची निष्ठावंत शिक्षकांची परंपरा इथे अधोरेखित होण्यासारखी आहे. कारण शिक्षण हे समाज परिवर्तनाचे आणि व्यक्तीच्या वर्तनातील परिवर्तनाचे साधन आहे असे केवळ म्हणून चालत नाही. प्रत्यक्ष आपल्या कृतीतून शिक्षकाला ते सिद्ध करावे लागते. त्या काळातल्या गोरगरीब विद्यार्थ्यांवर आईच्या मायेने प्रेम करणारे प्राचार्य बापूसाहेबांच्या सारखे आदर्श शिक्षक संस्थेत होते. जागृतीच्या प्रतीक्षेत असणाऱ्या बहुजन समाजाला अशी माणसे मिळणे त्या काळात खूप गरजेचे होते. ठाकूर साहेबांना ही बापूसाहेबांचे प्रेम मिळाले. एका परोपकारी शिक्षकाचे दर्शन त्यांना झाले. कर्मवीरांची विचारसरणी त्यांनी आत्मसात केली. जातीपातींचे भेद मनातून कायमचे हद्दपार झाले. मानवतेच्या निखळ विचाराने जीवन सुंदर झाले.

व्यावहारिक पातळीवर विचार केला तर ठाकूर साहेब फार काळ साताऱ्यात नव्हते; पण जेवढा वेळ त्यांनी साताऱ्यात घालवला त्या वेळात त्यांचे जीवन आरपार बदलून गेले. जीवनाची दिशा समजली. जगण्याचा अर्थ समजला. बहुजनवाद लक्षात आला. शिक्षणाचे महत्त्व पटले. समाज कल्याणाची मनोभूमिका तयार झाली. शिक्षण क्षेत्राविषयी मनात कमालीची आस्था निर्माण झाला. आपणही याच मार्गाने शिक्षक व्हावे, हे स्वप्न मनाशी पक्के करून ठाकूर साहेबांनी सातारा सोडला. पुढे त्यांनी विखे हायस्कूलमध्ये शिक्षकाची नोकरी स्वीकारली आणि उत्तम लोकशिक्षकाच्या भूमिकेत ते गेले.

याच काळात जागतिकीकरणाचे पडघम वाजू लागले होते. मुक्त अर्थव्यवस्थेचा स्वीकार होण्याची स्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे नवी मुंबई विकसित होत होती. रायगड, पनवेल भागामध्ये कमालीचे स्थित्यंतर होत होते. पण बदल स्वीकारण्याची मानसिकता भूमिपुत्रांची नव्हती. त्यामुळे येणाऱ्या प्रत्येक प्रकल्पाला त्यांचा टोकाचा विरोध होता. सिडकोची कामे त्या भागात सुरू झाली होती; परंतु पूर्णत्वास जात नव्हती. कारण कोकणात असणाऱ्या शेतकरी कामगार पक्षाच्या वर्चस्वामुळे भांडवली व्यवस्थेविरुद्ध तीव्र आंदोलने छेडली जात होती. या सगळ्यात या भागाचा विकास रखडला जात होता. समन्वय निर्माण करणे आवश्यक होते. विकासाचे महत्त्व स्थानिकांना पटवून देणे आणि न्याय भूमिकेतून आपला विकास करून घेणे गरजेचे आहे, याची जाणीव स्थानिकांमध्ये निर्माण करणे आवश्यक होते. स्थानिक आणि शासन यांच्यामध्ये समन्वयकाची महत्त्वाची जबाबदारी काळाबरोबर ठाकूर साहेबांकडे आली. त्यांचा शिक्षकी पेशा त्यासाठी कामी आला. कारण शिक्षकाचे लोक ऐकतात, म्हणून सिडकोचे अधिकारी ठाकूर साहेबांना गळ घालत. ठाकूर साहेब पुढे होऊन आपल्या लोकांची समजूत काढत आणि विकासाचे काम मार्गी लागे. या सगळ्या चक्रात अधिकाऱ्यांनी ठाकूर साहेबांकडेच काही कामे सोपवली. विशेषतः मातीचा बंधारा बांधण्याचे एक महत्त्वाचे काम



अधिकाऱ्यांकडून ठाकूर साहेबांना देण्यात आले. हे काम म्हणजे ठाकूर साहेबांच्या पिढ्यान पिढ्यांची परंपरा होती. त्यामुळे कमी खर्चात व कमी वेळात त्यांनी हे काम करून दाखवले. या कामात मोठा नफा मिळाला. हळूहळू अशी अनेक कामे त्यांच्याकडे येऊ लागली आणि ठाकूर साहेब मनापासून ती करू लागले. अखेर लोकाग्रहास्तव व अधिकाऱ्यांच्या सांगण्यावरून ठाकूर साहेबांनी उद्योग क्षेत्रात काम करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाबरोबर लोकशिक्षक राम ठाकूर यांचे लोकनेते रामशेठ ठाकूर झाले.

व्यवसाय व उद्योग इतका वाढला, की आज रोजी कोट्यवधी रुपयांची उलाढाल त्यांच्या कंपन्यांमधून होत असते. पण खरी गोष्ट इथेच आहे. उद्योग-व्यवसायाचा व्याप इतका प्रचंड वाढला, की यातून मान वर काढणेदेखील अशक्य असताना ठाकूर साहेब मात्र जमिनीला धरून राहिले. जनसामान्यांविषयी असणारी त्यांची तळमळ कमी झाली नाही. सत्ता-संपत्तीच्या हस्तिदंती मनोऱ्यात बसून खाली राहिलेल्या समाजाकडे तुच्छतेने बघण्याचा संकुचित विचार त्यांच्या मनाला कधीही शिवला नाही. उलट आपण केलेला प्रवास कुठल्या परिस्थितीतून कुठवर आला आहे, याची पूर्ण जाणीव त्यांनी ठेवली. जीवन प्रवासातल्या प्रत्येक थांब्यावर आणि तिथल्या माणसांमध्ये ते रमले. प्रत्येकाला हात देत राहिले. मातीशी असणारी नाळ तुटू दिली नाही. आपल्या माणसांमध्येच रमणे त्यांना अधिक प्रसन्नता देणारे वाटले. त्यांच्या जीवनात यशाने अक्षरशः पायघड्या अंथरल्या. तरीही ठाकूर साहेब नि:स्पृह वृत्तीने वागले. मोह, अहंकाराचा वारा त्यांना कधीही लागला नाही.

रयत शिक्षण संस्थेच्या कामामध्ये त्यांचे पदार्पण झाले ते पनवेल कॉलेजला त्यांनी बांधून दिलेल्या जनार्दन भगत पंत हॉलच्या माध्यमातून. कारण विद्यार्थीदशेत ठाकूर साहेबांना शिकवायला असणारे प्राचार्य आर. डी. गायकवाड पनवेल कॉलेजला बदलून आले होते. आपला विद्यार्थी मोठा झाला याचा त्यांना आनंद होता. या विद्यार्थ्याचा हातभार संस्थेला लागला पाहिजे यासाठी गायकवाड साहेबांनी त्यांना गळ घातली आणि तिथून आजअखेर ठाकूर साहेबांचा हातभार संस्थेला अखंडपणे लाभतो आहे.

रयत शिक्षण संस्थेवर प्रेम करणारी निष्ठावंत रयत सेवकांची कोकणातील पिढी वयोमानाने निवृत्त झाल्यानंतर रयतेवर प्रेम करणाऱ्या ठाकूर साहेबांना कोकणातून संस्थेचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली. ८७ सालापासून कर्मवीर अण्णांच्या जयंती आणि पुण्यतिथीच्या कार्यक्रमांना ठाकूर साहेब अखंडपणे येऊ



लागले. कोकण विभागाची जबाबदारी त्यांच्याकडे आली; पण ते केवळ कोकणाचेच राहिले असे नाही. साताऱ्याच्या त्यांची मातृसंस्था असणाऱ्या छत्रपती शिवाजी कॉलेजवर त्यांनी नितांत प्रेम केले. या महाविद्यालयाला काय हवे नको ते सर्व ते पाहत आले आहेत. आजदेखील कोट्यवधी रुपये खर्चून त्यांनी उभे केलेले 'लोकनेते रामशेठ ठाकूर भवन' छत्रपती शिवाजी कॉलेजच्या प्रांगणात दिमाखात उभे आहे.

ठाकूर साहेबांनी रयत शिक्षण संस्थेमधल्या किती शाळांना, महाविद्यालयांना आर्थिक मदत केली याची यादी काढली तर ती फार मोठी निघेल. कारण एखाद्या महाविद्यालयाचे नॅक पुनर्मूल्यांकन असेल आणि भौतिक सोयी सुविधांच्या उभारणीसाठी काही आर्थिक आवश्यकता असेल, तर प्राचार्य अगदी हक्काने व खात्रीने ठाकूर साहेबांकडे जातात. आणि मला निश्चितपणाने माहिती आहे, की त्यांच्याकडे गेलेला एकही माणूस मोकळ्या हाताने परत आलेला नाही. मोखाडा महाविद्यालयाच्या कायापालटामध्ये, तर ठाकूर साहेबांचा सिंहाचा वाटा आहे. दुर्गम भागात असणारे ते महाविद्यालय ठाकूर साहेबांच्यामुळे सक्षम आणि सर्व सोयी सुविधांनी परिपूर्ण झाले आहे. कोकणातील सर्व महाविद्यालये आणि शाळांमध्ये ठाकूर साहेबांच्या दूरदृष्टीतून प्रचंड बदल झाल्याचे मी स्वतः पाहिले आहे. पण आश्चर्य म्हणजे आपल्या घाटावर असणाऱ्या जावळी तालुक्यातल्या पवारवाडी सारख्या एका छोट्या खेड्यातल्या शाळेलासुद्धा ठाकूर साहेबांकडून लाखो रुपयांमध्ये मदत येणे, ही गोष्ट मला कुतूहलाची वाटते. कारण एका छोट्याशा खेडेगावातल्या छोट्याशा शाळेतला शिक्षकदेखील त्यांच्याकडून शाळेसाठी आर्थिक मदत विश्वासाने घेऊन येऊ शकतो, इतके जमिनीशी नाते जोडलेले ठाकूर साहेबांचे व्यक्तिमत्त्व आहे. इथे मध्यस्थाची किंवा ओळखीपाळखीची आवश्यकता नसते. समाजहिताचे काम करणाऱ्या कुठल्याही माणसाकडे ठाकूर साहेब आपलेपणाने पाहतात.

रयतच्या सचिव पदावर कामाचा प्रारंभ केल्यानंतर पहिल्या वर्षीच्या कर्मवीर अण्णांच्या पुण्यतिथी समारंभात ठाकूर साहेबांचा सत्कार करताना त्यांनी संस्थेला दिलेल्या देणगीचे आकडे ऐकून मी थक्क झालो होतो. कारण सव्वाशे कोटींपेक्षा जास्त रक्कम आजपर्यंत त्यांनी संस्थेला देणगी स्वरूपात दिली आहे. शिवाय शाळा महाविद्यालयांना परस्पर केलेल्या मदतीची गणतीच करायला नको. रयत शिक्षण संस्थेने नेमकं काय पेरलं आणि त्यातून कर्मवीरांना अपेक्षित असलेले फळ कसं आलं, याचं मूर्तिमंत उदाहरण म्हणजे ठाकूर साहेब आहेत. संस्था ऑफिसच्या शेजारी आणि आमच्या सचिव निवासस्थानाला लागून सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालयाने नव्या विस्तारित इमारतीचे भूमिपूजन केले. या समारंभाला ठाकूर साहेब स्वतः उपस्थित होते. त्यावेळी मला समजले, की त्यांनी या नव्या इमारतीच्या भूमिपूजनाप्रसंगीच चाळीस लाख रुपयांचा निधी महाविद्यालयाला दिला आहे.

मला वाटतं गेल्या ३० वर्षांहून अधिक काळ कर्मवीर अण्णांच्या जयंती आणि पुण्यतिथीचा एकही कार्यक्रम असा गेला नसेल, की ठाकूर साहेबांनी संस्थेसाठी काही आर्थिक मदत दिलेली नाही. दरवर्षी प्रत्येक कार्यक्रमाला त्यांची कोटींची पावती जणू काही ठरलेलीच असते. जणू काही महाभारतातल्या दानशूर कर्णाच्या कुळाचा आणि ठाकूर साहेबांच्या घराण्याचा काहीतरी ऐतिहासिक संदर्भ असावा असेच मला वाटत राहते. बरं, ही नि:स्वार्थ दानाची परंपरा ठाकूर साहेबांनी सुरू केली आणि त्यांच्या पर्यंतच थांबलेली आहे, असेही नाही. त्यांच्या पत्नी, दोन्ही चिरंजीव आमदार प्रशांत ठाकूर आणि परेश ठाकूर यांनीही संस्थेला स्वतंत्रपणे देणग्या द्यायला सुरुवात केल्यामुळे दानाची ही परंपरा अशीच पुढे सुरू राहणार आहे.

धनिणीच्या बागेतील वसतिगृह आणि शाळेला ठाकूर साहेबांनी एका जाहीर कार्यक्रमात थेट मदत जाहीर केली. ते बघून त्या कार्यक्रमाला उपस्थित असणाऱ्या कितीतरी मुख्याध्यापकांनी साहेबांना पत्रव्यवहार करून कामांसाठी आर्थिक मदतीची मागणी केली. या सर्व गोष्टींकडे मी फार बारकाईने पाहत होतो; परंतु खरोखरच हेवा वाटावा असे ठाकूर कुटुंबाचे जगणे आहे. माणसांसाठी जीव ओतणारी अशी माणसे समाजात खूप विरळ असतात.

ठाकूर साहेबांचे व्यक्तिमत्त्व मोठे विलक्षण आहे. ते मोठे उद्योगपती आहेत आणि आपल्या संस्थेला कोट्यवधी रुपयांच्या देणग्या त्यांनी दिल्या आहेत म्हणून त्यांचे मोठेपण आहे असे नाही. संस्थेविषयी त्यांना वाटणारी तळमळ. संस्थेच्या आधुनिकीकरणासाठी आम्ही राबवत असलेल्या प्रत्येक उपक्रमाच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहणे आणि मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य म्हणून अत्यंत संयमाने प्रत्येक प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी प्रयत्न करणे, ही त्यांची खासियत आहे.

कोकणच्या शैक्षणिक विकासासाठी त्यांनी स्वतःची एक शिक्षण संस्था स्थापन केली आहे; परंतु ते शिक्षण सम्राट झाले नाहीत. स्वतःच्या शिक्षण संस्थेबरोबरच त्यांनी रयत शिक्षण संस्था ही त्याच निष्ठेने आणि जिव्हाळ्याने जपली आहे. या दोन्ही संस्थांमध्ये त्यांनी कधी भेद केला नाही. सद्यस्थितीत शिक्षण संस्थाच काय, एक स्वतंत्र विद्यापीठ ते उभे करू शकतात; परंतु तसे न करता कर्मवीरांच्या वटवृक्षाला मायेने वाढवण्यावरच त्यांचा भर आहे. कर्मवीर अण्णांची समाधी हे त्यांचे तीर्थक्षेत्र बनले आहे. संस्थेसाठी ठाकूर साहेब म्हणजे कल्पतरू ठरले आहेत. संस्थेच्या सर्वांगीण विकासात त्यांचा असणारा वाटा खूप मोठा आणि वाखाणण्याजोगा आहे.

आजही संस्थेतील त्यांचा वावर लोकशिक्षकाच्या भूमिकेतूनच असतो. राजकारणात कोकणचे देश पातळीवर नेतृत्व करणाऱ्या आणि उद्योग व्यवसायात देशात अग्रभागी असणाऱ्या या माणसाला व्हीआयपी कल्चर आपल्या व्यक्तिगत जीवनात राबवावे असे कधीही वाटलेले नाही. उलट साधी राहणी आणि उच्च विचारसरणीचा त्यांच्यावर असणारा प्रभाव सतत जाणवत राहतो. संस्थेतील सर्वसामान्य विद्यार्थी देखील त्यांच्याशी मोकळेपणाने संवाद साधू शकतात. खरोखंरच श्रीमंत असूनही योग्याचे जीवन जगणाऱ्या या आभाळा एवढ्या माणसाच्या जीवननिष्ठेविषयी कृतज्ञता व्यक्त करावी तेवढी कमीच आहे. रामशेठ ठाकूर यांनी दीन दुबळ्यांच्या झोपड्यांमध्ये दिवा लावण्याचे काम केले आहे. सर्वसाधारण वर्गाला आधाराचा खांब म्हणून उभे राहून त्यांनी आपल्या जीवनात मानव्याचे अधिष्ठान जपले आहे.

खऱ्या अर्थाने या श्रीमंत योग्याचा सहवास आम्हाला आमचे जीवन समृद्ध करणारा वाटतो. आभाळाला भिडणारी उंची लाभलेल्या या वडीलधाऱ्या माणसाचे पाय मातीला धरून आहेत यापेक्षा मोठा आदर्श आमच्यासाठी कुठला असेल ?

ठाकूर साहेब तुम्ही दीर्घायुष्यी व्हा ! कारण आपण दीर्घायुष्यी असणे सबंध महाराष्ट्राच्या दृष्टीने हिताचे आहे. आपणास पुढील संपन्न जीवनासाठी लक्ष लक्ष शुभेच्छा !!



समाजकारण, शिक्षण आणि दातृत्वाचा महामेरु: मा. लोकनेते रामशेठ ठाकूर

डॉ. ज्ञानदेव म्हस्के
कुलगुरु, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ,
सातारा

शतेषु जायते शूर : सहस्त्रेषु च पण्डितः ।
वक्ता दशसहस्त्रेषु दाता भवती वा न वा ।।

याचा अर्थ असा की, शंभर व्यक्तींमध्ये एखादा शूर असू शकतो, हजारांमध्ये एखादा पंडित असू शकतो, दहा हजारांमध्ये एखादा वक्ता असू शकतो आणि लाखांत एखादा दाता असू शकतो. संस्कृत साहित्यातील हे प्रसिद्ध सुभाषित ज्या व्यक्तिमत्त्वाला अक्षरशः लागू पडते, ते नाव म्हणजे 'लोकनेते रामशेठ ठाकूर'. समाजकारण, शिक्षण, राजकारण, उद्योग आणि सार्वजनिक जीवन या सर्व क्षेत्रांमध्ये आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटविणाऱ्या रामशेठ ठाकूर यांचा जीवनप्रवास हा संघर्ष, जिद्द, कृतज्ञता, दातृत्व आणि लोकसेवेचा प्रेरणादायी इतिहास आहे. त्यांनी आयुष्यभर मिळविण्यापेक्षा समाजाला देण्यातच धन्यता मानली म्हणूनच जनमानसात ते केवळ यशस्वी उद्योजक किंवा माजी खासदार म्हणून नव्हे, तर दानशेठ म्हणूनही ओळखले जातात.

रामशेठ ठाकूर यांचा जन्म एका साध्या शेतकरी कुटुंबात झाला. त्यांच्या आई भागुबाई आणि वडील चांगू ठाकूर यांनी कष्ट, प्रामाणिकपणा आणि श्रमप्रतिष्ठा यांचे संस्कार त्यांच्यावर लहानपणापासून केले. आर्थिक परिस्थिती मर्यादित असली, तरी शिक्षण घेण्याची तीव्र इच्छा त्यांच्यामध्ये होती. याच जिद्दीच्या बळावर त्यांनी साताऱ्यातील रयत शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या 'कमवा आणि शिका' या योजनेत सहभागी होऊन आपले शिक्षण पूर्ण केले. या योजनेने त्यांना केवळ शिक्षणच दिले नाही, तर श्रमसंस्कार, स्वावलंबन आणि सामाजिक बांधीलकीची जाणीवही दिली. १९७२ मध्ये पदवी पूर्ण केल्यानंतर त्यांनी पनवेल येथील विठोबा खंडप्पा माध्यमिक विद्यालयात शिक्षक म्हणून कारकीर्द सुरू केली. शिक्षक म्हणून काम करत असतानाच त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील उद्यमशीलता अधिक प्रबळ होत गेली. १९७६ मध्ये त्यांनी बांधकाम व्यवसायात प्रवेश केला. कठोर परिश्रम, दूरदृष्टी, निर्णयक्षमता आणि व्यवहारातील पारदर्शकता यांच्या बळावर त्यांनी उद्योगक्षेत्रात स्वतःची आगळी-वेगळी ओळख निर्माण केली. या प्रवासात त्यांना पत्नी सौ. शकुंतला ठाकूर यांची खंबीर साथ लाभली. त्यांचा समाजाभिमुख विचारांचा आणि लोकसेवेचा वारसा आमदार प्रशांत ठाकूर व परेश ठाकूर आजही अविरतपणे पुढे नेत आहेत.

हजारो नागरिक आपल्या समस्या घेऊन रामशेठ यांच्या भेटीस येत असतात. मदतीसाठी आलेली व्यक्ती कधीही विन्मुख परत जाऊ नये, यासाठी त्यांचा नेहमीच कटाक्ष असतो. गरीब, शोषित, वंचित आणि गरजू घटकांना मदत करणे हीच खरी ईश्वरसेवा आहे, या भावनेने त्यांनी सामाजिक विकास मंडळाच्या माध्यमातून

आरोग्य, शिक्षण, महिला सक्षमीकरण, दिव्यांग कल्याण आणि युवक विकास अशा अनेक क्षेत्रांत आयुष्यभर उल्लेखनीय कार्य केले. कोविड-१९ महामारीच्या काळात रामशेठ ठाकूर यांनी लॉकडाऊनमुळे उपासमारीची वेळ आलेल्या हजारो कुटुंबांना अन्नधान्य, औषधे आणि जीवनावश्यक वस्तूंचे मोठ्या प्रमाणावर वितरण करून संकटाच्या काळात समाजासोबत खंबीरपणे उभे राहण्याचा वस्तुपाठ घालून दिला.

रामशेठ ठाकूर यांचा राजकीय प्रवासही प्रेरणादायी आहे. कोणताही राजकीय वारसा नसताना त्यांनी स्वतःच्या कार्यकर्तृत्वाच्या बळावर जनसामान्यांच्या पाठबळावर कुलाबा (रायगड) लोकसभा मतदारसंघाचे दोन वेळा प्रतिनिधित्व केले.

शिक्षणामुळेच स्वतःचे आयुष्य घडले, याची जाणीव असल्याने त्यांनी १९९२ मध्ये जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेची स्थापना केली. या संस्थेच्या माध्यमातून बालवाडीपासून ते पीएच.डी.पर्यंतचे शिक्षण देण्याची सोय उपलब्ध झाली आहे. सी.के.टी. महाविद्यालय, रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, भागुबाई ठाकूर लॉ कॉलेज, शकुंतला रामशेठ ठाकूर महाविद्यालय आणि इतर संस्थांमुळे हजारो विद्यार्थ्यांच्या आयुष्याला दिशा मिळत आहे.

रामशेठ ठाकूर यांच्या आयुष्यात रयत शिक्षण संस्थेला विशेष स्थान आहे. ज्या संस्थेने त्यांना घडवले, त्या संस्थेचे ऋण फेडण्याचा त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केला. ते रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडीचे सदस्य असून मॅनेजिंग आणि एक्झिक्युटिव्ह समितीचे सन्माननीय सदस्य आहेत. त्यांनी जेथे शिक्षण घेतले त्या गव्हाण येथील शाळेसाठी सुमारे पाच कोटी रुपये खर्च करून सुसज्ज शैक्षणिक इमारत आणि साताऱ्यातील छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये स्पर्धा परीक्षा आणि कौशल्य विकासासाठी अत्याधुनिक लोकनेते रामशेठ ठाकूर भवन उभारले. रयत शिक्षण संस्थेच्या विविध विभागांतील शाळा, महाविद्यालये आणि प्रकल्पांसाठी रामशेठ ठाकूर व त्यांच्या कुटुंबीयांनी १२५ कोटी रुपयांहून अधिक निधी दिला आहे, त्यामाध्यमातून संस्थेच्या अनेक शाखांचा कायापालट झाला. रामशेठ ठाकूर अनेकदा भावुक होऊन म्हणतात, ''मी रयतेचे लेकरू आहे. रयत माझी माऊली आणि श्रद्धास्थान आहे. कर्मवीर अण्णांनी मला जे दिले, ते शब्दांत सांगता येणार नाही.'' प्रत्येक वर्षी ९ मे रोजी साताऱ्यातील कर्मवीरांच्या समाधीस्थळी जाऊन अभिवादन करण्याची त्यांची परंपरा आजही कायम आहे. कर्मवीरांच्या समाधीवर डोके ठेवल्यानंतर मला नव्या उमेदीने कार्य करण्याची प्रेरणा मिळते, असे ते आवर्जून सांगतात. रयत शिक्षण संस्थेचे विद्यापीठ व्हावे, हे कर्मवीर भाऊराव पाटील यांचे स्वप्न होते. कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाची स्थापना होताच रामशेठ ठाकूर यांनी विद्यापीठासाठी पाच कोटी रुपयांची देणगी दिली. त्यांच्या योगदानाचा गौरव म्हणून विद्यापीठात लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या नावाने मानवी हक्क व सामाजिक न्याय अध्यासन स्थापन करण्यात आले आहे.

रामशेठ ठाकूर यांच्या दातृत्वामध्ये कधीही प्रसिद्धीची अपेक्षा किंवा अहंकार दिसून आलेला नाही. सत्ता, संपत्ती आणि प्रतिष्ठा मिळाल्यानंतरही त्यांचा साधेपणा कधी बदलला नाही. त्यांनी केलेली मदत ही केवळ आर्थिक नसून सामाजिक परिवर्तनाची चळवळ आहे. कर्मवीर भाऊराव पाटील, राजर्षी शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संत गाडगेबाबा यांच्या विचारांचा वारसा त्यांनी आपल्या कृतीतून जपला आहे. रामशेठ ठाकूर यांचे नाव समाजसेवा, दातृत्व आणि लोकाभिमुख नेतृत्वाचे प्रतीक बनले आहे. रयत शिक्षण संस्थेचा एक सामान्य विद्यार्थी, शिक्षक, उद्योजक, खासदार आणि समाजसेवेचा महामेरू असा त्यांचा प्रवास विलक्षण आहे. संघर्षातून उभे राहत समाजाला परत देण्याची भावना काय असते, याचे ते मूर्तिमंत

उदाहरण आहे.

लोकनेते रामशेठ ठाकूर आणि माझी पहिली भेट सन २००९ मध्ये झाली. रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलमध्ये त्यांच्यासोबत काम करण्याचे भाग्य मला लाभले. या काळात त्यांचे नेतृत्व आणि कर्तृत्व मला जवळून अनुभवता आले. असाच एक अविस्मरणीय प्रसंग म्हणजे, श्रीरामपूर येथील रावबहादूर नारायणराव बोरावके कॉलेजच्या काही इमारतींच्या उद्घाटनप्रसंगी त्यांना प्रमुख अतिथी म्हणून आमंत्रित केले होते. त्यांनी महाविद्यालयाला काही आर्थिक देणगी द्यावी, असा आम्हा संयोजकांपैकी कोणाचाही दूरदूरपर्यंत हेतू नव्हता. मात्र, कार्यक्रमाचा समारोप करताना माननीय रामशेठ यांनी आपल्या भाषणात महाविद्यालयासाठी चक्क दहा लक्ष रुपयांची घसघशीत देणगी जाहीर केली आणि आम्हा सर्वांनाच एक सुखद धक्का दिला. त्या काळात एखाद्या महाविद्यालयाला एवढी मोठी रक्कम देणगी म्हणून मिळणे ही बाब अचंबित करणारी होती. रामशेठ यांच्या दातृत्वाचा हा सिलसिला आजही अविरत सुरू आहे. आजपर्यंत त्यांनी देणगीचे नवनवीन विक्रम प्रस्थापित केले असून त्यांच्या या अनोख्या दानशूरतेने आम्हास नेहमीच विस्मयचकित केले आहे. रामशेठ ज्या ज्या ठिकाणी, कार्यक्रमाला जातात, त्या ठिकाणी काहीतरी मदत नक्कीच करतात. रिकाम्या हाताने ते कधीच परतले नाहीत. रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग व एक्झिक्युटिव्ह कौन्सिलमध्ये काम करताना सेवक आणि संस्था या दोन्ही घटकांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी रामशेठ सदैव सजग आणि तत्पर असतात, हे त्यांचे सर्वात मोठे वैशिष्ट्य आहे. त्यांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्ताने मी त्यांचे अभीष्टचिंतन करतो. समाजकारण, शिक्षणसेवा, लोकहित आणि दातृत्वाचा हा दीपस्तंभ पुढील पिढ्यांसाठी प्रेरणेचा अखंड स्रोत राहावा यासाठी मन:पूर्वक शुभेच्छा !!





ऋणानुबंध

प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे
सहसचिव (उच्च शिक्षण)
रयत शिक्षण संस्था, सातारा

रयत शिक्षण संस्था, छत्रपती शिवाजी कॉलेज आणि मा. रामशेठ ठाकूर साहेब यांचे ऋणानुबंध अतूट अशाच प्रकारचे आहेत. ''एखादा वारकरी आयुष्यभर विठ्ठलाच्या भेटीसाठी पंढरपूरची पायी वारी करतो, तासनतास रांगेत उभे राहून विठुरायाचे नामस्मरण करीत त्या ठिकाणचा अबीरबुक्का आपल्या ललाटी लावतो. यामधून त्या वारकऱ्याला जो निर्मळ आनंद मिळतो तोच आनंद छत्रपती शिवाजी कॉलेजच्या प्रांगणामध्ये आल्यानंतर मला मिळतो. छत्रपती शिवाजी कॉलेज म्हणजे माझ्यासाठी विठुरायाची पंढरीच आहे,'' अशी भावना मा. रामशेठ ठाकूरसाहेब यांनी अनेक वेळा बोलून दाखविली आहे. छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये येणारा विद्यार्थी हा शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी समाजातून येतो. अशा उपेक्षित समाजातील मुलांना शिक्षणाची संधी मिळावी यासाठी पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली, म्हणूनच बहुजन समाजातील गोरगरीब विद्यार्थी शिक्षणाच्या मुख्य प्रवाहामध्ये आला. ''कर्मवीरांच्या याच शैक्षणिक कार्याचा मी सुद्धा खरा लाभार्थी आहे. छत्रपती शिवाजी कॉलेजमधील 'कमवा आणि शिका योजना' नसती तर कदाचित मी सुद्धा कोठेतरी सर्वसामान्य नोकरी करीत जीवनाचा प्रवास केला असता. मात्र कर्मवीरांनी आपणास शिक्षणाची संधी दिली म्हणूनच आपले जीवन संपन्न आणि समृद्ध झाले,'' ही कृतार्थतेची आणि सामाजिक बांधीलकीची भावना ते नेहमीच व्यक्त करतात. छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये शिक्षणासाठी येणाऱ्या मुलांसाठी शैक्षणिक सुविधा निर्माण करताना त्यांना निखळ आनंद मिळतो. 'देतो तो देव आणि राखतो तो राक्षस' या उक्तीप्रमाणे अखंडपणे देत राहण्यात मिळणारा आनंद पैशापेक्षा कितीतरी पटीने मोठा आहे, या भावनेतून ते मदत करीत असतात.

आदरणीय लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे व्यक्तिमत्त्व आणि वैचारिक बैठक प्रा. डॉ. एन. डी. पाटील, माजी खा. दि. बा. पाटील अशा पुरोगामी विचारवंतांच्या वैचारिकतेवर तयार झाली आहे. संपूर्ण जीवनभर विचारांशी एकनिष्ठ राहून साहेबांनी शैक्षणिक, सामाजिक व औद्योगिक क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा एक वेगळा ठसा निर्माण केला. त्यांच्या वैचारिक परंपरेला साजेल असेच कर्तृत्व त्यांनी आयुष्यभर केले. त्यामुळे या मान्यवर व्यक्तींबद्दल जेव्हा जेव्हा कृतज्ञता व्यक्त करण्याचा प्रसंग त्यांच्या जीवनात आला तेव्हा-तेव्हा त्यांनी ही संधी कधीच सोडली नाही. एक दिवस मा. रामशेठ ठाकूरसाहेब यांचा मला फोन आला. त्यावेळी मी डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, औंध, पुणे याठिकाणी प्राचार्य म्हणून काम करीत होतो. आमच्यामध्ये असणारे ऋणानुबंध मध्यंतरीच्या काळात अधिक दृढ झाले होते. खरे तर साहेबांच्या एकूण कार्यातून प्रेरणा घेऊन मी त्या दिशेने गेली अनेक वर्षे वाटचाल करीत आहे. साहेब मला फोनवर म्हणाले, ''मेनकुदळे सर, मला तुम्हाला



भेटायचे आहे. माझे एक काम आहे''. मी साहेबांना म्हणालो, ''साहेब, तुम्हाला जेव्हा वेळ असेल तेव्हा मला सांगा मी वाशीला येऊन आपली भेट घेतो.'' दोन दिवसानंतर सी.के.टी. कॉलेज, नवी मुंबई याठिकाणी मी त्यांची भेट घेतली. त्यांनी येण्यापूर्वी माझे आवडते काम मला सांगितले होते. ते म्हणाले, ''डॉ.एन.डी.पाटील साहेब यांना जीवनगौरव पुरस्कार द्यायचा आहे. त्यासाठी मानपत्र तयार करा. वास्तविक पाहता एन.डी. सरांच्या नेतृत्वाचा, वक्तृत्वाचा आणि कर्तृत्वाचा ठसा माझ्या महाविद्यालयीन जीवनापासूनच माझ्यावर होता. त्यामुळे एन.डी.सरांच्या एकूण कार्याचा मी अनेकवेळा अभ्यास केला होता आणि त्यांच्या कर्तृत्वाबद्दल मानपत्र करण्यासारखी आणखी आनंददायी गोष्ट कोणती असू शकते ! मी अत्यंत अभ्यासपूर्ण आणि माझे संपूर्ण कौशल्य वापरून एन.डी. सरांच्याबद्दलचे मानपत्र तयार केले आणि सी.के.टी. कॉलेजवर गेल्यावर ते मानपत्र साहेबांना वाचून दाखविले. ते मानपत्र साहेबांना खूप आवडले. त्या मानपत्राबरोबरच एन.डी. सरांच्या जीवनकार्याचा आढावा घेणारा अत्यंत विस्तृत असा लेख मी तयार केला आणि तो साहेबांकडे सुपूर्त केला. त्यावेळी मा.रामशेठ ठाकूरसाहेब यांच्यासारख्या शैक्षणिक, सामाजिक, औद्योगिक, क्रीडा आणि राजकीय क्षेत्रात उत्तुंग कार्य केलेल्या साहेबांनी माझे केलेले आदरातिथ्य, केलेला पाहुणचार मला जीवनातील सर्वोत्कृष्ट आनंदाची अनुभूती देऊन गेला.

छत्रपती शिवाजी कॉलेजमधील स्पर्धा परीक्षा केंद्र हा ठाकूर साहेबांचा आणखी एक आस्थेचा विषय. त्या केंद्रासाठी त्यांनी दिलेली लाखो रुपयांची मदत चिरंतन लक्षात राहण्यासारखी आहे. आपल्याला शिकविण्यासाठी असलेले प्राचार्य उनउने सर असो, प्राचार्य मा. के. यादव सर असो किंवा प्राचार्य आर. डी. गायकवाड साहेब असो या सर्वच गुरुवर्यांविषयी कृतज्ञतेची भावना त्यांच्या अंत:करणात अखंड वास करीत असते. कर्मवीर भाऊराव पाटील आणि रयत माऊली सौ. लक्ष्मीबाई पाटील यांनी आपल्या वसतिगृहात येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यावर आई-वडिलांसारखे प्रेम केले. तेवढेच प्रेम वसतिगृहातील मुलांनी कर्मवीर अण्णा आणि सौ. वहिनी यांच्यावर केले. हे नाते जसे एखाद्या स्वच्छ पाण्यासारखे नितळ होते तसेच नाते मा. रामशेठ ठाकूर साहेबांनी वरील ऋषितुल्य गुरुवर्यांच्या संदर्भात जोपासले आहे. प्राचार्य उनउने यांच्या नावाने

महाविद्यालयामध्ये स्मृतिदालन उभा करण्याचा विषय आला, तेव्हा रामशेठ ठाकूर साहेबांनी मदत केली नसती तरच नवल! साहेबांनी लाखो रुपयांची मदत करून एक देखणे दालन उभे केले आहे.

रयतच्या विद्यार्थ्यांना पारंपरिक शिक्षणाबरोबरच व्यावसायिक शिक्षण, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे शिक्षण मिळाले पाहिजे, असा त्यांचा नेहमीच आग्रह असतो. छत्रपती शिवाजी कॉलेजमधील विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षण मिळावे यासाठी हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरिंग हा पदवी अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी त्यांनी केलेले मार्गदर्शन आणि त्यासाठी आवश्यक शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी केलेली आर्थिक मदत यामधूनच सर्व प्रकारच्या शैक्षणिक सुविधांनी सुसज्ज असे व्यवसाय शिक्षणाचे केंद्र उभे राहिले आहे. अशा प्रकारचे अनेक शैक्षणिक उपक्रम छत्रपती शिवाजी कॉलेजच्या प्रांगणामध्ये सुरू करण्यामध्ये मा. रामशेठ ठाकूर साहेब यांची भूमिका खूप मध्यवर्ती राहिली आहे. या महाविद्यालयास खूप मोठी ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. युगपुरुष छत्रपती शिवरायांच्या नावाने उभे राहिलेले हे महाविद्यालय महाराष्ट्राच्या शैक्षणिक प्रवासातील महत्त्वाचा टप्पा ठरले आहे. याच महाविद्यालयामध्ये ज्ञानाचे कण गोळा करून महाराष्ट्राच्या सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, साहित्यिक, क्रीडा, राजकीय, औद्योगिक, व्यावसायिक, प्रशासकीय अशा सर्वच क्षेत्रात उत्तुंग यश संपादन केलेल्या असंख्य व्यक्ती निर्माण झाल्या आहेत. याच कर्तृत्वसंपन्न व्यक्तींनी खऱ्या अर्थाने महाराष्ट्र घडविला. या संस्थेमध्ये उभे राहण्याची क्षमता छत्रपती शिवाजी कॉलेजने मला दिली म्हणून महाविद्यालयाच्या संख्यात्मक आणि गुणात्मक विकासासाठी केलेला हा प्रयत्न आहे. ही त्यांनी व्यक्त केलेली भावना रयत सेवकांना ऊर्जा देणारी आहे.

पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्यावर अढळ श्रध्दा ठेवून अखंड रयतेसाठी काम करणारे लोकनेते मा.रामशेठ ठाकूरसाहेब यांच्या भेटीचा पहिला प्रसंग तर माझ्या अंतःकरणात सुवर्णा अक्षरांनी लिहून ठेवावा एवढा अविस्मरणीय आणि विलोभनीय असा आहे. २०१४ चा तो दिवस आजही एखाद्या चलतचित्रपटाप्रमाणे माझ्या डोळयांसमोरून तरळतो आहे. छत्रपती शिवाजी कॉलेज हे रामशेठ ठाकूर साहेबांचे अत्यंत श्रध्देचे आणि जिव्हाळयाचे ठिकाण. त्यावेळी कॉलेजचे प्राचार्य डॉ.गणेश ठाकूर साहेब होते. तेव्हा मी याच महाविद्यालयात मराठी विभागप्रमुख म्हणून काम करत होतो. संस्थेचे कोणतेही काम अत्यंत जिव्हाळयाने करायचे हा माझा नेहमीचा स्वभाव. त्यामुळे प्राचार्य ठाकूर साहेबांनी आपल्या संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य आणि आपल्या महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी लोकनेते रामशेठ ठाकूरसाहेब कॉलेजला सदिच्छा भेट देण्यासाठी येणार आहेत, असा निरोप मला दिला. त्यापूर्वी मी रामशेठ ठाकूरसाहेबांविषयी खूप ऐकून होतो. त्यांची संस्थेवरील निष्ठा, रयत शिक्षण संस्थेस ज्ञानमंदिर समजत संस्थेसाठी तन, मन, धन अर्पण करून सेवा करण्याची वृत्ती, त्यांच्या दातृत्वाच्या कथा मी ऐकूण होतो. मी प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर यांना साहेबांचे स्वागत जंगी स्वरूपात करूया असे सुचविले सकाळी नऊची वेळ असेल, महाविद्यालयाच्या 'कमवा व शिका' योजनेतील विद्यार्थ्यांचे झांजपथक आम्ही कॉलेजच्या प्रांगणात बोलावून घेतले. गेटपासून प्राचार्य केबीनपर्यंत आमचे सर्व प्राध्यापक आणि विद्यार्थी यांच्या दुतर्फी रांगा उभ्या केल्या. रामशेठ ठाकूरसाहेब गेटवर आले. त्याठिकाणी त्यांना गाडीतून उतरण्याची आम्ही विनंती केली. गेटवरच बुके देऊन त्यांचे स्वागत केले आणि झांजपथकाच्या निनादात आणि प्राध्यापक, विद्यार्थ्यांच्या टाळ्यांच्या गजरात त्यांना कॉलेजच्या गेटपासून प्राचार्य केबीनपर्यंत अत्यंत उत्साही वातावरणात आम्ही घेऊन गेलो. माझ्या जीवनातील एवढा विलोभनीय प्रसंग मी कधीच अनुभवला नव्हता. मात्र आभाळाएवढी उंची असणाऱ्या या माणसाचे सामर्थ्य



त्यांच्या नम्रतेतच दिसून येते. प्राचार्यांच्या केबीनमध्ये आम्ही गेल्यानंतर प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर, मी स्वतः, आदरणीय रामशेठ ठाकूर आणि काही प्राध्यापक एकत्र बसलो होतो. प्राचार्य गणेश ठाकूर साहेबांनी माझा परिचय त्यांच्याशी करून दिला आणि तो परिचय करून देत असताना हे डॉ. शिवलिंग मेनकुदळे मराठी विषयाचे प्राध्यापक आहेत. त्यांचे लेखन आणि वक्तृत्व इतरांना मोह घालणारे आहे. अशा प्रकारची ओळख करून दिली. तेव्हा त्यांच्या मुखातून दोन शब्द बाहेर पडले ते आजही माझ्या कानात घोंगावतात. ते म्हणाले ''अहो, माझासुध्दा विषय मराठीच आहे, आम्ही दोघे एकाच विषयाचे आहोत, मला अशा माणसांविषयी विशेष जिव्हाळा आहे. सर, इकडे या, माझ्या जवळ बसा.'' त्यांनी मला बोलावून घेतले आणि त्यांच्याशेजारी असणाऱ्या खुर्चीवर बसवले. अत्यंत जिव्हाळयाने माझी विचारपूस केली. कौटुंबिक पार्श्वभूमी विचारली. माझे संपूर्ण शिक्षण कमवा आणि शिका योजनेतून झाले असे सांगितल्यावर. तेंव्हा त्यांनी माझ्या पाठीवर हात टाकून ''अरे वा ! आपण दोघे तर एकाच मार्गाचे प्रवाशी आहोत.'' या शब्दात माझा गौरव केला. आजपर्यंत अशा प्रकारचा सन्मान पाच मिनिटांच्या ओळखीवर मी कधीच अनुभवला नव्हता. त्या क्षणापासून लोकनेते रामशेठ ठाकूर साहेब हे माझे प्रेरणास्थान झाले. या प्रसंगी ते आणखी एक वाक्य बोलून गेले की ''एवढा मोठा स्वागताचा सोहळा करण्याची काहीही गरज नव्हती. मी अत्यंत साधा माणूस आहे. एवढेच नव्हे तर याच परिसरात मी ज्ञानाचे कण गोळा केलेत, त्यामुळे छत्रपती शिवाजी कॉलेजची भूमी ही माझ्यासाठी तीर्थक्षेत्र आहे. माझ्याच या ज्ञानभूमीत अशा स्वागताची गरज नव्हती.'' आम्ही त्यांना सांगितले, साहेब आपण रयत शिक्षण संस्थेमध्ये जो आदर्श निर्माण केला आहे. त्याबद्दलची ही कृतज्ञता आहे. हा सर्व प्रसंग आजही ठळकपणाने माझ्या डोळ्यांसमोर उभा राहतो.

याच छत्रपती शिवाजी कॉलेजच्या प्रांगणातील आणखी एक प्रसंग सांगितल्याशिवाय मला पुढे जाता येत नाही. आमच्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर हे संस्थेचे सचिव म्हणून कार्यरत होते. संस्थेच्या कामानिमित्त एक दिवस ते बाहेरगावी होते. सकाळी नऊ, साडेनऊची वेळ होती. मी कॉलेजच्या जाण्याच्या

तयारीत होतो. प्राचार्य गणेश ठाकूरसाहेबांचा फोन आला. आदरणीय रामशेठ ठाकूर साहेब कॉलेजवर येत आहेत. मी संस्थेच्या कामासाठी बाहेरगावी आलो आहे. तुम्ही तातडीने कॉलेजवर जा आणि तुम्ही त्यांचे स्वागत आणि चहापानाची व्यवस्था करा. मी तात्काळ तयार झालो आणि दहा मिनिटात मी कॉलेजवर जातानाच बुके घेऊन गेलो. काही वेळात साहेबांची गाडी छत्रपती शिवाजी कॉलेजच्या प्रांगणात आली. मी साहेबांचे स्वागत करण्यासाठी पुढे धावलो. 'साहेब, महाविद्यालयाच्या वतीने आपले मनःपूर्वक स्वागत' असे औपचारीक स्वागत करून मी त्यांना प्राचार्यांच्या केबीनकडे घेऊन गेले. मी त्याठिकाणी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. चहापान उरकल्यानंतर रामशेठ ठाकूरसाहेब मला म्हणाले,''सर, मला कॉलेजचे ग्रंथालय पाहायचे आहे. आपण ग्रंथालयाकडे जाऊन येऊया का?'' मी आमच्या महाविद्यालयाचे ग्रंथपाल शिवाजी लोखंडे यांना कल्पना दिली की आम्ही दोन मिनिटात ग्रंथालयात येत आहोत, माझ्यासोबत आदरणीय रामशेठ ठाकूरसाहेब आहेत याची कल्पना दिली, आम्ही जेव्हा ग्रंथालयात पोहोचलो, तेंव्हा ग्रंथालयामध्ये असणारी पुस्तकांची संख्या, त्याठिकाणी चालणारे कामकाज, शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील सर्वात मोठे ग्रंथालय म्हणून असणारा लौकीक, अत्यंत दुर्मीळ ग्रंथांचा असणारा संचय या सर्व घटकांची माहिती लोखंडे सरांनी आणि मी रामशेठ ठाकूर साहेबांना दिली. मी या ठिकाणी शिक्षण घेत होतो. त्याकाळातील ग्रंथालय आणि आजचे ग्रंथालय यामध्ये झालेला बदल त्यांनी आम्हाला सांगितला. कोणत्याही कॉलेजचे ग्रंथालय हा त्या कॉलेजचा आत्मा असतो. कॉलेजचे ग्रंथालय हे समृध्दच असायला पाहिजे. एवढे ग्रंथांवर प्रेम करणारे ठाकूरसाहेब मी पहिल्यांदा पाहिले. ग्रंथालय समृध्द होते मात्र त्याठिकाणी अपुऱ्या असणाऱ्या भौतिक सुविधा त्यांच्या नजरेतून सुटल्या नाहीत. संपूर्ण ग्रंथालय पाहून झाल्यानंतर त्यांनी स्पर्धा परीक्षेचे ग्रंथालय पाहण्याची इच्छा व्यक्त केली. आम्ही ते ग्रंथालय पाहण्यासाठी गेलो. पश्चिम महाराष्ट्रातील एक आदर्श स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र म्हणून याचा लौकिक पसरला होता. स्पर्धा परीक्षा केंद्राच्या ग्रंथालयात असणारी पुस्तके तेवढीच दुर्मीळ आणि उपयुक्त होती म्हणूनच या केंद्रातून शेकडो विद्यार्थी महाराष्ट्राच्या प्रशासकीय क्षेत्रात काम करत आहेत याचा मला अभिमान वाटतो अशा भावना त्यांनी याप्रसंगी व्यक्त केल्या. या ग्रंथालयाच्या पाहणीत तीन तासांचा वेळ कसा गेला हे आंम्हालाही कळाले नाही. या दोन्ही ग्रंथालयातून बाहेर पडताना रामशेठ ठाकूर साहेब मला म्हणाले,'' सर, या ग्रंथालयातील पुस्तके खूप महत्त्वाची आणि दुर्मीळ आहेत. या विद्यार्थ्यांना आणखी चांगल्या भौतिक सुविधा आपण दिल्या पाहिजेत. मी या दोन्ही ग्रंथालयांसाठी वीस लाख रूपये देतो. आपण ही ग्रंथालये आणखी चांगली करूया.'' प्राचार्यांच्या केबीनपर्यंत पोहोचलो तेंव्हा ते असे म्हणाले. ''सर, वीस लाखांऐवजी मी चाळीस लाख रूपये देतो.'' माझ्यासारख्या प्राध्यापकाच्या आनंदाला पारावार उरला नाही. माझ्या जीवनात एखाद्या व्यक्तीने शिक्षण क्षेत्रावर एवढी श्रध्दा ठेवून काम केलेले मी कधीच पाहिले नव्हते. हळूहळू आमच्या मधील ऋणानुबंध अधिक घट्ट होत गेले. एवढया प्रचंड मोठया उंचीच्या माणसाने माझ्यासारख्या प्राध्यापकाला नावानिशी ओळखणे ही खूप मोठी गोष्ट होती.

पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी गोरगरीब मुलांना उच्च शिक्षण मिळावे यासाठी छत्रपती शिवाजी कॉलेज या रयत शिक्षण संस्थेच्या पहिल्या महाविद्यालयाची स्थापना केली. त्यामुळे या महाविद्यालयास पश्चिम महाराष्ट्रात एक वेगळे स्थान आहे. या महाविद्यालयाने शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात गुणवत्तेचे अनेक उच्चांक निर्माण केले आहेत. या महाविद्यालयात शिक्षण घेऊन समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, साहित्यिक, औद्योगिक आणि राजकीय क्षेत्रात अनेक विद्यार्थ्यांनी आपला

लौकिक प्राप्त केला आहे. याच शृंखलेतील संस्थेवर आणि शिक्षण क्षेत्रावर श्रध्दा ठेवून काम करणारी एक कडी म्हणजे लोकनेते रामशेठ ठाकूर हे होय. २०१७ चा प्रसंग म्हणजे आपल्या मातृसंस्थेवर एखाद्या विद्यार्थ्यांची किती भक्ती असू शकते याचे एक उदाहरण आहे. छत्रपती शिवाजी कॉलेज सर्व तयारीनिशी नॅकच्या तिसऱ्या मूल्यांकनाला सामोरे जात होते. नॅक पिअर टिमच्या महाविद्यालय भेटीमध्ये लंच ऑन मिटींग होती. यामध्ये संस्थेचे प्रतिनिधी म्हणून रामशेठ ठाकूर उपस्थित होते. त्यांच्याबरोबर मा.आ. पतंगरावजी कदमसाहेब, मा.डॉ.अनिल पाटील साहेब ही मान्यवर मंडळी उपस्थित होती. लंच ऑन मिटींगच्या दरम्यान संस्थेचे शैक्षणिक कार्य, संस्थेने समाजासाठी दिलेले योगदान यासंदर्भात विस्ताराने चर्चा झाली. ही मिटींग संपल्यानंतर नॅक पिअर टीम माजी विद्यार्थी मेळाव्यासाठी निघून गेली आणि महाविद्यालयाचे प्राचार्य, मी आणि रामशेठ ठाकूर साहेब महाविद्यालयाच्या प्रांगणात सहज फिरण्यासाठी गेलो. तेव्हा साहेबांना एक उणीव जाणवली आणि ती त्यांनी बोलून दाखविली. रामशेठ ठाकूरसाहेब म्हणाले, ''आपले महाविद्यालयाचे स्पर्धा परीक्षा केंद्र एवढया चांगल्या पध्दतीने आपण चालवतो आहे, तर या विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या भौतिक सुविधा आपण दिल्या पाहिजेत. चांगले लेक्चर हॉल, समृध्द ग्रंथालय, उत्कृष्ट दर्जाची अभ्यासिका आणि तज्ज्ञ मार्गदर्शक हे या विद्यार्थ्यांना देणे आपले काम आहे. तुम्ही असे करा, महाविद्यालयाच्या परिसरात ज्याठिकाणी मोकळी जागा आहे, त्याठिकाणी चांगल्या इमारतीचे नियोजन करा, मी त्यासाठी रूपये ऐंशी लाख देतो.'' नियोजन करत असताना पाच मजली इमारतीचे नियोजन करूया. हळूहळू त्या इमारतीचा विस्तार करता येईल, असे नियोजन केले. मा.रामशेठ ठाकूर साहेब यांच्यापुढे आम्ही त्या इमारतीचे बजेट आणि डिझायनिंग ठेवले. ते डिझायनींग पाहिल्याबरोबर साहेबांनी यासाठी १ कोटी ८० लाख देण्याचे जाहीर केले. आपणास विशेष आश्चर्य वाटेल. प्रत्यक्ष त्या इमारतीच्या पायाभरणीसाठी आम्ही जेव्हा एकत्र आलो. तेव्हा प्राचार्यांनी मा. रामशेठ ठाकूर यांना बांधकामाचे नियोजन सांगितले, आम्ही या एकूण डिझायनिंग मधील अर्धीच पूर्ण करणार आहोत. भविष्यात जसजसे पैसे येतील तसे आम्ही ती पूर्ण करणार आहोत. हे ऐकताच या महान दानशूर व्यक्तीने सहजपणे सांगून टाकले, ''सर, इमारत अशी अर्धवट बांधू नका, या इमारतीसाठी जेवढा खर्च येईल तो खर्च मी देईल''. या इमारतीचे एकूण बजेट सुमारे सहा कोटी रू. झाले. एका वर्षात ही टोलेजंग इमारत उभी राहिली. छत्रपती शिवाजी कॉलेजच्या वैभवात भर टाकणारी आणि विद्यार्थ्यांना सर्वोत्कृष्ट दर्जाच्या भौतिक सुविधा देणारी इमारत एका वर्षात पूर्ण झाली. एका हाताने दिलेले दान दुसऱ्या हातालासुध्दा कळू नये. इतक्या सहजतेने या इमारतीचा कोट्यवधी रूपयांचा खर्च ठाकूर साहेबांनी लीलया केला. आज त्या इमारतीमध्ये मीडिया आणि एंटरटेनमेंट आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सर्वोत्कृष्ट सुविधा पुरविण्यात आली आहे. त्यांच्याबद्दलची कृतज्ञता म्हणून त्यांची इच्छा नसताना आणि नाव देण्यासाठी त्यांचा विरोध असताना सुध्दा संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलने या इमारतीस 'लोकनेते मा. रामशेठ ठाकूर भवन' असे नाव देण्याचा ठराव केला. आज सातारा शहरातील आणि रयत शिक्षण संस्थेच्या अनेक महाविद्यालयांपैकी एक उत्तम दर्जाचे महाविद्यालय म्हणून छत्रपती शिवाजी कॉलेजकडे पाहिले जाते. याचे श्रेय रामशेठ ठाकूरसाहेब यांना दिले तर ते अनुचित होणार नाही.

या दरम्यानच्या कालखंडात मा. रामशेठ ठाकूरसाहेब यांचा अनेकवेळा सहवास मिळाला. त्यांचे शैक्षणिक विचार ऐकावयास मिळाले, मानवी जीवनात नेमका आनंद कशात असतो याचा अर्थ मला कळाला. एकदा साहेबांना मी प्रश्न केला, ''साहेब ! आपण एवढया उदार मनाने संस्थेच्या अनेक शाखांना आर्थिक मदतीसह सर्व प्रकारची मदत करत असता, याचे नेमके गमक काय आहे ? त्यावर साहेबांनी दिलेले उत्तर अत्यंत मार्मिक

होते.''ते म्हणाले, ''ज्या समाजाने आपल्याला घडवले. आपल्यावर चांगले संस्कार केले, त्या समाजाचे आपण काही देणे लागतो. या जन्मात आपण जे कमवतो, ते अत्यंत निष्ठेने, प्रामाणिकपणे आणि कष्टाने कमवतो. त्यावर या समाजाचासुध्दा अधिकार आहे. ज्या संस्थेने माझ्यावर ज्ञानाचे संस्कार केले. याच ज्ञानाच्या शिदोरीवर मी शिक्षक झालो. उद्योग आणि व्यवसाय क्षेत्रात पदार्पन केले आणि माझ्या प्रामाणिकपणाच्या सामर्थ्यावर खूप काही मिळाले. या संस्थेने मला जे काही दिले त्या संस्थेसाठी सढळ हाताने देण्यात आणि दुसऱ्याच्या चेहऱ्यावर आनंद शोधण्यात मला आनंद प्राप्त होतो. हेच माझ्या जगण्याचे गमक आहे. म्हणून मला मिळणाऱ्या पैशापैकी जेवढे म्हणून देता येतील तेवढे देण्यात मला आनंद वाटतो.''

मा. रामशेठ ठाकूर साहेबांसारख्या असामान्य व्यक्ती सोबत माझ्या जीवनातील काही वेळ मला घालविता आला. यासारखं दुसरं भाग्य कोणतं असू शकतं? खरं तर मी अत्यंत सामान्य कुटुंबातील विद्यार्थी रयत शिक्षण संस्थेतील कमवा व शिका योजनेमुळे शिकू शकलो. याच संस्थेने मला प्राध्यापक म्हणून सेवा करण्याची संधी उपलब्ध करून दिली. एवढेच नव्हे तर संस्थेचे लाईफ वर्कर, मेंबर, प्राचार्य, मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य, संस्थेचे ऑडिटर, सहसचिव अशा विविध पदांवर काम करण्याची संधी दिली. ज्या सभागृहामध्ये खूप कर्तृत्वसंपन्न माणसांनी संस्थेला एक वैचारिक दिशा दिली. त्यामध्ये लोकनेते रामशेठ ठाकूरसाहेब यांनी मांडलेले विचार ऐकण्याची आणि त्याप्रमाणे कृती करण्याची संधी मला मिळाली. यासारखे दुसरे कोणतेही चांगले भाग्य असू शकत नाही. ठाकूरसाहेबांच्या शैक्षणिक कार्याला माझा अंतःकरणपूर्वक सलाम !





मूर्तिमंत दातृत्व : लोकनेते रामशेठ ठाकूर

श्री. बंडू पवार
सहसचिव (माध्यमिक)
रयत शिक्षण संस्था, सातारा

समाजातील, दीनदलित गरजूंना शिक्षणाच्या प्रवाहामध्ये आणून त्यांचं जगणं सुसह्य करण्यासाठी कर्मवीर भाऊराव पाटील यानी जी वैचारिक भूमिका मांडली कायम राहिली. आज रयत शिक्षण संस्थेला १०७ वर्षे पूर्ण झाली आहेत या काळात कर्मवीरांना अनेक रयत सारथी यांनी मदत केली. यामध्ये रामशेठ ठाकूर यांचे नाव आवर्जून घ्यावे लागेल. संस्थेच्या १०७ वर्षांच्या काळात लोकनेते रामशेठ हे खऱ्या अर्थाने दातृत्वाचा दीपस्तंभ आहेत याचा सर्व रयत सेवकांना मनापासून अभिमान आहे. रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांचा, कार्याचा प्रचंड प्रभाव लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यावर आहे.

रामशेठ यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण हे अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत पूर्ण झाले. त्यांनी माध्यमिक शिक्षण रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण शाखेमध्ये पूर्ण केले. त्यानंतर उच्च शिक्षणासाठी १९६८ ते ७२ या कालखंडात छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा या ठिकाणी त्यांनी प्रवेश घेतला होता. अगदी प्रारंभिक काळापासूनच फुले-शाहू-आंबेडकर यांचा वसा आणि वारसा त्यांनी आपल्या भूमिकेतून जपला. रयत संस्कृती खऱ्या अर्थाने किती उच्च आणि कृतिशील आहे, हे रामशेठ यांच्या कर्तृत्वातून दिसून येते. आजअखेर कोट्यवधी रुपये त्यांनी रयत शिक्षण संस्थेच्या पायाभूत सुविधांसाठी विविध शाखांना देणगी म्हणून दिलेत. अत्यंत नम्र आणि उदार असलेला असा हा भला माणूस रयतेचा एक खऱ्या अर्थाने आधारस्तंभ आहे.

छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा या ठिकाणी ठाकूरसाहेबांनी दिलेल्या कोट्यवधी रुपयाच्या देणग्यातून सुसज्ज कॅम्पस तयार केला. संस्थेने लोकनेते रामशेठ ठाकूर भवन असे त्या वास्तूला नाव दिले. आज यू.पी.एस.सी. व एम.पी.एस.सी. परीक्षांची तयारी करण्यासाठी ग्रामीण भागातून विद्यार्थी या ठिकाणी येतात आणि मार्गदर्शन घेतात. खऱ्या अर्थाने ग्रामीण भागाचा स्तर उंचवायचा असेल, तर त्या भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण व दर्जेदार शिक्षण प्रदान करता आले पाहिजे, हा विचार रामशेठ यांनी जपला. आपल्याला आलेल्या अडचणी शेतकरी, कामगार, मजुरांच्या वाट्याला येऊ नये म्हणून त्यांनी रयत शिक्षण संस्थेच्याच नव्हे, तर महाराष्ट्राच्या इतर जिल्ह्यातही इतर संस्थांच्याही शाळा, महाविद्यालयांना भरघोस मदत जाहीर केली. आदिवासी, कामगार, मजूर यांचे जीवन समृद्ध व संपन्न व्हावे यासाठी आजही ते कार्यरत आहेत.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी बांधकाम क्षेत्रामध्ये ठाकूर इन्फ्रास्ट्रक्चरच्या माध्यमातून कामे करत असताना कामाचा दर्जा व गुणवत्ता जपला, त्यामुळे त्यांच्याकडे पुढे कामे येत गेली त्यातून प्रचंड पैसा मिळत गेला, पण त्या पैशाचा उपयोग त्यांनी आदिवासी दुर्गम भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी खर्च करण्याचे ठरविले



त्यातूनच वेगवेगळ्या भागांमध्ये शिक्षण, कला, क्रीडा याक्षेत्रासाठी त्यांनी भरघोस निधी देणगी म्हणून दिला. कोणत्याही कामामध्ये नियोजन पारदर्शकता गतिमानता असेल व उत्कृष्टतेचा ध्यास असेल, तर आपण प्रगतीकडे वाटचाल करू, हा संदेश भावी पिढीला यानिमित्ताने देता येईल.कोणत्याही क्षेत्रात स्पर्धा उत्कृष्ट कामगिरीसाठी प्रवृत्त करत असते ही स्पर्धा त्यांनी जपली त्याला सामोरे गेले आणि आजअखेर ठाकूर इन्फ्रा. कंपनीच्या माध्यमातून त्यांनी देशांमध्ये आपले नाव केले आज त्यांच्या या कंपनीच्या माध्यमातून हजारो कामगारांना रोजगार उपलब्ध झाला आहे. आपल्या नोकरांवर, कामगारांवर प्रचंड विश्वास ठेवून काम कसे करता येऊ शकते, याचे उत्तम उदाहरण म्हणजे ठाकूर इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट कंपनी होय. हाच नियम आपण घरामध्येसुद्धा लागू केल्यास त्याचा निश्चित संख्यात्मक गुणात्मक विकासासाठी फायदा होईल. याची खात्री पटते.

रयत शिक्षण संस्थेमध्ये संगणक शिक्षण द्यायचे होते. त्यासाठी काही निधी आवश्यक होता त्यावेळी पहिली एक कोटी रुपयांची देणगी रामशेठ यांनी देऊ केली. खऱ्या अर्थाने आज ग्रामीण भागामध्ये जे संगणक शिक्षण सुरू आहे, त्याची पायाभरणी आणि त्याच्याकरिता पहिली देणगी रामशेठ यांनी दिलेली आहे याचा आवर्जून उल्लेख करावासा वाटतो.

सहसचिव निवड झाल्यानंतर भेटायला गेल्यानंतर त्यांनी आवर्जून सांगितले की आमच्या भागातील जास्तीत जास्त प्रश्न सोडवा. मला खूप आश्चर्य वाटले, की एवढी मोठी संवेदनशील असलेली दानशूर व्यक्ती माझ्यासारख्या सामान्य रयत सेवकाला कामासाठी विनंती करते. यातच त्यांचा मोठेपणा दिसून येतो. एक जून २०२५ रोजी त्यांच्या धर्मपत्नी यांच्या वाढदिवशी मी व माझी पत्नी पनवेल येथे गेलो असता, त्यांनी आमचा सत्कार केला त्यांच्या घरातील सर्व सदस्यांना मोठ्या उत्सुकतेने आमची ओळख करून दिली. खरोखर रामशेठ



ठाकूर साहेबांचे प्रेरणादायी मूल्य व संस्कार घेण्यासारखे आहेत.

आज रामशेठ साहेब यांचे अमृत महोत्सवी वर्ष आहे. इथून पुढील काळात त्यांच्या कार्याचा आवाका पाहता समाजासाठी, रयत शिक्षण संस्थेसाठी खूप मोठे कार्य त्यांच्या हातून होईल. समाजातील जीवनमानाचा स्तर उंचावण्यासाठी त्यांची धडपड कायम स्मरणात राहील. एवढे मोठे कार्य त्यांनी उभे केले आहे. कला, क्रीडा, खेळ, साहित्य सर्वच क्षेत्रात त्यांनी गेली दोन वर्षे समाज हिताचे कार्य करून समाजाची सेवा केलेली आहे. त्यांच्या कार्यास कृतज्ञतापूर्वक नमन !

त्यांच्या या ७५ वर्षांच्या सहप्रवासामध्ये त्यांच्या पत्नी शकुंतला ताई त्याचबरोबर आमदार प्रशांत ठाकूर परेश ठाकूर यांनी मोलाची साथ दिली त्याबद्दल सर्वांविषयी कृतज्ञता व्यक्त करतो.



'शेठ'पणापलीकडचा माणूस : मा. रामशेठ ठाकूर

प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे
सहसचिव (ऑडिट)
रयत शिक्षण संस्था, सातारा

माणूस आपल्या कर्तृत्वाने किती मोठा होऊ शकतो, किती उच्च पदावर पोहोचू शकतो आणि जनमानसात लोकादरास कसा पात्र ठरू शकतो, याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य आदरणीय श्री. रामशेठजी ठाकूर साहेब !

लौकिक अर्थाने 'शेठ' हा शब्द समाजात सहसा केवळ श्रीमंती किंवा व्यापाराशी जोडला जातो. मात्र, श्रीमान रामशेठजींनी आपल्या निस्सीम दातृत्वाने या शब्दाची व्याख्याच बदलून टाकली आहे. व्यवसायाने यशस्वी उद्योजक, कर्तृत्वाने रायगडचे दोन वेळा खासदार; पण अंतःकरणाने सदैव 'शिक्षक' आणि 'दानशूर' राहिलेले रामशेठ ठाकूर साहेब आज आपल्या आयुष्याच्या अमृतमहोत्सवी वर्षात पदार्पण करत आहेत. अमृत महोत्सव हा केवळ वयाचा नव्हे, तर जीवन कर्तृत्वाचा उत्सव असतो. वयाची वाटचाल काळ ठरवतो; पण कर्तृत्वाचे महोत्सव समाज साजरे करतो. श्री. रामशेठजी ठाकूर यांची पावले जरी वयाच्या शताब्दीकडे पडत असली, तरी कर्तृत्वाची शताब्दी त्यांनी खूप आधीच गाठली आहे. त्यांचा जीवनप्रवास हा वैभवाचा नव्हे, तर संघर्षाचा प्रवास आहे. अत्यंत साध्या आणि कष्टकरी कुटुंबात जन्मलेल्या या व्यक्तिमत्त्वाने आयुष्याच्या सुरुवातीला अनेक अडचणी अनुभवल्या. मात्र परिस्थितीसमोर हार न मानता त्यांनी शिक्षणाला आपल्या आयुष्याचा केंद्रबिंदू बनवले. १९७२ साली कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या 'कमवा आणि शिका' योजनेतून त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आपले पदवी शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर बी.एड. करून पनवेलच्या 'विठोबा खंडप्पा' माध्यमिक शाळेत अवघ्या २०० रुपये पगारावर शिक्षक म्हणून त्यांनी आपल्या कारकिर्दीची सुरुवात केली. आई-वडील भागूबाई आणि चांगू ठाकूर यांच्याकडून मिळालेले कष्टाचे व प्रामाणिकपणाचे बाळकडू त्यांनी आयुष्यभर जपले.

१९७६ मध्ये रामशेठ साहेबांनी व्यवसायात पाऊल टाकले आणि अथांग परिश्रमाच्या जोरावर ते एक यशस्वी उद्योजक बनले; पण खरा चमत्कार त्यांच्या संपत्तीत नाही, तर त्यांच्या 'माणूसपणात' आहे. रामशेठ जेव्हा 'शेठ' नव्हते, तेव्हा जसे होते तसेच ते आज अफाट वैभव आणि प्रतिष्ठा मिळाल्यानंतरही आहेत. आजच्या जगात एखाद्याकडे संपत्ती असणे ही मोठी गोष्ट राहिलेली नाही; पण त्या संपत्तीचा उपयोग समाजकल्याणासाठी करण्याची उदार वृत्ती असणे, हेच खऱ्या श्रीमंतीचे अंतिम मोजमाप असते. रामशेठ ठाकूर साहेबांनी आयुष्यभर जे काही कमावले, ते केवळ स्वतःसाठी किंवा आपल्या कुटुंबासाठी नव्हे, तर संपूर्ण समाजासाठी! साहेब नेहमी एका ऋषितुल्य भूमिकेतून म्हणतात, ''जे माझ्याजवळ आहे ते देण्यासाठी आहे, घेण्यासाठी नाही.''

ज्या रयत शिक्षण संस्थेने साहेबांना घडवले, त्या संस्थेविषयी त्यांनी दाखवलेली कृतज्ञता थक्क करणारी आहे. मी सध्या साताऱ्याच्या छत्रपती शिवाजी महाविद्यालयात प्राचार्य म्हणून कार्यरत आहे. येथे साहेबांच्या दातृत्वाचा एक जिवंत इतिहास दररोज अनुभवतो आहे. महाविद्यालयाच्या भव्यतेसाठी आणि विद्यार्थ्यांच्या सुविधांसाठी शिवाजी कॉलेजला वर्गखोल्यांची गरज असताना रामशेठ साहेबांनी कोणतेही आढेवेढे न घेता तब्बल ७ कोटी रुपयांचा निधी स्वतःच्या खिशातून दिला आणि एक दिमाखदार इमारत उभी राहिली. 'लोकनेते रामशेठ ठाकूर भवन' ही भव्य वास्तू आज साहेबांच्या अलौकिक शैक्षणिक कार्याची साक्ष देत अभिमानाने उभी आहे. एकेकाळी 'कमवा आणि शिका' योजनेतून शिक्षण घेणारा विद्यार्थी पुढे जाऊन आपल्या मातृसंस्थेलाच कोट्यवधींचे दान देतो, ही घटना केवळ विलक्षण नाही; तर येणाऱ्या अनेक पिढ्यांना कृतज्ञतेची आणि समाजभानाची शिकवण देणारी प्रेरणागाथा आहे. छत्रपती शिवाजी कॉलेज आणि रामशेठ ठाकूर यांचे नाते काही वेगळेच आहे. साताऱ्यामध्ये जेव्हा जेव्हा रामशेठ ठाकूर साहेब येत असतात तेव्हा ते आवर्जून शिवाजी कॉलेजमध्ये फिरून जात असतात. आपले नातेवाईक, कुटुंबीय, मित्रपरिवार सुना, नातवंडे हे ज्या वेळेला त्यांच्यासोबत असतात, तेव्हा मी या वर्गात बसत होतो, इथे माझे मराठीचे, इंग्रजीचे तास होत होते. कॉलेजबद्दल, कॉलेजच्या आठवणीबद्दल ते भरभरून बोलत असतात. ऐकणाऱ्यांना वाटते रामशेठ अजूनही कॉलेजमध्ये शिकत आहेत. कॉलेजमध्ये नवीन काही सुविधा निर्माण करावयाचे असतील, तेव्हा रामशेठ स्वतःहून पंधरा-वीस लाख रुपये न मागता देत असतात. चांगल्या सुविधा विद्यार्थ्यांना द्या, असा त्यांचा आग्रह असतो.



'रयत' ही त्यांच्यासाठी केवळ संस्था नाही, तर श्रद्धास्थान आहे. शिक्षणातून समाजपरिवर्तन घडावे आणि विद्यार्थी जागतिक स्तरावर उभे राहावेत, ही त्यांची मनोमन तळमळ आहे. त्यांचे दातृत्व केवळ सातारा किंवा पनवेलपुरते मर्यादित राहिले नाही. मोखाडा या आदिवासी तालुक्यातील मोडकळीस आलेल्या रयतच्या शाळेसाठी त्यांनी ५ कोटी रुपयांचा निधी दिला. वयाची ७० वर्षे पार केल्यानंतरही गेल्या तीन वर्षांत त्यांनी पनवेलहून तब्बल ७३ वेळा मोखाड्याचा प्रवास केला. परिणामी ८ एप्रिल २०२३ रोजी अत्याधुनिक विज्ञान प्रयोगशाळेसह भव्य शिक्षण संकुलाचे लोकार्पण झाले. आज या परिसरातील हजारो आदिवासी विद्यार्थ्यांसाठी उभे राहिलेले हे संकुल म्हणजे रामशेठ ठाकूर यांच्या लोकाभिमुख विचारांचे मूर्त स्वरूप आहे. एकेकाळी स्वतः शिक्षक राहिलेले रामशेठ ठाकूर आज कोणताही गाजावाजा न करता २० हजारांहून अधिक विद्यार्थ्यांचे 'पालक' बनले आहेत. 'जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था' या माध्यमातून त्यांनी कष्टकऱ्यांच्या झोपडीपर्यंत आधुनिक आणि इंग्रजी माध्यमाचे शिक्षण पोहोचवले. पनवेलचे सी. के. टी. कॉलेज, गव्हाण-कोपरचे महाविद्यालय, खांदा कॉलनीतील उच्च माध्यमिक विद्यालय, खारघरचे रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, भागुबाई ठाकूर लॉ कॉलेज, उलवे येथील शकुंतला रामशेठ ठाकूर महाविद्यालय आणि भव्य क्रीडा संकुल- या सर्व संस्था आज केवळ शिक्षणाची केंद्रे नसून सुसंस्कृत



नागरिक घडवणारी विद्यापीठे बनली आहेत.

रामशेठ ठाकूर साहेब हे आजच्या संभ्रमित राजकीय वातावरणात एक सुसंस्कृत चेहरा आहेत. ते २० टक्के राजकारणी आणि ८० टक्के समाजकारणी आहेत. रायगडमधून दोनदा खासदार म्हणून निवडून येताना त्यांनी दि. बा. पाटील आणि बॅ. अंतुले यांसारख्या दिग्गज नेत्यांचा पराभव केला; पण विजयाचा अहंकार कधीही बाळगला नाही. राजकीय जीवनात त्यांनी कधीही कटुता बाळगली नाही. सर्वपक्षीय नेत्यांशी त्यांनी आत्मीयतेचे संबंध जपले. आजच्या राजकारणातील कडवटपणाचा लवलेशही त्यांच्या व्यक्तिमत्त्वात दिसत नाही. नम्रता, संयम, माणुसकी आणि कार्यकर्त्यांविषयी आत्मीयता हे गुण त्यांच्या व्यक्तिमत्त्वात विशेषत्वाने जाणवतात. कोरोना महामारीच्या काळात संपूर्ण समाज संकटात असताना रामशेठ ठाकूर साहेबांनी मदतीचा हात पुढे केला. हजारो कुटुंबांना अन्नधान्य, भोजन पाकिटे, आरोग्य साहित्य आणि आर्थिक मदत उपलब्ध करून दिली. रक्तदान शिबिरे, मास्क वाटप, औषध वितरण आणि कम्युनिटी किचनच्या माध्यमातून त्यांनी लोकसेवेचा आदर्श निर्माण केला. थोडक्यात सांगायचे तर लोकनेते रामशेठ ठाकूर हे केवळ राजकीय नेते नाहीत; ते हजारो कुटुंबांचे आधारवड, विद्यार्थ्यांचे प्रेरणास्थान, गरिबांचे कैवारी आणि समाजपरिवर्तनाचा दीपस्तंभ आहेत. आज अमृतमहोत्सवी वर्षात पदार्पण करताना लोकनेते रामशेठ ठाकूर साहेबांचा गौरव करणे म्हणजे एका उत्तुंग समाजनिष्ठ व्यक्तिमत्त्वाचा सन्मान करणे होय. अशा या महान लोकनेत्याच्या आणि दानशूर व्यक्तिमत्त्वाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त त्यांच्या प्रदीर्घ, समाजसेवेने समृद्ध आयुष्याला मनःपूर्वक सलाम !

परमेश्वराकडे त्यांच्या दीर्घायुष्याची प्रार्थना करत शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते–'आभाळाएवढे त्यांचे ऋण, फिटणार नाही जन्म उधळून.'



आदरणीय रामशेठजी ठाकूर

श्रीमती मीनाताई जगधने
मॅनेजिंग कौन्सिल सदस्य,
रयत शिक्षण संस्था, सातारा

आदरणीय रामशेठजी ठाकूर यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना मला मनस्वी आनंद होत आहे. आज आपल्या सर्वांच्या दृष्टीने एक सोनियाचा दिन आहे असे मी मानते. असे क्षण आपल्या आयुष्यात फारच क्वचित येतात. रामशेठजी ठाकूर यांचा स्वभाव अत्यंत कुटुंबवत्सल असून ते माणुसकी जपणारे एक विलोभनीय व्यक्तिमत्व असून त्यांच्या प्रगतीमध्ये त्यांची आई स्व. भागुबाई चांगू ठाकूर व वडील स्व. चांगू काना ठाकूर हे त्यांचे आद्य गुरु असून त्यांनी रामशेठ ठाकूर यांना आयुष्यभर कष्ट, प्रामाणिकपणा व निष्ठावंतपणा शिकवलेला आहे. त्यामुळेच मोठ्या संघर्षातून वाट काढत त्यांचे सासरे स्व. जनार्दन भगत साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली ते माणुसकी जपत मोठे झालेले आहेत याचा विशेष उल्लेख करावा लागेल.

रामशेठ ठाकूर साहेब हे रयत परिवाराशी एकरूप झालेले व्यक्तिमत्त्व असून त्यांना महाराष्ट्राचे पुरोगामी नेते व ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. एन. डी. पाटील साहेब व आदरणीय माई यांचा शुभाशीर्वाद व प्रेम लाभले आहे.

खरंतर मनाची व विचारांची श्रीमंती ही रामशेठ ठाकुरांकडून घ्यावी इतपत ते जनमानसात मोठे झालेले आहेत. साधी राहणी व उच्च विचारसरणी ही त्यांच्या अंगी बाणलेली असून रयत परिवाराच्या वटवृक्ष विश्वातील सर्वात तेजस्वी चमकणारा तारा म्हणून 'रामशेठ ठाकूर' यांचा उल्लेख करणे मला येथे संयुक्तिक वाटते. कर्मवीर अण्णांच्या स्वप्नातील समाज परिवर्तनातील समाज अभियंता म्हणून रयत परिवारातील रामशेठ ठाकूर हे नेहमी प्रत्येक बाबतीत उजवे ठरलेले आहेत यात दुमत नाही.

माझे शिक्षण कर्मवीर अण्णांनी स्थापन केलेल्या पहिल्या महाविद्यालयात म्हणजे छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा येथे झाले. मी अण्णांचे कार्यकर्तृत्व फार जवळून पाहू शकले. त्याच कॉलेजमध्ये रामशेठ ठाकूर यांचेही शिक्षण झालेले आहे. त्यामुळे आम्ही दोघे अत्यंत जवळचे गुरुबंधू असून आमचे ऋणानुबंध अतिशय घट्ट असून आणि दोघेही स्वतःला नशीबवान मानतो, की आम्हा दोघांचे येथे शिक्षण घेण्याचे भाग्य आम्हाला लाभले.

महाराष्ट्राच्या सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, सांस्कृतिक इतिहासात ज्या थोर महनीय व्यक्तींनी आपल्या कर्तृत्वाने नवी दिशा दिली. त्या व्यक्तीमध्ये लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे नाव फार महत्त्वाचे आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करून सामाजिक, राजकीय, शैक्षणिक तसेच औद्योगिक क्षेत्रात स्वकर्तृत्वाने वेगळे स्थान त्यांनी निर्माण केले आहे. सामान्य कुटुंबात जन्म घेऊन मेहनतीच्या जोरावर असामान्य कर्तृत्व त्यांनी केले.

१९७२ मध्ये रयतच्या 'कमवा आणि शिका' योजनेत पदवीधर झाले. रयत शिक्षण संस्था ही विद्यार्थ्यांमध्ये खंबीर नेतृत्व गुण आणि सामाजिक बांधीलकी रुजवणारी संस्था आहे. विद्यार्थ्यांमध्ये व समाजामध्ये सकारात्मक परिवर्तन घडवण्याचं काम रयत शिक्षण संस्था करते.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सर्वसामान्यांच्या हिताला प्राधान्य देऊन माणुसकीचे नाते जपत लोकांना मदत करण्याचे काम नेहमीच केले आहे. आयुष्याची सुरुवात अवघ्या २०० रुपये पगारावर शिक्षक म्हणून रामशेठ ठाकूर यांनी आपली कारकीर्द सुरू केली.

राजर्षी शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील यांचा आदर्श घेऊन ते नेहमी कार्यरत राहिले. आपली सर्व पुंजी समाजाला सुशिक्षित करण्यासाठी आणि उत्तम शैक्षणिक संस्था उभ्या करण्यासाठी खर्च केली. शिक्षणाचे मोठे पुण्य कर्म त्यांनी केले आहे. शून्यातून विश्व निर्माण करणारे सामान्य माणसाने असामान्य कसे व्हायचे याचे उत्तम उदाहरण म्हणजे लोकनेते रामशेठ ठाकूर होय.

घरचे दागिने गहाण ठेवून आणि दहा हजार रुपयांच्या पहिल्या कंत्राटातून व्यवसायाची त्यांनी सुरुवात केली. परिस्थितीने त्यांना घडवले आजवरच्या ७५ वर्षांच्या यशस्वी उद्योजक आणि सत्यशील राजकारणी होण्यापर्यंत अनेक खाचखळगे त्यांनी अनुभवले आहे. भूमिपुत्रही मोठे कंत्राटदार होऊ शकतात हे आपल्या जिद्दीने त्यांनी सिद्ध करून दाखवले आहे. दि. बा. पाटील यांच्या नेतृत्वाखाली भूमिपुत्रांच्या हक्कांसाठी त्यांनी दिलेला लढा ऐतिहासिक आहे.

लोकनेते रामशेठ ठाकूर हे केवळ उद्योजक नसून भूमिपुत्रांच्या हक्कासाठी लढणारे, विकासाला गती देणारे कणखर नेतृत्व आहे. १९९५ च्या काळात मुंबई पुणे एक्सप्रेसवे आणि उड्डाणपूलांची कामे रखडलेली होती. त्या काळात रामशेठ ठाकूर यांनी यांच्या धाडसी सहकार्यानेच ती पूर्ण होऊ शकली. जेएनपीटी आणि सिडकोच्या माध्यमातून प्रकल्पग्रस्तांना रोजगार मिळवून देण्यासाठी त्यांनी मोठा संघर्ष केला. नवी मुंबई आणि रायगडच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांची दूरदृष्टी अत्यंत महत्त्वाची ठरली आहे.

गोरगरीब विद्यार्थ्याला सर्वोत्कृष्ट शिक्षणाची दालने उभे करून दिली. गेली सत्तावीस वर्षे शिक्षणाचे पवित्र काम ते करत आहेत. श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाची स्थापना करून लाखो लोकांना वैद्यकीय आर्थिक मदत, शैक्षणिक साहित्य व शिक्षणासाठी आर्थिक मदत, जीवनावश्यक वस्तूंचे वाटप अशी विविध प्रकारची मदत ते करतात. सर्वसामान्यांना आधार देण्याचे काम करतात सर्वसामान्य कुटुंबातील होतकरू खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी श्री रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स ची स्थापना करून उत्कृष्ट खेळाडू तयार करण्यासाठी नि:शुल्क स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सची दारे खुली केली आहेत. सांस्कृतिक ठेवा जतन करण्यासाठी आगरी कोळी आणि मल्हार महोत्सवाचे अत्यंत सुंदर नियोजन आयोजन केले जाते. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्राला महोत्सवाची उत्सुकता वाढत राहते पनवेल मॅरेथॉन स्पर्धा याचे आयोजन करून या स्पर्धेने संपूर्ण महाराष्ट्राला वेड लावले आहे. दर्जेदार दिवाळी अंकाची निर्मिती व्हावी यासाठी राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धा सुरू केली आहे.



रयत शिक्षण संस्था ही लोकनेते रामशेठ ठाकूर यांची मातृसंस्था आहे. रयत शिक्षण संस्थेचे ते मॅनेजिंग

कौन्सिल सदस्य आहेत; पण ते स्वतःला रयत सेवक समजून रयत शिक्षण संस्थेत काम करतात. ज्या रयत शिक्षण संस्थेने त्यांना घडवलं त्या रयत शिक्षण संस्थेला १३५ कोटीहून अधिक रुपयांची गुरुदक्षिणा त्यांनी दिली आहे. रयत शिक्षण संस्थेच्या अनेक शाखांच्या उभारणीत लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा सिंहाचा वाटा राहिलेला आहे. रयत शिक्षण संस्थेच्या सातारा येथील शिवाजी कॉलेजमध्ये सात कोटी रुपये खर्च करून इमारत उभी करून दिली. रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेब यांनी या इमारतीचे 'रामशेठ ठाकूर भवन' असे नामकरण केले.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे निवासस्थान हे लोकांच्या समस्या सोडविणे, त्यांना आर्थिक मदत देणे यासाठी प्रसिद्ध आहे. त्यांनी महिला वर्गांसाठी रोजगार प्रशिक्षण मोहीम राबवून अनेक महिलांना उद्योजक बनवले आहे. रोजगार मेळाव्यांचे आयोजन करून हजारो तरुणांना नोकरीची संधी उपलब्ध करून दिली आहे. कृत्रिम हात व पाय बसवण्याचे शिबिर घेऊन हजारो अपंग व्यक्तींना त्यांच्या पायावर उभे केले श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने दरवर्षी विद्यार्थ्यांना दोन लाख वह्यांचे वाटप केले जाते. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी नेहमीच ज्येष्ठांचा सन्मान केला आहे. रायगड जिल्ह्यात सर्वाधिक लाखाहून अधिक ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान करण्याचे सामाजिक काम त्यांनी केले आहे.

खऱ्या अर्थाने लोकनेते रामशेठ ठाकूर समाजसेवेचा अथांग सागर एक दानशूर व्यक्तिमत्त्व आणि सर्वसामान्यांचे आधारवड आहेत. गरिबीतून मोठे झालेले लोकनेते रामशेठ ठाकूर कधीच गरिबांना विसरले नाहीत. त्यांचा समाजसेवेचा यज्ञ अखंड चालू आहे. रामशेठ ठाकूर यांच्याजवळ निर्मळपणा व नम्रता आहे. ते म्हणतात जे माझ्याजवळ आहे, ते देण्यासाठी आहे. घेण्यासाठी नाही या भावनेने रामशेठ ठाकूर म्हणून फार मोठे आहेत. त्यांच्या कर्तृत्वाला, नेतृत्वाला आणि दातृत्वाला मी सलाम करते.

त्यांना ७५ व्या वाढदिवसानिमित्त माझ्या व कुटुंबीयांच्या वतीने मी शुभेच्छा देते, त्यांच्या कुटुंबाला सुयश व दीर्घायुष्य चिंतिते. तसेच त्यांचा शताब्दी महोत्सव साजरा करण्याची संधी आम्हाला मिळो ही कर्मवीर अण्णांच्या व वहिनींच्या चरणी प्रार्थना करते. आदरणीय रामशेठजी ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त शुभेच्छा !





दातृत्वाचा दीपस्तंभ

डॉ. विठ्ठल शिवणकर
प्राचार्य, श्री.आर.आर.पाटील महाविद्यालय
सावळज, ता. तासगाव, जि. सांगली.

कष्ट व शिक्षण यातून प्रत्येकाला शाश्वत परतावा मिळतच असतो. याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे माजी खासदार, थोर देणगीदार आणि रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य मा. रामशेठजी ठाकूर होय.

शाळा महाविद्यालयात जाणाऱ्या बऱ्याच जणांना वाटत असते, की आपल्याच नशिबी अशी परिस्थिती का? इतके कष्ट का? जवळची शाळा, चांगले कॉलेज मिळालं नाही तरी मुलं खूप नाराज होतात. स्मार्ट फोन मिळाला नाही, तर आयुष्यात काही अर्थ नाही असं त्यांना वाटतं. जगात किंवा शेजारी काय चाललं आहे याचा त्यांच्यावर चटकन परिणाम होतो आणि मग अशा परिस्थितीत त्यांची स्फूर्ती जागविण्यासाठी, उत्तेजना देण्यासाठी, सकारात्मक विचारसरणी रुजविण्यासाठी एक ऊर्जास्त्रोत समोर आणण्याची आवश्यकता भासते. अशा वेळी मा.रामशेठ यांचे नाव चटकन डोळ्यांसमोर येते. आज जगामध्ये तरुण पिढी समोर काही आदर्शच राहिलेले नाहीत अशी जेव्हा चर्चा ऐकतो तेव्हा त्यांच्यापुढे मा. रामशेठजी ठाकूर यांचे जीवन व कार्य आणलं पाहिजे, हे प्रकर्षाने जाणवते. सर्वोत्तम यश मिळविण्यासाठी सातत्याने बदलांना सामोरे जा, नवनवीन बदलांना स्वीकारा, तंत्रस्नेही दृष्टिकोन बाळगा, जिद्द व चिकाटीच्या जोरावर आकाशालाही गवसणी घालता येते याबाबत नवीन पिढीला ते नेहमी स्मरण करुन देतात.

आपल्या आशा-आकांक्षांना प्रयत्नांची जोड दिली, तर यश तुमच्या पायाशी लोळण घेतं याच जिवंत उदाहरण म्हणजे मा.रामशेठजी ठाकूर. अत्यंत गरीब कुटुंबात जन्म घेतल्यामुळे त्यांच्या जीवनाची सुरुवात अतिशय कष्टात झाली. प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण गव्हाण सारख्या एका खेडेगावात झाल्यानंतर पदवी शिक्षण घेण्यासाठी रायगड जिल्हा सोडून साता-याकडे प्रयाण करावं लागलं. तिथं छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये 'कमवा आणि शिका' योजनेअंतर्गत आपलं शिक्षण पूर्ण केलं. याच महाविद्यालयात त्यांनी श्रमदान करुन, घाम गाळून स्वावलंबी व आत्मनिर्भर होण्याचा कर्मवीरांचा कानमंत्र आजीवन जपला. आजही ते दिवस आठविले की, त्यांचे मन भरुन येते. तासनतास या पवित्र भूमीत ते स्थिरावतात. प्रत्येक प्रसंगाचा, घटनांचा ते जाणीवपूर्वक उल्लेख करतात. आज जे काही यश त्यांना मिळाले आहे त्याचे सर्व श्रेय ते रयत शिक्षण संस्था व कर्मवीरांना देतात. यावरुन त्यांची कृतज्ञता व तत्वनिष्ठा लक्षात येते. 'कमवा व शिका' योजनेमुळे मी फक्त शिकलोच नाही, तर जीवनात उभं राहण्याचं बळ मिळालं असं ते मानतात.

माणूस आर्थिकदृष्ट्या कितीही संपन्न असला, तरी मनाची श्रीमंती ही प्रत्येकाकडे असतेच असे नाही. मा.रामशेठजी यांच्या मनाची श्रीमंती प्रत्येकालाच अचंबित करणारी आहे. 'बहुजनहिताय-बहुजनसुखाय' हे

सुवचन त्यांच्या हृदयात सतत वास करीत आहे. गरजू व्यक्ती कोणीही असो, जर तो आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि होतकरु असेल तर त्यास मदत मिळणारच हे निश्चित. विद्यार्थीदशेत माझ्या वाटयाला जे प्रतिकूल दिवस आले ते दिवस इतर विद्यार्थ्यांच्या वाट्याला येऊ नयेत याविषयी ते संवेदनशील आहेत.

जेव्हा मी मा. रामशेठ यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचं निरीक्षण करतो, तेव्हा मला कविश्रेष्ठ बा.भ. बोरकर यांच्या 'असे देखणे होऊया !!' या कवितेच्या सुंदर काव्यपंक्ती आठवतात.

देखणे ते हात ज्यांना निर्मितीचे डोहळे ।

मंगलाने गंधले, सुंदर सोहळे ।।

ज्या हातांना नवनिर्मितीची ओढ लागलेली असते, जे हात नेहमी चांगले व पवित्र काम करण्यात मग्न असतात आणि ज्यांच्यामुळे या जगात सौंदर्य आणि आनंदाचे सोहळे निर्माण होतात ते हातच खऱ्या अर्थाने सुंदर आणि देखणे असतात. मा. रामशेठ यांच्या हातून 'रयत' साठी आणि एकूणच साऱ्या समाजासाठी जे पवित्र काम झाले आहे ह्याचा सार वरील काव्यपंक्तीत सामावलेला आहे असे मला वाटते.

मी १९८८-८९ पासून त्यांना ओळखतो. राजकारणात ते योगायोगाने आले, असे मला वाटते. त्यांचा खरा पिंड समाजकारणाचा आहे. मानवजातीच्या इतिहासातला सर्वात जास्त पैसे कमावणारा बिल गेटस् असो किंवा वॉरेन बफेट, दोघेही आयुष्याच्या उत्तरार्धात समाजसेवेकडे वळले. श्रीमती सुधा मूर्तींनी त्यांच्याकडे येणारा बराचसा पैसा समाजहिताकडे म्हणजेच शिक्षणाकडे व आरोग्य सेवेकडे वळविला आहे. किंबहुना अशाच प्रकारचे सामाजिक कार्य, उच्च विचारसरणी आचरणात आणून मा. रामशेठजी तरुणपणापासूनच करत आहेत, याचा आम्हां सर्व रयत सेवकांना अभिमान वाटतो. त्यांनी तरुणपणापासूनच पैसा हे साध्य मानलं नाही, साधन मानलं. शाळेच्या इमारती, मग त्या 'जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या' असोत किंवा 'रयत शिक्षण



संस्थेच्या' असोत, त्यांनी त्या बांधल्या, काहींचे नूतनीकरण केले, क्रीडा संकुल बांधले, सांस्कृतिक वास्तू बांधल्या आणि त्या माध्यमातून ते समाजघटकांच्या विशेषतः विद्यार्थ्यांच्या उन्नतीसाठी तरुणपणापासूनच कार्यरत राहिलेले आहेत.

त्यांच्या विद्यार्थीदशेमध्ये उच्च शिक्षणाची सोय रायगड व पनवेल भागात फारशी नव्हती. आता नवीन पिढीला तरी दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षणाची सोय जवळच उपलब्ध व्हावी हा उदात्त विचार बाळगून त्यांनी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेची स्थापना केली आणि पनवेल, नवी मुंबई परिसरात अत्याधुनिक सेवा देणाऱ्या शाळा व महाविद्यालयाचे जाळे उभे केले. आज शिक्षण खूप महाग झाले आहे. पालक आयुष्यभर कष्ट करतात, एक वेळ उपाशी राहतात, परंतु मुलांनी चांगले शिक्षण घ्यावे हा त्यांचा आग्रह असतो. अशा मुलांना माफक किमतीत उच्च गुणवत्तेचे शिक्षण देण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. पैसे नाहीत म्हणून कोणाचे शिक्षण थांबू नये यासाठी ते आग्रही असतात. एकूणच कर्मवीरांच्या विचारांची प्रेरणा घेऊन बहुजन समाजाच्या, उपेक्षितांच्या दाराशी तेजाचे दीप तेवत ठेवण्याचे महनीय कार्य ते करीत आहेत. शिक्षणावरील निःसीम प्रेम, सामान्यांविषयी आत्मियता, दिवसरात्र अविरत काम करण्याची दुर्दम्य इच्छाशक्ती हे गुण मा. रामशेठजी यांच्या ठायी उतरले आहेत.

मी एका घटनेचा उल्लेख करू इच्छितो जेणेकरून मा. रामशेठ साहेबांचे महत्त्व अधोरेखित होईल. 'मायक्रोसॉफ्टने' जेव्हा 'नोकिया' चा ताबा घेतला तेव्हा हे जाहीर करण्यासाठी प्रेस कॉन्फरन्स आयोजित केली होती. तेव्हा 'नोकिया' चे तत्कालीन CEO आपल्या भाषणाच्या शेवटी म्हणाले, 'We didn't do anything wrong, but somehow we lost' आणि त्याचबरोबर नोकियाची सारी मॅनेजमेंट टीम व CEO, सर्वांना रडू कोसळले. नोकिया एक ब्रँड होता, प्रथितयश कंपनी होती. 'आम्ही आमच्या व्यवसायात काहीच चुकीचं केलं नाही; परंतु जग अत्यंत झपाट्याने बदलले. आमच्या ते लक्षात आलं नाही एवढीच आमची चूक झाली.' म्हणजेच आपण जर बदललो नाही, तर फक्त स्पर्धेतूनच नव्हे, तर काळाच्या प्रवाहातून बाहेर फेकले जाऊ शकतो हा बोध यातून घेण्यासारखा आहे. मा. रामशेठ साहेबांनी काळाची पावलं अगोदरच ओळखली. आणि त्या अनुषंगाने जगामध्ये जे-जे नवीन शैक्षणिक प्रवाह आले, ते प्रवाह राबवत गेले. आपले प्रेरणास्थान तीर्थरुप कर्मवीर अण्णा यांच्या तत्त्वज्ञानास मुरड न घालता नवनवीन योजनांची अंमलबजावणी करत गेले.

आंतरराष्ट्रीय स्तरावर जागतिकीकरण व खाजगीकरणाचा शिक्षणावर व इतर सर्वच सेवा क्षेत्रांवर झालेला परिणाम पाहता यात ग्रामीण भागातील माझा विद्यार्थी कुठेही कमी पडू नये, स्पर्धेत मागे राहू नये, कोणत्याही ज्ञानाला पारखा होऊ नये ही दूरदृष्टी ठेवून त्यांनी इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरू केल्या. लॉ कॉलेज सुरू केले. गुणवत्तेचे शतक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नवीन युगात शिक्षणाची सुद्धा बाजारपेठ विकसित होत आहे. विदेशातील विद्यापीठांनी भारतात पाय रोवण्यास सुरुवात केली आहे. त्यांचे आकर्षण वाढू लागले आहे. बहुसंख्य असणाऱ्या गरीब/मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांना तेथे प्रवेश घेऊन महागडे शिक्षण घेणं अशक्य आहे. अशा परिस्थितीत 'जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या' तसेच रायगड विभागातील 'रयत' च्या पारंपरिक महाविद्यालयांमध्ये कौशल्याधारित विविध व्यावसायिक अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी भरीव प्रयत्न केले. शिक्षणात आवश्यक असलेल्या अत्युच्च दर्जाच्या गुणवत्तेशी तडजोड करणे त्यांना अजिबात मान्य नाही.

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण व समतोल विकास व्हावा या उदात्त हेतूने त्यांनी 'रामशेठ ठाकूर सामाजिक व

शैक्षणिक संस्था' स्थापन केली. दुर्गम, आदिवासी भागातील विद्यार्थ्यांसाठी कला, क्रीडा इत्यादींसाठी एक प्रभावी दालन त्यांनी उपलब्ध करून दिले आहे. मानवतावादी मूल्यांसाठी झटणारा, सामाजिक बांधीलकी जपणारा एक 'नि:स्वार्थी लोकनेता' म्हणून मा.रामशेठजी ठाकूर यांचा उल्लेख करावा लागेल.

२०११ साली माझी कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, वाशी येथे बदली झाल्यानंतर आमचा संपर्क वाढला आणि त्यांच्या स्वभावाचं आणि गुणांचं दर्शन झालं. त्यांच्याकडून खूप काही शिकता आले. या महाविद्यालयाच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये त्यांचे मार्गदर्शन खूपच मोलाचे ठरले आहे. २०१८ च्या रयत विज्ञान परिषदेचे आयोजन यशस्वी झाले ते मा.रामशेठजी यांच्या भक्कम पाठिंब्यामुळेच. वाशी येथे कार्यरत असताना कामोठे हायस्कूलच्या नामकरण समारंभासाठी (लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडिअम स्कूल, कामोठे) उपस्थित होतो. त्यावेळी शाखेची इमारत अपुरी होती व भौतिक सुविधांची सुद्धा वानवा होती. सदर समारंभात २-३ वर्षात या शाखेचे रुपडे बदलण्याबाबत मा.रामशेठजी यांनी सूतोवाच केले होते. १-२ वर्षातच याच शाखेच्या विस्तारीत इमारतीमध्ये ज्यूनिअर कॉलेजच्या उद्घाटन समारंभास उपस्थित राहण्याचा योग आला. या २ वर्षात एका साध्या शाळेचं अत्याधुनिक संकुलात झालेले रूपांतर पाहताना मन थक्क व्हायला होते. शाळेत गेल्यानंतर सर्व अद्ययावत सोयींनीयुक्त शैक्षणिक इमारतीचे रूप लक्षात येते. तसेच महामार्गावरूनही इमारतीची भव्यता लक्षात येते. फक्त भाषणात न बोलता ते कृतीत उतरवायचं आणि भव्य दिव्य करायचं या सगुणाची प्रचिती वारंवार येते. पुष्पकनोड येथील शाखेची इमारत तर एकमे अद्वितीय आहे. खारघर येथे असलेल्या रयत रिसर्च सेंटरमध्ये संस्थेचे अध्यक्ष मा. शरदरावजी पवार यांच्या विशेष प्रयत्नातून साकारलेल्या Rayat Centenary Centre for Invention, Innovation and Incubation (RCC-III) या अत्याधुनिक केंद्राच्या उभारणीसाठी आर्थिक पाठबळ मा. रामशेठजी ठाकूर यांच्या रूपानं मिळालं आहे.

छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये पदव्युत्तर शिक्षण, संशोधन व इतर आनुषंगिक बाबींकरिता करिता रु. सहा कोटीपेक्षा जास्त रक्कम खर्चून बहुउद्देशीय अशी अप्रतिम वास्तू त्यांनी बांधून दिली आहे. त्यांची शिक्षणाविषयीची आत्मियता व तळमळ याचा विचार करुन रयत शिक्षण संस्थेने त्या वास्तूला 'लोकनेते रामशेठ ठाकूर भवन' नाव दिले आहे. ऐतिहासिक व पवित्र पार्श्वभूमी असलेल्या भूमीवर कर्तृत्व आणि दातृत्वाचे प्रतीक असलेली ही वास्तू भावी पिढीस सदैव स्मरण करून देईल हे निश्चित.

जेव्हा जेव्हा मा.रामशेठजी यांच्याशी भेट होते, तेव्हा छत्रपती शिवाजी कॉलेजचा विषय हमखास येतोच. २०२० साली माझी बदली योगायोगाने ह्याच महाविद्यालयात झाली आणि मला प्रकर्षाने जाणवले, की जेव्हा ते सातारला येतात तेव्हा कॉलेजवर आवर्जून येतात. ज्या झाडाकडे देण्यासाठी फळे नाहीत, सावली नाही अगदी हिरवे एक पानही नाही, तिथे पक्षीही पाठ फिरवतात असे आपण पाहतो. पण 'राम' नावाचा पक्षी मात्र तिथेच येत राहतो. कारण नातं नेहमी स्वतःच्या फायद्यासाठीच नसतं. काही नाती काही जागा आपलेपणासाठी सुद्धा जपली जातात. ज्या वास्तूत, वर्गात ते शिकले तेथे जाऊन बसतात, भूतकाळात रमतात. एखाद्या लहान मुलाच्या उत्सुकतेने त्यांना काय सांगू अन् किती सांगू असे होते. प्रत्येक वेळेस मी हे अनुभवतो. प्रत्येक भेटीमध्ये ते कॉलेजच्या आर्थिक नियोजनाबद्दल चर्चा करतात. नोव्हेंबर २०२० मध्ये 'महाविद्यालय विकास समितीच्या' पहिल्या बैठकीमध्ये स्पर्धा परीक्षा इमारतीच्या बांधकामाचा विषय होता. अंदाजे १.५० कोटी खर्च अपेक्षित होता. 'एवढे छोटे बांधकाम नको, रामशेठचे कॉलेज आहे. त्यास साजेसा प्लॅन करा. अंदाजे १०००

क्षमतेचे ऑडिटोरियम बांधा आणि त्याच्या दुसऱ्या-तिसऱ्या या मजल्यावर स्पर्धा परीक्षा केंद्र करा, त्यासाठी मी CSR अंतर्गत ५ ते ६ कोटी रक्कम द्यायला तयार आहे' असे विचार त्यांनी व्यक्त केले.

मार्च २०२१ मध्ये झालेल्या एक्झिक्युटिव्ह कमिटी मिटींगमध्ये छत्रपती शिवाजी कॉलेजच्या 'कमवा व शिका' योजनेतील मुलांच्या वसतिगृहाचा विषय होता. चर्चेच्या सुरूवातीसच त्यांनी स्पष्ट केले, जागा बघा, मी १ कोटी देतो. मिटिंग संपल्यानंतर जातेवेळी छत्रपती शिवाजी कॉलेजच्या ऑफिसमध्ये चहा घेत असताना मला म्हणाले, ''अण्णांनी सुरू केलेले हे पहिले कॉलेज आहे. मी ७० लाख रु. CSR अंतर्गत देतो, ऑफीसचे नूतनीकरण करून घ्या.'' त्यांच्या दातृत्वाला सीमा नाही.

शिवाजी कॉलेजच्या एका बाजूला वाय. सी. कॉलेज तर दुसऱ्या बाजूला डी. जी. कॉलेज. दोन्ही महाविद्यालये तशी आर्थिकदृष्ट्या संपन्न. तुलनात्मकदृष्ट्या शिवाजी कॉलेज काहीसं माग पडलेलं. तरीही पायाभूत/भौतिक सुविधांच्या बाबतीत शिवाजी कॉलेज या दोन्ही महाविद्यालयात तसूभरही कमी नाही. याचे श्रेय मा. रामशेठ यांना. जेव्हा जेव्हा गरज भासते तेव्हा तेव्हा त्यांनी न मागता कॉलेजसाठी पैसा ओतला आहे. माझं जन्मस्थान विसापूर. तिथेही रयतची शाखा आहे. शाखेची इमारत अपूर्ण व जीर्ण झालेली. त्या इमारतीच्या दुरुस्तीबरोबरच नवीन इमारत बांधणे गरजेचे होते. मी सचिव पदावर कार्यरत असतानाच साधारणतः २०२१ मध्ये त्यांच्या कानावर ही गोष्ट घातली. त्यांनी CSR मधून तात्काळ ५० लाख रु. दिले. त्यातून इमारतीचे बांधकाम सुरू झाले. त्यानंतर रयतेच्या काही शाखांनी भरीव मदत केली. जसजशी इमारत वर येऊ लागली तसतसा ग्रामस्थांकडून देणगीचा ओघ सुरू झाला व २०२३ ला इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले. स्कूल कमिटीचे सदस्य व तत्कालीन मुख्याध्यापकांचे जितके कौतुक करावे तितके कमी. इमारतीच्या उद्घाटनास रामशेठ साहेब प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तत्कालीन चेअरमन मा. डॉ. अनिल पाटील तसेच संस्थेचे अनेक पदाधिकारी, जनरल बॉडी सदस्य उपस्थित होते. सर्वांनी समाधान व्यक्त केले. समारंभात रामशेठ साहेबांनी अजून २५ लाख रुपये देण्याची घोषणा केली. म्हणजे आजपर्यंत जवळजवळ ७५ लाख रु. रामशेठ साहेबांनी दिले आहेत. त्यांनी देणगी दिली नसती तर या इमारतीची स्वप्नपूर्ती कधीच होऊ शकली नसती. शाखेच्या ज्यूनिअर कॉलेज विभागाला रामशेठ साहेबांचे नाव देण्याबाबतचा ग्रामस्थांचा व स्कूल कमिटीचा विचार त्यांच्या कानावर घातला. परंतु त्यांनी स्पष्ट नकार दिला. 'सध्या ज्यांचं नाव शाळेला दिले आहे त्या दानशूर कै. रामराव शामराव माने-पाटील यांनी आपला राहता वाडा व जवळजवळ ५० एकर जमीन शाळेस देणगी दिली आहे. त्यांच्या दातृत्वात कोणीही वाटेकरी नसावा,' असा विचार त्यांनी बोलून दाखविला आणि विद्यालय व ज्यु. कॉलेज या दोन्हीसाठी फक्त रामराव शामराव माने पाटील यांचेच नाव असावे, ही भूमिका आग्रहाने मांडली.

स्कूल कमिटी व ग्रामस्थ यांना मा. रामशेठ साहेब हे फक्त धनानेच नाही तर मनाने सुद्धा तितकेच मोठे आणि हळवे आहेत हे जाणवले. जेव्हा सुरुवातीला देणगी देण्यासाठी कोणीही खिशात हात घालत नव्हते तेव्हा विसापूर येथील शाळेला रायगड जिल्ह्यातील एक देणगीदार, ज्यांचा विसापूर गावाशी तसा काहीही संबंध नाही, ७५ लाख रु. देतो, विभागास आपलं नाव द्यायला नकार देतो हे त्यांचं मोठेपण पुढच्या अनेक पिढ्यांना आठवणीत राहावं म्हणून स्कूल कमिटीने नूतन इमारतीचे 'लोकनेते रामशेठ ठाकूर इमारत' असे नामकरण करण्याचा निश्चय केला व तसा ठराव संमत करून दक्षिण विभागाकडे पाठवला. नंतर संस्थेच्या मॅनेजिंग

कौन्सिलने सर्व संमतीने त्या ठरावास मान्यता दिली. फक्त रयतमधीलच नव्हे, तर रयत बाहेरील कितीतरी इमारती त्यांनी बांधून दिल्या आहेत किंवा त्यांचं नूतनीकरण करून दिले आहे. सर्वसामान्यांच्या शिक्षणासाठी धनवर्षा करणारा रामशेठ या उभ्या महाराष्ट्रात एकमेव आहे हे नमूद केले पाहिजे.

मा. रामशेठजी ठाकूर यांचे जीवन व कार्य याचं सूक्ष्मपणानं अवलोकन केलं तर ते श्रीमंतयोगी आहेत असं म्हणावं लागेल. एके ठिकाणी राजा जनकांविषयी वाचलेलं होतं. दानशूर व श्रीमंत योगी म्हणून राजा जनकाची झालेली कीर्ती जेव्हा शुकदेव महाराजांच्या कानी पडली तेव्हा महाराजांनी राजा जनकाची भेट घेतली. 'तू राजमहालात राहतोस, सगळी सुखे उपभोगतोस, तू योगी कसा काय?' असे जेव्हा महाराज म्हणाले तेव्हा राजांनी तेलाने काठोकाठ भरलेला दिवा महाराजांच्या हाती दिला आणि विनंती केली की हा दिवा घेऊन आपण महालभर फिरा; परंतु दिव्यातील एक थेंबसुध्दा खाली सांडू नये याची दक्षता घ्या. परत आल्यानंतर मी तुमच्या प्रश्नाचं उत्तर देतो. महाराज हातात दिवा घेऊन सारा महाल बघून परत आले. जेव्हा राजांनी महाराजांना विचारले, की महालात ऐश्वर्याच्या किती खुणा सापडल्या, तेव्हा महाराज म्हणाले की त्यांना महालात काहीच आढळले नाही, कारण त्यांचे सारे लक्ष दिव्यावर व त्यातून तेल सांडू नये यावर होते. हे ऐकल्यानंतर राजा जनक म्हणाले की, 'माझेही तसेच आहे, या सुखसोयी उपभोगण्यासाठी मला सवडच नाही कारण जनतेच्या कल्याणासाठी अहोरात्र लक्ष द्यावे लागते. राजांचे विचार ऐकल्यानंतर शुकदेव महाराजांनी जनकाचे श्रीमंत योगीपण मान्य केले. आपल्याकडे जर ऐश्वर्य असेल, तर त्याचा उपभोग घेणे चूक नाही; परंतु आपल्या सुखसमृध्दीचा उपभोग घेता-घेता आपली कर्तव्ये पार पाडली पाहिजेत आणि जेव्हा-जेव्हा शक्य होईल, तेव्हा गरजूंना मदत केली पाहिजे हेच खरे अध्यात्म. ह्या अध्यात्माचं पालन मा. रामशेठजी आयुष्यभर करत आले आहेत.

ग. दि. माडगूळकर यांच्या एका कवितेतल्या प्रेरणादायक ओळी त्यांना चपखल लागू पडतात.

ज्ञानियाचा वा तुक्याचा । तोच माझा वंश आहे ।।

माझिया रक्तात काही । ईश्वराचा अंश आहे ।।

फक्त रायगड जिल्ह्यातीलच नव्हे तर रयतच्या कार्यक्षेत्रातील सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनी यांच्यासाठी आरोग्य, शिक्षण, कला, क्रीडा इत्यादी क्षेत्रामध्ये दर्जेदार पायाभूत सुविधा निर्माण व्हाव्यात यासाठी मा. रामशेठजी यांच्यासारखा प्रगल्भ व निःस्वार्थी वटवृक्ष सदा बहरत राहो अशी प्रार्थना करतो आणि त्यांच्या दीर्घायुष्यासाठी सदिच्छा व्यक्त करतो.






राम ते लोकनेते रामशेठ ठाकूर

प्रा. प्रदीप बबन हिवरकर
मॅनेजिंग कौन्सिल सदस्य,
रयत शिक्षण संस्था, सातारा

शिव-फुले-शाहू-गाडगेबाबा-प्रबोधनकार ठाकरे यांनी सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून समाजातील अगदी शेवटच्या स्तरापर्यंत गुणवत्तापूर्ण, दर्जेदार, कौशल्याधिष्ठित शिक्षण प्रदान करता यावे, यासाठी आयुष्याच्या अखेरपर्यंत कार्यरत राहिले. पुढे हा वारसा पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी चालविला. फुले, शाहू, कर्मवीर भाऊराव पाटील यांचे सच्चे अनुयायी म्हणून ज्ञात असलेले लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सत्यशोधक समाजाचा वारसा आजअखेर जपला. कर्मवीरांचा सत्यशोधक वारसा जपणारा हा सच्चा रयतसेवक स्वतः कष्टाच्या अनेक झळा सहन करून उपेक्षित समाज हा सक्षम आणि समृद्ध व्हावा यासाठी अविरत कार्यरत राहिला. आपण सोसलेले दु:ख, हाल पुढील पिढीच्या वाट्याला येऊ नये यासाठी राम झटत राहिला. रयत शिक्षण संस्थेच्या संख्यात्मक, गुणात्मक वाढीसाठी १२५ कोटींपेक्षा अधिक रक्कम आदरणीय रामशेठ यांनी अगदी सहजपणे देऊ केली त्यामध्ये कुठलाही स्वार्थ, जात, धर्म, प्रांत यामध्ये भेदभाव केला नाही. 'जिथे कमी तिथे रामशेठ' हेच सूत्र आज महाराष्ट्रामध्ये विशेषत: रयत शिक्षण संस्थेमध्ये दिसून येते.

'शुद्ध बीजापोटी, फळे रसाळ गोमटी' भागुबाई चांगू ठाकूर व चांगू काना ठाकूर यांच्या पोटी २ जून १९५१ न्हावा खाडीमध्ये रामचा जन्म झाला. बालपणापासूनच अपार कष्ट हा संस्कार आपल्या आई-वडिलांच्या पासून त्यांनी शिकून घेतलेला होता. वयाच्या पाचव्या वर्षापासून राम आपल्या आईला लाकूड फोडून देणे, विहिरीतून पिण्यासाठी पाणी आणून देणे यासारखे अनेक काम करीत होता. १९६४ मध्ये गव्हाण हायस्कूलला प्रवेश मिळाला आणि याच ठिकाणी कर्मवीरांचा सत्यशोधक वारसा जपण्याची संस्कृती त्यांच्या अंगी रयतने विकसित केली. कष्टाने जगायचे, श्रमप्रतिष्ठेला जपायचे हा संस्कार कर्मवीर भाऊराव पाटील यांच्याकडून त्यांना मिळाला.

रयत शिक्षण संस्थेच्या संस्कृतीचा खरा वारसा रामने जपला आणि तो अखेरपर्यंत आपल्या आयुष्याच्या जडणघडणीमध्ये त्यांनी तो उपयोगात आणला. फक्त शिक्षणंच घ्यायचे नाही, तर समाजहित, विधायक काम, व्यवहार हा सुद्धा जतन करता आला पाहिजे हा महत्त्वाचा संदेश रयतकडून त्यांना मिळाला. हायस्कूलचे शिक्षण झाल्यानंतर उच्च शिक्षणासाठी त्याकाळी फारशी सोय नसायची म्हणून १९६८ साली उच्च शिक्षणासाठी छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा या ऐतिहासिक महाविद्यालयात त्यांनी प्रवेश घेतला. कर्मवीरांचा 'कमवा आणि शिका' हा मूलमंत्र स्वीकारत या अभिनव प्रयोगामध्ये त्यांनी भाग घेतला. मोजक्या पैशांमध्ये फारसं भागत



नव्हतं. काम करून शिकायचं, स्वावलंबी जीवन जगायचं, श्रमप्रतिष्ठा जपायची कितीही मोठा माणूस असला, तरी श्रमाला कमी लेखायचे नाही घामाचा गंध हा सर्वात सुगंधी गंध समजला जातो याची जाणीव व अण्णांचा हा संदेश रामला नेहमी स्मरणात होता म्हणजेच रामच्या जडण-घडणीमध्ये रयतचा खूप मोठा वाटा आहे याचे स्मरण रामशेठ नेहमी करून देत असतात.

'इंडियन एज्युकेशन सोसायटी' या संस्थेतील 'विठोबा खंडाप्पा हायस्कूल' येथे १९७३ साली ते शिक्षक पदी रुजू झाले कोणतेही काम करायचे ते निष्ठेने करायचे. त्यामध्ये गुणवत्ता असलीच पाहिजे यामध्ये रामशेठ यांनी कधीही तडजोड केली नाही. दोन वर्षे विद्यार्थ्यांना मनापासून मार्गदर्शन केले. अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम राबवून ते खऱ्या अर्थाने विद्यार्थीप्रिय शिक्षक म्हणून नावारूपास आले. लहानपणापासूनच स्वतः गरिबी अनुभवली होती त्यामुळे गरिबीतून अगदी शून्यातून कर्तृत्वाची उंची कशी निर्माण करता येईल, याविषयी विद्यार्थ्यांना ते स्वतः समजावून सांगायचे व प्रेरित करायचे. एक हाडाचा शिक्षकच विद्यार्थ्यांना प्रेरित करू शकतो, दिशा देऊ शकतो तेच रामशेठ यांनी केले.

आयुष्य जगत असताना समस्या तर येणारच; पण त्या समस्यांना न घाबरता, समस्यांसाठी न थांबता त्या सोडवण्यावर भर त्यांचा दिसून येतो. काट्याकुट्यांची वाट असूनसुद्धा त्या वाटेवरील काटे दूर करून प्रवास सहज आणि सुलभ करता येतो, हा संस्कार कर्मवीर भाऊराव पाटलांकडून शिकला आहे त्यामुळे कितीही संकटं आली, तरी मागे हटायचे नाही. फक्त आपल्या कामाशी आपण प्रामाणिक राहायचे, निष्ठेने काम करायचे, गुणवत्ता जपायची हा कर्मवीरांचा विचार त्यांनी पावलोपावली जपला आणि पुढील पाठ पिढीसाठी देऊ केला.

साधारणपणे दोन वर्ष शिक्षक म्हणून काम केल्यानंतर त्यांनी व्यवसायात जाण्याचा निर्णय घेतला. मला व्यक्तिगत वाटते, की बरं झालं रयत शिक्षण संस्थेमधील एक निष्ठावान सच्चा सेवक शिक्षक रूपाने कमी झाला असला, तरी हजारो शिक्षकांच्या बरोबरीने रामशेठ काम करीत आहेत. अध्यापनाचे काम बाजूला सारून उपेक्षित घटकातील विद्यार्थ्यांसाठी नवनवीन इमारती बांधायच्या, संगणक शाळा, प्रयोगशाळा, मुलींसाठी स्वच्छतागृह, संरक्षक भिंत, क्रीडांगण, विज्ञान प्रयोगशाळा ज्याची खऱ्या अर्थाने रयत शिक्षण संस्थेला गरज

आहे, तेच रामशेठ यांनी करून दाखविले. संस्थेच्या पाचही विभागांमधील कोणतेही ग्रामस्थ त्यांच्याकडे जाऊ देत, रामशेठ यांनी प्रत्येकाला मदत केली. त्यासाठी प्रत्येक शाळा सुसज्ज कशी होईल, विद्यार्थ्यांची सोय कशी होईल याकडे लक्ष दिले व त्यासाठी कोट्यवधी रुपये दान दिले.

जानेवारी २०२३ मध्ये मी स्वतः मोखाडा, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे माध्यमिक आश्रमशाळा व डोळखांब येथील रयत शिक्षण संस्थेच्या शाखेला भेट दिली होती त्या आदिवासी भागात अतिशय सुसज्ज असे कॅम्पस रामशेठ यांनी निर्माण केले आहे. भारतीय संविधानानुसार कलम २१ अ प्रत्येकाला गुणवत्तापूर्ण जीवन जगण्याचा अधिकार आहे तो अधिकार आदिवासी बांधवांना रयतच्या माध्यमातून प्रदान करण्याचे महत्त्वाचे कार्य रामशेठ यांनी केल्याचे दिसून येते, कारण त्या भागातील विद्यार्थी हे किती उपेक्षित आहेत, किती गरजू आहेत, हे तेथील आदिवासी पाड्यावर गेल्यावरच समजते त्या आदिवासी विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी सुसज्ज कॅम्पस, संगणक प्रयोगशाळा, ए.आय. तंत्रज्ञान, स्पोकन इंग्लिश यासारखे उपक्रम अतिशय चांगल्या पद्धतीने कार्यरत असल्याचे दिसून आले. त्याचे सर्व श्रेय त्या भागातील आदरणीय रामशेठ यांना जाते. कारण रामशेठ यांना 'शिक्षण कुणासाठी व कशासाठी ?' हे समजले आहे. अशक्त समाजाला सशक्त करण्याचे एक कृतिशील उदाहरण म्हणजे रामशेठ आहेत. स्वतःचा संसार कुणीही करू शकतो; पण अवघाची संसार करणे सोपे नाही. रामशेठ यांनी अवघाची संसार सुखाचा, मांगल्याचा, ज्ञानसमृद्धीचा व्हावा यासाठी कित्येक दशके रयतेसाठी दिली.



(मोखाडा गावातील आदिवासी पाडा)



'रामपर्व' या ग्रंथामध्ये माझ्या वाचनात आले. त्यामध्ये रामशेठ यांनी शिक्षक पदाचा राजीनामा देऊन व्यवसायामध्ये काम करायचे ठरविले. प्रारंभी ३५ हजार रुपये किमतीचा एक जुना डंपर त्यांनी खरेदी केला त्या डंपरवर अनेक वर्षे काम करून नफा कमविला. आजही तो डंपर त्यांनी आठवण म्हणून जपलेला आहे यावरून रामशेठ हे जुनं सोडून देत नाहीत ते जपून ठेवतात मग ती वस्तू असो वा माणसं याचा प्रत्यय येतो. येणाऱ्या नवीन पिढीला रामशेठ यांचे कार्य, विचार निश्चितच प्रेरणादायी व दिशा देणारे आहे.

९ मे २०२६ रोजी रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. खासदार शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली रयत शिक्षण संस्थेच्या जनरल सभेमध्ये माझी संचालक मंडळावर निवड झाली त्याचवेळी संस्थेचे आधारस्तंभ रामशेठ ठाकूर साहेब स्वतः माझ्याकडे आले आणि माझ्या हातात 'रामपर्व' हे पुस्तक ठेवले. मला आश्चर्याचा धक्का बसला इतका मोठा माणूस सामान्य माणसाच्या जवळ येऊन ग्रंथ भेट देतात. मला तो क्षण अतिशय हृदयस्पर्शी वाटला. रामशेठ यांना गरिबीचा विसर नाही. कोणताही भेदभाव नाही. मोठे झाले पण माती, आपली माणसं ते आजही विसरलेले नाहीत. मोठेपणा तर कधीच अंगाशी लावून घेतला नाही याचा प्रत्यय पुन्हा त्या निमित्ताने आला.

अनेक राजकीय नेते म्हणतात, 'मी राजकारण करत नाही समाजकारण करतो' पण प्रत्यक्षात तसे दिसून येत नाही या उलट लोकनेते रामशेठ हे राजकारण कमी करतात; पण समाजकारण अधिक याचा प्रत्यय त्यांनी केलेल्या कामातूनच दिसून येतो म्हणूनच रयत शिक्षण संस्थेत तसेच त्यांच्या स्वतःच्या संस्थेत सुसज्ज कॅम्पस असलेल्या शाळा, महाविद्यालये गरजूंसाठी उभी केली. कला, संस्कृती, शिक्षण, क्रीडा क्षेत्रात चौफेर कार्य रामशेठ यांनी केलेले आहे एवढे मोठे काम क्वचितच राजकीय मंडळींनी केले असावे. ते स्वतः दोन वेळा खासदार म्हणून निवडून आलेले आहेत शेतकरी, कामगार, मजूर यांचे अनेक प्रश्न त्यांनी मार्गी लावलेले आहेत. आज त्यांची दोन्ही मुलं आमदार प्रशांत ठाकूर व परेश ठाकूर हे आपल्या वडिलांच्या विचारधारेवर चाललेले दिसून येतात. अनेक सामाजिक प्रश्नांची जाण व ते प्रश्न सोडवण्याची धमक त्यांच्यामध्ये दिसून येते. यामागे सुद्धा रामशेठ यांचे मार्गदर्शन असल्याचे दिसून येत आहे. या सहजीवन प्रवासात सहचारिणी शकुंतला ताईंची साथ विसरता येणार नाही.

२०२५-२०२६ हे वर्ष रामशेठ यांचे अमृतमहोत्सवी वर्ष आहे. आदरणीय रामशेठ अमृत महोत्सवी वाढदिनी रयत शिक्षण संस्थेच्या वतीने लक्ष- लक्ष शुभेच्छा..!



रयतेचा आधारवड

प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर
महात्मा फुले ए.एस.सी.कॉलेज,
पनवेल

महात्मा जोतिबा फुले व राजर्षी शाहू महाराजांचे बहुजन समाजाच्या उद्धाराचे कार्य आपल्या खांद्यावर घेऊन कर्मवीर भाऊराव पाटील यांनी केशवराव बागडे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित सत्यशोधक समाजाच्या परिषदेमध्ये रयत शिक्षण संस्थेची मुहूर्तमेढ रोवली व दिनांक ४ ऑक्टोबर १९१९ रोजी विजयादशमीच्या दिवशी रयत शिक्षण संस्थेची स्थापना झाली.

कर्मवीर अण्णांनी आपल्या अफाट कर्तृत्वाने बहुजन समाजाला शिक्षणाची कवाडे खुली केली. वसतिगृहांची स्थापना करून अठरापगड जातीच्या मुलांना सहजीवनाचा मंत्र दिला. 'कमवा आणि शिका' ही योजना राबवून विद्यार्थ्यांना स्वावलंबी बनविले. 'गाव तिथे शाळा' स्थापन करून ज्ञानाची गंगा गरिबांच्या झोपडीपर्यंत नेली व शिक्षण क्षेत्रातील दीपस्तंभ ठरले. रयतेच्या शिक्षणाचा ध्यास घेणाऱ्या या महामानवाच्या पश्चातही त्यांनी निर्माण केलेल्या ज्ञानगंगेची ही ज्योत असंख्य रयतपुत्रांनी तेवत ठेवली आहे. रयत शिक्षण संस्थेची कार्यप्रणाली आणि विचारप्रवाहातून तावून सुलाखून निघालेले रायगड जिल्ह्यातील आदर्शवत व्यक्तिमत्त्व म्हणजेच लोकनेते रामशेठ ठाकूर होत !

पनवेल तालुक्यातील शिवाजीनगर या लहानशा गावामध्ये अत्यंत गरीब कुटुंबात त्यांचा जन्म झाला. त्यांचे आई-वडील दोघेही दररोज शेतांवर मोलमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत. गरीब कुटुंबात जन्म घेऊनही मा. रामशेठ ठाकूर साहेबांनी जिद्दीने प्राथमिक व माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. आपल्या गुरूंच्या मार्गदर्शनानुसार त्यांनी उच्च शिक्षणासाठी सातारा येथील छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये 'कमवा आणि शिका' योजनेमध्ये सहभागी होऊन प्रवेश घेण्याचा निर्णय घेतला. कर्मवीर अण्णांच्या स्वावलंबनाच्या अभिनव प्रयोगशाळेमध्ये श्रमाची प्रतिष्ठा शिकून त्यांनी पदवी प्राप्त केल्यानंतर खऱ्या अर्थाने त्यांच्या आर्थिक प्रगतीची गरुडभरारी सुरु झाली. शिक्षण, श्रम व संस्कार यांच्या त्रिवेणी संगमाने मा. रामशेठ ठाकूर साहेबांच्या व्यक्तिमत्त्वात आमूलाग्र बदल झाला. सुरुवातीला शिक्षक म्हणून ज्ञानदानाचे काम केल्यानंतर उद्योगक्षेत्रात प्रवेश करण्याचा त्यांनी निर्णय घेतला व तो समर्पक ठरला, कारण साक्षात लक्ष्मी त्यांच्यावर प्रसन्न झाली व पनवेल तालुक्यातील एका यशस्वी उद्योजकाची राजकीय, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील वाटचाल अत्यंत वेगाने सुरु झाली. कर्मवीरांच्या मुशीत तयार झाल्याने त्यांच्या विचारांचा पगडा मा. रामशेठ ठाकूर साहेबांच्या मनावर कायमचा कोरलेला आहे, त्यामुळेच आपल्या कमाईतील २५ % वाटा हा समाजाचा आहे असा विचार करणारे ते एक असामान्य व्यक्तिमत्त्व आहे. महाभारतातील दानशूर कर्णाप्रमाणेच शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक व क्रीडाक्षेत्राला भरभरून आर्थिक मदत करणारे दानशूर व्यक्तिमत्त्व म्हणून आज संपूर्ण महाराष्ट्रात ते सर्वोतोपरिचित आहेत.

रयत शिक्षण संस्थेचे कार्य पुढे नेण्याचे काम संस्थेचे हितचिंतक, कार्यकर्ते, शिक्षक व माजी विद्यार्थीच करतील, असा आत्मविश्वास कर्मवीर अण्णांना होता. संस्थेच्या शताब्दी महोत्सवाची वाटचाल पाहिल्यानंतर हाच प्रत्यय येतो. संस्थेचे अध्यक्ष आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेब, दिवंगत पतंगराव कदम साहेब, दिवंगत एन. डी. पाटील साहेब, दिवंगत रावसाहेब शिंदे साहेब, मा.डॉ. अनिल पाटील साहेब व मा. चंद्रकांत दळवी साहेब यांच्या खांद्याला खांदा लावून मा. रामशेठ ठाकूर साहेबांनी काम केले आहे व सातत्याने करीत आहेत. संस्थेच्या प्रत्येक उपक्रमात त्यांची आर्थिक मदत असते. दरवर्षी संस्थेला कोट्यवधी रुपयांची देणगी त्यांच्याकडून व त्यांच्या कुटुंबीयांकडून दिली जाते ही बाब निश्चितच कौतुकास्पद आहे.

रयत शिक्षण संस्थेच्या प्रत्येक विद्यार्थ्यास संगणक शिक्षण देण्याची योजना मा. शरदचंद्रजी पवार साहेबांनी जाहीर केल्यानंतर व्यासपीठावर बसलेल्या मा. रामशेठ ठाकूर साहेबांनी क्षणाचाही विलंब न लावता १ कोटी रुपयांची देणगी या प्रकल्पास जाहीर केली. त्यांची ही कृती कर्मवीर निष्ठेचे प्रतिक आहे ! कर्मवीर अण्णांनी संस्था वाढीसाठी प्रत्येक घरोघरी जाऊन पैशाच्या किंवा धान्याच्या रुपात देणगी जमा केली परंतु संस्थेचा एक विद्यार्थी नि:स्वार्थीपणे कोट्यवधी रुपयांची देणगी देत आहे हे पाहून कर्मवीर अण्णांना मा. रामशेठ ठाकूर साहेबांचा निश्चितच अभिमान वाटला असता !

छत्रपती शिवाजी कॉलेजने आपल्याला शिक्षणरूपी वाघिणीचे दूध दिले त्या महाविद्यालयाची ६ कोटी रुपयांची एक आदर्श प्रशासकीय इमारत बांधून देण्याची घोषणा मा. रामशेठ ठाकूर साहेबांनी केली व बांधकामाची सुरूवात वेगाने सुरु केली. संस्थेच्या पहिल्या महाविद्यालयाच्या या प्रशासकीय इमारतीचे प्रत्यार्पण मा. शरदचंद्रजी पवार साहेबांच्या उपस्थितीत झाले तो क्षण ऐतिहासिक होता ! कर्मवीर अण्णांच्या परीस स्पर्शाचा व दूरदृष्टीचा हा विजय आहे असे मी मानतो. देतो तो देव, राखतो तो राक्षस ! या उक्तीनुसार बहुजन समाजातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी भरीव आर्थिक मदत देणाऱ्या मा. रामशेठ ठाकूर साहेबांच्या



दातृत्वास सलाम ! माणसाचे मोठेपण हे त्याच्या जन्मावर अवलंबून नसते, तर ते त्याच्या कर्तृत्वावर अवलंबून असते ! मा. रामशेठ ठाकूर साहेबांनी आपल्या अफाट कर्तृत्वाने व रयत शिक्षण संस्थेवरील निष्ठेने ते सप्रमाण सिद्ध केले आहे. त्यामुळेच संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलवर व एक्झिक्युटीव्ह कमिटीवर त्यांची दर तीन वर्षांनी निवड करून त्यांना सन्मानित केले जाते. आपल्या जीवनात मिळालेल्या अनेक पुरस्कारापेक्षा संस्थेचा 'रयत माऊली पुरस्कार' व 'इस्माईल साहेब मुल्ला पुरस्कार' मला जास्त मोलाचा वाटतो, असे जाहीरपणे सांगणारे ते संस्थेचे एक निष्ठावान माजी विद्यार्थी व सच्चे हितचिंतक आहेत, याचा सर्व रयत सेवकांना अभिमान वाटतो.

रयत शिक्षण संस्था शतकोत्तर वाटचाल करीत असताना विविध शाखांच्या जुन्या झालेल्या इमारती आधुनिक शिक्षणाच्या दृष्टीने अद्ययावत करणे संस्थेपुढे मोठे आव्हान होते, ते स्वीकारून रायगड जिल्ह्यातील विविध शाखांच्या नवीन इमारती बांधून देण्याचा संकल्प मा. रामशेठ ठाकूर साहेबांनी केला आहे. गव्हाण, कामोठे, रिटघर, वावंजे, उलवा व मोखाडा महाविद्यालय या शाखांच्या नवीन इमारती बांधण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. तसेच संस्थेच्या विविध हायस्कूल व महाविद्यालयांना विविध कामांसाठी त्यांनी आजअखेर आपल्या कमाईतील १२५ कोटी रुपयांची देणगी दिली आहे.

रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, देशाचे माजी कृषी मंत्री व महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आदरणीय शरदराव पवारसाहेब पनवेल महाविद्यालयात आले असताना त्यांना माहिती मिळाली, की मा. रामशेठ ठाकूर साहेबांनी आपल्या सासऱ्यांच्या नावाने एक हॉल बांधून दिला आहे. आपल्या भाषणात त्यांनी रामशेठ ठाकूर साहेबांचा गौरव करताना सांगितले, मी संपूर्ण महाराष्ट्रात फिरत असतो. परंतु आपल्या सासऱ्यांच्या नावाने हॉल बांधून देणारा जावई मी आज पहिल्यांदा पाहिला ! महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री दिवंगत अजितदादा पवार साहेब ईश्वरपूर येथील कार्यक्रमात त्यांच्या दातृत्वाचा गौरव करताना उत्स्फूर्तपणे म्हणाले, ''रामशेठ म्हणजे कर्णाचा अवतार असून महाराष्ट्रातील लोकांनी त्यांच्या दातृत्वाचा आदर्श समोर ठेवून अनुकरण केले पाहिजे.'' रयत शिक्षण संस्थेचे माजी चेअरमन मा. डॉ. एन. डी. पाटील साहेब त्यांना सर्वांची इच्छापूर्ती करणाऱ्या कल्पवृक्षाची उपमा द्यायचे, तर मा. रावसाहेब शिंदे त्यांच्याबद्दल अभिमानाने सांगायचे, की रामशेठ हे माणसातील देव आहेत. वरील सर्व मान्यवरांचे विचार हे मा. रामशेठ ठाकूर साहेबांच्या कर्तृत्वाचा गौरव करणारे आहेत.

आपल्या सासऱ्यांच्या नावाने स्वतःची 'जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था' स्थापन केली असताना सुद्धा रयत शिक्षण संस्था ही माझी मातृसंस्था असून माझ्या अखेरच्या श्वासापर्यंत मी संस्थेच्या विकासात माझे योगदान देत राहीन असा दृढनिश्चय त्यांनी केला असून आपल्या कृतीने त्यांनी तो सिद्ध केला आहे. 'बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले' या उक्तीनुसार मा. रामशेठ ठाकूर साहेब खऱ्या अर्थाने रयत शिक्षण संस्थेचे आधारवड झाले आहेत. त्यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त त्यांना उदंड आयुष्य लाभो, हीच ईश्वर चरणी प्रार्थना ! रयत परिवारातर्फे त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा !





ममत्व आणि दातृत्वाची कवचकुंडले लाभलेला लोकनेता : मा. खा. रामशेठ ठाकूर

प्रो. (डॉ.) अनिलकुमार वावरे
प्रमुख, अर्थशास्त्र विभाग
छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा

समस्त मानव जातीच्या उत्क्रांतीचा आजवरचा इतिहास पाहिला असता या इहलोकी जन्माला येणाऱ्या मानव जातीतील काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की, त्यांचे मूल्यांकन केवळ त्यांनी प्राप्त केलेल्या पदांवरून, संपत्तीवरून किंवा लोकप्रियतेवरून करता येत नाही. त्यांच्याकडे पाहताना एखाद्या व्यक्तीपेक्षा एक विचार, एक संस्कारपरंपरा आणि एक जीवनमूल्य आपल्यासमोर उभे राहते. लोकनेते मा. रामशेठ ठाकूर हे असेच एक विलक्षण व्यक्तिमत्त्व आहे. त्यांच्या अमृतमहोत्सवी वर्षाच्या निमित्ताने त्यांच्या जीवनकार्याचा मागोवा घेताना आपण एका यशस्वी उद्योगपतीची कथा वाचत नाही; तर संघर्षातून उभ्या राहिलेल्या, शिक्षणातून घडलेल्या, कृतज्ञतेतून फुललेल्या आणि परोपकारातून समाजाला समृद्ध करणाऱ्या एका जीवनमहाकाव्याचा अनुभव घेतो.

आजच्या काळात यशाची व्याख्या बहुधा संपत्ती, सत्ता आणि प्रतिष्ठा यांच्याशी जोडली जाते; परंतु काही व्यक्ती आपल्या जीवनातून यशाची वेगळीच व्याख्या घडवतात. समाजाने दिलेले ऋण समाजालाच परत करणे, शिक्षणातून मिळालेली उंची शिक्षणालाच अर्पण करणे आणि वैयक्तिक प्रगतीचे रूपांतर सामूहिक कल्याणात करणे ही यशाची सर्वोच्च पायरी आहे, हे रामशेठ ठाकूर यांच्या जीवनातून अधोरेखित होते. ठाकूर साहेबांच्या एकूणच व्यक्तिमत्त्वाचा विचार करताना सर्वप्रथम जाणवणारा गुण म्हणजे कृतज्ञता. भारतीय संस्कृतीत दानशूर व्यक्तींची परंपरा मोठी आहे; परंतु दानाला कृतज्ञतेचे अधिष्ठान लाभले, की ते अधिक उदात्त बनते. म्हणूनच रयत शिक्षण संस्थेला त्यांनी दिलेल्या शेकडो कोटी रुपयांच्या योगदानाविषयी बोलताना ते सहजपणे म्हणतात, 'ही देणगी नाही; ही माझी कृतज्ञता आहे.' या एका वाक्यात त्यांच्या जीवनदृष्टीचे संपूर्ण तत्त्वज्ञान सामावलेले आहे. ज्या संस्थेने एका ग्रामीण विद्यार्थ्याला स्वप्न पाहण्याची हिंमत दिली, श्रमाची प्रतिष्ठा शिकवली आणि जीवनाचा मार्ग दाखवला, त्या संस्थेप्रती व्यक्त केलेली ही भावनाच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला असामान्य बनवते. रामशेठ ठाकूर यांचे जीवन पाहताना संत साहित्याची परंपरा आठवते. संत तुकाराम म्हणतात 'जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले' ही ओळ जणू त्यांच्या जीवनाचीच ओळख बनून जाते. कारण त्यांच्या घराचा दरवाजा केवळ पाहुण्यांसाठी नव्हे, तर गरजूंसाठी सदैव खुला राहिला आहे. समाजातील दुर्बल, वंचित, संकटग्रस्त आणि उपेक्षित घटकांप्रती असलेली त्यांची संवेदनशीलता ही केवळ सामाजिक कर्तव्याची अभिव्यक्ती नाही; ती त्यांच्या जीवनमूल्यांची नैसर्गिक फलश्रुती आहे.

प्रत्येक महान प्रवासाची सुरुवात एखाद्या लहानशा पाऊलखुणेपासून होत असते. पुढे इतिहास घडविणाऱ्या व्यक्तिमत्त्वांच्या जीवनाकडे पाहताना त्यांच्या कर्तृत्वाच्या शिखरांपेक्षा त्यांच्या संघर्षाच्या पायवाटा अधिक बोलक्या वाटतात. लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांच्या जीवनाची कहाणीही अशीच आहे. आज

महाराष्ट्राच्या शैक्षणिक, सामाजिक, औद्योगिक आणि राजकीय क्षेत्रात आदराने घेतले जाणारे हे नाव एका साध्यासुध्या ग्रामीण कुटुंबातून पुढे आले आहे. त्यामुळे त्यांचा जीवनप्रवास हा केवळ वैयक्तिक यशाचा आलेख नसून ग्रामीण महाराष्ट्रातील शिक्षणक्रांतीचा एक जिवंत दस्तऐवज आहे.

याच प्रेरणादायी जीवनप्रवासाची सुरुवात झाली ती एका छोट्याशा गावातील पडवीत भरलेल्या शाळेतून. त्यांचे प्राथमिक शिक्षण ज्या शाळेत झाले, ती शाळा आजच्या भव्य शैक्षणिक संकुलांसारखी नव्हती. गावातील एखाद्या मंदिरात, कधी एखाद्या दानशूर व्यक्तीच्या घराच्या पडवीत भरत असलेली ती शाळा होती. गव्हाण परिसरातील धर्मा ठाकूर यांच्या घराच्या माडीवर सुरू झालेल्या अशाच एका शाळेत त्यांनी शिक्षणाची पहिली अक्षरे गिरवली. नियतीचा हा किती विलक्षण खेळ म्हणावा लागेल की, पडवीतील शाळेत बसून शिक्षण घेणारा हा विद्यार्थी पुढे कोट्यवधी रुपयांच्या देणग्यांमधून शेकडो शैक्षणिक इमारती उभ्या करणार होता. विशेष म्हणजे या काळात त्यांच्यावर कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांचा प्रभाव पडू लागला. शालेय जीवनात कर्मवीर जयंती, विविध शैक्षणिक कार्यक्रम आणि रयत शिक्षण संस्थेच्या कार्याची माहिती यांमधून त्यांना कर्मवीरांच्या जीवनकार्याची ओळख झाली. समाजातील सर्व स्तरांतील मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आयुष्य झिजविणाऱ्या या महापुरुषाविषयी त्यांच्या मनात आदर निर्माण झाला. पुढे हा आदर श्रद्धेत आणि श्रद्धा कृतीत परिवर्तित होणार होती.

गावातील पडवीत सुरू झालेला हा प्रवास आता एका नव्या वळणावर येत होता. ग्रामीण शाळेतील हा जिद्दी विद्यार्थी उच्च शिक्षणाच्या शोधात साताऱ्याकडे मार्गस्थ होणार होता. त्याची भेट होणार होती रयत शिक्षण संस्थेच्या त्या ऐतिहासिक महाविद्यालयाशी, ज्याने त्याच्या आयुष्याला केवळ दिशा दिली नाही, तर त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा पुनर्जन्म घडविला. छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा आणि 'कमवा व शिका' योजनेचा तो अध्याय पुढे रामशेठ ठाकूर यांच्या जीवनातील सर्वांत निर्णायक पर्व ठरणार होते.

छत्रपती शिवाजी कॉलेजच्या परिसरात प्रवेश करताना त्यांच्यासमोर केवळ वर्गखोल्या नव्हत्या; तर विचारांचे, संस्कारांचे आणि सामाजिक समतेचे एक विशाल विश्व उघडत होते. ग्रामीण, शहरी, दलित, बहुजन,



शेतकरी, कामगार, सर्व धर्म आणि जातींचे विद्यार्थी एकत्र राहत, श्रम करत आणि शिक्षण घेत होते. त्या काळातील भारताच्या सामाजिक वास्तवात ही एक लहानशी सामाजिक क्रांतीच होती. रामशेठ ठाकूर अनेकदा सांगतात की रयतच्या वसतिगृहात त्यांनी प्रथमच समता जगताना अनुभवली. अठरापगड जातींची मुले एकत्र राहणे, एकत्र जेवणे, एकत्र श्रम करणे आणि एकमेकांच्या सुखदुःखात सहभागी होणेही केवळ शिक्षणाची प्रक्रिया नव्हती; ती सामाजिक लोकशाहीची प्रयोगशाळा होती. पुढे त्यांच्या सार्वजनिक जीवनात दिसणारी सर्वसमावेशकता आणि माणसाला माणूस म्हणून पाहण्याची दृष्टी याच संस्कारातून घडली. या महाविद्यालयात त्यांना अनेक विलक्षण शिक्षक लाभले. इतिहासाचे अभ्यासक आर. डी. गायकवाड यांनी त्यांच्या मनात इतिहासाविषयीची जिज्ञासा जागवली. मराठी संतपरंपरेचे अभ्यासक आणि महाविद्यालयाचे आदरणीय प्राचार्य बापूसाहेब उनउने यांनी त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर खोल परिणाम केला. संत वाङ्मय शिकवताना उनउने सर केवळ पाठ्यपुस्तक शिकवत नसत; ते जीवन शिकवत असत. संतांच्या विचारांतून करुणा, समता, सेवा आणि परोपकार यांचे जे संस्कार विद्यार्थ्यांच्या मनावर होत, त्याचा प्रभाव रामशेठ ठाकूर यांच्या आयुष्यावर दीर्घकाळ राहिला.

'कमवा आणि शिका' योजनेत काम करताना त्यांना दरमहा दहा, वीस, तीस किंवा जास्तीत जास्त चाळीस रुपये मानधन मिळत असे. आजच्या पिढीला ही रक्कम अत्यल्प वाटू शकते; परंतु त्या काळी या रकमेने स्वप्ने जगली जात होती. त्या पैशांत शिक्षण घेतले जात होते. त्या पैशांत आत्मसन्मान विकत घेतला जात नव्हता, तर कमावला जात होता. इतिहासाचे स्वतःचे असे एक विलक्षण सौंदर्य असते तो अनेकदा पूर्ण वर्तुळ पूर्ण करतो. महिन्याला चाळीस रुपयांपेक्षा कमी मानधन मिळवणारा हा विद्यार्थी पुढे त्याच संस्थेच्या विकासासाठी शेकडो कोटी रुपयांचे योगदान देईल, अशी कल्पना त्या काळी कोणालाही सुचली नसती; परंतु हेच वास्तव घडले. विद्यार्थी म्हणून ज्यांनी संस्थेकडून घेतले, त्याच विद्यार्थ्याने पुढे संस्थेला अनेक पटींनी परत दिले. अमेरिकेतील विद्यापीठांच्या माजी विद्यार्थ्यांनी आपल्या संस्थांसाठी मोठा निधी उभारल्याच्या कथा आपण ऐकतो; परंतु छत्रपती शिवाजी कॉलेजच्या इतिहासात रामशेठ ठाकूर यांनी निर्माण केलेला आदर्श विलक्षण आहे. एका माजी विद्यार्थ्याने आपल्या मातृसंस्थेला दिलेली साथ ही केवळ आर्थिक मदत नाही; ती कृतज्ञतेच्या भारतीय परंपरेची सर्वोच्च अभिव्यक्ती आहे.

छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा येथील शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांच्या मनात एक स्वप्न होते. शिक्षक होण्याचे, शिक्षणाने त्यांना घडवले होते आणि शिक्षणाच्या माध्यमातून समाजाला काहीतरी परत देण्याची त्यांची इच्छा होती. त्यामुळे त्यांनी बी.एड. पूर्ण केले आणि शिक्षक म्हणून आपल्या कार्यजीवनाची सुरुवात केली. वर्गखोलीत उभा असलेला हा तरुण शिक्षक विद्यार्थ्यांना केवळ विषय शिकवत नव्हता; तर स्वतःच्या संघर्षातून उभे राहण्याची प्रेरणाही देत होता. शिक्षक म्हणून कार्य करताना त्यांनी समाजाचे वास्तव अधिक जवळून अनुभवले. ग्रामीण विद्यार्थ्यांच्या अडचणी, आर्थिक मर्यादा, शिक्षणातील विषमता आणि सामान्य माणसाचे संघर्षमय जीवन त्यांनी प्रत्यक्ष पाहिले. याच काळात त्यांच्या मनात एक व्यापक सामाजिक दृष्टी विकसित होत गेली. शिक्षक म्हणून काम करत असतानाच त्यांनी जीवनातील संधींचा शोध घेतला आणि उद्योगविश्वात पाऊल ठेवले.

अनेकजण उद्योगपती होतात; परंतु सर्वच उद्योगपती समाजधुरीण बनत नाहीत. आर्थिक यशाच्या

शिखरावर पोहोचल्यानंतरही त्यांनी आपल्या मुळांशी असलेले नाते कधी तुटू दिले नाही. उलट शिक्षणाने घडवलेल्या व्यक्तीने शिक्षणालाच आपले जीवन अर्पण करण्याचा निर्णय घेतला. यातूनच पुढे जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या शैक्षणिक कार्याला नवी दिशा मिळाली. पनवेल आणि रायगड परिसरातील हजारो विद्यार्थ्यांच्या जीवनात शिक्षणाचा प्रकाश पोहोचविणाऱ्या या संस्थेने आधुनिक महाराष्ट्राच्या शैक्षणिक इतिहासात स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे. ग्रामीण आणि निमशहरी भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देण्याच्या ध्येयातून उभ्या राहिलेल्या या संस्था आज ज्ञान, संस्कार आणि सामाजिक बांधीलकीची केंद्रे बनल्या आहेत. पनवेल परिसरात उभारलेली विविध शैक्षणिक संकुले, महाविद्यालये आणि व्यावसायिक शिक्षण संस्था पाहताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते या सर्वांच्या केंद्रस्थानी केवळ इमारती नाहीत, तर शिक्षणावरील श्रद्धा आहे. पडवीतील शाळेतून सुरू झालेला प्रवास आता हजारो विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणाऱ्या ज्ञानमंदिरांपर्यंत पोहोचला होता.

उद्योगविश्वातील यशाने त्यांना संपत्ती दिली; परंतु शिक्षणाने दिलेली संवेदनशीलता त्यांनी जपली म्हणूनच ते स्वतः अनेकदा नम्रपणे सांगतात, ''पहिल्या दिवशी शिक्षक असताना जो राम ठाकूर होता, तोच आज आहे. लोकांनी मला रामशेठ बनवलं; पण मी मनानं अजून रामशेठ झालेलो नाही.'' या एका वाक्यात त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे संपूर्ण सार दडलेले आहे.

रयत शिक्षण संस्थेच्या विविध शाळा, महाविद्यालये, वसतिगृहे, शैक्षणिक इमारती, सभागृहे आणि विकास योजनांसाठी त्यांनी उदार हस्ते मदत केली. या योगदानाची एकत्रित रक्कम एकशे चाळीसकोटी रुपयांहून अधिक असल्याचे नमूद केले जाते. मात्र या आकड्यांपेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यामागील भावना. कारण ठाकूर साहेबांसाठी हा निधी खर्च नव्हता; तो त्यांच्या जीवनाला आकार देणाऱ्या संस्थेप्रती व्यक्त केलेला नतमस्तक आदर होता.

विशेषतः छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा या त्यांच्या मातृमहाविद्यालयाशी असलेले त्यांचे नाते विलक्षण भावनिक आहे. 'कमवा आणि शिका' योजनेतून शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्याने पुढे त्याच महाविद्यालयाच्या विकासासाठी कोट्यवधी रुपयांचे योगदान द्यावे, ही घटना भारतीय शिक्षणक्षेत्रात प्रेरणादायी



मानावी लागेल. विद्यार्थी म्हणून ज्यांनी संस्थेकडून घेतले, त्यांनी आयुष्याच्या उत्तरार्धात संस्थेला अनेक पटींनी परत दिले – हीच खरी भारतीय गुरुकुल परंपरा आहे. रामशेठ ठाकूर साहेबांविषयी लिहिताना मला लाभलेल्या काही वैयक्तिक अनुभवांचा उल्लेख केल्याशिवाय हा लेख पूर्ण होऊ शकत नाही. कारण त्यांच्या दानशूरतेविषयी, कृतज्ञतेविषयी आणि शिक्षणनिष्ठेविषयी. महाराष्ट्रभर अनेक कथा सांगितल्या जातात; परंतु त्यातील काही प्रसंगांचा प्रत्यक्ष साक्षीदार होण्याचे भाग्य मला लाभले आहे.

मी गेली अनेक वर्षे छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा येथे प्राध्यापक म्हणून कार्यरत आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्थापन केलेल्या या ऐतिहासिक महाविद्यालयाशी रामशेठ ठाकूर साहेबांचे नाते हे केवळ माजी विद्यार्थ्यांचे नाही, तर कृतज्ञ पुत्राचे आहे. महाविद्यालय विकास समितीवर कार्य करत असताना त्यांच्या मार्गदर्शनाखाली काम करण्याची संधी मला मिळाली. त्या काळात त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील दूरदृष्टी, संस्थेविषयीची आत्मीयता, निर्णयक्षम नेतृत्व आणि शिक्षणाबद्दलची असामान्य बांधीलकी जवळून अनुभवता आली. माझ्या स्मरणात विशेषत्वाने कोरलेला एक प्रसंग म्हणजे मराठी अर्थशास्त्र परिषदेशी संबंधित आहे. मी मराठी अर्थशास्त्र परिषदेचा अध्यक्ष असताना पनवेल येथील चांगू काना ठाकूर महाविद्यालयात स्व. जमनालाल बजाज व्याख्यानमालेच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या संशोधन, लेखन, समाजप्रबोधन आणि अर्थजागरणाच्या कार्याचा आढावा सादर करण्यात आला. परिषदेचे कार्य ऐकल्यानंतर ठाकूर साहेबांनी कोणताही विलंब न करता आपल्या मातोश्री स्वर्गीय भागुबाई चांगू ठाकूर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ परिषदेला २० लाख रुपयांची देणगी जाहीर केली. त्या क्षणी मी एका दानशूर व्यक्तीला नव्हे, तर ज्ञानचळवळीवर श्रद्धा असलेल्या एका संस्कारित समाजपुरुषाला पाहत होतो. या कार्यक्रमाच्या शुभप्रसंगी आमच्या कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे सन्माननीय कुलगुरू डॉ. ज्ञानदेव म्हस्के, रजिस्ट्रार डॉ. विजय कुंभार, मराठी अर्थशास्त्र परिषदेचे कार्यवाह खजिनदार डॉ. मारोती तेगमपुरे आणि कार्यकारिणी सदस्य प्रा. डॉ. बाळासाहेब पाटील हे मान्यवर देखील उपस्थित होते. आज त्या देणगीच्या माध्यमातून संशोधन, प्रकाशन, विद्यार्थी मार्गदर्शन, समाजप्रबोधन आणि अर्थसाक्षरतेचे अनेक उपक्रम राबविले जात आहेत. एका उदार निर्णयामागे किती व्यापक सामाजिक परिणाम दडलेला असतो, याची ती जिवंत साक्ष आहे.

त्यांच्या अमृतमहोत्सवी वर्षाकडे पाहताना मनात एकच भावना दाटून येते – काही व्यक्ती आपल्या कार्याने संस्था घडवतात, काही व्यक्ती इतिहास घडवतात; परंतु काही विरळ व्यक्तिमत्त्वे अशी असतात की ती मूल्यांची परंपरा घडवतात. रामशेठ ठाकूर हे त्या परंपरेतील एक तेजस्वी दीपस्तंभ आहेत. पडवीतील शाळेतील एका विद्यार्थ्यापासून ते हजारो विद्यार्थ्यांच्या भवितव्याला आकार देणाऱ्या लोकनेत्यापर्यंतचा त्यांचा प्रवास हा केवळ यशाचा प्रवास नाही; तो कृतज्ञतेचे कर्तृत्वात आणि कर्तृत्वाचे समाजसेवेत झालेले रूपांतर आहे. त्यांच्या जीवनाचे वर्णन करताना शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते–दानाने मोठेपणा येत नाही; मोठेपणातून दान जन्माला येते आणि जेव्हा दानाला कृतज्ञतेची, शिक्षणनिष्ठेची व माणुसकीची जोड लाभते, तेव्हा रामशेठ ठाकूरांसारखी व्यक्तिमत्त्वे निर्माण होतात. अशा व्यक्तींचे जीवन हे चरित्र नसते, ते पुढील पिढ्यांसाठी लिहिलेले प्रेरणेचे जिवंत महाकाव्य असते.



कर्मवीरांच्या स्वप्नातील विद्यापीठाचे हितचिंतक : मा. लोकनेते रामशेठ ठाकूर

प्रो. (डॉ.) विजय कुंभार
प्रभारी कुलसचिव,
कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, सातारा

'दान हे संपत्तीचे नव्हे, तर संस्कारांचे वैभव असते आणि समाजासाठी जगणे हीच जीवनाची सर्वोच्च सार्थकता असते.' या उक्तीचा प्रत्यय ज्यांच्या संपूर्ण जीवनकार्याकडे पाहिल्यानंतर येतो, अशा रयत शिक्षण संस्थेचे ज्येष्ठ व्यवस्थापन परिषद सदस्य, ख्यातनाम उद्योजक, ज्येष्ठ समाजसेवक, दानशूर व्यक्तिमत्त्व आणि कर्मवीरांच्या विचारांचे निष्ठावंत उपासक माननीय श्री रामशेठ ठाकूर हे आजच्या काळातील एक विलक्षण आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व आहेत.

रयत शिक्षण संस्थेच्या शतकपूर्तीच्या वाटचालीत अनेक दानशूर, समाजहितैषी आणि शिक्षणप्रेमी व्यक्तींनी योगदान दिले आहे. परंतु काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात, की त्यांचे योगदान केवळ आर्थिक किंवा प्रशासकीय मर्यादेत मोजता येत नाही. त्यांचे अस्तित्वच संस्थेच्या विकासाचा, मूल्यांचा आणि संस्कारांचा अविभाज्य भाग बनून जाते. माननीय रामशेठ ठाकूर हे असेच एक व्यक्तिमत्त्व आहे. पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन आहे, या विश्वासातून रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. ग्रामीण, वंचित आणि दुर्बल घटकांपर्यंत शिक्षण पोहोचविण्याचा त्यांचा ध्यास होता. ही केवळ शैक्षणिक संस्था नव्हती, तर सामाजिक क्रांतीची एक व्यापक चळवळ होती. कर्मवीरांच्या या विचारसरणीशी मनोमन एकरूप झालेल्या व्यक्तींपैकी माननीय रामशेठ ठाकूर हे अग्रस्थानी आहेत. रयत शिक्षण संस्थेबद्दल त्यांना असलेली निष्ठा, प्रेम आणि आत्मीयता ही केवळ एका व्यवस्थापन परिषद सदस्याची जबाबदारी नाही ती एका कृतज्ञ विद्यार्थ्याची, संवेदनशील समाजसेवकाची आणि संस्थेला आपले कुटुंब मानणाऱ्या रयत सेवकाची भावनात्मक अभिव्यक्ती आहे. रयत शिक्षण संस्थेच्या प्रत्येक यशात त्यांना आनंद वाटतो आणि प्रत्येक आव्हानात ते संस्थेच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहतात. ही बांधीलकी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य आहे.

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी ग्रामीण भारतातील सर्वसामान्य, वंचित आणि कष्टकरी समाजघटकांच्या जीवनात शिक्षणाचा प्रकाश पोहोचविण्याच्या ध्येयाने रयत शिक्षण संस्थेचा विशाल वटवृक्ष उभा केला. मात्र त्यांच्या दूरदृष्टीचा आवाका केवळ शाळा आणि महाविद्यालयांपुरता मर्यादित नव्हता. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण, संशोधन आणि ज्ञाननिर्मितीची सर्वोच्च संधी उपलब्ध व्हावी, यासाठी त्यांच्या मनात स्वतंत्र ग्रामीण विद्यापीठाचे एक भव्य स्वप्न होते. आपल्या हयातीत त्यांनी या स्वप्नाच्या पूर्ततेसाठी विविध स्तरांवर प्रयत्न केले; परंतु काळाच्या मर्यादांमुळे हे स्वप्न प्रत्यक्षात साकार होऊ शकले नाही.

काळ पुढे सरकत गेला, परंतु कर्मवीरांचे स्वप्न मात्र रयत परिवाराच्या सामूहिक चेतनेत जिवंत राहिले. अखेर भारत सरकारच्या शिक्षण क्षेत्रातील महत्त्वाकांक्षी राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (RUSA) अंतर्गत समूह विद्यापीठाच्या संकल्पनेला मूर्त स्वरूप प्राप्त झाले आणि रयत शिक्षण संस्थेच्या सातारा येथील तीन महाविद्यालयांचे एकत्रीकरण करून २७ ऑक्टोबर २०२१ रोजी कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, सातारा या समूह विद्यापीठाची अधिकृत स्थापना झाली. हा क्षण केवळ एका नव्या विद्यापीठाच्या जन्माचा नव्हता, तर कर्मवीरांच्या अनेक दशकांपूर्वी पाहिलेल्या स्वप्नाच्या साकारतेकडे टाकलेले पहिले ऐतिहासिक पाऊल होते. विद्यापीठाची कायदेशीर स्थापना जाहीर झाली असली, तरी प्रत्यक्ष प्रशासकीय आणि शैक्षणिक कार्यवाही सुरू



होण्यासाठी काही कालावधी लागला. अखेर महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार दिनांक ३ नोव्हेंबर २०२२ रोजी प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांनी कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे पहिले कुलगुरू म्हणून पदभार स्वीकारला आणि विद्यापीठाच्या प्रत्यक्ष कार्याचा शुभारंभ झाला. त्या दिवसापासून कर्मवीरांच्या स्वप्नातील विद्यापीठाला प्रत्यक्ष आकार मिळण्याची प्रक्रिया वेगाने सुरू झाली.

कुलगुरूंच्या नेतृत्वाखाली विद्यापीठाची प्रशासकीय आणि शैक्षणिक रचना उभी करण्याचे मोठे आव्हान समोर होते. कुलसचिव, वित्त व लेखाधिकारी, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक, विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता आणि इतर प्रशासकीय पदांची टप्प्याटप्प्याने नियुक्ती करण्यात आली. या ऐतिहासिक उभारणीच्या प्रक्रियेत मला देखील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाच्या प्रभारी कुलसचिव म्हणून कार्य करण्याची संधी लाभली. नव्याने स्थापन झालेल्या विद्यापीठाची प्रशासकीय चौकट उभी करणे, शासनाच्या अधिनियमांनुसार यंत्रणा विकसित करणे, विविध वैधानिक प्राधिकरणे कार्यान्वित करणे आणि विद्यापीठाच्या भविष्यातील वाटचालीसाठी आवश्यक पायाभूत व्यवस्था निर्माण करणे, या ऐतिहासिक प्रक्रियेचा प्रत्यक्ष साक्षीदार आणि

सहभागी होण्याचा बहुमान मला लाभला. त्यामुळे कर्मवीरांच्या स्वप्नातील विद्यापीठाच्या प्रारंभिक जडणघडणीशी माझे नाते केवळ प्रशासकीय जबाबदारीचे नसून भावनिक आणि ऐतिहासिक स्वरूपाचे आहे.

मला आजही तो दिवस स्पष्टपणे आठवतो – ७ नोव्हेंबर २०२२. त्या दिवशी अचानक माझ्या मोबाईलवर फोन आला. फोनच्या दुसऱ्या टोकाला प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर गडदे होते. त्यांनी शांतपणे सांगितले, ''कुंभार सर, शेठ आपल्याशी बोलणार आहेत.'' क्षणभर मला काहीच सुचेना. पुढच्या दोन मिनिटांत काय घडणार आहे याची मला कल्पनाही नव्हती. मी जिथे बसलो होतो, तिथून सहजच उठून उभा राहिलो. कारण माननीय रामशेठ ठाकूर यांच्यासारख्या व्यक्तीचा मला थेट फोन येईल, असे स्वप्नातही वाटले नव्हते.

थोड्याच क्षणात फोनवरून ठाकूर साहेबांचा भारदस्त आणि प्रेमळ आवाज कानावर आला. त्यांनी सुरुवातीलाच उच्चारलेले शब्द आजही माझ्या स्मरणात कोरलेले आहेत. ''कुंभार सर, अभिनंदन! आमच्या कर्मवीर अण्णांच्या स्वप्नातील विद्यापीठाचे तुम्ही पहिले कुलसचिव झालात. हे तुमचे मोठे भाग्य आहे. मनःपूर्वक अभिनंदन!'' या शब्दांनी मी भारावून गेलो. त्यांनी पुढे विचारले, ''बरं, आता तुम्ही कुठे बसता?'' मी नम्रपणे उत्तर दिले, साहेब, विद्यापीठ नवीन आहे. सध्या वाय. सी. कॉलेजमध्ये विद्यापीठासाठी दिलेल्या जागेतून काम सुरू आहे. उद्यापासून कार्यालय सुरू करीत आहोत. क्षणभर शांतता होती. मग पलीकडून त्यांचा ठाम स्वर ऐकू आला, ''कुंभार सर, हे रयतचे विद्यापीठ आहे. याची भव्य इमारत उभी राहिली पाहिजे. मी लगेच म्हणालो ! हो साहेब, नक्की उभी राहील.'' मात्र त्यानंतर त्यांनी जे शब्द उच्चारले, ते ऐकून मी अक्षरशः अवाक् झालो. ''कुंभार सर, लवकरात लवकर विद्यापीठाची मोठी इमारत बांधा, त्या इमारतीसाठी माझ्याकडून पाच कोटी रुपयांची देणगी जाहीर करत आहे आणि त्याचा चेक उद्याच डॉ. अनिल पाटील यांच्याकडे पाठवून देतो.'' माझ्यासाठी तो क्षण अविश्वसनीय होता; पण रामशेठ ठाकूर केवळ घोषणा करणारे नव्हते; ते कृतीतून शब्दांची पूर्तता करणारे व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी पुढे अत्यंत आपुलकीने सांगितले ''ही तर सुरुवात आहे. अजून पैसे लागले तर आवर्जून सांगा. कर्मवीरांच्या स्वप्नातील विद्यापीठाच्या विकासासाठी कितीही पैसा लागला तरी घाबरू नका.'' मी भावूक होऊन म्हणालो, ''साहेब, आपल्यासारखी मोठी माणसे पाठीशी असताना आम्ही कशाला घाबरू?''

त्या संभाषणानंतर बराच वेळ मी स्तब्ध होतो. सर्व काही इतके अनपेक्षित होते, की त्या गडबडीत मी रामशेठ ठाकूर साहेबांना साधे धन्यवाद म्हणणेही विसरून गेलो. कारण असा प्रसंग येईल, त्यांच्याशी इतक्या आत्मीयतेने बोलण्याची संधी मिळेल आणि विद्यापीठाच्या उभारणीसाठी इतक्या मोठ्या मदतीची घोषणा ते करतील, याची कल्पनाही मी कधी केली नव्हती.

आज मागे वळून पाहताना जाणवते, की अशी माणसे फारच विरळ असतात. ज्या संस्थेत आपण शिक्षण घेतले, त्या संस्थेच्या संस्थापकाच्या अपूर्ण राहिलेल्या स्वप्नपूर्तीसाठी स्वतःचा खजिना खुला करण्याची तयारी ज्यांच्यात असते, अशा दानशूर व्यक्ती समाजात क्वचितच जन्माला येतात. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या स्वप्नातील विद्यापीठाच्या उभारणीसाठी उदार हस्ते मदतीचा हात पुढे करणारे रामशेठ ठाकूर हे केवळ एक यशस्वी उद्योजक नाहीत, तर रयत शिक्षण संस्थेच्या संस्कारांचे खरे वारसदार आहेत. अशा विद्यार्थ्यांचा लाभ होणे हे केवळ रयत शिक्षण संस्थेचेच नव्हे, तर संपूर्ण समाजाचे भाग्य आहे.

महाराष्ट्राचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनीही रामशेठ ठाकूर यांच्या व्यक्तिमत्त्वाचा गौरव

करताना अत्यंत मार्मिक शब्दांत त्यांच्या दानशूर वृत्तीचे वर्णन केले होते. ''ते म्हणाले होते, पैसा तर सगळ्यांकडे असतो; पण तो द्यायची दानत लागते. ती दानत असणारा खरा दानशूर आणि नावाप्रमाणेच 'शेठ' असणारे आमचे रामशेठ आहेत.'' या एका वाक्यात रामशेठ यांच्या जीवनकार्याचा, उदार अंतःकरणाचा आणि समाजाप्रती असलेल्या निःस्वार्थ बांधीलकीचा सार दडलेला आहे. संपत्ती मिळविणे हे अनेकांना शक्य होते; परंतु त्या संपत्तीचा उपयोग समाजकल्याणासाठी, शिक्षणविकासासाठी आणि गरजूंच्या उन्नतीसाठी करण्याची उदात्त वृत्ती फार थोड्या व्यक्तींमध्ये आढळते. रामशेठ ठाकूर यांनी आपल्या कर्तृत्वाने, सामाजिक उत्तरदायित्वाच्या जाणीवेने आणि दानशूरतेच्या अखंड परंपरेने हे सिद्ध केले आहे, की खरे मोठेपण संपत्तीत नसून तिच्या समाजोपयोगी विनियोगात असते म्हणूनच त्यांचे व्यक्तिमत्त्व हे केवळ यशस्वी उद्योजकाचे नसून समाजहितासाठी समर्पित असलेल्या एका संवेदनशील, दूरदृष्टीसंपन्न आणि लोकहितैषी नेतृत्वाचे प्रेरणादायी उदाहरण ठरते. अशा या थोर दानशूर, समाजभूषण, शिक्षणप्रेमी आणि रयत परिवाराच्या लाडक्या व्यक्तिमत्त्वास कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाच्या वतीने सादर प्रणाम आणि दीर्घायुष्याच्या हार्दिक शुभेच्छा.





श्री. रामशेठ ठाकूर साहेब : शिक्षण क्षेत्रातील द्रष्टे नेते

प्राचार्य डॉ. सिध्देश्वर गडदे
सचिव, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक
संस्था, पनवेल

पनवेल-उरण परिसरामध्ये गेल्या ४० वर्षांमध्ये आमूलाग्र बदल घडला, गावाच्या वेशीपर्यंत गोदामे, लहान-मोठे उदयोगधंदे, कारखाने, रेल्वे आणि गृहनिर्माण संकुले पोहोचली आहेत. पनवेल-उरण परिसरामध्ये होणारा हा बदल मात्र या परिसराचे 'भूमिपुत्र' माजी खासदार मा. श्री. रामशेठ ठाकूर साहेब यांच्या त्वरित लक्षात आला. आपल्या परिसरामध्ये वेगवेगळे उदयोगधंदे, कारखाने, व्यवसाय स्थापन होऊन येथे उच्चशिक्षित, प्रशिक्षित आणि कार्यकुशल उमेद्वारांची आवश्यकता भासणार, हे सदैव वेगळी दृष्टी असणाऱ्या लोकनेत्याने त्वरित ओळखले.

रायगडचे माजी खासदार श्री. रामशेठ ठाकूर साहेब मुळातच कर्मवीरांच्या रयत शिक्षण संस्थेतील 'कमवा आणि शिका' योजनेच्या माध्यमातून तावून सुलाखून निघालेले व्यक्तिमत्त्व, सातारा येथे छत्रपती शिवाजी महाविद्यालयामध्ये शिकताना महाराष्ट्रातील नामवंत व्यक्तिमत्त्वांचा सहवास आणि त्यांच्या प्रगल्भतेचे व समाजाकडे बहुसमावेशक व निखळ दृष्टिकोनातून पाहण्याचे बाळकडू लाभलेले हे 'परिसस्पर्शी व्यक्तिमत्त्व, त्यामुळेच अगदी विद्यार्थीदशेपासूनच फुले-शाहू-आंबेडकर यांच्या प्रभावशाली विचारांचा पगडा त्यांच्या व्यक्तिमत्त्वात जाणवतो, म्हणूनच शिक्षणाबद्दलची आत्मीयता त्यांच्या मनात निर्माण झाली आणि आपल्या नोकरीची सुरुवात त्यांनी शिक्षकी पेशानेच केली.

शिक्षकी पेशातून उदयोगधंद्यामध्ये उडी घेताना त्यांच्या मनात येथील विद्यार्थी आणि आधुनिक शिक्षण हाच विचार होता, म्हणूनच सुयोग्य परिस्थिती निर्माण झाल्यानंतर पनवेल-उरण परिसरातील समाजाला येथील परिस्थितीनुसार आवश्यक असणाऱ्या शिक्षणाची सोय उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने त्यांनी पनवेल-उरण परिसरातील सेवाकार्याचे सारस्वत स्व. जनार्दन भगत साहेब यांच्या आशीर्वादाने 'जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था' दिनांक ०१ जानेवारी १९९२ रोजी आपल्या सहकार्याच्या मदतीने स्थापन केली.

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेची स्थापना करताना मा. श्री रामशेठ ठाकूर साहेब यांना आपल्या डोळयांसमोर इथल्या कष्टकरी समाजातील विद्यार्थी दिसत होतेच; पण त्याचबरोबर विविध प्रांतातून येथे स्थायिक होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या दर्जेदार शिक्षणाची आस ही दिसत होती. जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेने आपल्या कार्याचा श्रीगणेशा गव्हाण कोपर येथे 'मोरू नारायण म्हात्रे विद्यालय' हे इंग्रजी माध्यमाचे विद्यालय स्थापन करून केला. गव्हाण-कोपर आणि नाव्हे परिसरातील ग्रामीण विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाचे सुयोग्य शिक्षण प्राप्त व्हावे हा दृष्टिकोन ठेवून मा. रामशेठ ठाकूर साहेबांनी या विद्यालयाची स्थापना केली. आज जवळजवळ २००० विद्यार्थी या विद्यालयामध्ये पूर्व प्राथमिकपासून बारावीपर्यंत इंग्रजी माध्यमातून धडे घेत आहेत. या परिसरातील भूमिपुत्रांची, कष्टकऱ्यांची मुले आज या विद्यालयाद्वारे इंग्रजी माध्यमातून शिकून

चमकदार कामगिरी ही मा. श्री रामशेठ ठाकूर साहेब यांच्या अचूक मार्गदर्शनाची उत्तम उदाहारणे आहेत. या महाविद्यालयातील एकूण दहा विद्यार्थ्यांनी मुंबई विद्यापीठाच्या तृतीय वर्ष परीक्षेतील गुणवत्ता यादीमध्ये सर्वप्रथम येऊन मुंबई विद्यापीठामध्ये महाविद्यालयाची विजयी पताका फडकावली व आपला ग्रामीण विद्यार्थीही संधी मिळाली, तर आपल्या शैक्षणिक क्षमतेची चुणूक दाखवू शकतो हे दाखवून दिले. येथील ग्रामीण भागातील विद्यार्थिनीने मुंबई विद्यापीठामध्ये रसायनशास्त्र विषयामध्ये सर्वप्रथम येऊन मुंबई विद्यापीठातील १५० वर्षांतील गुणांचा इतिहास बदलला ही साधी गोष्ट नाही आपल्या जीवनविकासासाठी झेप घेण्याची संधी मा.श्री. रामशेठ ठाकूर साहेबांनी इथल्या विद्यार्थ्यांना दिली आणि त्यामुळेच या परीसरातील शिक्षण क्षेत्राचा इतिहास बदलला. नवनवीन अभ्यासक्रम, अत्याधुनिक शिक्षासामग्री आणि उच्चतम प्राध्यापक उपलब्ध करून दिल्यामुळेच इथल्या मातीचा सुगंध शहरातील वातावरणातही दरवळू लागला. मा. श्री रामशेठ ठाकूर साहेबांच्या मार्गदर्शनामुळेच पदवी, पदव्युत्तर आणि पीएच.डी. पर्यंतचे शिक्षण येथे उपलब्ध झाले आहे महाविद्यालयाची सातत्यपूर्ण गुणवत्ता व शैक्षणिक क्षेत्रामधील देदीप्यमान कामगिरी यांचा एकत्रित परिणाम म्हणून विद्यापीठ अनुदान आयोगाकडून शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून महाविद्यालयास मानाचा 'स्वायत्तता दर्जा' प्राप्त झाला आहे.

शिक्षण ही सतत बदलणारी व कधीही न संपणारी प्रक्रिया असते व जी शिक्षणसंस्था या बदलाचा मागोवा घेते व आपल्या कार्यप्रणालीमध्ये, प्रशासनामध्ये व धोरणांमध्ये यथोचित बदल अंगीकारते व सतत कार्यरत असते अशीच संस्था समाजाच्या विश्वासास पात्र ठरते आणि समाजाचा अविभाज्य अंग बनते. या तत्वाला अनुसरूनच उच्च शिक्षणातील प्रगतीनंतर त्यांनी पुढचे पाऊल टाकले आणि नवीन पनवेलच्या खांदा वसाहतीमध्येच विद्यार्थी वकिली क्षेत्रात यावा म्हणून 'भागुबाई चांगू ठाकूर विधी महाविद्यालय न्यू पनवेल' ची स्थापना करून विद्यार्थ्यांना विधी शिक्षणाची सोय उपलब्ध करून दिली. खारघर, नवी मुंबई येथे सी. बी. एस. ई. बोर्डाचे 'रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल' उभारले आहे. हे स्कूल फक्त नवी मुंबईमध्येच नव्हे, तर मुंबईमध्येही एक प्रथितयश स्कूल म्हणून नावारूपास आले आहे. ओवेपेठ येथील न्यू इंग्लिश स्कूल, गव्हाण कोपर येथील 'तुकाराम नारायण घरत कनिष्ठ महाविद्यालय' याची उभारणीदेखील संस्थेच्या शाखा विस्तारामधील गगनभरारीस नवी उमेद देत आहे. खारघर येथे उच्च शिक्षण क्षेत्रामध्ये गुणात्मक शिक्षण देण्यासाठी 'रामशेठ ठाकूर कॉलेज ऑफ कॉमर्स अॅन्ड सायन्स, खारघर, तसेच 'रामशेठ ठाकूर हायर सेकंडरी विद्यालय, खारघर' या शाखांची स्थापना ही संस्थेच्या शाखा विस्तारामध्ये मानाचा तुरा मानली जात आहे. उरण परिसरातील द्रोणागिरी नोड मध्ये 'श्रीमती भागुबाई चांगू ठाकूर, विद्यालय द्रोणागिरी' हे संकुल ही त्या परिसरातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची सुवर्णसंधी उपलब्ध करून देत आहे. भविष्यातील बदलांचा वेध घेऊन उलवे परिसरातील प्रगतीचा आढावा घेऊन, संस्थेची उलवे येथे 'रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, उलवे' (नियोजित) या संकुलाची इमारत प्रगतिपथावर आहे.

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या कार्याचा प्रसार करताना आदरणीय रामशेठ ठाकूर साहेबांनी सदैव इथला विद्यार्थी नजरेसमोर ठेवला हा विद्यार्थी सर्वगुणसंपन्न व्हावा यासाठी त्यांनी कुठलीही तडजोड केली नाही. विद्यार्थ्यांसाठी दर्जेदार अत्याधुनिक आणि प्रशस्त शैक्षणिक संकुले निर्माण केली उच्चशिक्षित, अनुभवी आणि हुशार शिक्षक व प्राध्यापकांची नेमणूक केली. आधुनिक उपकरणे आणि यंत्रसामग्री उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी आपला हात आखडता घेतला नाही. मी सर्व काही करतो ते विद्यार्थ्यांच्या भल्यासाठी, हीच भूमिका ठेवली, शिक्षणाच्या प्रसारासाठी त्यांनी उत्कृष्ट शिक्षक व प्राध्यापकांची नेमणूक केली.

व्यक्तींची गुणग्राहकता हा रामशेठ ठाकूर साहेबांच्या व्यक्तिमत्त्वाचा मोठा गुण आहे. या गुणाद्वारे त्यांनी आपल्या संस्थेतील सेवकांना काम करण्यासाठी पूर्णपणे मोकळीक दिली. त्यांच्या कामकाजामध्ये कधीही ढवळाढवळ केली नाही, उलट त्यांच्यासाठी उच्चतम सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या. आज मितीस जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या विविध शाखांमध्ये जवळजवळ २० हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत तसेच जवळजवळ ९५० शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी शिक्षणदानाचे कार्य करत आहेत.

मा. रामशेठ ठाकूर साहेबांचे शिक्षण सेवाकार्य हे केवळ जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेपर्यंतच मर्यादित नाही. जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चेअरमन पदाबरोबर आशिया खंडातील सर्वात मोठ्या रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य म्हणूनही ते जबाबदारी सांभाळत आहेत. रयत शिक्षण संस्थेतील महाविद्यालये आणि विद्यालये यांचा विकास होण्यासाठी त्यांनी सदैव अर्थिक मदत केली आहे. कामोठे येथील 'लोकनेते रामशेठ ठाकूर विद्यालय' हे स्टेट बोर्ड व सी.बी.एस.ई. अभ्यासक्रम शिकविणारे एक आदर्श विद्यालय तसेच, उलवे येथील 'शकुंतला रामशेठ ठाकूर' हे सी. बी. एस. ई. अभ्यासक्रम शिकविणारे विद्यालय त्यांनी तन-मन-धन समर्पित करून रयतची ही संकुले उभी केली आहेत. तसेच छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा येथे ही 'रामशेठ ठाकूर भवन' हे संकुल स्पर्धात्मक परीक्षेचे मार्गदर्शन देण्यासाठी त्यांनी स्वखर्चाने उभे केलेले आहे. त्यांचे हे रयत सेवा कार्य ही उल्लेखनीय आहे. नुकतेच पालघर जिल्हयातील मोखाडा या आदिवासी भागात लोकनेते रामशेठ ठाकूर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मोखाडा हे संकुल पायाभूत व शैक्षणिक सुविधापूर्ण करून दिले.

तीक्ष्ण बुध्दिमत्ता थोरांप्रती आदर, लहानांप्रती प्रेम, दीनदुबळ्यांसाठी तळमळ, सतत काम करण्याची प्रवृत्ती आदी गुणांमुळे मा. रामशेठ ठाकूर साहेब यांनी शिक्षण क्षेत्रातील केलेली भीम कामगिरी खरोखर अभिमानास्पद आहे. पनवेल - उरण आणि नवी मुंबईतील विद्यार्थ्यांना के. जी. पासून पी. जी. पर्यंत नव्हे, तर अगदी पी.एचडी. पर्यंतचे शिक्षण आपल्या घरापासून काही अंतरावरच उपलब्ध करून दिले आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांची होणारी 'पायपीट' थांबली आहे आणि त्यांना अभ्यासासाठी भरपूर वेळ प्राप्त होत आहे, विद्यार्थ्यांना हवी ती शाखा आणि विषय येथे उपलब्ध करून दिले आहेत.

या शिक्षणप्रसाराबरोबरच सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे या शैक्षणिक केंद्रामध्ये इथल्या हुशार आणि मेहनती स्थानिक वर्गांना उच्चप्रतीच्या नोकऱ्या उपलब्ध झाल्या, त्यामुळे इथल्या समाजाचा आर्थिक स्तरही उंचावला. एकंदरीत नवी मुंबई, पनवेल व उरण परिसरामध्ये अत्याधुनिक आणि २१ व्या शतकाला साजेसे असे शैक्षणिक केंद्र निर्माण करणारे लोकनेते, माजी खासदार श्री रामशेठ ठाकूर साहेब हे इथल्या विद्यार्थी, पालक आणि समाजाच्या शैक्षणिक प्रगतीचे 'आधारवड' झाले आहेत.

गेली २५ वर्षे, मी, साहेबांच्या शिक्षणकार्यातील एक पाईक बनून त्यांच्या महत्त्वाकांक्षी अशा चांगू काना ठाकूर आर्टस कॉमर्स ॲण्ड सायन्स न्यू पनवेल (स्वायत्त) या महाविद्यालयाचा प्राचार्य म्हणून कार्यरत होतो व आज त्यांच्या जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचा सचिव म्हणून कार्यरत आहे. अचूक निर्णय घेण्याची क्षमता, नवनवीन ध्येये साध्य करण्याचा ध्यास, जे करायचे ते मनापासून व उच्चतम आणि सतत प्रगतीचा मागोवा या त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील गुणांचा अनुभव घेत आहे. ते आमचे मार्गदर्शक व आदर्श आहेत. साहेबांच्या वाढदिवसानिमित्त मी आमच्या सर्व प्राध्यापक, प्रशासकीय सेवक, शिक्षक व शिक्षकेतर सेवक व आजी-माजी विद्यार्थ्यांच्या वतीने त्यांना शुभेच्छा देतो. तसेच त्यांना उदंड आयुष्य, कीर्ती, यश देवो ही ईश्वर चरणी प्रार्थना.



६२ वर्षांच्या ऋणानुबंधाच्या गाठी

श्री. वाय. टी. देशमुख

होय, गेली ६२ वर्षे अगदी बालपणापासून मी आणि लोकनेते रामशेठ ठाकूर जीवाभावाचे मित्र आहोत. एवढी प्रदीर्घकाळ मैत्री आणखी कुणाच्या वाट्याला आली असेल असे मला वाटत नाही एवढ्या प्रदीर्घ काळात आमच्या मैत्रीत तसूभर अंतर पडले नाही. अगदी कामाच्या व्यापात एखादा दुसरा दिवस भेट झाली नाही, तर एक प्रकारे अनामिक हुरहुर लागून राहते. माझ्या आयुष्यात अनेक चढउतार आले; पण रामशेठ भेटल्यावर जो आनंद होतो तो आनंद शब्दापलीकडचा आहे.

गव्हाणच्या प्राथमिक शाळेत १९६३ साली जून महिन्यात आमच्या वर्गामध्ये एक चुणचुणीत सरळ स्वभावाचा विद्यार्थी नव्यानेच दाखल झाला. आम्ही सर्व मित्रांनी त्याला निरखून पाहिले; पण पहिल्या भेटीतच हा मुलगा आम्हाला अगदी सरळ स्वभावाचा वाटला सुरुवातीला तो अबोल वाटला; पण आम्ही मित्रांनी त्याला बोलका केला. त्याचे नाव विचारल्यावर त्याने अगदी मृदू आवाजात राम ठाकूर असे नाव सांगितले.

येथूनच आमच्या मैत्रीपर्वाला सुरुवात झाली. एक मित्र म्हणून राम मला खूपच आवडला. आमच्या नवीन अशा मैत्रीपर्वाला सुरुवात झाली. रामची अत्यंत साधी राहणी आणि सर्वांशी मिळून मिसळून वागणे मला फार भावले. त्याचे जवळ असणारे हे गुणंच आमच्या मैत्रीच्या धाग्याला गुंफत गेले. राम आमच्या शाळेत नवीन होता, तरी सर्वांशी मिळून-मिसळून वागत असे. एक हुशार विद्यार्थी म्हणून त्यांनी आपले अस्तित्व सिद्ध करून दाखविले. तो आपल्या गुणांमुळे, लाघवी स्वभावामुळे सर्वांचा आवडता मित्र बनला. तो एखादे दिवशी शाळेत आला नाही, तर आम्हा सर्वांना हुरहुर वाटत असे. एकंदरीत गव्हाण शाळेतील ते आमचे दिवस अतिशय आनंदाचे होते.

आमचे प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यावर आम्ही सर्वांनी गव्हाणच्या छत्रपती शिवाजी विद्यालयामध्ये माध्यमिक शिक्षणासाठी प्रवेश घेतला. हे विद्यालय कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्थेचे होय. रयत शिक्षण संस्थेचे हे विद्यालय गव्हाण या ठिकाणी व्हावे म्हणून या परिसरातील मान्यवर व्यक्तींनी प्रयत्न केले होते. त्यामध्ये प्रामुख्याने कर्तबगार समाज सुधारक जनार्दन भगत साहेबांचा उल्लेख करावा लागेल.त्यांच्यामुळेच गव्हाण हायस्कूल आकाराला आले. ते छत्रपती शिवाजी विद्यालयाचे सर्वस्वी पालक होते. मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी, ग्रामस्थ या सर्वांचे ते समन्वयक होते. कोणाची काहीही अडचण असो, ती अडचण दूर करण्यात जनार्दन भगत साहेबांचा हातखंडा होता.

छत्रपती शिवाजी विद्यालयात रामसह आम्ही सर्वांनी आठवी ते अकरावीपर्यंत शिक्षण घेतले. आम्ही आठवीत असताना एका गोठा वजा शाळेत आमचे वर्ग भरत होत, तर कधी घराच्या माडीवर वर्ग भरायचे. अशा

प्रकारे आमची शाळा विखुरलेली होती. आम्ही शिकत असताना खाकी हाफ पॅन्ट पांढरा हाफ शर्ट आणि पांढरी टोपी, असा आमचा युनिफॉर्म होता. आम्ही आता सज्ञानी होतो. तशातच येता जाता आम्ही पनवेलच्या हायस्कूलचे विद्यार्थी पाहत असू; पण त्यांचा गणवेश डोक्यावर टोपी नसलेला होता, ती मुले झकासपैकी भांग पाडून आलेली असायची. आम्हालाही वाटू लागले, आपणाला ही टोपी नको, म्हणून आम्ही आम्हाला टोप्या नको, असे छोटेखानी आंदोलन केले. हे आंदोलन आमच्या आयुष्यातील पहिले आंदोलन होय. मुख्याध्यापकांनी लगेच जनार्दन भगत साहेबांना बोलावून घेतले. त्यांना मुलांनी डोक्यावर टोपी घालण्याकरिता बहिष्कार घातल्याचे सांगितले. भगत साहेबांनी ताबडतोब मुलांच्या पालकांना शाळेत बोलावून घेतले. आम्हालाही बोलावून घेतले. पालक व भगत साहेबांच्या समोर आम्ही खजील झालो. अशा प्रकारे टोप्या बंद आंदोलनाचा फज्जा उडाला. या गोष्टीची गप्पांच्या ओघात आठवण निघाली, की पोटभर हसून घेतो. आज मागे वळून पाहताना रम्य ते बालपण याची प्रचिती येते.



अशाप्रकारे आमचे शालेय जीवन चालू होते. दरवर्षी एक एक वर्ग वाढत होता. तशी तशी इमारत वर्ग खोल्यांची कमतरता भासत होती. शेवटी भगत साहेब आणि गावकऱ्यांनी, पंचक्रोशीतील प्रमुख मंडळींना नवीन इमारत बांधण्याचा संकल्प केला. त्यावेळी सरकारी ग्रँट अगदी तुटपुंजी असायची अगदी शिक्षकांचे पगारसुद्धा सहा सहा महिन्यांनी होत असत. शिक्षकांना किराणा दुकानाचा मालसुद्धा उधारीने आणावा लागत असे. भगतसाहेब स्वतःच्या हमीवर दुकानदाराला माल उधार द्यावयास सांगायचे, अशाप्रकारे सगळीकडचे दारिद्र्याचे वातावरण असायचे म्हणून नवीन शाळेचे काम जरी सुरू झाले, तरी मुलांच्या कडून श्रमदान करून घेतले जायचे, दगड वाहून नेणे, ट्रकमधून विटा उतरवणे, भिंतीवर पाणी मारणे, अशी कामे आम्हा विद्यार्थ्यांना करावी लागत. आमच्याबरोबर शिक्षकही काम करायचे. त्यामुळे आम्हाला काम करताना अजिबात संकोच वाटायचा नाही, तर या वयातच 'स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद' अशा घोषणा आम्ही देत असू, कर्मवीर भाऊराव पाटील, रयत शिक्षण संस्था, आमचे शिक्षक हे सर्व आम्हाला कळू लागले. आमचे शालेय जीवनातील दिवस याही खडतर परिस्थितीमध्ये आनंदाने जात होते. कर्मवीर अण्णांच्या कार्याचे महत्त्व कळत होते. आज तर मी काय? रामशेठ काय? कर्मवीरांच्या कार्याचे अनुयायी झालो आहोत.

अशाप्रकारे आमचे आठवी ते अकरावीपर्यंत शिक्षण खडतर परिस्थितीतून गेले. त्या वेळेला रयत सेवक

शिक्षकांना आमचा रायगड विभाग दुर्गम भाग वाटायचा. अति पाऊस, दमट हवामान, त्यामुळे घाटमाथ्यावरील शिक्षकांना आमचा भाग त्रासाचा वाटायचा. त्यामुळे आमच्या शाळेला पदवीधर शिक्षकच मिळायचे नाहीत. अपवादात्मक एक एक दोन पदवीधर ट्रेंड शिक्षक मिळाले. आमची बॅच तर पहिली बॅच होती, तरीसुद्धा जुन्या अकरावीची आमची बॅच चांगल्या रीतीने पास झाली. त्यामध्ये रामशेठ ठाकूर, माधुरी सोलकर, गौली पाथ कोळी, वाय. टी. देशमुख, हरिभाऊ देशमुख चांगल्या गुणांनी पास झालो. अर्थात त्या वेळेचे चांगले गुण म्हणजे ६०% होय. खरं म्हणजे सुविधांचा अभाव, अप्रशिक्षित शिक्षक असूनसुद्धा आमचे सातवीपर्यंत शिक्षण चांगल्याप्रकारे झाल्यामुळे आम्हाला फारशा अडचणी जाणवल्या नाहीत. तरीपण आनंद या गोष्टीचा गव्हाणला हायस्कूल सुरु झाल्यामुळे आम्ही मॅट्रिक पास झालो. रयत शिक्षण संस्थेसारख्या मानवतावादी, समतावादी संस्थेशी आमचे नाव जोडले गेले. हे आमचे भाग्य होय. कर्मवीर अण्णांच्या सारख्या महापुरुषाचा वैचारिक वारसा रामशेठ आणि मला मिळाला आम्ही धन्य आहोत. आम्ही कृतज्ञ आहोत.

शालेय जीवनात आम्हाला खूपच अडचणी सोसाव्या लागल्या. मी काय, राम काय आम्ही सर्वच मुले नवी पुस्तके विकत घेऊ शकत नव्हतो म्हणून वरच्या वर्गातील मुलांची जुनी पुस्तके निम्म्या किमतीत विकत घेऊन अभ्यास करीत असू. हे आजच्या तरुण विद्यार्थी वर्गाला पटणारसुद्धा नाही. तसेच आमच्या वह्या म्हणजे रद्दीतील कोरी पाने फाडून त्या जुन्या पानांची आमची वही असायची, तर शर्टाला डाग पडणारे आमचे गळके पेन असायचे. शाईचा डाग हाताला पडायचा आणि शर्टाला सुद्धा पडायचा. आम्हाला युनिफॉर्म कपड्यांचा एकच जोड असायचा. ते कपडे आम्ही रविवारी धूत असू, अशा प्रकारचा सर्व त्रास मी आणि रामशेठनी भोगला आहे. आमच्या शालेय मित्रमंडळींनी भोगला आहे. मजल दरमजल करीत अखेर आमचे अकरावीपर्यंतचे शिक्षण आम्ही पूर्ण केले. आज मागे वळून पाहताना आम्ही कष्टातून, स्वावलंबनातून शिक्षण घेतले. याचा सार्थ अभिमान वाटतो आहे.

अकरावीनंतर पुढील शिक्षणाचा प्रश्न निर्माण झाला. पुढे शिक्षण घ्यावे, की नोकरी अशी द्विधा मनस्थिती होती, त्यावेळी साताऱ्याहून आलेल्या शिक्षकांनी सातारच्या छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये जाण्याचा सल्ला दिला, त्यानुसार रामशेठ, मज्जिद सोलकर, हरिभाऊ देशमुख, कोळी ही मंडळी सातारला गेली.

मी मात्र माझ्या पुण्यातील नातेवाईकांकडे राहून फर्ग्युसन कॉलेजमध्ये पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. त्यामुळे आम्हा मित्रमंडळींची भेट फक्त सुट्टीच्या दिवशी होत होती. त्यावेळी रामशेठ साताऱ्याहून सुट्टीवर यायचा. रामचा पोशाख लेंगा, शर्ट आणि पांढरी टोपी असा होता. हा पोशाख आमच्या भागात नवलाईचा होता. आम्ही रामला 'या घाटी मामा' अशी हाक मारायचो व सर्वजण मोठमोठ्याने हसत असू अशी आमची सुट्टी मजेत जायची. ते दिवस जरी कष्टाचे होते, तरी मागे वळून पाहताना रम्य ते बालपण असेच वाटते. असे आमचे बालपणाचे शालेय जीवनातील दिवस आनंदाचे होते. निरागस होते. आम्हा दोघांचे भाग्य आहे त्या निरागस मैत्रीचा निर्झर आजही खळाळून वाहतो आहे. प्रेम लाभो प्रेमाला, त्याग ही त्याची कसोटी ! अशाप्रकारे आमची मैत्री गेली ६०-६५ वर्षे अखंडपणे टिकून आहे. आम्हा दोघांच्या घरी आणि पनवेल परिसरातील आमची मैत्री अनेकांच्या कौतुकाचा विषय ठरली आहे. गौरवाचा विषय ठरली आहे. निरपेक्ष मैत्री काय असते, याची अनुभूती आम्ही दोघे दररोज घेत असतो.

साताऱ्याच्या छत्रपती शिवाजी कॉलेजमधून बी.ए. ऑनर्स मराठी ही पदवी घेतल्यानंतर रामशेठ ठाकूर

पनवेलला आले. पनवेलला बी. एड झाले आणि कोकण एज्युकेशन सोसायटीमध्ये शिक्षक म्हणून नोकरीस लागले, अर्थात ही नोकरी जनार्दन भगत साहेबांमुळे मिळाली. रामशेठनी पनवेलला भाड्याच्या खोल्या घेऊन तेथे ते राहू लागले. मी पण अधूनमधून पनवेलला जात असे. रामशेठ यांच्या घरी वस्तीला राहत असे त्यांनी भाड्याने घेतलेल्या खोल्या राहायला तशा धोकादायक होत्या. तरीपण भाडे द्यायला ज्यादा पैसे नसल्यामुळे त्यांनी अशा खोल्यांमध्ये आपला संसार सुरू केला. याचदरम्यान रामशेठ यांचे लग्न झाले. थोर समाज सुधारक, या परिसरातील ध्येयवादी नेते जनार्दन भगत साहेब यांच्या कन्या शकुंतला यांच्याशी त्यांचा विवाह झाला. शकुंतला वहिनी रामशेठ यांच्या सहधर्मचारिणी झाल्या. रामशेठ ठाकूर आणि शकुंतला वहिनी यांच्या संसार जीवनाची लंबी सफर सुरू झाली.

काही दिवस शिक्षक म्हणून नोकरी केल्यानंतर ते सिडकोच्या मॉडर्न स्कूलमध्ये शिक्षक झाले. सिडकोने रामशेठ यांना सन्मानपूर्वक नोकरी दिली. सिडकोलाही रामशेठसारख्या होतकरू शिक्षकांची गरज होती. कारण त्यावेळी सिडकोच्या जमीन ग्रहण करण्याच्या धोरणाला शेतकरी कामगार पक्षाचे नेते दि.बा पाटील, जनार्दन भगत साहेब व शेतकरी यांचा प्रचंड विरोध होता. दररोज सिडकोच्या विरोधात मोर्चे निघत होते.

अशावेळी सिडकोच्या पदाधिकाऱ्यांनी रामशेठ यांचा दूरदृष्टीने उपयोग करून घ्यायचे ठरवले. रामशेठ सुद्धा विरोधासाठी विरोध या मताचे नव्हते. विधायक काम होत असेल, आपल्या भागातील बेरोजगार तरुणांना काम मिळत असेल, तर सिडकोला विरोध करू नये असे त्यांचे ठाम मत होते. सिडकोनेसुद्धा रामशेठ यांच्या व्यक्तिमत्त्वाचा पुरेपूर फायदा घेण्याचे ठरविले. सिडकोचे छोटे कार्यालय रामशेठ यांच्या घरीच सुरू झाले. त्यावेळी रामशेठ यांना मोठा विरोध झाला. पनवेल, उरण परिसरात सिडकोला विरोध करण्यासाठी युवक संघर्ष संघटना पुढे सरसावली. मी वाय. टी. देशमुख या संघटनेचा उपाध्यक्ष होतो. आमच्या संघटनेने रामशेठ यांच्या घरावर मोठा मोर्चा नेला. आमची संघटना शेतकरी कामगार पक्ष पुरस्कृत होती. आम्हाला दि. बा. पाटील, जनार्दन भगत साहेब, विवेक पाटील, दत्तूशेठ या मंडळींचा पाठिंबा होता. या मोर्चाचा फायदा असा झाला आमच्या मोर्चामुळे या परिसरातील १५ तरुण सिडकोने कामावर घेतले. याचा फायदा रामशेठ यांनाही झाला. सिडकोने मोठ्या चाणाक्षपणे रामशेठ यांना दहा हजार रुपयांचे काम दिले. हाच त्यांच्या यशस्वी व्यवसायाचा शुभमुहूर्त होय. हळूहळू त्यांना सिडकोची कामे मिळू लागली. त्यांचे नाव उद्योजक म्हणून पुढे येऊ लागले. त्यांच्या उद्योगपर्वाला सुरुवात झाली.

१९७४ ते १९७७ हा तीन ते चार वर्षांचा कालखंड म्हणजे भारतीय लोकशाहीच्या इतिहासातील फार मोठा संघर्षमय कालखंड होय. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधींनी देशात आणीबाणी जाहीर केली होती. या आणीबाणीमुळे अघोषित अशी जणू हुकूमशाही राजवटच सुरू झाली होती. आणीबाणीला विरोध करणाऱ्या अनेक राष्ट्रीय नेत्यांना अटक झाली होती. अगदी जयप्रकाश नारायण, जगजीवन राम, मोरारजी देसाई, मोहन धारिया, चंद्रशेखर, अटल बिहारी वाजपेयी, सुषमा स्वराज एवढेच नव्हे तर देशातील जवळजवळ सर्वच विरोधी पक्षातील नेते मंडळींना तुरुंगवास भोगावा लागला होता. एकंदरीत संपूर्ण देशात लोकशाहीची घुसमट सुरू होती. अशावेळी जयप्रकाश नारायण यांनी दुसऱ्या क्रांतीची घोषणा केली आणि काय आश्चर्य संपूर्ण देश लोकशाहीच्या लढ्यासाठी सज्ज झाला. त्यावेळी सर्वांच्या तोंडी, तरुणांच्या तोंडी एकच घोषणा होती, ती म्हणजे अंधेरेमे एक प्रकाश, जयप्रकाश ! या घोषणेने संपूर्ण भारत देश झपाटलेला होता. मोठमोठे मोर्चे निघू लागले. मी वाय. टी. देशमुख, रामशेठ ठाकूर या आंदोलनामध्ये सामील झालो; जयप्रकाश नारायण यांच्या

नेतृत्वाखाली जनता पार्टीचा उदय झाला. अनेक पक्ष जनता पार्टीत मिलिंद झाले. सारे विरोधी पक्षनेते इंदिरा गांधी आणि काँग्रेस पक्षाच्या विरोधात एक झाले. आम्हीपण या नव्या पक्षात सामील झालो. पण आमच्या पनवेल, पेन, उरण या परिसरात शेतकरी कामगार पक्षाचा मोठा दबदबा होता. दि.बा.पाटील, जनार्दन भगत, दत्तूशेठ, जे. एम. म्हात्रे, विवेक पाटील अशी मातब्बर मंडळी शेतकरी कामगार पक्षाची धुरा वाहत होते. अशा मंडळींच्या विरोधात जाणाऱ्यांना खूप त्रास सहन करावा लागत असे कुटुंबावर बहिष्कार घातला जायचा, अशा कठीण परिस्थितीत आम्ही आमचा एक उमेदवार आमदार म्हणून निवडून आणण्याचे ठरवले होते. त्यावेळी मला व कुटुंबीयांना खूप त्रास झाला. ॲडव्होकेट सुरेश ठाकूर हा उमेदवार जॉर्ज फर्नांडिसना युनियनमार्फत उभा करायचे ठरले. उमेदवार उभा राहिला; पण आम्हाला मोठा विरोध झाला. त्यावेळी दि. बा. पाटील व जनार्दन भगत साहेब एकत्र होते. आमच्या घरावर बहिष्कार टाकला होता. आमच्या घरावरील जनता पार्टीचा झेंडा उतरविला होता. त्यामुळे भगत साहेबांना सांगून आम्ही तटस्थ राहण्याची भूमिका घेतली.

मी हिंदुस्थान लिव्हर कंपनीत नोकरीस होतो. तर रामशेठनी शिक्षकाची नोकरी सोडून उद्योग व्यवसायात गरुड भरारी घेतली. दहा हजार रुपये पासून उद्योग व्यवसायाचा श्रीगणेशा केला आणि सचोटी श्रमनिष्ठा उद्याचे काम आजच करा या तत्त्वामुळे रामशेठ यांचा उद्योग व्यवसाय आज हजारो कोटीपर्यंत जाऊन पोहोचला. मराठी उद्योजक आपल्या व्यवसायात यशस्वी होत नाही, हा समज किंवा गैरसमज म्हणा रामशेठनी आपल्या कर्तबगारीने दूर केला. आपल्या कामाचा डोंगर उभा केला. त्यांचा उद्योग व्यवसाय आज अनेकांना प्रेरणा आणि स्फूर्ती देत आहे. रामशेठ ठाकूर हे अनेकांचे ऊर्जास्रोत झाले आहेत. दीपस्तंभ झाले आहेत.

१९९८ सालच्या लोकसभेसाठी रामशेठना उभे करण्याचे ठरले. ते आत्तापर्यंत शेकाप पक्षाचे किंगमेकर होते. आता आम्ही सर्वांनी त्यांनाच उभे केले. प्रचाराची रणधुमाळी सुरू होती. नेमके त्याच वेळी माझे वडील त्रिंबक देशमुख आजारी होते. त्यांच्या तब्येतीत सारखे चढउतार चालू होते. रामशेठसह इतर नेतेमंडळी वडिलांना भेटून जात होती. तेव्हा माझे वडील रामशेठना बोलायचे राम, तुला मत दिल्याशिवाय मी मरणार नाही.

दुर्दैवाने माझ्या वडिलांचे २६ तारखेला देहावसन झाले. माझ्या वडिलांच्या अंत्यविधीला रामशेठ, सर्व नेते आले होते; पण मी त्यांना थांबू दिले नाही. मी त्यांना म्हणालो तुम्ही प्रचार थांबवू नका. तुम्ही इथून जा, त्याशिवाय माझ्या वडिलांच्या आत्म्याला आनंद वाटणार नाही, असे म्हणून मी सर्वांना घालवले. अखेर रामशेठ चांगल्या मतांनी विजयी झाले. ते शपथविधीसाठी नवी दिल्लीला गेले. माझ्या वडिलांच्या निधनामुळे मी दिल्लीला जाऊ शकलो नाही; पण नंतर मात्र अधिवेशन काळात ते मला दिल्लीला घेऊन गेले. दिल्लीला हिवाळा कडक असतो. त्यांनी मला नवा ड्रेस, नवा बूट, नवे स्वेटर घेतले. आम्ही विमानाने दिल्लीला गेलो. माझा पहिलाच विमान प्रवास होता. माझा आनंद गगनात मावेना. मला तर मीच खासदार झालोय असे वाटायचे. माझा जिवलग स्नेही दिल्लीच्या पार्लमेंटमध्ये प्रवेश करताना मी डोळे भरून पाहिला. त्यावेळचा आनंद शब्दापलीकडचा होता. प्रजासत्ताक दिनाच्या संचालन पाहण्याचा फॅमिली पास आम्हास दिला गेला. खरोखर त्यावेळी मला बालपणीचा राम आठवला आपल्या कर्तबगारीने माझा राम दिल्ली दरबारी पोहोचला. माझा राम आता लोकनेता झाला आहे.

रामशेठनी मला नवीन पनवेलमधून नगरसेवक म्हणून पाठविले. पुढे आरक्षणामुळे नगरसेवक होता आले नाही म्हणून रामशेठनी मला पनवेल नगरपालिका शिक्षण मंडळाचा सभापती नेमले. नगरपालिका बरखास्त होईपर्यंत आठ वर्षे मी सभापती होतो. या कारकिर्दीत शाळा, बालवाड्या, एकंदर सर्वच प्राथमिक शाळांचा विकास झाला. वेळोवेळी रामशेठ यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. खरे म्हणजे संपूर्ण रायगड जिल्ह्यातील सर्व शिक्षण मंडळापेक्षा आमच्या शिक्षण मंडळाचे काम उत्तम होते. आमच्या शिक्षण मंडळाचा लौकिक सर्वत्र पोहोचला. ही कारकीर्द माझ्या आयुष्यातील अतिशय महत्त्वपूर्ण होती.

रामशेठ यांच्या नेतृत्वाखाली जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेची वाटचाल अतिशय वेगाने सुरू आहे. या संस्थेचा रौप्य महोत्सव मोठ्या धुमधडाक्यात साजरा झाला. रामशेठनी मला या संस्थेचा उप कार्याध्यक्ष केले आहे. आमची संस्था सध्या गुणात्मकदृष्ट्या अग्रगण्य शिक्षण संस्था आहे. आमची टीम पनवेल परिसराचा शैक्षणिक व सामाजिक परिवर्तनाचा ध्यास घेतलेली आहे. आमच्या संस्थेची गरुडभरारी इथे नवा इतिहास घडवित आहे.

अशाप्रकारे रामशेठ आणि मी अजूनही मोठ्या आनंदाने यशस्वी जीवनाची वाटचाल करीत आहोत. आमच्या दोघांची अमृत वाटचाल चालू आहे. आमची मैत्री शब्दापलीकडची आहे. एकरूपतेची आहे. ज्ञानेश्वर माऊलींच्या शब्दात व्यक्त करायचे म्हटले तर..

हृदय हृदय एक झाले ।
ये हृदयाचे ते हृदयी घातले
आपणा ऐसे केले अर्जुना
हाल जैखन मोडता !!





माणसे जोडणारी प्रयोगशाळा

प्रा. डी. ए. माने
सदस्य, शेती समिती द.विभाग सांगली,
विसापूर, तासगाव

लोकनेते रामशेठ ठाकूर हे कोकणचे भूमिपुत्र आहेत. त्यांच्या जीवनाची सुरुवात अगदी शून्यातून झालेली आहे. मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर पुढच्या शिक्षणाचे काय ? हा प्रश्न त्यांच्यासमोर उभा राहिला. त्यांना त्यांच्या सरांनी सांगितले, ''सातारला कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्थापन केलेले छत्रपती शिवाजी कॉलेज आहे. तेथे 'कमवा व शिका योजना' आहे. तेथे स्वावलंबी शिक्षण घेता येते'' रामशेठनी उच्च शिक्षणासाठी सातारला जाण्याचा निश्चय केला. ते पनवेल-रायगड-महाड-महाबळेश्वर मार्गे सातारला आले. त्यांच्या जीवनाचा नवा प्रवास सफर सुरू झाला. सातारला त्यावेळी प्राचार्य बापूसाहेब उनउने छत्रपती शिवाजी कॉलेजचे प्राचार्य होते. प्राचार्यांनी रामशेठ यांना 'कमवा व शिका' योजनेत प्रवेश दिला. त्यांनी कला शाखेच्या प्री डिग्रीच्या वर्गात प्रवेश घेतला.

रामशेठ ठाकूर यांना छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये शिक्षणाचे नवे दालन सापडले. आता आपले पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण होईल. या कल्पनेने त्यांना अतिशय आनंद झाला. तशात प्राचार्य एस. के. उनउने म्हणजे देवमाणूस होय. प्राचार्य उनउने कर्मवीरांचे खरे वारसदार होते. त्या उनउने बापूंची मायेची सावली रामशेठ ठाकूर यांना लाभली. त्यांच्या प्रेमळ सहवासात रामशेठ ठाकूर यांच्या जीवनाची जडणघडण सुरू झाली. १९६८ ते १९७२ अशी चार वर्षे बी.ए. पर्यंतचे शिक्षण छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये घेतले. तेथे त्यांना उनउने बापूनी आईवडिलांचे प्रेम दिले. त्यांच्या विषयी कृतज्ञता व्यक्त करताना रामशेठ ठाकूर यांनी म्हटले आहे, उनउने बापूचा आदर्श घेऊन मी माझ्या आयुष्याची वाटचाल केली आहे. त्यांचा मला खूपच फायदा झाला आहे. बापूंच्या आचारविचारांचा प्रभाव आहे. त्यांचा मला चार वर्षे सहवास मिळाला. त्यामुळे माझे भविष्य घडले आहे. अशा प्रकारे उनउने बापूंचा आणि कर्मवीर अण्णांच्या विचारांचा वारसा घेऊन त्यांच्या जीवनाची यशस्वी घोडदौड सुरू आहे. यशवंतराव चव्हाणांच्या भाषेत सांगायचे तर, त्यांच्या जीवनाची लंबी सफर सुरू आहे. ही लंबी सफर सामान्य, गोरगरीब लोकांना आधारवड झाली आहे.

कर्मवीर अण्णांना वाटायचे, माझ्या रयतेचे विद्यार्थी, माझ्या बोर्डिंगचे विद्यार्थी, माझ्या 'कमवा व शिका' योजनेचे विद्यार्थी दिल्लीच्या संसदेमध्ये जावेत. मला वाटते कर्मवीर अण्णांची ती इच्छा रामशेठ ठाकूर यांनी पूर्ण केली. रामशेठ ठाकूर दोन वेळा प्रचंड मताने विजयी होऊन लोकसभेत गेले. छत्रपती शिवाजी कॉलेजमधील 'कमवा व शिका' योजनेतील एक सामान्य कुटुंबातील मुलगा संसद सदस्य झाला. भारताच्या लोकशाही मंदिराचा मानदंड झाला. रयतेचा झेंडा दिल्ली दरबारी फडकला. मला वाटते, आजच्या मंगल प्रसंगी ही आठवण 'आनंदाच्या डोही आनंद तरंग' निर्माण करणारी आहे. आज रामशेठ ठाकूर कर्तबगारीने श्रीमंत व्यक्ती बनले आहेत. श्रीमंत अनेकजण असतात; पण त्यातील फार थोडे दिलदार असतात. फार थोडे दानशूर असतात. हा


दानशूरपणाचा संस्कार कर्मवीर भाऊराव पाटील आणि त्यावेळचे प्राचार्य एस. के. उनउने यांच्याकडून त्यांना मिळाला आहे. प्राचार्य बापू ज्या मुलाकडे साबण नाही, तेल नाही, अंथरूण-पांघरूण नाही त्यांना पैसे द्यायचे. या सगळया घटनांचा त्यांच्या मनावर संस्कार झालेला आहे. त्यामुळेच आपणाला जे मिळाले आहे. त्यातील काही आपण दुसऱ्याला देत राहिले पाहिजे. या भावनेने ते काम करत असतात, दान देत असतात. पुढील जीवनात जनार्दन भगत साहेबांनी हेच संस्कार त्यांच्यावर केले आहेत. भगत साहेबांमुळेच रामशेठ ठाकूर राजकारण व समाजकारणाचे मानबिंदू ठरले आहे. त्यामुळे आजही शेकडो विद्यार्थी-पालक, संस्था चालक, वेगवेगळया मंडळाचे चालक, गरीब विद्यार्थी त्यांच्याकडे मदतीसाठी येतात आणि रामशेठ ठाकूर यथाशक्ती सर्वांनाच मदत करतात. आज कोणालाही विन्मुख पाठवायचे नाही. या ब्रीद वाक्याचे ते मानकरी ठरले आहेत.

त्यांच्या स्वभावाने अनेक लहानथोर माणसं अंत:करणाने जोडली गेली आहेत. आज अवघ्या महाराष्ट्रात त्यांचा माणसांचा गोतावळा निर्माण झाला आहे. मी तर म्हणेन लोकनेते रामशेठ ठाकूर हे माणसे जोडणारी प्रयोगशाळा आहेत.

ऋणानुबंधाच्या जिथून पडल्या गाठी।
भेटीत तृष्ठता मोठी ।।

अशा ओळी कानावर पडताच जी माणसं माझ्या समोर उभी राहतात. त्यामध्ये लोकनेते रामशेठ ठाकूर प्रथम स्थानी असतात. काही काम असोत नसो त्यांच्या भेटीची ओढ कायम असते. भेटल्यावर प्रसन्नता समाधान वाटते. माझ्याप्रमाणे अनेकांच्या मनातला माणूस म्हणजे रामशेठ ठाकूर होय. माणूस हा आपल्या भाग्याचा शिल्पकार आहे.हे सुभाषित नक्की ज्याच्याबद्दल वापरावे असा आगळावेगळा माणूस म्हणजे रामशेठ ठाकूर होय.

आज संपूर्ण समाजजीवन राजकारणग्रस्त झाले आहे. भ्रष्ट होत चालले आहे. अशा काहीशा निराशाजनक व उद्विग्न करणाऱ्या परिस्थितीमध्ये रामशेठसारख्या समाजमनाची जाण असणारी, मानवी जीवनमूल्ये जपणारी व राष्ट्रविकासाची तळमळ असणारी मंडळीच आशेचा किरण आहेत. रामशेठ यांचे जीवन पहाट ताऱ्यासारखे (शुक्रतारा) आहे. पहाट तारा पहाटे उगवतो. सर्वांना जागे करतो. पशु-पक्षी, शेतकरी, विद्यार्थी आणि अवघ्यांना जागे करतो. आपले मंगल दर्शन सर्वांना घडवितो. रात्र संपली आहे, अवघ्या विश्वाला सुचवितो. सर्वांना उषःकालाची चाहूल देतो. सामाजिक, राजकीय, औद्योगिक



आणि शैक्षणिक परंपरेतील हा 'पहाट तारा' सर्वांना दीपस्तंभासारखा मार्गदर्शक आहे. सर्वांना मानवतेच्या बंधुतेच्या, समतेच्या वाटेवरून चालण्याचा संदेश देत आहे. नवभारताच्या निर्मितीसाठी – महाराष्ट्राच्या जडणघडणीसाठी शिक्षणाची दारे सर्वांना खुली करून गोरगरीब वंचित विद्यार्थ्यांची जडणघडण करत आहे. आपली मातृसंस्था 'रयत शिक्षण संस्था' आभाळाएवढी मोठी करण्यासाठी अब्जावधी रूपयांचे दान करीत आहे. 'जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था' पनवेलच्या परिसरात उभी करून आदर्श शिक्षण संस्था कशी असावी? याचा आदर्श सर्वांच्या पुढे ठेवून जीवनाची यशस्वी वाटचाल करत आहे. नवमहाराष्ट्र आणि नवभारताचे आदर्श विद्यार्थी घडवत आहे. नवनिर्मितीचे स्वप्न सत्यात साकार करत आहे. अशा व्यक्तीला मी पहाट ताऱ्याची (शुक्रतारा) समर्पक उपमा दिली आहे. रामशेठ ठाकूर यांच्या जीवनाचे सार सांगायचे, तर रामशेठ ठाकूर हे पारिजातकाचे झाड आहेत. मी माझ्या घरासमोरील पारिजातकाच्या झाडाचे सूक्ष्म निरीक्षण केले आहे. पारिजातकाला इवलीशी फुले येतात. पण त्या फुलांचा परिमळ सभोवताली पसरतो आणि सर्वांना सुगंधित करून जातो. या फुलांचा देठ भगव्या रंगाचा असतो आणि उमलणारे फूल पांढरेशुभ्र असते. या फुलाकडे पाहून हा निसर्गाचा चमत्कार आहे. असेच उद्गार बाहेर पडतात. या फुलांचे वैशिष्ट्य म्हणजे ही फुले रात्री उमलतात आणि अगदी उषःकाली सूर्योदय होणाच्या समयी सारी फुले गळून पडतात. ही फुले जणू काय सूर्याला अर्घ्य देतात. सर्वांसाठी आपले दान देतात. अवघा परिसर मंगलमय करीत असतात. येणा-जाणाऱ्याला सुगंधित करतात. आपला कसलाही विचार न करता पारिजात आपल्या फुलांची उधळण करीत असतो. आणि पुन्हा दिवसभर फुलांची निर्मिती करून उद्याच्या दानाची तयार करित असतो म्हणूनच म्हणतात 'दान करावे, तर पारिजातकासारखे. 'खरोखर रामशेठ ठाकूर यांचे दान पारिजातकाच्या झाडासारखे आहे. ते तुम्हा सर्वांचे पारिजातकच आहेत! म्हणूनच त्यांच्या कार्याचा सुगंध सर्वत्र दरवळतो आहे !





कृतज्ञतेचा महामेरु : दानशूर आणि रयतनिष्ठ मा.लोकनेते रामशेठ ठाकूर

प्राचार्य डॉ. ए. सी. अत्तार
कर्मवीर भाऊराव पाटील
अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

रयतेचा कणा, बहुजनांचा राजा, कर्मवीरांच्या विचारांचा, खरा वारसदार हा माझा...

भारतीय शिक्षण क्षेत्राच्या इतिहासात 'रयत शिक्षण संस्था' हे केवळ एक नाव नसून, ती बहुजन समाजाच्या उद्धाराची एक अखंड ज्ञानगंगा आहे. पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील (अण्णा) यांनी लावलेलं हे रोपटं आज एक महावृक्ष झाले आहे. या महावृक्षाच्या सावलीत लाखो सुशिक्षित आणि सुसंस्कृत पिढ्या घडल्या. रयत शिक्षण संस्थेचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे या संस्थेने समाजाला केवळ पदव्या दिल्या नाहीत, तर स्वाभिमानाने जगण्याचे संस्कार दिले. 'कमवा आणि शिका' (Earn and Learn) या क्रांतिकारी योजनेच्या माध्यमातून अण्णांनी गरिबातील गरीब विद्यार्थ्याला शिक्षणाच्या प्रवाहात आणले.

आज रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सन्माननीय सदस्य आणि महाराष्ट्राचे लाडके लोकनेते मा. रामशेठ ठाकूर साहेब आपल्या वयाची ७५ वर्षे पूर्ण करीत आहेत. त्यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त प्रकाशित होत असलेल्या या 'गौरवग्रंथा'साठी लेख लिहिताना, कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाचा प्राचार्य म्हणून माझा ऊर अभिमानाने आणि कृतज्ञतेने भरून येत आहे. रामशेठ ठाकूर साहेब हे रयतचे माजी विद्यार्थी, रयतचे पाठीराखे आणि आजच्या काळातील रयतचे 'आधुनिक दानी' आहेत. त्यांच्या जीवनप्रवासाचा आणि रयत संस्थेच्या ऋणानुबंधाचा वेध घेण्याचा हा एक प्रामाणिक प्रयत्न.

आदरणीय रामशेठ ठाकूर साहेबांच्या जीवनाकडे पाहताना मला नेहमी कर्मवीर अण्णांच्या विचारांची ताकद जाणवते. साहेब हे रयत शिक्षण संस्थेच्या 'कमवा व शिका' योजनेचे विद्यार्थी राहिले आहेत. ज्या संस्थेने आपल्याला घडवले, ज्या संस्थेच्या छत्राखाली आपण कष्टाचे आणि स्वावलंबनाचे धडे गिरवले, त्या संस्थेप्रती साहेबांच्या मनात असलेली कृतज्ञता अथांग आहे. आज साहेब रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे अत्यंत सक्रिय आणि मार्गदर्शक सदस्य आहेत. केवळ पदावर राहणे साहेबांना मान्य नाही, तर संस्थेच्या प्रत्येक चांगल्या उपक्रमात त्यांचा प्रत्यक्ष सहभाग असतो.

आदरणीय रामशेठ ठाकूर साहेबांचे रयत शिक्षण संस्थेतील स्थान आणि महाराष्ट्राच्या नेतृत्वाशी असलेले त्यांचे संबंध किती कौटुंबिक आणि हक्काचे आहेत, याचा एक ऐतिहासिक प्रसंग रयत शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा येथे घडला.

शिवाजी कॉलेजमध्ये मा. ठाकूर साहेबांच्या दातृत्वातून भव्य 'रामशेठ ठाकूर भवन' उभारण्यात आले आहे. या वास्तूच्या उद्घाटनप्रसंगी रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार आदरणीय मा.



शरदचंद्रजी पवार साहेब उपस्थित होते. व्यासपीठावर महाराष्ट्रातील दिग्गज मंडळी होती.

भाषणादरम्यान बोलताना पवार साहेबांनी काळाची पावले ओळखून एक अत्यंत महत्त्वाची सूचना केली. ते म्हणाले, आपल्या अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये (KBP Engineering College) आता 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' (Artificial Intelligence) हा आधुनिक विषय सुरू करण्यात यावा. तंत्रज्ञानाच्या या युगात आपल्या रयतचे विद्यार्थी मागे पडू नयेत, हा पवार साहेबांचा त्यामागील शुद्ध हेतू होता.

परंतु, असा मोठा आणि आधुनिक विभाग सुरू करायचा म्हणजे त्यासाठी प्रचंड मोठा आर्थिक खर्च येतो, हे सर्वांनाच ठाऊक होते. पवार साहेबांनी तिथेच उपस्थितांच्या मनातील ही शंका ओळखली आणि ते हसून अत्यंत हक्काने म्हणाले:

तुम्ही पैशाची अजिबात काळजी करू नका... ती जबाबदारी मी आणि रामशेठ घेऊ!

आदरणीय पवार साहेबांनी भर जाहीर सभेत, एवढ्या मोठ्या व्यासपीठावर रामशेठ ठाकूर यांचे नाव घेणे आणि ती जबाबदारी मी आणि रामशेठ घेऊ असे म्हणणे, हा क्षण आम्हा सर्व रयत सेवकांसाठी अंगावर रोमांच उभा करणारा होता. आदरणीय पवार साहेब ज्या हक्काने आणि विश्वासाने रामशेठ साहेबांना बोलू शकतात, यावरूनच त्या दोन महान नेत्यांमधील राजकारणापलीकडचे, रयतच्या विचारांनी बांधलेले घट्ट नाते आणि आपुलकी स्पष्ट होते. मा. रामशेठ ठाकूर साहेब हे रयतसाठी कोणत्याही क्षणी, कोणतीही किंमत

मोजायला तयार असतात, हा विश्वास पवार साहेबांना आहे आणि ठाकूर साहेबांनी तो विश्वास नेहमीच सार्थ ठरवला आहे.

आमच्या कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा (KBPCOES) येथे रामशेठ ठाकूर साहेब एका विशेष कार्यक्रमासाठी आले होते. महाविद्यालयात नव्याने उभारण्यात आलेल्या 'सेंटर ऑफ एक्सेलेन्स' (Center of Excellence) चे उद्घाटन मा. खा. शरदचंद्र पवार साहेबांच्या शुभहस्ते होणार होते त्या वेळी मा. रामशेठ ठाकूर साहेब देखील उपस्थित होते. संपूर्ण महाविद्यालयात उत्साहाचे वातावरण होते.

उद्घाटन सोहळा संपन्न झाल्यानंतर मा. रामशेठ ठाकूर साहेब महाविद्यालयाच्या परिसराची पाहणी करत होते. सर्व वरिष्ठ पदाधिकारी आणि रयतचे हितचिंतक एकत्र चालत होते. त्या वेळी सहज बोलता बोलता रयतचे मार्गदर्शक मा. एम. बी. शेख साहेब यांनी महाविद्यालयाच्या मुख्य इमारतीकडे पाहिले आणि रामशेठ ठाकूर साहेबांना म्हणाले, ठाकूर साहेब, आपल्या या इंजिनिअरिंग कॉलेजचे मुख्य 'एलिव्हेशन' (दर्शनी भाग) तितकेसे आधुनिक आणि चांगले वाटत नाही. तंत्रज्ञानाचे शिक्षण देणाऱ्या या एवढ्या मोठ्या कॉलेजचे रूप बाहेरूनही दिमाखदार दिसणे गरजेचे आहे, त्यात बदल व्हायला हवा. मा. एम. बी. शेख साहेबांचे हे वाक्य संपते न संपते, तोच मा. रामशेठ ठाकूर साहेबांनी क्षणाचाही विलंब न लावता तिथेच सांगितले. ''शेख साहेब, काळजी करू नका. हे काम लगेच करून घ्या. या एलिव्हेशनच्या बदलाबद्दल जो काही खर्च येईल, तो पूर्ण खर्च मी द्यायला तयार आहे!''

त्या प्रसंगी मी तिथेच हजर होतो. साहेबांचा तो तत्पर निर्णय आणि रयतच्या वास्तूबद्दलची त्यांची संवेदनशीलता पाहून मी थक्क झालो. कोणतीही पूर्वकल्पना नसताना, कोणताही प्रस्ताव समोर नसताना, केवळ संस्थेच्या हिताचा एक विचार समोर आला आणि साहेबांनी स्वतःचा खिसा रिकामा करायची तयारी दर्शवली. हाच तो कर्मवीरांचा संस्कार!

मा. ठाकूर साहेबांनी महाविद्यालयाच्या एलिव्हेशनचे काम करण्याचे जाहीर केल्यानंतर, आम्ही तातडीने त्याचे प्लॅन (Plan) आणि एस्टिमेट (अंदाजपत्रक) तयार केले. उत्कृष्ट दर्जाचे आणि आधुनिक काळाला साजेसे एलिव्हेशन डिझाईन फायनल करण्यात आले. यानंतर, मी (प्राचार्य डॉ. ए. सी. अत्तार) आणि रयत शिक्षण संस्थेचे आदरणीय सचिव माननीय विकास देशमुख साहेब हे दोघे मिळून पुढील मंजुरीसाठी आणि साहेबांना प्रोग्रेस रिपोर्ट देण्यासाठी वाशी (नवी मुंबई) येथे त्यांना भेटायला गेलो.

आम्ही मा. ठाकूर साहेबांसमोर सर्व डिझाइन्स ठेवले आणि सांगितले, ''साहेब, कॉलेजच्या या नवीन एलिव्हेशनसाठी साधारणपणे ३० ते ३५ लाख रुपये खर्च अपेक्षित आहे.

आम्हाला वाटले होते की साहेब ३०-३५ लाखांच्या या खर्चाला मंजुरी देतील. पण रामशेठ ठाकूर साहेब हे मोठ्या मनाचे राजे माणूस आहेत! त्यांनी अंदाजपत्रक पाहिले, आमची रयतप्रती असलेली तळमळ पाहिली आणि ते अत्यंत प्रेमाने म्हणाले, ३०-३५ लाखांचा विचार करू नका. मी या कामासाठी पूर्ण ५० लाख रुपये देतो! कामाच्या दर्जाशी कुठेही तडजोड करू नका. दर्जेदार आणि भव्य काम तातडीने सुरू करा!

साहेबांनी केवळ शब्द दिला नाही, तर त्यांनी नुकतीच ५० लाख रुपयांची देणगी महाविद्यालयाला सुपूर्द देखील केली आहे. आज साहेबांच्या याच दातृत्वातून आमच्या कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या एलिव्हेशनचे काम अत्यंत वेगाने आणि युद्धपातळीवर सुरू आहे. जेव्हा हे काम पूर्ण होईल,

तेव्हा ती वास्तू साहेबांच्या रयतवरील प्रेमाचे प्रतीक म्हणून दिमाखात उभी असेल.

मागितले ३० लाख आणि दिले ५० लाख! हे केवळ पैशाचे गणित नाही, तर रयत शिक्षण संस्थेच्या मातीबद्दल, तिथल्या विद्यार्थ्यांबद्दल साहेबांच्या मनात असलेले असीम प्रेम आणि आपुलकी आहे.

आदरणीय रामशेठ ठाकूर साहेबांचा आजवरचा जीवनप्रवास हा थक्क करणारा आहे. पनवेल-नवी मुंबई परिसराचे नेतृत्व करताना त्यांनी सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रात स्वतःचा एक वेगळा ठसा उमटवला आहे. जनसामान्यांचे प्रश्न सोडवणारा नेता, गरिबांचा कैवारी आणि शिक्षणाचा प्रसार करणारा ज्ञानदूत अशी त्यांची ओळख आहे.

पण या सर्व आभूषणांमध्ये ठाकूर साहेबांना सर्वात जास्त अभिमान कशाचा वाटत असेल, तर तो म्हणजे मी रयतचा विद्यार्थी आहे याचा! ज्या अण्णांच्या बोर्डिंगमध्ये साहेबांनी जेवण केले, ज्या रयतच्या संस्कारात ते मोठे झाले, त्या रयतला आज ते सढळ हाताने मदत करत आहेत.

माननीय खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर साहेब यांच्या अमृत महोत्सवी ७५ व्या वाढदिवसानिमित्त मी, कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा येथील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी यांच्या वतीने त्यांना कोटी कोटी शुभेच्छा देतो.

साहेबांनी आमच्या महाविद्यालयाला जे ५० लाख रुपयांचे आर्थिक बळ दिले, त्यामुळे आमच्या संस्थेचे वैभव अधिकच वाढणार आहे. साहेबांचे हे ऋण आम्ही कधीही विसरू शकत नाही. साहेबांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य लाभो आणि त्यांच्या हस्ते रयत संस्थेची अशीच अखंड सेवा घडत राहो, हीच कर्मवीर माऊलींच्या चरणी प्रार्थना!

साहेब, रयतचा हा डोलारा तुमच्यासारख्या छत्रछायेमुळेच आज सुरक्षित आहे. तुमच्या ७५ व्या वाढदिवसाला आमचा मानाचा मुजरा!





लोकनेते रामशेठ ठाकूर : सामाजिक बांधीलकी मानणारे यशस्वी उद्योजक

श्री. देववृत जाधव
खारघर

७५ वर्षांचे होत असलेले लोकनेते रामशेठ ठाकूर हे नाव राजकारण, शिक्षण आणि समाजकारणासाठी सर्वज्ञात आहे; पण या व्यक्तिमत्त्वामागचा जिद्दी उद्योजक, जोखीम घेणारा नियोजक आणि नव्या पिढीच्या स्टार्टअप्सना पाठबळ देणारा मार्गदर्शक हा पैलू तितकाच प्रेरणादायी आहे. उद्योजकतेचा सामाजिक उपयोग याच विचारातून त्यांनी स्थिर नोकरीचा मार्ग न स्वीकारता स्वतःचा मार्ग निवडला – उद्योजकतेचा.

उद्योजकतेचा श्रीगणेशा: एका धाडसी निर्णयाची कहाणी

शिक्षक म्हणून काम करत असतानाच रामशेठ ठाकूर यांनी नोकरीला पूर्णविराम दिला आणि एका नव्या, अनिश्चित वाटेवर पाऊल ठेवले. कसलाही कौटुंबिक व्यावसायिक वारसा नसताना कंत्राटदारी आणि पायाभूत सुविधा (Infrastructure) क्षेत्रात उतरणे हे त्या काळात अत्यंत धाडसाचे आणि जोखमीचे काम होते.

केवळ १०,००० रुपयांच्या एका छोट्या अर्थमूव्हिंग प्रकल्पापासून सुरू झालेली ही कंपनी आज 'ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रायव्हेट लिमिटेड' या नावाने महाराष्ट्रातील अग्रगण्य पायाभूत सुविधा उभी करणारी कंपनी म्हणून ओळखली जाते. याद्वारे रस्ते विकास, इमारतींचे बांधकाम, बंदरांचा विकास आणि विविध नागरी पायाभूत सुविधांचे भव्य प्रकल्प राबवले जातात.

रामशेठ ठाकूर यांच्या व्यावसायिक दृष्टीचे मूळ त्यांच्या शिस्तीत, सचोटीत आणि गुणवत्तेच्या आग्रहात होते. कंत्राट क्षेत्रात वेळेत काम पूर्ण करणे आणि कामाचा दर्जा राखणे या दोन गोष्टींना त्यांनी नेहमीच सर्वोच्च प्राधान्य दिले. रामशेठ यांच्या उद्योजकीय शैलीत तीन गोष्टी कायम राहिल्या – पहिली म्हणजे छोट्या कामापासून सुरुवात करण्याची तयारी, दुसरी म्हणजे जोखीम घेण्याचे धाडस आणि तिसरी म्हणजे कुठलाही प्रकल्प हातात घेताना त्याची 'सामाजिक उपयुक्तता' आधी पडताळून पाहण्याची सवय. सर्व गोष्टी नव उद्योजकांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून शिकण्यासारख्या आहेत.

राजकारणातील उद्योजकीय शिस्त

लोकनेते रामशेठ ठाकूर दोन वेळा खासदार राहिले; पण त्यांच्या राजकारणातही उद्योजकीय दृष्टिकोन होता. एखादा प्रश्न पाहताना ते प्रकल्प व्यवस्थापन पद्धतीने विचार करत.

त्यांच्या सहकाऱ्यांच्या मते, बैठकीत ते नेहमी तीन प्रश्न विचारायचे–

१. याचा लोकांना नेमका फायदा काय?

२. आर्थिक मॉडेल काय?



३. काम पूर्ण होण्याची वेळ किती?

ही शैली उद्योगविश्वातून आलेली होती.

सामाजिक कार्यातदेखील रामशेठ ठाकूर यांची शैली ही 'प्रोजेक्ट मॅनेजमेंट'कडे झुकलेली आहे. पूर, साथरोग किंवा कोरोनासारखी महामारी असो, ते फक्त देणगी जाहीर करून बाजूला उभे राहत नाहीत. हाच उद्योगशील विचार सामाजिक क्षेत्रात वापरणे ही त्यांची खासियत म्हणता येईल.

रामशेठ ठाकूर यांनी सामाजिक विकास मंडळाच्या अंतर्गत अनेक समाजसेवेची कामे केली आहेत. करोनाकाळातही व्यवसायात शिकलेली 'लॉजिस्टिक्स' आणि 'सप्लाय-चेन'ची समज त्यांनी इथे वापरली ट्रक्स, वेअरहाउसिंग, अन्नधान्याचा साठा, स्वयंसेवकांचे नेटवर्क – हे सर्व घटक जोडून त्यांनी मदतकार्य प्रभावी केले.

उद्योगातून मिळालेलं यश त्यांनी शिक्षण आणि राजकारणातून समाजकारण यासाठी वापरलं. रयत शिक्षण संस्थेशी त्यांचं नातं हे केवळ पदाचे नाही; ते भावनेचं आहे. सातारा येथील कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सुरू केलेल्या रयत शिक्षण संस्थेच्या ऐतिहासिक 'कमवा आणि शिका' या योजनेच्या माध्यमातून रामशेठ ठाकूर यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. ज्या रयत शिक्षण संस्थेने आपल्याला कठीण काळात शिकवले, त्या संस्थेला परत देण्याची वेळ आली तेव्हा रामशेठ ठाकूर यांनी औदार्याचा नवा इतिहास रचला. त्यांनी रयत संस्थेला आजवर एकूण १२५ कोटी रुपयांपेक्षा जास्त निधी वैयक्तिक आणि संस्थात्मक माध्यमातून दिला आहे. रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माननीय शरद पवार यांनी एका कार्यक्रमात म्हटलं होतं, रयत शिक्षण संस्थेच्या कार्यात रामशेठ ठाकूर यांचं योगदान हे केवळ आर्थिक नाही; ते संस्थेच्या विचारविश्वाला बळ देणारे आहे.

प्रचंड ध्येयवादी व्हा, आयुष्यात प्रचंड मेहनत करा. कामावरची श्रद्धा आणि शिस्त हाच स्वभावधर्म बनवा. रामशेठ ठाकूर साहेबांना व्यावसायिक होण्याची संधी त्यांच्याकडे चालून आली व त्यांनी त्याचे सोने केले, तसेच प्रत्येक माणसाच्या आयुष्यात संधी दार ठोठावत असते फक्त ती अचूक ओळखून शिखर गाठता येते. त्यासाठी अचूक निर्णय क्षमता, धैर्य व त्याचबरोबर प्रचंड ध्येयासक्ती असली पाहिजे. रामशेठ ठाकूर साहेबांना पहिल्या कामाला सुरुवात करण्यासाठी व जुळवाजुळव करण्यासाठी प्रसंगी दागिने गहाण ठेवून पाच

हजार रुपयांचे कर्ज काढावे लागले होते. ही गोष्ट व्यवसाय करताना घेतली जाणारी जोखीम दर्शवते. एका रस्ता बनवण्याच्या कामात जेथे गाडी जाणे शक्य नव्हते तेथे त्यांनी ७० गाढवे भाड्याने घेऊन माती वाहून नेली व व्यावसायिक बुद्धीने अडचणींवर मात केली. छोट्या कामापासून सुरुवात करा व हळूहळू त्याचा आवाका वाढवत न्या. कामे दर्जेदारच असली पाहिजे हा त्यांचा आग्रह होता. कामाकडे दुर्लक्ष व चुकारपणा त्यांना अजिबात आवडत नसे.

स्वतः अत्यंत प्रतिकूल आर्थिक परिस्थितीवर मात करून एक यशस्वी उद्योजक बनलेल्या रामशेठ ठाकूर यांचे हे ठाम मत आहे की, आजचा तरुण केवळ नोकरी मागणारा न राहता नोकरी देणारा उद्योजक बनला पाहिजे. तंत्रज्ञानाचा वापर करून नवीन पिढीने व्यावसायिक क्रांती करावी, या ध्यासापोटी त्यांनी रयत शिक्षण संस्थेच्या शताब्दी महोत्सवाचे औचित्य साधून स्थापन झालेल्या सेंटर फॉर इन्व्हेंशन, इनोव्हेशन अँड इन्क्यूबेशन (CIII) च्या उभारणीत आणि कारभारात अत्यंत मोलाचे योगदान खालीलप्रमाणे दिले आहे.

कोणत्याही नवीन कल्पनेचे किंवा स्टार्ट-अपचे रूपांतर यशस्वी व्यवसायात करण्यासाठी सुरुवातीच्या काळात 'सीड फंडिंग' (Seed Funding) आणि पायाभूत सुविधांची मोठी गरज असते. रामशेठ ठाकूर यांनी CIII च्या प्रत्यक्ष स्थापनेसाठी आणि पायाभरणीसाठी सुरुवातीलाच २ कोटी रुपयांची भक्कम वैयक्तिक आर्थिक मदत दिली. ही मदत केवळ एक देणगी नव्हती, तर ती महाराष्ट्रातील हजारो नवोदित तंत्रज्ञांच्या आणि तरुण उद्योजकांच्या स्वप्नांना दिलेली ताकद होती. भारत स्टार्टअप आणि इनोव्हेशनच्या नव्या युगात प्रवेश करत असताना विद्यार्थ्यांना या प्रवाहाशी जोडणं आवश्यक आहे, ही कल्पना त्यांनी खूप आधी ओळखली. उखखख ची स्थापना २०१९ मध्ये वैज्ञानिक संशोधन, प्रशिक्षण आणि नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्याच्या मुख्य उद्देशाने करण्यात आली. आहे, ज्याचा वापर प्रभावी उद्योजक घडवण्यामध्ये होईल. प्रारंभी CIII ची स्थापना रयत शिक्षण संस्था, सातारा, सायन्स अँड टेक्नॉलॉजी पार्क, पुणे आणि टाटा टेक्नॉलॉजीज लि. या तीन प्रतिष्ठित संस्थांच्या सहकार्याने करण्यात आली.

नवी मुंबईतील वाशी येथील नामांकित कर्मवीर भाऊराव पाटील (KBP) स्वायत्त महाविद्यालयाच्या कॉलेज विकास समितीचे (College Development Committee) अध्यक्ष म्हणून रामशेठ ठाकूर दीर्घकाळ काम पाहत आहेत. या पदावर कार्यरत असताना त्यांनी महाविद्यालयाच्या स्तरावरून CIII च्या उभारणीसाठी आणि नवोपक्रम परिसंस्थेच्या निर्मितीसाठी आवश्यक तो निधी आणि शैक्षणिक सहकार्य उपलब्ध करून दिले. यामुळे वाशी महाविद्यालयातील शेकडो सामान्य व मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांना थेट खारघर येथील अत्याधुनिक इनक्युबेशन सेंटरशी जोडले जाणे शक्य झाले.

संचालक मंडळाचे अध्यक्ष

रामशेठ ठाकूर हे केवळ आर्थिक मदत देऊन थांबले नाहीत, तर ते स्वतः रयत सेंटेनरी इनोव्हेशन अँड इनक्युबेशन फाउंडेशन (Rayat Centenary Innovation and Incubation Foundation - RCIIF, खारघर) च्या संचालक मंडळाचे अध्यक्ष बनले. त्यांच्या प्रदीर्घ व्यावसायिक अनुभवामुळे या संस्थेला एक व्यावसायिक आणि शिस्तबद्ध दिशा मिळाली. 'ना नफा, ना तोटा' तत्त्वावर २०२२ साली स्थापन झालेल्या या सेक्शन ८ कंपनीमध्ये कंपनीच्या जडणघडणीमध्ये त्यांचा सिंहाचा वाटा आहे.

लोकनेते रामशेठ ठाकूर साहेबांच्या मार्गदर्शनानुसार रयत सेंटेनरी इनोव्हेशन अँड इनक्युबेशन फाउंडेशन

मध्ये नव उद्योजकांसाठी तसेच होतकरू विद्यार्थ्यांसाठी खालील सुविधा उपलब्ध आहेत –

* उद्योजकता जागरूकता अभियान
* व्यापक व्यवसाय प्रशिक्षण कार्यक्रम
* नव उद्योजकांसाठी मार्गदर्शन कार्यक्रम
* नव उद्योजकांसाठी व नवीन कंपनी स्थापण्यासाठी सर्व कागदपत्रांसाठी मार्गदर्शन
* नवकल्पकांना कायदेशीर/मानवी संसाधन/फायनान्स/ बौद्धिक संपदा सेवांसह जोडणे
* प्रारंभिक टप्प्यातील ग्राहक संपादनासाठी मार्केटिंग संदर्भात मार्गदर्शन
* बिझनेस मॉडेलिंग आणि धोरण नियोजन संदर्भात मार्गदर्शन
* व्यवसाय मूल्यांकन आणि इक्विटी सल्ला
* स्टार्ट-अप बूट कॅम्प शिबिरे
* सरकारी निधी मिळवण्याबाबत मार्गदर्शन
* नेटवर्किंग इव्हेंट
* इतर संस्थांसह संलग्नित शाखांमधून मदत
* दस्तऐवजीकरण/नियम/पालन संबंधित समर्थन
* स्टार्टअप ईकोसिस्टम
* इनक्यूबॅशन प्रोग्रॅम
* इनक्युबेशन सेंटर मध्ये नवउद्योजकांना मार्गदर्शन प्रोग्रॅम तयार आहे.
* एंजल इन्वेस्टर व व्हेंचर कॅपिटलिस्ट यांच्यामार्फत बाहेरून फंडिंगची सुविधा उपलब्ध आहे.
* कौशल्य प्रशिक्षण केंद्र
* विद्यार्थ्यांना संशोधनामध्ये सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत मदत करणे

पाच दशकांहून अधिक काळ यशस्वी पायाभूत उद्योग चालवल्यामुळे रामशेठ ठाकूर यांना बाजारातील चढ-उतार, कायदेशीर बाबी आणि आर्थिक व्यवस्थापनाचे अचूक ज्ञान आहे. RCIIF च्या व्यवस्थापन चमूला वेळोवेळी मौल्यवान मार्गदर्शन करतात. तसेच तेथे मार्गदर्शन घेत असलेल्या नवोद्योजकांना ते नेहमी खालीलप्रमाणे अत्यंत व्यावहारिक टिप्स देतात :

* आर्थिक शिस्त आणि पारदर्शकता: कोणत्याही स्टार्ट-अपच्या अपयशाचे मुख्य कारण अपुरे आर्थिक नियोजन असते. त्यामुळे सुरुवातीच्या काळापासूनच प्रत्येक रुपया काळजीपूर्वक वापरला पाहिजे.
* ग्राहकाभिमुखता (Market Viability): केवळ प्रयोगशाळेत एखादे तांत्रिक उत्पादन बनवून चालत नाही, तर बाजारात त्या उत्पादनाला किती मागणी आहे आणि ते ग्राहकांच्या गरजा कशा पूर्ण करते, याचा सखोल अभ्यास विद्यार्थ्यांनी केला पाहिजे.
* अपयशातून शिकण्याची तयारी: व्यवसायात सुरुवातीला येणाऱ्या अडचणींमुळे खचून न जाता, कल्पकतेमध्ये सातत्य ठेवले पाहिजे.

* त्यांचा मुख्य आग्रह 'इनोव्हेशनला प्रोत्साहन' हा आहे.

रामशेठ ठाकूर यांचं सर्वात मोठं योगदान म्हणजे त्यांनी उद्योजकता ही केवळ श्रीमंतांची गोष्ट राहू दिली नाही. RCIIF, शैक्षणिक संस्था, कौशल्य विकास कार्यक्रम, विद्यार्थ्यांसाठी संधी त्यांनी पहिल्या पिढीतील उद्योजक तयार करण्याचा प्रयत्न केला.

अशा प्रकारे, केवळ देणगीदार म्हणून नव्हे तर 'इन्क्यूबेटर-उद्योजक' म्हणून स्टार्टअप-इकोसिस्टममध्ये योगदान देणारा हा विरळाच नेता आहे.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा ७५ वर्षांचा हा जीवनप्रवास म्हणजे कष्ट, जिद्द, सचोटी, व्यावसायिक यश आणि अनंत दातृत्वाचे एक प्रेरणादायी महाकाव्य आहे. ७५ वर्षांच्या या प्रवासाकडे पाहताना जाणवते-रामशेठ ठाकूर यांना एका चौकटीत बांधणं कठीण आहे. शैक्षणिक संस्था सोबतच आज RCIIF सारख्या संस्थांमधून ते नव्या पिढीतील उद्योजक घडवण्याचे काम करत आहेत. त्यामार्फत महाराष्ट्राच्या भावी पिढ्यांना स्वावलंबनाचा आणि यशाचा मार्ग दाखवत राहतील.

रामशेठ ठाकूर हे केवळ राजकीय लोकनेते नाहीत, तर महाराष्ट्राच्या उद्योजकीय संस्कृतीचेही एक महत्त्वाचे आदर्श व्यक्तिमत्त्व आहेत - 'कमवा-शिका' पासून 'इनोव्हेट-इन्क्यूबेट' पर्यंतचा प्रवास घडवणारे !





शिक्षणविकासाचे उदार पुरस्कर्ते : लोकनेते मा.श्री.रामशेठ ठाकूर

प्राचार्य डॉ. वैशाली जाधव
इस्माईलसाहेब मुल्ला विधी महाविद्यालय,
सातारा

महाराष्ट्राच्या सामाजिक आणि शैक्षणिक परिवर्तनाच्या इतिहासात आपली मातृसंस्था रयत शिक्षण संस्थेचे योगदान अत्यंत मोलाचे आणि प्रेरणादायी राहिले आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षण हेच समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन या ध्येयातून सुरू केलेल्या या ज्ञानचळवळीने ग्रामीण, वंचित आणि सर्वसामान्य समाजघटकांपर्यंत शिक्षणाची गंगा पोहोचविली. कमवा व शिका या तत्त्वज्ञानातून श्रमप्रतिष्ठा, स्वावलंबन आणि सामाजिक बांधीलकीची मूल्ये रुजविण्याचे महान कार्य संस्थेने केले.

आजही आपली संस्था आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरत, बदलत्या शैक्षणिक प्रवाहांशी सुसंगत राहून ज्ञानदानाचे कार्य प्रभावीपणे पुढे नेत आहे. आधुनिक तंत्रज्ञानाधारित अध्यापन पद्धती, डिजिटल शिक्षण, कौशल्याभिमुख शिक्षण आणि विद्यार्थीकेंद्रित उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठीचे उपक्रम यांमुळे संस्थेचे कार्य अधिक व्यापक आणि काळानुरूप प्रगतीशील होत आहे. संस्थेचे हे शिक्षणप्रसाराचे कार्य शिक्षणप्रेमी, समाजहिताची जाणीव जपणाऱ्या अनेक दानशूर व्यक्तींच्या सहकार्यामुळे यशस्वीपणे पुढे चालू आहे. या उदात्त कार्यात ज्यांनी आपल्या कर्तृत्वाने, दातृत्वाने आणि दूरदृष्टीने विशेष स्थान निर्माण केले, अशा व्यक्तिमत्त्वांमध्ये लोकनेते मा. श्री. रामशेठ ठाकूर यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. जनसामान्यांशी असलेली त्यांची घट्ट नाळ, लोकहितासाठीची सातत्यपूर्ण तळमळ आणि समाजकारणातील सक्रिय योगदान यांमुळे ते लोकनेते म्हणून सर्वत्र आदरपूर्वक ओळखले जातात.

इस्माईलसाहेब मुल्ला विधी महाविद्यालय, सातारा येथे प्राचार्य म्हणून कार्य करत असताना, कर्मवीर अण्णांच्या विचारांतून घडलेल्या अनेक थोर व्यक्तिमत्त्वांच्या सहवासात येण्याची संधी मला लाभली. त्या व्यक्तिमत्त्वांमध्ये सामाजिक, शैक्षणिक, राजकीय आणि लोकहितवादी कार्यामुळे विशेष अधोरेखित होणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे मा. श्री. रामशेठ ठाकूर. विविध क्षेत्रात अग्रगण्य असलेले हे शिक्षणप्रेमी आणि दानशूर व्यक्तिमत्त्व दि. २ जून २०२६ रोजी आपल्या जीवनातील अमृतमहोत्सवी ७५ वर्षांची यशस्वी वाटचाल पूर्ण करीत मानाचा टप्पा गाठत आहेत. त्यांच्या जीवनकार्याचा मागोवा घेत असताना त्यांच्या ज्ञानयज्ञातील उदात्त दातृत्वाचा परिचय झाल्यानंतर मनात प्रथम विचार आला की, हे जणू महाभारतातील कर्णाचेच आधुनिक रूप– शिक्षणक्षेत्रातील आधुनिक कर्ण आहेत.

लोकसभेच्या व्यासपीठापर्यंत यशस्वीपणे पोहोचलेले हे आदरणीय नेतृत्व – दानशूरता, निष्ठा आणि लोकसेवेचे मूर्तिमंत प्रतीक आहे. दि. २ जून १९५१ रोजी रायगड जिल्ह्यातील शिवाजीनगर येथे सर्वसामान्य कुटुंबात जन्मलेले मा. रामशेठ ठाकूर यांचे जीवन संघर्ष, कष्ट, जिद्द आणि सामाजिक बांधीलकी यांचे

प्रेरणादायी उदाहरण आहे. खडतर परिस्थितीला सामोरे जात आणि मातीतल्या संस्कारांची जपणूक करत त्यांनी राष्ट्रीय राजकारणात व समाजकारणात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. त्यांचा जीवनसंघर्ष हा समाजातील सामान्य माणसासाठी प्रेरणादायी जीवनमूल्यांचा जिवंत आदर्श ठरतो. सुविद्य पत्नी सौ. शकुंतला यांच्या साथीने मा. श्री. रामशेठ ठाकूर यांनी कुटुंब सांभाळत पुढील पिढीलाही सामाजिक बांधीलकीचे संस्कार दिले.

लहानपणी माता श्रीमती भागुबाई आणि पिता श्री. चांगू ठाकूर यांच्या समवेत कठोर परिश्रम करत असतानाच त्यांनी शिक्षणाचे महत्त्व जाणले व 'शिक्षणाशिवाय जीवनाला पर्याय नाही' हे लहान वयातच मनात दृढपणे रुजविले. रायगड जिल्ह्यातील न्हावेवाडी व गव्हाण येथे शालेय शिक्षण पूर्ण करून ते महाविद्यालयीन शिक्षणासाठी छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा येथे आले. कर्मवीर अण्णांनी सुरू केलेल्या श्रमप्रतिष्ठा आणि स्वावलंबनाची शिकवण देणाऱ्या 'कमवा व शिका' योजनेत सहभागी होत त्यांनी स्वतःच्या कष्टातून महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले. आपल्या शिक्षकांनी केलेले संस्कार, दिलेले मार्गदर्शन आणि विचारांची समृद्ध शिदोरी ही जीवनप्रवासात आजही संजीवनीसारखी प्रेरणा देत असल्याची कृतज्ञ भावना ते नेहमी व्यक्त करतात. 'कमवा व शिका' योजनेतून मिळालेल्या सामाजिक बांधीलकीच्या धड्याचे ते स्वतःच वर्णन करतात, मला जेव्हा शंभर रुपये मिळत होते तेव्हा मी समाजासाठी दहा रुपये खर्च करीत होतो; लाख रुपये मिळाले तेव्हा दहा हजार समाजासाठी खर्च केले. – हेच खरे 'कर्णतत्त्व' आहे.



या त्यांच्या शब्दांतून त्यांच्या जीवनतत्त्वज्ञानाचा आणि समाजाभिमुख दृष्टिकोनाचा प्रत्यय येतो.

राजकारणात यशस्वी वाटचाल करत असतानाही त्यांनी शिक्षण आणि समाजकारण या क्षेत्रांशी असलेले नाते कधीही तुटू दिले नाही. उलट, 'समाजाने दिलेले समाजालाच परत द्यावे' ही भावना त्यांनी आयुष्यभर जपली. त्यांच्या जीवनप्रवासातील सर्वात उल्लेखनीय बाब म्हणजे शिक्षणक्षेत्रासाठी त्यांनी दिलेले भरीव योगदान. रायगड आणि नवी मुंबई परिसरात त्यांनी उभारलेल्या शैक्षणिक संस्था, आधुनिक शाळा आणि महाविद्यालये ही त्यांच्या दूरदृष्टीची साक्ष देतात.

रयत शिक्षण संस्थेचे व्यवस्थापन परिषदेचे जेष्ठ सदस्य म्हणून त्यांनी शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम मानले. संस्थेच्या कोणत्याही शाखेतील समस्या घेऊन त्यांच्याकडे गेल्यास, त्या तात्काळ आणि आत्मीयतेने सोडविल्या जातात असा विश्वास आणि जिव्हाळ्याचे नाते संस्थेशी गेल्या चार दशकांत निर्माण झाले आहे. संस्थेच्या रायगड विभागातील शाखांमध्ये त्यांनी गुणवत्तापूर्ण शिक्षण, आधुनिक सुविधा, स्मार्ट वर्गखोल्या, संगणक प्रयोगशाळा, संशोधनाभिमुख उपक्रम आणि सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी प्रभावी पायाभरणी करत शैक्षणिक विकासाचे समृद्ध नंदनवन उभे केले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही महानगरांप्रमाणे गुणवत्तापूर्ण आणि आधुनिक शिक्षण मिळावे, ही त्यांची व्यापक दृष्टी त्यांच्या कार्यातून स्पष्टपणे

जाणवते.

अनेक शाखांना कोट्यवधी रुपयांची मदत करून त्यांनी शिक्षणप्रसाराच्या कार्याला भक्कम आधार दिला आहे. समाजकारण, शिक्षणसेवा आणि लोकहितासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत मा. श्री. रामशेठ ठाकूर यांना 'आर. के. एक्सलन्स अवॉर्ड', 'समाजभूषण पुरस्कार' यांसारख्या अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. हे सन्मान त्यांच्या समाजाभिमुख कार्याचा, दानशूर वृत्तीचा आणि शिक्षणसेवेप्रती असलेल्या समर्पणाचा गौरव करणारे आहेत. सामजिक बांधीलकी, सकारत्मक विचारसरणी, शिक्षणसेवा आणि रयत शिक्षण संस्थेच्या कार्यासाठी दिलेल्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेऊन दि. १७ डिसेंबर २०१८ रोजी मा. श्री. रामशेठ ठाकूर यांना 'इस्माईलसाहेब मुल्ला जीवन गौरव पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले. त्यांच्या दीर्घकालीन समाजाभिमुख कार्याचा, शिक्षणप्रेमी दृष्टिकोनाचा आणि संस्थेविषयीच्या आत्मीय बांधीलकीचा हा सन्मान म्हणजे कृतज्ञतापूर्वक व्यक्त केलेला गौरव होय.

इस्माईलसाहेब मुल्ला विधी महाविद्यालय, सातारा सन १९६८ मध्ये रयत शिक्षण संस्थेच्या अधिपत्याखाली स्थापन झाल्यापासून गुणवत्तापूर्ण विधी शिक्षणाचे प्रेरणादायी केंद्र म्हणून कार्यरत आहे. न्याय, कर्तव्यभावना, सामाजिक उत्तरदायित्व आणि व्यावसायिक उत्कृष्टता यांची जाणीव विद्यार्थ्यांच्या मनामध्ये रुजविण्याचे कार्य महाविद्यालय सातत्याने करत आहे.

विधी शिक्षणाच्या माध्यमातून समाजात न्याय, सामाजिक जाणीव आणि सांविधानिक मूल्यांची जपणूक करणारे सक्षम विधिज्ञ घडावेत, या कर्मवीर अण्णांच्या दूरदृष्टीपूर्ण स्वप्नाला मूर्त स्वरूप देण्यासाठी ॲड. इस्माईलसाहेब मुल्ला यांनी विशेष परिश्रम घेतले. संस्थेचे मानद सचिव म्हणून कार्यरत असताना त्यांनी विधी महाविद्यालय स्थापनेचा ध्यास घेतला आणि त्यांच्या प्रयत्नांतूनच विधी महाविद्यालयची स्थापना साकार झाली. त्यांच्या दूरदृष्टी, संघटनकौशल्य आणि निःस्वार्थ शिक्षणसेवेबद्दल कृतज्ञतापूर्वक महाविद्यालयाला त्यांचे नाव प्रदान करण्यात आले.

काळाच्या बदलत्या गरजा आणि आधुनिक शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्याची आवश्यकता लक्षात घेऊन महाविद्यालयासाठी नव्या इमारतीची उभारणी २००७ मध्ये करण्यात आली. या नव्या वास्तूमुळे विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण आणि सक्षम शैक्षणिक वातावरण उपलब्ध झाले आहे. महाविद्यालयाने पायाभूत सुविधा विकास आणि शैक्षणिक आधुनिकीकरणाच्या दिशेने प्रभावी वाटचाल सुरू केली व वर्गखोल्या, ग्रंथालय, स्वतंत्र सभागृह, डिजिटल सुविधा आणि तंत्रज्ञानाधारित शैक्षणिक वातावरण यांमुळे महाविद्यालयाने आधुनिकतेकडे प्रभावी वाटचाल सुरू केली. महाविद्यालयाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त २०१८ मध्ये मा. रामशेठ ठाकूर यांनी आपल्या व कुटुंबीयांच्या नावे १२ लाख रुपयांचे उदार आर्थिक सहाय्य प्रदान केले. हे योगदान केवळ आर्थिक देणगीपुरते मर्यादित नव्हते, तर संस्थेविषयी त्यांच्या मनात असलेल्या आत्मीयतेचे, जिव्हाळ्याच्या नात्याचे आणि शिक्षणसेवेप्रती असलेल्या दृढ समर्पणाचे प्रतीक आहे. त्यांच्या या उदात्त सहकार्यामुळे महाविद्यालयाच्या विकासाला नवी दिशा मिळाली असून, शिक्षणाच्या माध्यमातून समाज उन्नतीची कर्मवीर अण्णांची परंपरा अधिक सक्षमपणे पुढे नेण्यास बळ प्राप्त झाले. त्यांनी दिलेल्या या मोलाच्या योगदानाची आणि संस्थेविषयीच्या आत्मीय बांधीलकीची कृतज्ञतापूर्वक नोंद म्हणून महाविद्यालयाच्या सभागृहाचे लोकनेते रामशेट ठाकूर सभागृह असे नामकरण करण्यात आले.

महाविद्यालयाच्या विकासाला नवे परिमाण प्राप्त व्हावे, विद्यार्थ्यांना अधिक सक्षम आणि गुणवत्तापूर्ण शैक्षणिक वातावरण मिळावे, तसेच भावी पिढ्यांसाठी संस्थेची शैक्षणिक परंपरा अधिक भक्कम व्हावी, या व्यापक दृष्टिकोनातून त्यांनी हे योगदान दिले. त्यांच्या सहकार्यामुळे महाविद्यालयाच्या पायाभूत सुविधा विकासाला गती मिळाली आणि संस्थेच्या शैक्षणिक, सांस्कृतिक तसेच बौद्धिक उपक्रमांना अधिक सक्षम व्यासपीठ उपलब्ध झाले. विशेष म्हणजे, त्यांच्या या योगदानामागे प्रसिद्धीची अपेक्षा नव्हती, तर शिक्षणाच्या माध्यमातून समाज उन्नत झाला पाहिजे ही कर्मवीर अण्णांच्या विचारांनी प्रेरित भूमिका होती. त्यामुळेच त्यांचे योगदान हे केवळ दातृत्व न राहता संस्थेच्या प्रगतीशी असलेल्या त्यांच्या भावनिक बांधीलकीचे जिवंत उदाहरण ठरते.

त्यांनी महाविद्यालयाला दिलेल्या उदार आर्थिक योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी सभागृहास लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांचे नाव देऊन त्यांचा यथोचित गौरव करण्यात आला. त्यांच्या सहकार्यामुळे सभागृहाच्या उभारणीला नवे स्वरूप प्राप्त झाले आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सांस्कृतिक तसेच बौद्धिक विकासासाठी एक सक्षम व्यासपीठ निर्माण झाले. याचप्रमाणे, अलीकडील काळातही २०२५ मध्ये महाविद्यालयाच्या पायाभूत सुविधा विकास, आधुनिकीकरण आणि तंत्रज्ञानाधारित शैक्षणिक वातावरण निर्मितीसाठी त्यांनी पुन्हा एकदा उदार हस्ते १० लाख रुपयांचे आर्थिक सहाय्य प्रदान केले. बदलत्या काळानुसार शिक्षणव्यवस्थेत डिजिटल साधनांचे वाढते महत्त्व ओळखून त्यांनी महाविद्यालयाला आधुनिक तंत्रज्ञानाशी सुसंगत बनविण्यासाठी मोलाचे योगदान दिले. आज महाविद्यालय डिजिटलदृष्ट्या सक्षम होण्याच्या दिशेने जे यशस्वी पाऊल टाकत आहे, त्यामागे मा. रामशेठ ठाकूर यांचे दूरदृष्टीपूर्ण सहकार्य, शिक्षणाविषयीची तळमळ आणि संस्थेविषयीची आत्मीय बांधीलकी मोठ्या प्रमाणात अधोरेखित होते.

त्यांच्या उदार आर्थिक सहाय्यामुळे महाविद्यालयासाठी आधुनिक इंटरक्टिव्ह पॅनल्स खरेदी करणे, संगणक प्रयोगशाळेचे नूतनीकरण करणे आणि विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाधारित शिक्षणासाठी सक्षम सुविधा उपलब्ध करून देणे शक्य झाले. बदलत्या शैक्षणिक प्रवाहांशी सुसंगत असे आधुनिक शैक्षणिक वातावरण निर्माण करण्यात त्यांच्या योगदानाचा अत्यंत मोलाचा वाटा आहे.

त्यांच्या वेळोवेळी मिळालेल्या आर्थिक पाठबळामुळे त्यांच्या योगदानामुळे केवळ इमारती उभ्या राहिल्या नाहीत, तर महाविद्यालयात डिजिटल सुविधा, अद्ययावत शैक्षणिक साधने आणि विद्यार्थीकेंद्रित आधुनिक उपक्रम प्रभावीपणे राबविणे शक्य झाले आहे. विद्यार्थ्यांच्या भविष्यास नवे क्षितिजही प्राप्त झाले आहे. त्यांच्या दानशूरतेचा विस्तार केवळ शिक्षणापुरता मर्यादित नाही. गरीब आणि गरजू विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य, मोफत वह्या आणि गणवेश वाटप, ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, सामाजिक विकास उपक्रम, आरोग्य शिबिरे आणि आपत्तीच्या काळात मदतकार्य अशा विविध माध्यमांतून त्यांनी समाजाशी असलेली आपली बांधीलकी सातत्याने जपली आहे.

मा. श्री. रामशेठ ठाकूर यांचे व्यक्तिमत्त्व हे केवळ राजकीय नेतृत्वापुरते मर्यादित नाही; तर शिक्षण, समाजकारण, मानवता, लोकसंग्रह आणि दानशूरता यांचा सुंदर संगम आहे. म्हणूनच त्यांच्या कार्याचा विचार करताना महाभारतातील कर्णाची आठवण अपरिहार्यपणे होते. त्यांनी आयुष्यभर जपलेले 'समाजाने दिलेले समाजालाच परत द्यावे' हे मूल्यच त्यांच्या कार्याचे खरे अधिष्ठान आहे. आपल्या कर्तृत्वाने आदरणीय श्री.

रामशेठ ठाकूर यांनी असामान्य उंची गाठली आहे व अनन्यसाधारण आदर्श आपल्या सर्वांसमोर निर्माण केला आहे. जनसामान्यांच्या सुख-दुःखाशी नाळ जपत समाजहितासाठी सातत्याने कार्य करणारे हे नेतृत्व खऱ्या अर्थाने लोकनेते म्हणूनच ओळखले जाते. लोकसेवेचा त्यांनी प्रज्वलित केलेला दीप अधिक तेजाने समाजाला दिशा देत राहो, त्यांच्या कार्याचा गौरव आणि आदर्श समाजमनात चिरंतन प्रेरणास्रोत म्हणून सदैव जागृत राहो, ही सदिच्छा.





शब्दाला जागणारे नेते : लोकनेते रामशेठ ठाकूर

सौ. सुनिता वाघमारे
मुख्याध्यापिका, जयसिंगराव मल्हारी
करपे हायस्कूल, वर्ये

जयसिंगराव मल्हारी करपे हायस्कूल, वर्ये ही रयत शिक्षण संस्थेची साताऱ्यापासून जवळ असलेली ग्रामीण भागातील एक शाखा. १९७० मध्ये स्थापन झालेल्या या शाखेने ग्रामीण शिक्षणाचा पाया रचला. शेतकरी, कष्टकरी, भटके विमुक्त, विविध प्रकारचे वंचित समूह यांची मुली-मुले या शाखेतून शिक्षण घेत उभी राहिली. मात्र, कालांतराने गावोगावी माध्यमिक विद्यालये झाली. त्यासोबतच इंग्रजी माध्यमांची वाढलेली ओढ आणि पालकांचा शहरी शाळांकडे कल यामुळे पटसंख्या घटत गेली. आजच्या काळात जिथे आर्थिक विषमता प्रचंड आहे आणि बेरोजगार तरुणाईचा प्रश्न उग्र आहे, अशा परिस्थितीत ग्रामीण शाळा चालवणे मोठे आव्हान बनले आहे. त्यातच शासनाने शालेय खर्चाची अनुदाने कमी केल्यामुळे ग्रामीण भागातील दुर्बल शाखांची मोठी परवड होत आहे. आमच्या शाळेत येणारे बहुतांश विद्यार्थी हे आर्थिक दुर्बल आणि वंचित घटकातून येतात. त्यांचे पालक रोजंदारीवर जाणारे मजूर आहेत, त्यामुळे शिक्षणासाठी पुरेसा खर्च करण्याची त्यांची तयारी नसते. अशा बिकट परिस्थितीत शाळेची जुनी इमारत आणि विशेषतः धोकादायक झालेली एक खोली यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा आणि बैठक व्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला होता. तो सोडवणे आवश्यक होते.

या संकटाच्या काळात मी आणि माझ्या सहकाऱ्यांनी अनेक ठिकाणी मदतीसाठी प्रयत्न केले; पण कुठेही यश मिळत नव्हते. कधी कधी असेही वाटून गेले, ''समाजमनातून दातृत्वभावना संपली का?''. पण पुन्हा आशेचा किरण उगवला! २०२२-२३ मध्ये पवारवाडीच्या शाखेला मा. रामशेठ ठाकूर साहेबांनी मोठी देणगी दिल्याचे आम्हाला समजले. त्यातूनच प्रेरणा घेऊन आम्ही ठरवले की साहेबांना भेटून आपल्या शाळेची कैफियत मांडावी. पुढे २०२४-२५ मध्ये साहेब छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये मॅनेजिंग कौन्सिलच्या मीटिंगसाठी येणार असल्याचे समजले. आम्ही प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे यांची परवानगी घेतली आणि मराठी विभाग प्रमुख डॉ. सुभाष वाघमारे यांच्या सहकार्याने कॉलेजमध्येच साहेबांची भेट घेतली. एवढ्या महान व्यक्तीशी बोलताना सुरुवातीला थोडे दडपण होते; पण त्यांच्या बोलण्यातील गोडवा आणि आपुलकीने केलेली शाळेची चौकशी पाहून आदर दुणावला. साहेबांनी शाळेची अडचण समजताच क्षणाचाही विलंब न लावता १५ लाख रुपये देण्याचे मान्य केले. पुढे जेव्हा आम्ही पुन्हा साहेबांना भेटलो, तेव्हा त्यांनी १५ ऐवजी २० लाख रुपये देतो असा शब्द दिला. 'ठाकूर इन्फ्रा प्रायव्हेट लिमिटेड'च्या माध्यमातून मिळणारी ही मदत आमच्या शाळेसाठी जणू संजीवनीच ठरली असून, त्यातून वर्गखोल्यांसह मुलींच्या शौचालयाचे नूतनीकरण करण्यात येणार आहे. या सर्व प्रवासात संस्थेचे संघटक डॉ. अनिल पाटील साहेब, सचिव विकास देशमुख साहेब, सहसचिव बी.एन. पवार साहेब यांनी समर्थ साथ दिली.

आजच्या राजकीय वातावरणाशी तुलना केली तर साहेबांचे वेगळेपण प्रकर्षाने जाणवते. सध्याचे राजकारण अनेकदा सत्ता, अधिकार आणि स्वार्थाभोवती केंद्रित झालेले दिसते. बहुतांश नेते केवळ निवडणुकीचे गणित

डोळ्यांसमोर ठेवून किंवा वैयक्तिक लाभासाठी निधी देतात. मात्र, रामशेठ ठाकूर साहेब हे 'राजकारणापेक्षा समाजकारण श्रेष्ठ' मानणारे व्यक्तिमत्त्व आहेत. जिथे इतर नेते मदत करताना अनेक अटी घालतात, तिथे साहेबांनी केवळ शिक्षणाप्रती असलेल्या तळमळीतून ही मोठी मदत जाहीर केली. राजकारण्यांमध्ये वैभव प्रदर्शनाची प्रवृत्ती असते, पण साहेबांचे राहणीमान आजही कर्मवीर अण्णांसारखे साधे आहे. ज्या काळात राजकारणी केवळ स्वतःच्या परिवाराचा विचार करतात, त्या काळात साहेबांनी रयत शिक्षण संस्थेला कोट्यवधी रुपयांचे दान देऊन कित्येक पिढ्यांचे भवितव्य सुरक्षित केले आहे. त्यांचे समाजकारण हे स्वतःच्या कष्टार्जित कमाईतून समाजाकडे जाणारे निःस्वार्थी कार्य आहे.

रामशेठ ठाकूर साहेबांचा हा दानशूरपणा त्यांच्या संस्कारांची शिदोरी आहे. साहेब स्वतः रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील शाखेचे तसेच कर्मवीर अण्णांनी स्थापन केलेल्या छत्रपती शिवाजी कॉलेज या संस्थेच्या पहिल्या महाविद्यालयाचेही विद्यार्थी आहेत. वडील कै. चांगू काना ठाकूर यांचा करुणाशील वारसा आणि सासरे जनार्दन भगत साहेब यांची सेवाभावी वृत्ती त्यांनी सक्षमपणे जपली आहे. परिस्थिती कितीही वैभवशाली असली, तरी साहेबांचा स्वभाव अत्यंत मृदू, प्रेमळ आणि समजूतदार आहे. कोणत्याही भ्रष्ट व्यवहाराला थारा न देता पारदर्शकपणे समाजहित जपणारे त्यांचे सद्गुण आजच्या पिढीसाठी आदर्श आहेत. साहेबांना आज ७५ वर्षे पूर्ण होत आहेत, या निमित्ताने त्यांच्या कार्याला उजाळा देणे आवश्यक ठरते. आमच्या शाखेच्या वतीने मी साहेबांच्या उदंड आयुष्यासाठी प्रार्थना करते. साहेब आणि त्यांचा परिवार नेहमी आनंदी, आरोग्यदायी राहो आणि या परिवाराकडून समाजसेवेचे कार्य घडत राहो हीच मनापासून सदिच्छा!





मा.रामशेठ ठाकूर : परोपकार, कृतज्ञता आणि समाजसेवेचा आधुनिक कर्ण

प्रो. (डॉ.) भगवान लोकडे
इंग्रजी विभाग प्रमुख
सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा

आपल्या अवतीभोवती काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की, त्यांचे कार्य केवळ त्यांच्या काळापुरते मर्यादित न राहता ते पुढील अनेक पिढ्यांसाठी प्रेरणेचे दीपस्तंभ बनते. समाजकारण, शिक्षण, उद्योग आणि परोपकार या सर्व क्षेत्रांत आपल्या कार्याचा अमिट ठसा उमटवणारे मा. रामशेठ ठाकूर हे असेच एक विलक्षण व्यक्तिमत्त्व आहे. त्यांच्या जीवनप्रवासाकडे पाहताना एका सामान्य ग्रामीण विद्यार्थ्यापासून ते यशस्वी उद्योगपती, शिक्षणप्रेमी, लोकप्रतिनिधी आणि समाजहितासाठी सर्वस्व अर्पण करणाऱ्या दानशूर व्यक्तीपर्यंतचा प्रेरणादायी प्रवास उलगडत जातो. रामशेठ ठाकूर यांचे व्यक्तिमत्त्व म्हणजे कर्तृत्व, कृतज्ञता आणि करुणा यांचा अद्वितीय संगम होय. त्यांच्या आयुष्याची सुरुवात अत्यंत साध्या परिस्थितीत झाली. ग्रामीण भागातील पडवीत भरलेल्या शाळेत शिक्षण घेताना त्यांनी गरिबीचे चटके अनुभवले; पण ज्ञानाची भूक मात्र कधी कमी झाली नाही. 'कमवा आणि शिका' या कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या उदात्त योजनेचा लाभ घेत शिक्षण पूर्ण केले. हीच योजना त्यांच्या जीवनपरिवर्तनाचा पाया ठरली.

रामशेठ ठाकूर यांच्यातील सर्वात मोठा गुण म्हणजे त्यांचा परोपकारी स्वभाव. त्यांच्या घराच्या पडवीत दररोज मदतीसाठी येणाऱ्या गरजूंना ते कोणताही गाजावाजा न करता मदतीचा हात देतात. रुग्णांचे नातेवाईक, अनाथाश्रमांचे प्रतिनिधी, वृद्धाश्रमांचे कार्यकर्ते, लोककलावंत, स्वयंसेवी संस्था अशा असंख्य लोकांसाठी त्यांचे घर आशेचे केंद्र बनले आहे. त्यांच्याकडे मदतीसाठी आलेला कोणीही व्यक्ती रिकाम्या हाताने परत जात नाही. या कृतींमधून त्यांच्यातील माणुसकीचे विशाल रूप दिसून येते. त्यांच्या परोपकाराचे वैशिष्ट्य म्हणजे त्यामागे प्रसिद्धीची अपेक्षा नाही. त्यांनी कधीही आपल्या देणग्यांचा हिशोब ठेवला नाही. आपल्या उद्योगातील नफ्याचा मोठा हिस्सा समाजासाठी खर्च करण्याची त्यांची भूमिका ही भारतीय परंपरेतील 'दान' या संकल्पनेची आधुनिक अभिव्यक्ती आहे. 'नफा हा माझा नसून समाजाचा आहे' ही त्यांची विचारधारा त्यांच्या प्रत्येक कृतीतून प्रतिबिंबित होते.

आपल्या समकालीनांप्रमाणेच रामशेठ ठाकूर हे पहिल्या पिढीतील शिक्षण घेणारे विद्यार्थी होते. त्यांच्या पालकांना कोणतेही औपचारिक शिक्षण नव्हते. त्यांच्या वडिलांना केवळ सही करण्यापुरते नाव लिहिता येत होते. तत्कालीन जिल्हा परिषद अध्यक्ष जनार्दन आत्माराम भगत, तसेच दि. बा. पाटील यांनी डॉ. एन. डी. पाटील यांच्या मदतीने साहेबांच्या गावात रयत शिक्षण संस्थेची शाळा सुरू केली. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी जसे मंदिरात व घरांच्या पडवीत शाळा सुरू केल्या, त्याचप्रमाणे गव्हाण येथे धर्मा ठाकूर यांच्या घराच्या माडीवर साहेबांची शाळा सुरू झाली. त्यांनी तेथे प्राथमिक शिक्षण घेतले.



कौटुंबिक आर्थिक परिस्थिती प्रतिकूल असतानाही त्यांना शिक्षणाची प्रचंड आवड होती. त्यांनी ७ वी ते ९वी पर्यंत शिक्षण याच शाळेत घेतले. पुढे सदाभाऊ देशमुख यांनी जमीन दान केली आणि गावकऱ्यांच्या देणगीतून नवीन शाळा उभारण्यात आली. साहेबांचे १० वीचे शिक्षण त्या नवीन इमारतीतील शाळेत पूर्ण झाले. पडवीतील शाळेतील हा अनुभव त्यांच्या पुढील आयुष्यात त्यांना मोठा देणगीदार बनविण्यास कारणीभूत ठरला असावा. आजपर्यंत त्यांनी रयत शिक्षण संस्थेला १०० कोटी रुपयांपेक्षा अधिक देणगी दिली आहे. ते नम्रपणे म्हणतात, ''ही देणगी नसून माझी कृतज्ञता आहे...त्या आईसमान रयत शिक्षण संस्थेबद्दल... जिने मला 'कमवा आणि शिका' योजनेतून घडवले.''

अलीबाग, महाड, मुंबई किंवा पुणे येथे उच्च शिक्षण घेण्याइतकी त्यांची आर्थिक परिस्थिती सक्षम नव्हती. तथापि, हायस्कूलच्या काळातच ते कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्याने अत्यंत प्रभावित झाले होते. कर्मवीर जयंती आणि शाळांमधील इतर कार्यक्रमांच्या प्रसंगी त्यांनी डॉ. एन. डी. पाटील यांसारख्या मान्यवरांचे विचार ऐकले होते आणि त्यातून त्यांना समजले की कर्मवीर भाऊराव पाटील यांनी 'कमवा आणि शिका' योजना सुरू केली होती, ज्यामुळे अनेक विद्यार्थ्यांनी आपले शिक्षण पूर्ण करून संस्थेची सेवा केली. उदाहरणार्थ, बॅरिस्टर पी. जी. पाटील हे शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू झाले, इस्माईलसाहेब मुल्ला बॅरिस्टर झाले, तर अस्पृश्य समाजातील ज्ञानदेव घोलप मुंबई विधानसभेचे सदस्य बनले आणि त्यांनी रयत शिक्षण संस्थेच्या विकासात योगदान दिले.

ठाकूर साहेब उच्च शिक्षणासाठी साताऱ्याला आले आणि छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा येथे प्रवेश घेतला. या महाविद्यालयात त्यांना चांगले शिक्षण मिळाले. या महाविद्यालयात 'कमवा आणि शिका' योजनेअंतर्गत त्यांना दरमहा किमान दहा ते कमाल चाळीस रुपये मिळत असत, ज्यातून ते आपला खर्च भागवत असत. कोणाला ठाऊक होते की, महिन्याला चाळीस रुपयांपेक्षा कमी मानधन मिळवणारा हा विद्यार्थी पुढे या महाविद्यालयाच्या विकासासाठी २० कोटींहून अधिक देणगी देईल?

असे म्हटले जाते की अमेरिकेत सर्व माजी विद्यार्थी एकत्र येऊन आपल्या महाविद्यालयाचा खर्च

भागवतात; परंतु छत्रपती शिवाजी कॉलेजचा एकमेव माजी विद्यार्थी म्हणून रामशेठ ठाकूर यांनी एकट्यानेच आपल्या महाविद्यालयाला भक्कम पाठिंबा दिला. साताऱ्यातील उच्च शिक्षणादरम्यान त्यांच्या काकांनी दिलेल्या आर्थिक मदतीबद्दल ते मनापासून कृतज्ञता व्यक्त करतात. त्यांनी रयत शिक्षण संस्थेच्या अनेक शाळा व महाविद्यालयांना देखील मदत केली आहे. ते आपल्या शिक्षकांचे खासकरून इतिहास शिकवणारे श्री. आर. डी. गायकवाड, मराठी संतांचे तत्त्वज्ञान शिकवणारे प्रा. बापूसाहेब उनउने, तसेच अर्धमागधी शिकवणारे श्री. बाळासाहेब भगरे यांचे आयुष्यातील प्रेरणादायी योगदान मान्य करतात. या शिक्षकांनी त्यांच्या मनात उच्च शिक्षणाबद्दलची आवड निर्माण केली. त्यांच्या प्रभावामुळेच पुढे त्यांनी शिक्षक होण्याची इच्छा व्यक्त केली. त्यांनी बी.एड. पूर्ण करून तीन वर्षे शिक्षक म्हणून सेवा केली. याबरोबरच त्यांनी आपले शिक्षक व प्राचार्य बापूसाहेब उनउने यांच्या परोपकारी स्वभावाचा जवळून अनुभव घेतला. ते आपल्या गरीब विद्यार्थ्यांना साबण, तेल, कपडे, गणवेश यांसारख्या दैनंदिन गरजांसाठीही मदत करत असत. विद्यार्थी अशा मागण्यांसह त्यांच्या जवळ आले की ते सहजपणे मदत देत असत. त्यांच्या या विचारांनी आणि पदवी शिक्षणादरम्यान मिळालेल्या मराठी संतांच्या शिकवणीने ठाकूर साहेबांवर खोल प्रभाव पडला.

पुढे ठाकूर साहेबांचे शिक्षक श्री. आर. डी. गायकवाड यांना समजले की छत्रपती शिवाजी कॉलेजचा एक विद्यार्थी यशस्वी उद्योगपती झाला आहे आणि आता गरजूंना दोन हजार, पाच हजार किंवा त्याहून अधिक मदत करतो. त्यांनी पनवेल येथे, प्रीतम हॉस्पिटलजवळील आपल्या मित्राच्या कार्यालयात ठाकूर साहेबांची भेट घेतली आणि महात्मा फुले कला व वाणिज्य महाविद्यालय, पनवेल येथे सभागृह उभारण्यासाठी देणगीची अपेक्षा व्यक्त केली. सहसा विद्यार्थी शिक्षकांच्या शोधात जातात; परंतु येथे शिक्षकच विद्यार्थ्याच्या शोधात आले...ही अत्यंत दुर्मीळ भेट ठरली. ठाकूर साहेबांनी क्षणाचाही विलंब न करता ५०,००० रुपयांची देणगी दिली. ही त्यांची रयत शिक्षण संस्थेला दिलेली पहिली देणगी होती. नव्याने बांधलेल्या सभागृहाला मा. जनार्दन भगत पंत यांचे नाव देण्यात आले आणि १९८९ साली मा. शरदचंद्र पवार साहेबांच्या हस्ते या सभागृहाचे उद्घाटन झाले. आतापर्यंत ठाकूर साहेबांनी अनेक शाळा व महाविद्यालयांच्या इमारती व सभागृहांसाठी दिलेल्या देणग्यांमुळे आणि त्यांच्या परोपकारी स्वभावामुळे प्रभावित होऊन मा. पवार साहेबांनी आपल्या उद्घाटनपर भाषणात त्यांचे कौतुक करताना म्हटले, ''मी अनेक जावई सासऱ्यांना लुटताना पाहिले आहेत; परंतु श्री. रामशेठ ठाकूर यांच्या रूपाने मी प्रथमच असा जावई पाहिला आहे, ज्याने आपल्या सासऱ्यांच्या नावाने सभागृह बांधले आहे.''

ठाकूर साहेब पुढे सांगतात की सहा वर्षांनंतर, सुमारे १९९५ साली, त्याच महाविद्यालयात एक कार्यक्रम झाला होता. त्या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. अंतुले साहेब, मा. दि. बा. पाटील आणि महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री मनोहर जोशी होते. सर्व वक्त्यांनी आपल्या भाषणात ठाकूर साहेबांचा उल्लेख एक परोपकारी व्यक्तिमत्त्व म्हणून केला. शेवटी आपल्या भाषणात मुख्यमंत्री मनोहर जोशी म्हणाले, प्रत्येकाने आपल्या भाषणात श्री. रामशेठ ठाकूर यांचा उल्लेख त्यांच्या शाळा-महाविद्यालयांबरोबरच गरजू व्यक्ती आणि स्वयंसेवी संस्थांना दिलेल्या देणग्यांसाठी केला आहे; आता मला त्यांना मुंबईला घेऊन जावेसे वाटते.

शिक्षण क्षेत्रातील त्यांचे योगदान विशेष उल्लेखनीय आहे. जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या स्थापनेद्वारे त्यांनी हजारो विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची दारे खुली केली. त्यांच्या दृष्टीने शिक्षण हे केवळ पदवी



मिळविण्याचे साधन नसून सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे. त्यांनी उभारलेल्या शैक्षणिक संस्था आज गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे आदर्श केंद्र म्हणून ओळखल्या जातात. रयत शिक्षण संस्थेच्या व्यवस्थापन मंडळाचे सदस्य म्हणूनही त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. गरीब, वंचित आणि ग्रामीण विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोहोचावे, हा कर्मवीर भाऊराव पाटील यांचा विचार त्यांनी नेहमीच जपला. संस्थेच्या बैठकीतही ते शिक्षणातील सामाजिक बांधीलकीला सर्वोच्च प्राधान्य देण्याचा आग्रह धरतात. त्यांच्या जीवनातील आणखी एक प्रेरणादायी पैलू म्हणजे शिक्षक ते उद्योगपती हा प्रवास. शिक्षक म्हणून अल्प वेतनावर काम करणाऱ्या ठाकूर साहेबांनी एका छोट्या संधीचे रूपांतर उद्योगविश्वातील यशात केले. मात्र यशाच्या शिखरावर पोहोचल्यानंतरही त्यांनी आपल्या सामाजिक जबाबदाऱ्यांचा विसर पडू दिला नाही. उलट आर्थिक यशाचा उपयोग समाजकल्याणासाठी कसा करता येईल, याचे ते आदर्श उदाहरण ठरले.

रामशेठ ठाकूर यांच्या विचारसरणीचा गाभा त्यांच्या जीवनाविषयीच्या एका सुंदर तत्त्वज्ञानात दिसून येतो. ते म्हणतात की, मानवी जीवनाची मांडणी तीन पानांत करता येते– 'पहिले पान जन्माचे, शेवटचे पान मृत्यूचे आणि मधले एकमेव पान आपल्या कर्माचे. जन्म आणि मृत्यू आपल्या हातात नसतात; पण मधल्या पानावर आपण काय लिहितो, हे पूर्णपणे आपल्या कृतींवर अवलंबून असते.' हे तत्त्वज्ञान केवळ प्रेरणादायी नाही, तर प्रत्येकाला आत्मपरीक्षण करण्यास भाग पाडणारे आहे.

आजच्या भौतिकवादी युगात संपत्तीचा उपयोग केवळ वैयक्तिक सुखासाठी न करता समाजहितासाठी करणारे लोक फारच कमी आढळतात. रामशेठ ठाकूर हे त्यापैकीच एक तेजस्वी नाव आहे. त्यांच्या जीवनाकडे पाहताना संत तुकारामांच्या 'जे का रंजले गांजले त्यासी म्हणे जो आपुले' या वचनाची आठवण येते. त्यांनी संपत्तीला समाजसेवेचे साधन बनवले, शिक्षणाला परिवर्तनाचे माध्यम बनवले आणि परोपकाराला जीवनमूल्य बनवले.

खऱ्या अर्थाने रामशेठ ठाकूर हे आधुनिक काळातील कर्ण आहेत. त्यांचे जीवन हे केवळ यशोगाथा नसून मानवतेचा उत्सव आहे. त्यांच्या कार्याचा सुवास समाजात दीर्घकाळ दरवळत राहील आणि असंख्य तरुणांना समाजासाठी जगण्याची प्रेरणा देत राहील. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वर्णन करताना एकच वाक्य मनात उमटते. दान, कर्तृत्व आणि कृतज्ञता यांचा मूर्तीमंत आविष्कार म्हणजे मा. रामशेठ ठाकूर.



समाजरत्न : रामशेठ ठाकूर

श्री. रघुराज मेटकरी
माजी विद्यार्थी, बळवंत कॉलेज, विटा

आपला भारत देश सुजलाम सुफलाम बनावा. या देशाची चौफेर प्रगती व्हावी. जगातील तो सर्वोत्तम देश असावा म्हणून झगडणारी भारत देशातील अनेक अशी माणसं आहेत. समाजरत्न, माजी खासदार, रामशेठ ठाकुरजी यापैकी एक आहेत. उपेक्षित समाजाला आपले मानणारे, समतेचे युग इथे नांदावे म्हणून झटणारे, माझा प्रत्येक माणूस अभिमानाने जगावा. इथला प्रत्येक विद्यार्थी शाळा शिकून ज्ञानवंत व्हावा म्हणून अहोरात्र झगडणारे आमचे नेते आहेत सन्माननीय रामशेठ ठाकूर.

रयत शिक्षण संस्था, कर्मवीर भाऊराव पाटील यांचे विचार आणि १९६८ ते १९७२ या चार वर्षात वडिलांसारखे प्रेम करणारे पुण्य पुरुष शंकरराव उनउने बापू यांना सन्माननीय रामशेठ ठाकूर कधीच विसरले नाहीत.

२ जून १९५१ रोजी नाव्हा खाडी या समुद्राच्या काठावरच्या खेडेगावात चांगू ठाकूर आणि भागुबाई या दोन दैववान जोडप्याच्या पोटी हे रत्न जन्मले. संत तुकाराम महाराज म्हणतात जन्मोजन्मी आम्ही बहु पुण्य केले ! तेव्हा या विठ्ठले कृपा केली. चांगू ठाकूर आणि भागुबाई यांची अनेक जन्मांची पुण्याई कामी आली आणि रामशेठ ठाकूर यांचा जन्म झाला. घरात भावंडांचे गोकुळ होते. चांगू ठाकूर आणि भागुबाई यांची परिस्थिती बेताची होती. फक्त आपली मुले चांगली संभाळून त्यांना ज्ञानवंत, बुद्धिवंत करून या समाजात त्यांना सन्मानाने जगता आले पाहिजे एवढी माफक इच्छा या मातापित्यांची होती. सर्वच मुले शिकत होती. पण रामशेठ सर्वात हुशार आणि बुद्धिमान होते. आपल्या घरच्या परिस्थितीची जाणीव त्यांना होती. वेळ मिळेल तेव्हा ते आईची परवानगी काढून मिळेल त्या रोजगारावर जायचे. जवळ रेल्वे स्टेशन होते. तेथे जाऊन छोटी-मोठी हमाली करायचे. एक रुपया जमला, तर मोठा आनंद व्हायचा ते धावत आपल्या घरी यायचे आणि आपल्या आईला मिठी मारून सांगायचे, आई, मी रुपया मिळवला. हा तुला देण्यासाठी आलोय. आईला फार आनंद व्हायचा. माझा राम खरोखर अयोध्येचा राम आहे असे आईला वाटायचे. ती रामशेठना म्हणायची, ''राम, तू खूप मोठा पैसेवाला होशील, असा मला विश्वास आहे.'' आईच्या चेहऱ्यावरील आनंद बघून रामशेठना मोठे समाधान वाटायचे. कारण त्यांच्याबरोबरचे मित्र कामाचे पैसे हातात मिळाले, की कुठे दुकानात गोळ्या बिस्कीट खायला जायची. पण राम रुपया आईकडे द्यायचा. आईच्या चेहऱ्यावरचा आनंद बघून त्यांचे पोट भरायचे.

राम शाळेत हुशार होते. चांगू ठाकूर आणि त्यांची पत्नी भागुबाई हे दाम्पत्य नाव्हा खाडी गाव आणि त्याच्या परिसरात एक आदर्श कुटुंब म्हणून प्रसिद्ध होते. त्यांचा मचवा होता. त्यात बसून चांगु ठाकूर समुद्रात

जायचे. समुद्रात बुडून रेती काढून विकायचे. रामशेठ वडिलांना या कामी नेहमी सुट्टीदिवशी मदत करायचे. इतर वेळीसुद्धा शाळेच्या अगोदर किंवा शाळा सुटल्यावर ते वडिलांच्या मदतीसाठी सर्वात पुढे असायचे. पहिली आणि दुसरीचे वर्ग रामशेठने आपल्या गावात उत्तम गुणांनी पास केले. गुरुजींनी भागुबाईंना आणि चांगु ठाकूर यांना ''हा तुमचा मुलगा भारी गोड आहे हो, तो बोलतो छान आणि शाळेचा अभ्यासही चांगला करतो. त्याला शिकवा, मोठा करा, तो मोठा माणूस होईल,'' असे सांगितले होते. रामशेठच्या आई-वडिलांना त्यांचे मोठे कौतुक वाटत होते.

नाव्हा खाडीवर निसर्गाचा मोठा प्रकोप झाला. अरबी समुद्राने अनेक गावे आपल्या रौद्ररूपाने भिजवून टाकली. परिसरातील सर्व घरे, दारे, शेती, विहिरी समुद्राच्या पाण्याखाली आल्या. सारा गाव उठला. विहिरीचे पाणी खारट झाले. शेकडो एकर शेतजमीन समुद्रानी गिळंकृत केली. प्यायला पाणीसुद्धा मिळेना अशी अवस्था झाली. सर्व रहिवासी गाव सोडून गव्हाणच्या परिसरात पुनर्वसित झाले. शिवाजीनगर या नव्या वसाहतीत आले. चांगू ठाकूर भागुबाई आपल्या सर्व गोतावळा घेऊन नवीन वसाहतीत राहू लागले. रामशेठ इथे शाळेत जाऊ लागले. लवकरच ते रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण हायस्कूलमध्ये शिकू लागले. ते गव्हाणचे हायस्कूल अत्यंत प्राथमिक अवस्थेत होते. रामशेठ यांना शिक्षण संस्था, कर्मवीर भाऊराव पाटील यांचेबद्दल आदर वाटू लागला. शिक्षणाचे महत्त्व त्यांना पटू लागले. वेळप्रसंगी उपाशी राहीन; पण शिक्षण पूर्ण करेन. ही त्यांची जिद्द होती. गव्हाण हायस्कूलमध्ये फार चांगले शिक्षक रामशेठ यांना भेटले. या मुलाची हुशारी व प्रामाणिकपणा त्यांच्या ध्यानात आला. त्यांनी अत्यंत जीव लावून रामशेठना शिकवले. सर्वच शिक्षक जीव तोडून शिकवत होते. रामशेठ आणि वर्गातील इतर मुलेही खूप अभ्यास करत होती. त्यांचा योग्य तो परिणाम झाला. रामशेठ ठाकूर चांगले मार्क्स मिळवून अकरावी म्हणजेच मॅट्रिकची परीक्षा पास झाले.

चांगले गुण मिळवणारा विद्यार्थी म्हणून रामशेठचे फार कौतुक झाले. मॅट्रिकनंतर त्या काळात नोकऱ्या सहज मिळत होत्या. पण आपण शिक्षण घ्यायचे आणि इतरांना शिक्षण प्रवाहात आणायचे. या उदात्त हेतूने



'कमवा व शिका' या योजनेत सहभागी होऊन, सातारला राहून शिक्षण पूर्ण करायचे हे ध्येय ठरविले. त्यांचे मुख्याध्यापक एस. बी. पाटील यांच्या समवेत ते उच्च शिक्षणासाठी सातारला आले. सातारला येताना रायगड, प्रतापगड, आंबेडकरांनी गोड पाण्यासाठी सत्याग्रह केलेले महाडचे तळे. याचे गाडीतून दर्शन घेऊन रामशेठ धन्य झाले.

सातारला छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये ते दाखल झाले. प्राचार्य शंकरराव उनउने बापू यांनी सर्व मुलांना आनंदाने प्रवेश दिला. प्राचार्य उनउने बापूंना भेटून रामशेठ ना फार आनंद झाला. उनउने बापूंचा जिव्हाळा पाहून ते भारावून गेले. सातारा इथे प्राध्यापक मा. के यादव, प्रा आर. डी. गायकवाड, प्रा. सुनंदा चव्हाण, प्रा. नारायणराव भगरे, प्रा द. ता. भोसले, प्रा. श्रीधर हेरवाडे ही प्राध्यापक मंडळी भेटली. वरील मान्यवर मंडळींकडून अण्णांचे विचार ऐकायला मिळाले. अण्णा किती महान होते याची जाणीव रामशेठना झाली. प्राचार्य उनउने बापू ही साने गुरुजीसारखे श्रेष्ठ आहेत हे रामशेठना समजले. इथे ते पदवीधर झाले. शिवाजी विद्यापीठात त्यांना पदवी मिळाली. त्यांचा सत्कार केला. मराठी हा त्यांचा आवडता विषय होता. या विषयात ते पदवीधर झाले होते. नाव्हाखाडी या भागात ते पहिले पदवीधर झाले. याचवेळी जनार्दन भगत साहेब यांनी आपली सुकन्या शकुंतला या सुशील, मायाळू आणि अत्यंत सुस्वभावी असणाऱ्या कन्येचा विवाह रामशेठ ठाकूर यांच्याशी करून दिला. रामशेठना एक आदर्श शिक्षक व्हायचे होते. मुलांना शिक्षण देऊन शहाणी करायचे हे ध्येय ठरवून रामशेठ पनवेलमधून बी.एड. पूर्ण करून बीए .बी.एड, झाले. कोकण एज्युकेशन सोसायटी विठोबा खंडाप्पा हायस्कूल येथे त्यांना नोकरी मिळाली. त्यांना त्यावेळी ३४२ रुपये एवढा पहिला पगार मिळाला. तो पगार पाहून त्यांना व त्यांच्या आई-वडिलांना अतिशय आनंद झाला.

त्यानंतर ते सिडकोच्या नवीन हायस्कूलमध्ये शिक्षक म्हणून रुजू झाले. नोकरी करता करता ते कॉन्ट्रॅक्टर झाले. नवीन मुंबईसाठी सिडको शेतकऱ्यांच्या जमिनी ताब्यात घेत होती. त्यावेळी सिडको जर गरीब शेतकऱ्यांच्या जमिनी घेत असेल, तर त्याचा योग्य मोबदला मिळाला पाहिजे. शेतकऱ्यांच्या मुलांना नोकऱ्या दिल्या पाहिजेत. यासाठी रामशेठ, दी. बा पाटील आणि जनार्दन भगत या शेका पक्षाच्या मंडळींनी अनेक मोर्चे काढले होते. त्यांनी नवीन उद्योजक कॉन्ट्रॅक्टर म्हणून काम सुरू केले. कामातून पैसा मिळू लागला. रामशेठ ठाकूर श्रीमंत बनत चालले आणि त्यांच्यामधील दानशूरपणास चालना मिळाली. मिळालेल्या पैशातून गोरगरिबांच्या मुलांच्या शिक्षणासाठी ते अनेकांना मदत करू लागले. योग्य मार्गाने मिळालेला पैसा गोरगरिबांना वाटू लागले. रयत शिक्षण संस्था आणि इतर संस्था यांना शैक्षणिक कामासाठी देणग्या देऊ लागले. दानशूर कर्ण म्हणून रामशेठ ठाकूर यांची सर्वत्र ख्याती झाली आहे.

मुलांना नोकऱ्या द्या, शेतकऱ्यांना जमिनीचा योग्य भाव द्या म्हणून ते मोर्चे काढू लागले महात्मा फुले यांचा आदर्श डोळ्यांपुढे ठेवून ते उद्योगही करू लागले उद्योगात पैसा मिळू लागला, तो ते गोरगरीब मुलांच्या शिक्षणासाठी कल्याणासाठी वापरू लागले.

१९९८ ला लोकसभा निवडणुका लागल्या. शेतकरी कामगार पक्षाने रामशेठ ठाकूर यांना खासदारकीचे तिकीट दिले. विरोधात होते बॅरिस्टर ए. आर. अंतुले आणि शिवसेनेचे अनंत तरे सर्व उमेदवार तुल्यबळ होते. कोकणात अंतुले आणि अनंत तरे फारच लोकप्रिय होते; पण रामशेठ ठाकूर हे सर्वसामान्य जनतेत लोकप्रिय होते. ३ मार्च १९९८ रोजी निकाल जाहीर झाला आणि बॅरिस्टर अंतुले यांच्यापेक्षा १८००० अधिकची मते

मिळवून रामशेठ खासदार झाले. वडील चांगू ठाकूर आणि आई भागुबाई यांचा आशीर्वाद उपयोगी पडला. उदंड यश मिळाले. खासदार झाल्यावर रामशेठनी सामान्य जनतेसाठी फार कामे केली. आपल्या मतदारसंघासाठी दिल्लीचा मोठा निधी आणला. रस्ते बांधले, पूल उभारले, नव्या इंडस्ट्रीज आणल्या, गोरगरिबांच्या हजारो मुलांना नोकऱ्या मिळवून दिल्या. समुद्रात बंधारे बांधून सागरी पाण्यामुळे नापीक झालेल्या जमिनी सुपीक करण्यासाठी खूप प्रयत्न केले. १९९९ साली लोकसभेची निवडणूक पुन्हा लागली यावेळी सुद्धा रामशेठ पुन्हा ७५ हजार मतांनी निवडून आले. कर्मवीर भाऊराव पाटील यांचे स्वप्न होते. त्यांच्या कमवा व शिका योजनेतून शिकणारे विद्यार्थी आमदार व्हावेत, खासदार व्हावेत. रामशेठ ठाकूर तर दोन वेळा खासदार झाले आणि त्यांनी कर्मवीर भाऊराव यांचे स्वप्न साकार केले. राजकारण, त्यातील चांगुलपणा तेवढाच रामशेठनी घेतला. पुढे मात्र २००४ साली त्यांनी राजकारणातून निवृत्ती घेतली आणि पुढे किंग मेकरच्या भूमिकेत ते वावरू लागले. मी माझा उद्योग, सर्वसामान्यांची सेवा, जनार्दन भगत शिक्षण संस्थेचा कारभार आणि रयत शिक्षण संस्थेचा कारभार यामध्येच ते कार्यमग्न झाले. हे कार्य त्यांना ईश्वराची सेवा वाटते

रामशेठ ठाकूर यांची स्वतःची शिक्षण संस्था आहे. त्यात हजारो मुले शिकत आहेत. कर्मवीर अण्णांची रयत शिक्षण संस्था आहे. ही त्यांची मातृसंस्था आहे. या संस्थेमध्ये लाखो मुले शिकत आहेत. त्या मुलांच्या चेहऱ्यावर उमटलेले हसू रामशेठ यांना फार आनंद देते. आनंदी विद्यार्थी बघून त्यांना स्वर्गीय आनंद होतो.

रामशेठ ठाकूर गोरगरीब जनतेच्या सुखात आपले सुख मानतात. सर्वांसाठी आधारवड आहेत. ते समाजरत्न आहेत. अशा रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा.....





सर्वसामान्यांचा आधारवड : लोकनेते, दानशूर रामशेठ ठाकूर

डॉ. अरुणकुमार सकटे
प्रबंधक, सद्गुरु गाडगे महाराज
महाविद्यालय, कराड

आपल्या स्वकर्तृत्वाने महाराष्ट्रात शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, व्यावसायिक अशा विविध क्षेत्रात शून्यातून विश्व निर्माण करणारे लोकनेते रामशेठ ठाकूर हे कर्मवीर अण्णांच्या संस्काराने व विचाराने भारावलेले व्यक्तिमत्त्व आहे. महाराष्ट्रातील एक आगळेवेगळे आणि दानशूर व्यक्तिमत्त्व २ जून १९५१ रोजी एका सर्वसामान्य कुटुंबात जन्म झालेले राम चांगू ठाकूर हे केवळ कुटुंबाचे राम न राहता आपल्या एकूणच कार्यामुळे ते संपूर्ण महाराष्ट्राचे रामशेठ झाले. रायगड भूमीतून उदयास आलेले लोकनेते रामशेठ ठाकूर हे नाव म्हणजे तळागाळातील जनतेच्या विकासाचे आणि सामाजिक बांधीलकीचे आणि विश्वासाचे सर्वमान्य प्रतीक आहे.

२ जून हा दिवस म्हणजे लोकनेते रामशेठ ठाकूर साहेब यांचा जन्मदिन. या जन्मदिनाचे औचित्य साधून ठाकूर साहेबांविषयी अंतःकरणातील भावना व्यक्त होत असताना प्रचंड आदर आणि सन्मान माझ्या मनात त्यांच्याबद्दल कायम आहे आणि कायम राहणार आहे. रयत शिक्षण संस्थेच्या सद्गुरु गाडगे महाराज महाविद्यालय कराड व छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा येथे प्रबंधक म्हणून काम करीत असताना एवढ्या मोठ्या माणसाशी प्रशासकीय काम करताना जवळून माझा संबंध आला आणि त्यातूनच साहेबांशी भावनिक नाते तयार झाले. एवढा मोठा माणूस मला माझ्या नावाने ओळखतो हेच माझं परमभाग्य आहे, असे मी समजतो. माझ्या बाबतीतील हा अनुभव सर्वसामान्य लोकांच्या बाबतीतही असावा असे त्यांच्या नि:स्वार्थी व्यक्तिमत्त्वातून दिसून येते.

शैक्षणिक क्षेत्रात आशिया खंडात अग्रेसर आणि तळागाळातील वाडीवस्तीपर्यंत पोहोचलेल्या रयत शिक्षण संस्थेच्या, छत्रपती शिवाजी कॉलेजमधून रामशेठ ठाकूर यांनी १९६८ ते १९७२ या काळात आपले शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर लगेच त्यांनी बी.एड केले आणि शिक्षक म्हणून नोकरीचा मार्ग स्वीकारला. मात्र नियतीच्या मनात काहीतरी वेगळे असावे म्हणूनच की काय ते १९७६ साली व्यवसायामध्ये उतरले. जिद्द, चिकाटी, परिश्रम आणि संयम याच्या जोरावर ते स्वकर्तृत्वाने सर्वोच्च स्थानी पोहोचले. ज्या रयत शिक्षण संस्थेत ते शिकले, त्याच संस्थेचे ते मॅनेजिंग कौन्सिल सदस्य म्हणून अनेक वर्षे कार्यरत आहेत ही गोष्ट भाग्याचीच म्हणावी लागेल. अगदी साध्या कुटुंबातून पुढे येत त्यांनी आपल्या कर्तृत्वाच्या बळावर समाजात मानाचे स्थान निर्माण केले. रामशेठ ठाकूर साहेबांनी जीवनातील उंच उंच ध्येय प्राप्त करताना ते कधीही थकलेले वाटले नाहीत, आजही ते तितक्याच ताकदीने काम करताना दिसतात. त्यांच्या नेतृत्वात लोकहिताची जाणीव आणि कार्यात सातत्य दिसून येते. ते ज्येष्ठ राजकारणी, माजी खासदार, प्रसिद्ध दानशूर व्यक्तिमत्त्व आहेत. रायगड जिल्ह्यात विशेषतः पनवेल परिसरात त्यांची विशेष ओळख असली, तरी एक दानशूर व्यक्तिमत्त्व म्हणून आता त्यांची ओळख संपूर्ण महाराष्ट्रभर घराघरात पोहोचलेली दिसून येते. प्रारंभी समाजकारणात अग्रेसर असणारे रामशेठ ठाकूर साहेब

लोकआग्रहास्तव राजकारणात उतरले आणि दोनदा ते लोकसभेचे खासदार झाले. आता त्यांचा राजकीय वारसा त्यांचे मोठे चिरंजीव आमदार प्रशांत ठाकूर मोठ्या नेटाने पुढे चालवीत आहेत. ते पनवेल मतदारसंघाचे आमदार आहेत. त्यांना त्यांच्या धाकट्या बंधूंची अर्थात परेश ठाकूर यांची साथ आहे. हे दोघेही रामशेठ ठाकूर साहेबांचा सामाजिक, राजकीय वारसा समर्थपणे सांभाळत आहेत.

रामशेठ ठाकूर यांनी राजकारणाला केवळ सत्तेचे साधन न मानता, जनसेवेचे माध्यम मानले. पनवेल व रायगड परिसरातील रस्ते, वीज, पाणीपुरवठा, शैक्षणिक संस्था, खेळ, क्रीडा यांसारख्या अनेक सोईसुविधा प्रत्यक्ष लोकांपर्यंत पोहचविताना विकासकामांतून त्यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटवला. सर्वसामान्य लोकांच्या समस्या ऐकून त्यावर लगेच कृती करणे, ही त्यांची कामाची पद्धत सर्वसामान्य लोकांना आपलीशी वाटते.

शिक्षण क्षेत्रात त्यांनी उभारलेल्या विविधांगी उपक्रमांमुळे व दिलेल्या आर्थिक ताकदीमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाची संधी उपलब्ध झाली. रामशेठ ठाकूर साहेब आणि रयत शिक्षण संस्थेचे भावनिक नातं आहे.संस्थेचे एक माजी विद्यार्थी, खूप मोठे उद्योजक झाले असले, तरी ते आपल्या रयत शिक्षण संस्थेला व छत्रपती शिवाजी कॉलेजला विसरले नाहीत. मातृसंस्था म्हणून रयत शिक्षण संस्थेला पहिली पसंती देतात. पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांची आयुष्यभर जपवणूक करताना ते दिसतात. ९ मे २०२६ रोजी पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुण्यतिथी कार्यक्रमाच्या निमित्ताने माननीय खासदार शरदचंद्र पवारसाहेब यांनी रामशेठ ठाकूर साहेब यांनी आत्तापर्यंत रयत शिक्षण संस्थेला जवळजवळ शंभर कोटी रुपयांची देणगी दिली याबद्दल रामशेठ ठाकूरसाहेब व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ.शकुंतला ठाकूर यांचा सत्कार केला, ही गोष्ट अत्यंत कौतुकाची व आदरास पात्र ठरणारी आहे.

जवळ जवळ ७५ वर्षांच्या प्रवासात रामशेठ ठाकूर साहेब यांनी सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांना दिलेले प्रोत्साहन म्हणजे समाजजीवन अधिक समृद्ध करणारे ठरले. त्यांच्या दानशूर व्यक्तिमत्वातून नव्या पिढीला प्रेरणेचा मार्ग मिळत आहे.त्यांच्या व्यक्तिमत्त्वात साधेपणा, निर्मळपणा, जिद्द आणि प्रामाणिकपणा यांचा सहज सुंदर संगम एकवटला आहे म्हणूनच 'लोकनेते' 'दानशूर' ह्या उपाध्या त्यांच्या कार्याची खरीखुरी ओळख करून देतात. रामशेठ ठाकूर यांचे जीवनकार्य हे संघर्षातून यशाकडे जाणाऱ्या प्रवासाचे प्रेरणादायी, दुर्मीळ उदाहरण आहे. आज त्यांच्या ७५ व्या अमृतमहोत्सवी अभीष्टचिंतन प्रसंगी त्यांना निरोगी दीर्घायुष्य लाभो हीच प्रार्थना !!





समाजसेवेची बांधीलकी अन् मातीशी नाळ जपणारा दानशूर

प्रा. डॉ. राजेंद्र तांबिले
छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा

काही व्यक्तींचे मोठेपण त्यांच्या संपत्तीत किंवा पदामध्ये नसते, ते त्यांच्या विचारांमध्ये, संवेदनशीलतेमध्ये आणि माणसांशी जोडलेल्या नात्यांमध्ये असते. रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य मा. रामशेठ ठाकूर यांच्यासोबत घालविलेला एक दिवस हा अशाच मोठेपणाचा साक्षीदार ठरला. त्या भेटीत आम्हाला एक यशस्वी उद्योजक, दूरदर्शी विकासक आणि दानशूर समाजसेवक तर भेटलाच; पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे संघर्ष विसरला नाही, आईचे ऋण विसरला नाही आणि मातीशी असलेली नाळ तुटू दिली नाही असा एक संवेदनशील माणूस भेटला.

नॅक (NAAC) आणि स्वायत्त महाविद्यालय (Autonomous College) या संदर्भातील उच्च व तंत्रशिक्षण मंत्रालयाच्या वतीने आयोजित कार्यशाळेसाठी आम्ही मुंबई विद्यापीठात गेलो होतो. मी, डॉ. शिवाजी पाटील, डॉ. अरुण सकटे आणि डी. जी. कॉलेजचे दोन सहकारी सहभागी होतो. कार्यशाळा संपल्यानंतर सहज बोलता बोलता डॉ. अरुण सकटे यांनी मा. रामशेठ ठाकूर यांना फोन केला. फोनवरूनच त्यांच्या मनमिळाऊ स्वभावाचा प्रत्यय आला. त्यांनी प्रेमाने सांगितले, ''पनवेलला आल्याशिवाय सातारला जायचं नाही.'' पनवेलला पोहोचल्यानंतर त्यांनी अत्यंत आत्मीयतेने आमचे स्वागत केले. काही वेळ गप्पा झाल्यानंतर त्यांनी सांगितले, ''चला, आधी तुम्हाला माझे गाव दाखवतो.'' त्यांच्या आवाजातील उत्साह पाहून आम्हीही आनंदाने तयार झालो. स्वतःच्या मूळ गावी नेताना त्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच अभिमान दिसत होता. आज मोठ्या उंचीवर पोहोचलेला हा माणूस आपल्या गावाबद्दल इतक्या प्रेमाने बोलत होता की त्यांची मातृभूमीशी असलेली नाळ किती घट्ट आहे, याची जाणीव होत होती.

गावात पोहोचल्यानंतर त्यांनी आपल्या बालपणीच्या आठवणी सांगायला सुरुवात केली. समुद्रकिनारी वसलेल्या त्या गावाचा इतिहास त्यांनी अतिशय जिव्हाळ्याने उलगडून सांगितला. एक काळ असा होता की, भरतीच्या वेळी समुद्राचे पाणी गावात शिरत असे. परिस्थिती इतकी बिकट झाली होती की, त्यांच्या कुटुंबासह संपूर्ण गावावर विस्थापित होण्याची वेळ आली. अनेक कुटुंबांना आपली घरे सोडून अन्यत्र जावे लागले. गावकऱ्यांच्या आयुष्यातील तो एक वेदनादायी काळ होता; परंतु संकटावर मात करण्याची जिद्द गावकऱ्यांनी सोडली नाही. पुढे समुद्राचे पाणी अडविण्यासाठी मजबूत बांध उभारण्यात आला. त्या बांधामुळे परिस्थिती हळूहळू बदलली. समुद्राचे पाणी रोखले गेले आणि विस्थापित झालेली कुटुंबे पुन्हा आपल्या मूळ गावी परतली. गावाने पुन्हा नव्याने उभारी घेतली. हा प्रसंग सांगताना त्यांच्या डोळ्यांत आपल्या गावाबद्दलचे प्रेम आणि अभिमान स्पष्ट दिसत होता.

त्यानंतर त्यांनी आम्हाला त्यांचे जन्मघर दाखवले. ते घर पाहताना एका सामान्य कुटुंबातील मुलाचा असामान्य प्रवास डोळ्यांसमोर उभा राहिला. त्या साध्याशा घरातून सुरू झालेला प्रवास आज हजारो लोकांना रोजगार देणाऱ्या आणि समाजासाठी कोट्यवधी रुपयांचे प्रकल्प उभारणाऱ्या व्यक्तीपर्यंत पोहोचला होता.

संघर्षाच्या दिवसांची आठवण सांगताना ते म्हणाले, व्यवसाय सुरू करण्यासाठी आवश्यक भांडवल त्यांच्याकडे नव्हते. परिस्थिती इतकी कठीण होती की, त्यांच्या आईचे दागिने गहाण ठेवावे लागले. हा प्रसंग सांगताना त्यांचा कंठ दाटून आला. काही क्षण ते भावूक झाले. त्या क्षणी आम्हाला एका मोठ्या उद्योजकाचे नव्हे, तर आपल्या आईच्या त्यागाचे ऋण मनापासून मानणाऱ्या कृतज्ञ पुत्राचे दर्शन झाले. यशाच्या सर्वोच्च शिखरावर पोहोचूनही ते आपल्या संघर्षाला आणि आईच्या त्यागाला विसरले नाहीत अशा व्यक्तीचे मोठेपण वेगळ्याच उंचीचे असते.



त्यांनी आम्हाला त्यांच्या स्वप्नातील प्रकल्पांपैकी एक असलेल्या 'राम बाग' मध्ये नेले. दुबईच्या जागतिक दर्जाच्या उद्यानांच्या धर्तीवर ही बाग उभारण्याचा त्यांचा मानस होता. हिरवाईने नटलेला परिसर, सुबक रचना, आकर्षक नियोजन आणि सौंदर्य यामुळे ती जागा मन मोहून टाकणारी होती. तेथील एका सहकाऱ्याने आम्हाला सांगितले की, या बागेची निर्मिती करण्यापूर्वी मा. रामशेठ वास्तुविशारदांच्या एका टीमला घेऊन स्वत: दुबईला गेले होते. तेथील उद्यानांचा अभ्यास करून त्यातील सर्वोत्तम संकल्पना येथे आणण्याचा प्रयत्न करण्यात आला. जागतिक दर्जाच्या सुविधा आपल्या लोकांना मिळाल्या पाहिजेत, हा त्यामागील विचार होता. विशेष म्हणजे एवढ्या मोठ्या खर्चातून उभारलेली ही बाग सर्वांसाठी खुली आणि विनामूल्य आहे. समाजाला काहीतरी परत देण्याची त्यांची भावना या उपक्रमातून प्रकर्षाने जाणवते.

यानंतर त्यांनी आम्हाला स्पोर्टस् कॉम्प्लेक्स दाखवले. हा प्रकल्प म्हणजे त्यांच्या दूरदृष्टीचा आणखी एक भव्य नमुना होता. खेळाडूंना जागतिक दर्जाच्या सुविधा मिळाव्यात, या उद्देशाने उभारलेला हा परिसर पाहून आम्ही प्रभावित झालो. तेथे भेटलेले व्यवस्थापक कातरखटावचे निघाले. गप्पांच्या ओघात ते म्हणाले,

सातारचा माणूस भेटला, की रामशेठ साहेब खूप भावनिक होतात. हे वाक्य ऐकताना आम्हाला त्याचे कारण समजले होते. कारण दिवसभरात आम्ही त्यांच्या मनातील मातीविषयीचे प्रेम प्रत्यक्ष अनुभवले होते. कॉम्प्लेक्सची पाहणी झाल्यानंतर त्यांनी आमच्यासाठी जेवणाची व्यवस्था केली. मात्र त्याचवेळी त्यांना एका महत्त्वाच्या बैठकीसाठी जावे लागले. त्यांनी सर्व व्यवस्था करून आम्हाला आग्रहाने जेवायला सांगितले आणि स्वतः बैठकीसाठी रवाना झाले. आम्ही जेवण उरकले. साधारण दोन तासांनंतर त्यांची बैठक संपली. एवढ्या व्यस्त वेळापत्रकातही ते थेट आमच्याकडे आले आणि प्रेमाने विचारले, ''व्यवस्थित जेवलात ना? काही कमी-जास्त तर झाले नाही ना?'' त्या क्षणी त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील खरी श्रीमंती आमच्यासमोर उभी राहिली. कोट्यवधींचे साम्राज्य उभे करणारा माणूस आपले पाहुणे नीट जेवले की नाही याची मनापासून काळजी घेत होता.

त्या दिवसाच्या भेटीत आम्ही एक यशस्वी उद्योजक पाहिला, एक विकासदृष्टी असलेला नेता पाहिला, एक दानशूर समाजसेवक पाहिला; पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे आम्ही एक माणूस पाहिला. संघर्षातून घडलेला, आईच्या त्यागाने समृद्ध झालेला, आपल्या गावाशी आणि माणसांशी नाळ जपणारा, समाजासाठी उदारपणे देणारा आणि यशाच्या शिखरावर पोहोचूनही नम्र राहिलेला माणूस.

मा. रामशेठ ठाकूर यांच्यासोबतचा तो दिवस केवळ एका भेटीची आठवण नाही; तो माणुसकी, कृतज्ञता, दातृत्व, दूरदृष्टी आणि साधेपणाचा अनुभव आहे. आजही त्या भेटीच्या आठवणी मनात जिवंत आहेत आणि त्यांच्याविषयीचा आदर प्रत्येक स्मरणासोबत अधिक दृढ होत जातो.





रयत युगातील कर्ण : रामशेठ साहेब

प्राचार्या सौ. मंगल पाटील
चेअरमन, सौ. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील
पतपेढी, सातारा

पनवेलमध्ये राहणारे, संस्थेत मॅनेजिंग कौन्सिलवर असणारे ठाकूर साहेबांचा अमृत महोत्सव सुरु आहे. त्यांची पंचाहत्तरी निमित्त थोडेसे रामशेठ शिवाजी कॉलेजचे 'कमवा व शिका' स्किमचे विद्यार्थी, त्यांचा मराठी विषय. काही नसताना सातारला शिक्षण घेऊन मोठे झाले.

त्यांचा व माझा परिचय २०१० साली झाला. कर्मवीर अण्णांनी १९१९ साली रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. सामाजिक परिस्थिती शिक्षणाबाबत मागासलेली होती. ठरावीक लोकांची मक्तेदारी शिक्षणाबाबत जागरुक होती. अण्णांनी हे ओळखून घरोघरी, झोपडीपर्यंत शिक्षण मिळण्यासाठी संस्थेची स्थापना केली. धार्मिक भिंती भक्कम होत्या. तरी पण शिक्षण सर्वांना मिळावे हे पाहून वसतिगृहाची स्थापना केली. वसतिगृहयुक्त शिक्षण ही संकल्पना अण्णांनी सुरु केली व वसतिगृह सुरु केले. गोरगरिबांची मुले शिकू लागली. 'कमवा शिका योजना' राबवून मुलांनी कष्ट करुन शिक्षण घ्यावे ही संकल्पना पुढे आली.

रामशेठ पनवेलला असतांना त्यांना हे कळाल्यानंतर ते सातारला आले व वसतिगृहात राहून शिक्षण घेतले. प्राचार्य उनउनेसाहेबांनी त्यांना मदत केली. शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले. मराठी विषय घेऊन ते बी.ए. झाले. अतिशय हुशार असल्याने त्यांना योग्य मार्गदर्शन व पुस्तके मिळाली व ते बी.ए. झाले. त्यांची जडणघडण कष्टातून, कामातून, स्वावलंबनातून त्यांचे व्यक्तिमत्त्व साकारत गेले. नंतर ते पुढे पनवेलमध्ये जाऊन व्यवसायाकडे वळले. जर संस्था नसती, प्राचार्य उनउने नसते तर कदाचित त्यांचे शिक्षण थांबले असते. आजही साहेब रयत शिक्षण संस्थेबद्दल कृतज्ञ आहेत. त्यांना रयतबद्दल जाणीव आहे. त्यांच्या जडणघडणीत रयतचे प्रवाह आहेत. प्रत्येक श्वास रयतेबद्दल कृतज्ञता दर्शवितो.

माझा त्यांचा परिचय २०१० साली अगदी जवळून आला. मी जिजामाता कॉलेजमध्ये प्राचार्या होते. कॉलेजच्या हॉलचे नूतनीकरणाचे काम मी सुरु केले. पूर्ण हॉलचे काम झाल्यानंतर उद्घाटन करायचे ठरले. मी डॉक्टरसाहेबांबरोबर बोलल्यानंतर रामशेठ ठाकूरसाहेबांचे नाव त्यांनी सांगितले. व लगेच फोनही केला. साहेबांनी येण्याचे कबूल केले. त्याप्रमाणे २६ जून २०१० तारीखही ठरली. दानशूर हे त्यांचे नाव मी पण ऐकून होते. त्यांचेकडे पाहिल्यानंतर एवढा मोठा माणूस पण साधी राहणी, प्रसन्न चेहरा, मृदु बोलणे, पाहुन मी भारावून गेले. देवत्व प्राप्त झाल्यासारखे भासले.

कार्यक्रमासाठी ते पनवेलहून सातारला आले. संस्था ऑफीसला मी त्यांना जावून भेटून आमच्या कॉलेजवर घेऊन आले. परमेश्वर काही लोकांनाच घडवितो व निसर्गात चमत्कार घडतात. कोनशिला तयार होती. हॉल सुसज्ज तयार होता. त्यांनी हे पाहिल्यावर त्यांना खूप आनंद झाला. ती. अण्णांच्या काळातील

मुलींचे पहिले डी.एड्. कॉलेज. सांगितल्यावर ते सुध्दा भावनिक झाले. त्यांच्या हस्ते उद्घाटन दिमाखात पार पडले. मनस्वी आनंदात होते.

त्यांच्या भाषणातून त्यांनी सांगितले, कॉलेजचे कौतुक केले व कॉलेजसाठी काहीही आर्थिक मदत न मागणारे कॉलेज असा उल्लेख केला आणि म्हणाले, ''पुन्हा जेव्हा कधीही मदत लागेल तेव्हा मला कळवा. मी देईन. मुलींच्या कॉलेजला काही कमी पडता कामा नये.'' डॉक्टरसाहेबांनीही कौतुक केले. साहेबांचा चेहरा बरेच काही सांगून, शिकवून गेला. मला व आमच्या स्टाफला खूप खूप आनंद झाला. त्यांचे पाय आमच्या कॉलेजला लागले.

नंतर अधून मधून कार्यक्रमाच्या निमित्ताने ते भेटत. प्रत्येक ९ मे ला संस्थेसाठी काही तरी देणगी देण्याचे सांगत. मी २०१० साली निवृत्त झाले. मी कॉलेजच्या स्थानिक स्कूल कमिटीवर असल्याने कॉलेजच्या गरजा समजते. हॉलची दुरुस्ती, वसतिगृह दुरुस्ती अशा गरजा समोर आल्या, मला अचानक साहेबांनी दिलेला शब्द आठवला व मी प्राचार्य विश्रांती कदम मॅडमना सांगितले व आम्ही साहेबांची भेट घेण्याचे ठरवले. मॅनेजिंग कौन्सिलवर ते असल्याने मिटिंगला येतात हे माहीत होते. त्याप्रमाणे मॅडमना पत्र तयार करुन घेण्यास सांगितले व आम्ही दोघी शिवाजी कॉलेजवर पोहोचलो. तेथे त्यांची भेट घालून देण्याबद्दल मीनाताईंनापण सांगून ठेवले होते. मिटिंग संपली व त्यांची भेट घेतली. त्यांनी दहा लाख रुपये देण्याचे मान्य केले. दहा लाख रुपयांचा चेक संस्थेकडे सचिवांकडे आला. त्यांनी बोलावून कॉलेजला दिला व त्याप्रमाणे कॉलेजच्या दुरुस्त्या, होस्टेल दुरुस्ती करता आली.

शिवाजी कॉलेजवर मराठी विभागाच्या कार्यक्रमांना मी गेले होते. तेव्हा पण पाहिले. कार्यक्रमात देणगी १-२ शाखांनी मागितली. तोच पटापट लाखात रुपये देण्याचे मान्य केले. लाख रुपयात किती शून्य आहेत. हे पटकन आपल्या लक्षात येत नाही. पण साहेब पटकन १ लाख, २५ लाख मान्य करतात, देतात. त्यांच्या दानशूरपणाबद्दल लिहिण्यास शब्दच नाहीत. महाभारतात कर्णाला दानशूर म्हणतात; पण आपल्या या रयतेच्या युगात शेठना दानशूर रयत कर्ण म्हटले, तर वावगे ठरणार नाही. त्यांच्याप्रमाणेच त्यांच्या सौभाग्यवती



सौ. शकुंतला ठाकूर अशाच मनाने दानशूर आहेत. त्यांनी पण खूप ठिकाणी देणगी दिली आहे. पूर्ण पनवेल परिसर, दुर्बल शाखा सर्व ठिकाणी साहेबांनी देणगी देऊन शाखा परिपूर्ण केल्या आहेत. या रयत कर्णाच्या मदतीने रयत शिक्षण संस्थेच्या अशा अनेक दुर्बल शाखा आज चांगल्या अवस्थेत आहेत. संस्थेत ते अजरामर आहेत. अनेक शाखा त्यांच्यामुळे आज डौलाने उभ्या आहेत.

निसर्गातला चमत्कार म्हणावा, की देवत्व प्राप्त झालेली व्यक्ती म्हणावे हे समजत नाही. रामायणात 'राम' तसे कर्मवीरायणातील हे 'राम' आहेत. असेच म्हणावे लागेल. नि:शब्द होतात भावना, मन. कल्पना करवत नाही, तुलना होत नाही. अशा व्यक्ती आपल्या रयतेच्या मातीत काम करुन घाम गाळून आज कॉलेजमध्ये शिकून आज 'शेठ' आहेत. 'राजा माणूस' असेही म्हणावे लागेल. देता देता देणा-याचे हातच घ्यावेत. असे देणारे हात.

या रयतेच्या मातीत घडावेत ही प्रार्थना. त्यांना अमृत महोत्सवानिमित्त लाख-लाख शुभेच्छा. त्यांना आरोग्यदायी आयुष्य मिळो, शांती, आनंद भरभरुन मिळो ही प्रार्थना. त्यांच्यात देवत्व आहे म्हणून मी अण्णांच्या चरणी, रयत माउलीच्या चरणी प्रार्थना करते.





मी जवळून बघितलेले रामशेठ ठाकूर

श्री. राजेंद्र काकुळते
प्रकल्प अधिकारी,
आश्रमशाळा विभाग, मोखाडा

एखाद्या व्यक्तीचे मोठेपण केवळ त्याच्या आर्थिक सामर्थ्यात नसते, तर त्याच्या समाजाप्रती असलेल्या बांधीलकीत, शैक्षणिक क्षेत्रातील योगदानात आणि माणसांशी जपलेल्या आत्मीय नात्यांत असते. अशाच व्यक्तिमत्त्वांपैकी एक म्हणजे रयत शिक्षण संस्थेचे ज्येष्ठ कार्यकर्ते, समाजसेवक आणि शिक्षणप्रेमी मा. रामशेठ ठाकूर साहेब. त्यांच्या सहवासात येण्याचे आणि त्यांना जवळून अनुभवण्याचे भाग्य मला लाभले, ही माझ्यासाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे.

माझी आणि रामशेठ ठाकूर साहेबांची पहिली ओळख १ ऑगस्ट १९९७ रोजी झाली. त्यावेळी मी छत्रपती शिवाजी विद्यालय, जासई, ता. उरण, जि. रायगड येथे कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षक म्हणून कार्यरत होतो. रायगड परिसरात आणि विशेषतः शिक्षण क्षेत्रात रामशेठ ठाकूर साहेबांचे कार्य सर्वदूर परिचित होते. त्या भागातील अनेक शैक्षणिक, सामाजिक आणि विकासात्मक उपक्रमांमध्ये त्यांचे मोलाचे योगदान होते आणि आजही आहे.

रयत शिक्षण संस्थेच्या प्रगतीमध्ये रामशेठ ठाकूर साहेबांचा सिंहाचा वाटा आहे. संस्थेच्या व्यवस्थापन परिषदेचे (Managing Council) सदस्य म्हणून त्यांनी अनेक वर्षे कार्य केले आहे. संस्थेच्या विस्तारासाठी, शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी आणि विद्यार्थ्यांच्या हितासाठी त्यांनी सातत्याने योगदान दिले आहे. त्यांनी विविध शैक्षणिक प्रकल्पांसाठी कोट्यवधी रुपयांची आर्थिक मदत केली असून, त्यामागे शिक्षणाविषयीची त्यांची नितांत आस्था दिसून येते.

रामशेठ ठाकूर साहेबांच्या उदारतेचा आणि शिक्षणप्रेमाचा मी स्वतः साक्षीदार आहे. नर्मदानगर येथील आश्रमशाळेच्या उद्घाटनासाठी आम्ही नाशिक ते नर्मदानगर असा प्रवास एकत्र केला होता. उद्घाटन समारंभानंतर आश्रमशाळेतील विज्ञान प्रयोगशाळेच्या उभारणीसाठी त्यांनी तत्काळ एक लाख रुपयांचा धनादेश देऊन मदत जाहीर केली. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शैक्षणिक सुविधा मिळाव्यात, हा त्यामागील त्यांचा प्रामाणिक हेतू होता.

नाशिक जिल्ह्यातील विविध शैक्षणिक कार्यक्रमानिमित्त त्यांचा अनेकदा सहवास लाभला. नूतन विद्यालय व रावसाहेब शिंदे कनिष्ठ महाविद्यालय, वावी येथील नामकरण समारंभासाठी ते आले असताना सिन्नर येथील पंचवटी हॉटेलमध्ये त्यांच्यासोबत वेळ घालविण्याची संधी मिळाली. त्यानंतर वावी ते पांगरी असा प्रवास आम्ही एकत्र केला. पांगरी येथील हरीबाबा विद्यालयात विद्यार्थ्यांनी लेझीम पथकाच्या माध्यमातून त्यांचे भव्य स्वागत केले. विद्यार्थ्यांचा उत्साह आणि शाळेची प्रगती पाहून ते अत्यंत भारावून गेले. त्यावेळी त्यांनी पुन्हा भेट

देण्याचे आश्वासन दिले आणि नंतर भेटीदरम्यान विद्यालयाच्या विकासासाठी तब्बल वीस लाख रुपयांची आर्थिक मदत दिली. याचप्रमाणे माध्यमिक विद्यालय, साकोरे, ता. नांदगाव येथील इमारतीच्या बांधकामासाठी त्यांनी पंचवीस लाख रुपयांची मदत दिली. त्या काळात हॉटेल एक्सप्रेस इन, नाशिक येथे त्यांचा मुक्काम असताना नाशिक ते साकोरे हा प्रवास त्यांच्या समवेत करण्याची संधी मला मिळाली. या प्रवासात त्यांच्या साधेपणाचा, दूरदृष्टीचा आणि शिक्षणाविषयीच्या तळमळीचा जवळून परिचय झाला.

माझ्या वैयक्तिक जीवनातही रामशेठ ठाकूर साहेबांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. १९९७ ते २००३ या कालावधीत मी जासई येथे कार्यरत होतो आणि माझी बदली उत्तर विभागात व्हावी यासाठी प्रयत्नशील होतो. त्या काळात मी ठाकूर साहेबांना फक्त एकदाच माझी अडचण सांगितली. त्यांनी कोणताही गाजावाजा न करता माझी अडचण समजून घेतली आणि माझी सोयीस्कर बदली होण्यासाठी आवश्यक सहकार्य केले. त्यांचे हे उपकार मी कधीही विसरू शकत नाही. रामशेठ ठाकूर साहेबांविषयी आणखी एक विशेष बाब म्हणजे त्यांचा माणुसकीने ओतप्रोत भरलेला स्वभाव. आजही मी त्यांना फोन केला, तर ते माझा फोन उचलल्याशिवाय राहत नाहीत. ते मला प्रेमाने नाशिकचे सर म्हणून संबोधतात. एवढ्या मोठ्या पदावर असलेल्या व्यक्तीने आपल्या सहकाऱ्यांशी आणि परिचितांशी अशी आत्मीयता जपणे, हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे मोठेपण दर्शवते.

त्यांच्या पंच्याहत्तरी अर्थात अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त रयत शिक्षण संस्थेचे व्हाईस चेअरमन मा. ॲड. भगीरथ शिंदे साहेब यांच्यासमवेत त्यांना शुभेच्छा देण्यासाठी जाण्याचा योग आला. त्यावेळी त्यांनी अत्यंत आपुलकीने आमची विचारपूस केली. त्यांच्या वागणुकीतील साधेपणा आणि जिव्हाळा पुन्हा एकदा अनुभवता आला.

आश्रमशाळांबाबत रामशेठ ठाकूर साहेबांना विशेष आस्था आहे. आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांचे शिक्षण, निवास, आरोग्य आणि सर्वांगीण विकास याबाबत ते नेहमीच चिंतित असतात. मी प्रकल्प अधिकारी म्हणून कार्यभार स्वीकारल्यानंतर त्यांनी विशेष आनंद व्यक्त केला. त्यानंतर अनेक वेळा त्यांनी आश्रमशाळांची स्थिती, विद्यार्थ्यांच्या अडचणी, सुविधा आणि विकासकामांबाबत चौकशी केली. विद्यार्थ्यांच्या हितासाठी काय करता येईल, याबाबत ते सदैव सकारात्मक आणि मार्गदर्शक भूमिका घेताना दिसतात.

माझ्या आयुष्यात अनेक मान्यवर व्यक्तींचा सहवास लाभला; परंतु रामशेठ ठाकूर साहेब यांचे स्थान विशेष आहे. शिक्षण क्षेत्रातील त्यांचे योगदान, समाजाप्रती असलेली बांधीलकी, उदार दानशूर वृत्ती, कार्यकर्त्यांप्रती असलेली आत्मीयता आणि विद्यार्थ्यांविषयी असलेली कळकळ या सर्व गुणांमुळे ते खऱ्या अर्थाने लोकनेते आणि शिक्षणमहर्षी ठरतात.

त्यांच्या सहवासातून मला खूप काही शिकायला मिळाले. त्यांच्या संपर्कात राहणे, त्यांच्याशी जुळलेले स्नेहबंध आणि त्यांच्या कार्याचा साक्षीदार होण्याचा लाभ मला मिळाला, याचा मला सदैव अभिमान आणि आनंद वाटत राहील. समाज आणि शिक्षण क्षेत्रासाठी त्यांचे योगदान प्रेरणादायी असून पुढील पिढ्यांसाठी ते निश्चितच आदर्शवत राहील.



आपले साहित्यिक : लोकनेते रामशेठ ठाकूर

प्रो. (डॉ.) सुभाष वाघमारे
माजी प्रमुख, मराठी विभाग
छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा

दि. २६ मे २०२६ रोजी पनवेल येथे कोकण मराठी साहित्य परिषदेने लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त 'कृतार्थ संध्याकाळ' या अत्यंत बहारदार सोहळ्याचे आयोजन केले होते. या देखण्या सोहळ्यात रामशेठजींचा उल्लेख 'कोमसापचे सल्लागार' असा करण्यात आला आणि त्याच क्षणी माझ्या मनात त्यांच्या जीवनप्रवासाचे कप्पे एकामागोमाग एक उघडत गेले. साहेबांचे व्यक्तिमत्त्व मी काही प्रमाणात जवळून अनुभवले असल्यामुळे, राजकारणाच्या आणि उद्योगविश्वाच्या झगमगटामागे एक अत्यंत संवेदनशील, रसिक साहित्यिक दडलेला आहे याची मला आधीपासूनच जाणीव होती; परंतु त्या संध्याकाळी त्यांच्या स्वतःच्या उत्स्फूर्त, प्रांजळ आणि ओघवत्या भाषणाने या जाणिवेवर सुवर्णाक्षरांचे शिक्कामोर्तब केले.

मला आठवते, मा. रामशेठ ठाकूरसाहेब एकदा छत्रपती शिवाजी कॉलेजला आल्यानंतर मी त्यांना म्हणालो होतो, की आपण १९६८ ते १९७२ या काळात छत्रपती शिवाजी कॉलेजला बी.ए.पदवीसाठी मराठी विषयात शिकलेले आहात. माझी अशी तीव्र इच्छा आहे की, आपण ज्या मराठी विभागाचे विद्यार्थी होता, त्या विभागाला नवनव्या साहित्यिकांशी जोडून ठेवण्यासाठी आणि कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी उत्तम पुस्तके वाचावीत म्हणून आपल्या नावाने 'लोकनेते रामशेठ ठाकूर साहित्य पुरस्कार' सुरू करूयात. त्या निमित्त कथा, कादंबरी, नाटक, ललित लेख, कवितासंग्रह इत्यादी पुस्तके पुरस्कार निवडीसाठी येतील, त्याचा फायदा प्रत्येक वर्षी नवनवीन ताज्या साहित्यकृती विद्यार्थी वाचतील. त्यावर साहेब अत्यंत सहजतेने आणि तत्परतेने म्हणाले, ''मी कुठे साहित्य लिहिले आहे? असे पुरस्कार देणे योग्य दिसणार नाही.'' साहेबांचे हे उत्तर ऐकले आणि मला त्यांच्यातील अत्यंत स्पष्टवक्ता, चिकित्सक आणि निगर्वी स्वभाव अधिक गडदपणे जाणवला. कुणीतरी स्तुतीची कमान रचते आहे म्हणून त्यात वाहून जाण्याची आणि स्वतःचे कौतुक करून घेण्याची हाव त्यांना अजिबात नाही. श्री चक्रधर स्वामींना लोक जसे 'सर्वज्ञ' म्हणायचे, तशीच साहेबांना मनुष्यस्वभावाची अचूक पारख आहे. कोण खरे आणि कोण खोटे, हे त्यांना पहिल्या नजरेत कळते; परंतु जेव्हा मी त्यांच्या महाविद्यालयीन जीवनाचा आणि त्यांच्या अलीकडील भाषणातील प्रत्येक मनोगताचा सूक्ष्म अभ्यास केला, तेव्हा मला समजले, की विद्यार्थीदशेत त्यांनी कॉलेजच्या नियतकालिकात 'प्रतापगडच्या वाटेवर' आणि 'भीड भिकेची बहीण' यांसारखे ललित अंगाने जाणारे दर्जेदार लेख लिहिले होते. तिथूनच हा साहित्यिक प्रवास सुरू झाला. या काळात छत्रपती शिवाजी कॉलेजला 'विद्यार्थी ज्योती' नावाचे भित्तीपत्रक तयार करीत असत. कदाचित 'भीड भिकेची बहीण' हे लेखन तेथे केले असावे असा माझा तर्क आहे. शिवविजय नियतकालिकात त्यांचे 'प्रतापगडच्या वाटेवर' हे प्रवास वर्णन प्रकाशित झाले होते, असे ते सांगतात. त्या काळात मराठी विभागातील प्रा. श्रीधर हेरवाडे, प्रा. द. ता. भोसले, प्राचार्य एस.के.उनउने, प्रा. एस.एस.भोसले, प्राचार्य



मा.के.यादव, इत्यादी मराठीचे प्राध्यापकांच्या व्याख्यानांचा प्रभाव त्यांच्यावर होत होता. प्राचार्य एस.के उनउने हे मराठी विषयाचे असल्याने कधी कधी त्यांच्या प्राचार्य केबिनमध्ये तास घेत होते. विद्यार्थ्यांना बोलते होण्यासाठी, लेखन करण्यासाठी ते प्रोत्साहन देत होते. शंकर दादू पायमल या चांगले लेखन करणाऱ्या 'कमवा आणि शिका' मध्ये काम करणाऱ्या मराठी विषय घेतलेल्या मित्राला रामशेठ पाठिंबा देत होते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यातदेखील हुशारी असते. अशा साहित्यप्रेमी मित्राला रामशेठ यांनी वर्गात बोलण्यासाठी प्रोत्साहन दिले आहे. बंधुत्व जपणारा साहेबांचा स्वभाव आहे. त्यांच्या वाणीत नम्रता, आपुलकी, प्रामाणिकपणा, नीतिमत्ता, धैर्य या गोष्टी असतात. कोट्यवधी रुपये असूनही आपण एक क्षणभंगुर जीवन असलेले माणूस आहोत हे त्यांना जाणवते. म्हणून कधीही इतर नेत्याप्रमाणे अकारण आवेश त्यांच्या भाषणात नसतो. संयम असलेले हे व्यक्तिमत्त्व आहे. इतरांच्या बारीकसारीक मागण्यादेखील त्यांच्या लक्षात राहतात आणि ते पूर्ण करतात. कोणीही असो, अगदी जेवायची वेळ असो, ते एकटे कधी जेवत असतील असे वाटत नाही, सर्वांच्या सुख दुःखात सामील होणे हे त्यांचे जीवन आहे. आपल्याला काही सांगायचे असेल ना, तर ते जवळ बसून सांगतील. एखाद्याने चांगले काम केले, की मनापासून शाबासकी देणे हा त्यांचा स्वभाव आहे. एक उद्योगपती इतका मोठा व्यवहार व्यवस्थित सांभाळतो; पण कंटाळा करत नाही. माणसात असले की, त्यांना समाधान वाटते. ते विनोदही करतात. लोकांच्यात असल्याने अनेक विसंगती त्यांना माहीत आहेत; पण त्यावर मिश्कील विनोद ते करतील; पण माणसे दुखावत नाहीत. एखादी ओळदेखील त्यांची सूचक असते. जितके दिलदार, दिलखुलास तितकेच ते सावध असलेले व्यक्तिमत्त्व आहे.

रामशेठ ठाकूर यांच्या व्यक्तिमत्त्वाचा हळूहळू शोध घेताना जाणवते, की एक उत्तम साहित्यिक नेहमी आपल्या मातीशी आणि तिथल्या लोकभाषेशी नाळ जोडून असतो. केवळ पदवी असणे वेगळे आणि जगण्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन साहित्यिक असणे वेगळे. रामशेठ यांच्या भाषणात आगरी-कोळी संस्कृतीचे आणि रायगड परिसरातील प्रादेशिक बोलीचे अत्यंत सुंदर, जिवंत प्रतिबिंब दिसते. बालपणीच्या अथांग संघर्षाचे आणि श्रमाचे वर्णन करताना त्यांच्या मुखातून आलेले शब्द त्यांच्या भाषिक समृद्धीची साक्ष देतात. ते जेव्हा म्हणतात, ''पूर्वी आमची शेती पाण्याखाली बुडली. समुद्राची खाडी, बंधारा फुटला... त्यावेळेला आमचा रेतीचा धंदा होता. तो पडाव रेतीचा होता-शीडवाले पडाव, इंजिनवाले नाहीत. सर, आम्ही दोन ठिकाणांहून रेती काढायचो. तिथं चार बाजूंना चार नांगर असायचे... पडावामध्ये नंतर इथे काठ्या-बांबू असतात ना, पाच-सहा मीटरचे, ते खाली असे लावायचे. मग टोपली घेऊन खाली पाण्यामध्ये जायचं... टोपली पाण्याखाली जाऊन भरायची. आपण म्हणताय तसं, तिथे श्वास कोंडलेला असतो आणि त्याने पुन्हा पुन्हा काठीला धरून वरती यायचं... जसा आमचा विहिरीतून पाणी काढायला पोहरा असतो, तशी ती वाळू पुन्हा पडावर टाकायची. अशी ती होडी भरायची.'' हा प्रसंग ऐकताना केवळ माहिती मिळत नाही, ऐकताना ऐकणाऱ्याचा श्वासही काही काळ रोखला जातो. वाळू काढण्याच्या जहाजाला 'पडाव' म्हणणे, ६-७ लोकांचे जेवण बनवणाऱ्या स्वयंपाक्याला 'रांध्या' म्हणणे आणि पाण्यासाठी 'पोहरा' व 'शिजोरी' हे शब्द वापरणे, हे दाखवते की रामशेठ शब्दांचा औचित्यपूर्ण वापर किती सहजतेने करतात.

साहित्यातील 'आत्मचरित्र' हा प्रकार माणसाला स्वतःचा भूतकाळ पारदर्शकपणे मांडायला शिकवतो आणि रामशेठ यांच्या कथनात नेमकी हीच पारदर्शकता दिसते. शेकडो कोटींचे साम्राज्य उभे करणारा हा महापुरुष जेव्हा जाहीर व्यासपीठावर अत्यंत निगर्वीपणे आपल्या भावना व्यक्त करतो, तेव्हा तिथे उद्योगपती नव्हे, तर एक हळवा लेखक बोलत असतो. ते म्हणतात, ''पहिल्या दिवशी शिक्षक असताना जो 'राम ठाकूर' होता ना, तो राम ठाकूरच आज आहे. लोकांनी मला 'रामशेठ' बनवलं, पण मी मनानं अजून रामशेठ झालेलो नाही. पैसे आले, पैसे येऊन मी शेठ झालो; पण वृत्तीनं आणि भावनेनं मी काय शेठ झालेलो नाही.'' मी स्वतः करत नाही; प्रत्यक्ष आता माझा स्टाफ सगळं करतो. एकदा ती टॅक्टिक्स सापडली, धंद्याची टॅक्टिक्स सापडली की सगळं बरोबर असतं. यशाचे सर्व श्रेय स्वतःकडे न घेता सहकाऱ्यांना देणे आणि स्वतःला मनातून राम ठाकूर ठेवणे, हा एका सच्च्या लेखकाचाच स्वभाव असू शकतो. स्वतःच्या गरिबीचा, रेल्वेच्या कामावरील एक रुपया मजुरीचा आणि आईसोबत पाण्याचे हंडे व लाकूड वाहण्याचा इतिहास ते ज्या प्रांजळपणे मांडतात, ते कोणत्याही श्रेष्ठ आत्मकथनाला शोभेल असेच आहे.

उत्कृष्ट साहित्यात संघर्ष आणि नाट्यमयता केंद्रस्थानी असते आणि रामशेठ यांच्या अभिव्यक्तीमध्ये ही नाट्यमयता हुबेहूब उतरते. त्यांनी भाषणात १९८४ च्या ऐतिहासिक शेतकरी आंदोलनाचे केलेले वर्णन वाचताना अंगावर काटा येतो. पोलिसांनी सांगितलं, ''एक मिनिटात तुम्ही पळता की नाही? डिस्पर्स व्हा, नाहीतर आता गोळीबार करू! कोणी हललं नाही... त्यांनी अश्रुधुराच्या नलिका फेकायला सुरुवात केली. लोकांनी त्याच नलिका उचलल्या आणि पोलिसांवर, एसआरपीच्या अंगावर फेकल्या. बघा, त्यावेळेला माणसं पळाली नाहीत... दोन लोक जागेवर धारातीर्थी पडले आणि ३०-३२ लोक गोळीबारात जखमी झाले आमच्यापैकी.'' हा प्रसंग सांगताना रामशेठ केवळ इतिहास सांगत नाहीत, तर त्यांच्या शब्दांतून 'वीर रस' आणि 'रौद्र रस' एकाच वेळी प्रवाहित होतो. पोलिसांवर अश्रुधुराच्या नळकांड्या उलटवून फेकणे, सहकाऱ्यांचे बलिदान आणि त्यानंतर रातोरात खालापूर-वेश्वीच्या जंगलात भूमिगत होणे हा सगळा प्रसंग श्रोत्यांच्या

डोळ्यांसमोर जिवंत चित्र उभे करतो. साहित्यात यालाच 'बिंब-प्रतिबिंब निर्मिती' किंवा दृश्यमानता म्हणतात, जी रामशेठ यांच्या वाक्चातुर्यात ठासून भरलेली आहे.

साहित्याचा अंतिम उद्देश माणसाला सुसंस्कृत बनवणे आणि त्याच्यात मूल्यांची जपणूक करणे हा असतो, आणि रामशेठ यांच्या जीवन प्रवासातून हाच मूल्यविचार समोर येतो. राजकारणाच्या चिखलात राहूनही त्यांनी नैतिकतेचे कमळ कधी कोमेजू दिले नाही.चिखलात नंदनवन कसे फुलवले जाते ते पहायचे असेल तर रामबाग बघा. निवडणुकीच्या रिंगणात आपलेच गुरू असणारे दि. बा. पाटील साहेब आणि बॅ. ए. आर. अंतुले साहेब यांना पराभूत केल्यानंतरही, पुढील १५ वर्षे ते सतत त्यांच्या घरी जाऊन त्यांच्या पाया पडून आशीर्वाद घेत राहिले. मी त्यांच्यापेक्षा मोठा झालो असं कधीच समजलो नाही, कारण ते माझे गुरु होते, हा विचार मांडताना त्यांच्या शब्दांतील औचित्य आणि आदर मनाला स्पर्शून जातो. 'पराभवाचे राजकारण' आणि 'नात्यांमधील ऋणानुबंध' यातील सूक्ष्म फरक ते एखाद्या विचारवंतासारखा मांडतात. वयाच्या अवघ्या ५४ व्या वर्षी, दिल्लीच्या सेंट्रल हॉलमधील प्रलोभनांना बाजूला सारून, माझी मास्तरकी चांगली, राजकारण नको म्हणत खासदारकी सोडण्याचा निर्णय घेणारी अलिप्तता केवळ एका तत्त्वनिष्ठ, मूल्यवादी साहित्यिकाकडेच असू शकते.

भाषणाच्या उत्तरार्धात तर रामशेठ यांच्यातील काव्याचे मर्म जाणणारा रसिक पूर्णपणे जागा झालेला दिसतो. कोकण मराठी साहित्य परिषदेच्या कार्याचा आणि केशवसुतांच्या कवितेचा गौरव करताना त्यांच्या प्रतिभेला नवा बहर येतो. ते म्हणतात, ''आपल्याकरिता-आपली जी 'कोकण मराठी साहित्य परिषद' आहे, या परिषदेकरिता सुद्धा मी २५ लाख रुपयांची देणगी आज जाहीर करतोय!'' या विधानातून त्यांची साहित्यावरील पराकोटीची निष्ठा आणि आदर स्पष्ट होतो. त्यांनी स्वतः जाहीर केले आहे की, माझा बी.ए. चा विषय मराठी स्पेशल होता. मराठी संत वाङ्मयाचा इतिहास, कादंबरी, नाटक या सगळ्याचा अभ्यास माझा झालाय म्हणूनच दगड-मातीच्या व्यवसायात आणि राजकारणाच्या धबडग्यात राहूनही त्यांच्या मनाच्या कोपऱ्यातील 'मराठीचा शिक्षक, विद्यार्थी' आणि 'संवेदनशील साहित्यिक' कधीच सुकला नाही.

अनेकदा रामशेठ ठाकूर साहेब छत्रपती शिवाजी कॉलेजला 'कमवा आणि शिका' योजनेत होते, असे सगळीकडे सांगितले जाते; पण ते कोणत्या विषयाला होते, त्यांच्या मनावर कोणत्या शिक्षकाचे संस्कार झाले, ते कसे राहत होते, रयत शिक्षण संस्थेबद्दलची आस्था त्यांच्या मनात एवढी का निर्माण झाली? आजही ते आपल्या छत्रपती शिवाजी कॉलेजच्या विद्यार्थी वसतिगृहात कुठे राहत होते? कॉलेजला असताना त्यांच्या जडणघडणीत कोणाचे योगदान आहे, हा शोध कोणी घेत नाही. त्यांचे दातृत्व हेच अधिक पुढे येते. त्यांनी मेहनतीने उभे केलेले जग कोणत्या अनुभवातून आलेल्या प्रेरणेतून उभा राहिले आहे, हा शोध मी घेत राहतो. खारकोपर हायस्कूल छत्रपती शिवाजी विद्यालय गव्हाण-कोपर येथे त्यांनी माध्यमिक शिक्षण घेऊन १९६७-६८ ला मॅट्रिक परीक्षा पास झाले. महाविद्यालयीन शिक्षण घेण्यासाठी आता कुठे जायचे? हा प्रश्न होता. पुणे, अलिबाग, मुंबई इकडे न जाता शाळेचे मुख्याध्यापक एस.बी.पाटील यांनी त्यांना रयत शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी कॉलेजला शिक्षण घेण्याचा आग्रह केला. त्यावेळी छत्रपती शिवाजी कॉलेजला प्राचार्य शंकरराव उनउने होते. रामशेठ यांनी मराठी विषय घेऊन पदवी शिक्षण पूर्ण केले. साहित्य, संस्कृती, भाषा याचा त्यांनी चांगला अभ्यास केला. त्यांनी उत्तम साहित्य वाचले. भाषा विषय घेतलेल्या या मुलांनी 'शिवविजय' मध्ये साहित्य लेखन केले असल्याचे मला सांगितले आहे. म्हणूनच रयत संस्कार हा त्यांना पैशापेक्षा मूल्यवान वाटतो. रयतला करोडो रुपये दिले तरी कधी कोणतीही लालसा त्यांनी दाखवली नाही. त्यामुळे लोक

त्यांच्यावर प्रेम करतात आणि मग त्यांच्या शब्दाला किंमत प्राप्त होते. जीवनात विश्वास आहे, त्यामुळे बोलण्यात विश्वास आहे. साहित्यात विश्वास नसेल, तर ते मूल्यहीन साहित्य होते असे मला वाटते. ते कृतार्थ संध्याकाळ कार्यक्रमात बोलताना म्हणाले, ''रयत शिक्षण संस्था आणि तिथले संस्कार मिळाले, हे महत्त्वाचं होतं. सर्व अठरापगड जातीचे लोक एकत्र येऊन जेवण-खाण करणं, एकत्र राहणं, हे आपल्याला तिथे मिळालं खरं बघायला गेलं तर माझा बी.ए. चा मराठी स्पेशल विषय होता. मराठी संत वाङ्मयाचा इतिहास, कादंबरी, नाटक या सगळ्याचा अभ्यास माझा झालाय पण त्याच्यानंतर मात्र मी दगड आणि मातीच्या व्यवसायात असा असा व्यस्त झालो की मला साहित्याकडे पहाण्यास वेळच नाही मिळाला.'' यातून साहेबांची साहित्याला वेळ न देऊ शकण्याची खंत दिसून येते.

कर्मवीरांनी रयत शिक्षण संस्थेसाठी सर्वस्व अर्पिले. रयत माउली लक्ष्मीबाई पाटील यांनी असीम त्याग केला. हे रामशेठ ठाकूर साहेबांनी जाणले होते. म्हणूनच सुखाचे साम्राज्य आले तरी राम मात्र इतरांची काळजी घेत राहिला, आणि देत राहिला. विनम्रता इतकी की, मला जे सुख मिळते ते कामगारांमुळे मिळते. हा त्यांच्या कष्टाचा पैसा आहे. मला उपभोग घ्यायला असा कितीसा पैसा लागतो? तो लोकांच्या सामाजिक समस्या सोडवण्यासाठी दिला, तर मला खरे समाधान मिळते, हा उदात्त विचार मला त्यांच्यात दिसतो. त्यांच्यात 'बोले तैसा चाले' या संत तुकाराम महाराजांच्या आचरणशैलीचा प्रत्यय येतो. लोकांचे धन आहे, लोकांना थोडे दिले म्हणून बिघडले कुठे, ही त्यांच्या मनाची उदारता आहे. त्यामुळे त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या माणसांची संख्या वाढत आहे. वंचित घटकांना हे स्वावलंबी व न्यायी नेतृत्व मिळावे, असे सतत वाटत राहते. त्यांच्याकडून पैसे मिळवणे हा सुप्त हेतू अनेकांचा असू शकतो; परंतु रामशेठ यांची वृत्ती अंगीकारणे, त्यांच्यासारखे कष्ट करणे, त्यांच्यासारखे प्रश्न सोडवणे हे मात्र आजच्या पिढीने शिकणे आवश्यक आहे. उत्तम उद्योजक होण्यासाठी व्यवहाराचे भान आणि मानवी संबंध जोपासणे किती आवश्यक असते. हे त्यांच्या आचरणातून दिसते .१३ मे २०२६ ला झालेल्या अमृत महोत्सवी कार्यक्रमात अनेक नेते मंडळी व लोक हजर राहिले, त्यांची काळजी त्यांनी घेतली. त्यातून त्यांना सुख मिळाले .

शेवटी, कवी नारायण सुर्वे यांनी म्हटल्याप्रमाणे 'झोतभट्टीत शेकावे पोलाद, तसे आयुष्य छान शेकून निघाले' हाच अनुभव रामशेठ ठाकूर यांच्या जीवनप्रवासाला लागू होतो. त्यांचे हे संपूर्ण भाषण वाचून विश्लेषण करताना जाणवते की, ते केवळ कोरडे वक्ते नाहीत, तर वेगवेगळ्या भावभावना व्यक्त करताना योग्य शब्दांचा औचित्यपूर्ण वापर करणारे प्रतिभावंत लेखक आहेत. सुधा मूर्ती जेव्हा आपले अनुभव लिहितात तेव्हा संपूर्ण जग त्याचे कौतुक करते. रामशेठ ठाकूर यांनी, जर आपले हे समृद्ध, बरे-वाईट आणि थरारक अनुभव लेखणीबद्ध केले, तर त्यांचे लेखन कर्तृत्व कोणत्याही प्रस्थापित साहित्यिकापेक्षा खूप उंचावर जाईल.

छत्रपती शिवाजी कॉलेजच्या मराठी विभागास लाभलेला हा गुणी, कर्तृत्ववान विद्यार्थी आज अनेकांची प्रेरणा आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे धैर्य, धडपड, विश्वास, मेहनत, प्रेम, न्याय, करुणा, संवेदनशीलता, दिलदार वृती, नैतिकता, रसिकता आणि सावधानता या मूल्य संस्कारावर लिखाण केले तर खऱ्या अर्थाने साहित्यातून रामशेठ समजून घेता येतील.



तू संविधानाचा प्रदीप...

तू संविधानाचा प्रदीप...
प्रेमाचा तू सागर । धैर्याचा मेरू सुंदर ।
करुणेचा अखंड निर्झर । वाहतसे ।।१।।
विश्वासाचा वटवृक्ष । श्रद्धेचा तू दीप लक्ष ।
शील तुझे चंद्रासम । निर्मळसे ।।२।।
अंत:करणात बुद्ध । विचारांत सत्यशुद्ध ।
करुणेमध्ये सम्यक युद्ध । अन्यायाशी ।।३।।
सम्यक दान तुझे । उजळल्या वाती ।
दीनांच्या त्या डोळ्यांती । आनंद फुले ।।४।।
दान देणारा हात । दु:खितांशी जिवलग नातं ।
कल्पवृक्ष ममतेची जात । तुझ्यामध्ये ।।५।।
कष्टकऱ्यांच्या घामाला । मान दिला जीवाभावाला ।
कमवा आणि शिका भला । मंत्र दिला ।।६।।
त्याग तुझा दीपस्तंभ । वाळामाजी अचल खांब ।
स्वप्नांचे तू कुशल शिल्प । घडविता ।।७।।
नवनिर्माणाचा ध्यास । अंतरी जळता प्रकाश ।
जनहिताचा अखंड श्वास । तुझ्यामध्ये ।।८।।
प्रतापगडच्या वाटेवर । चालतसे निर्धार थोर ।
शिवरायांचा खरा वारसदार । दिसतसे ।।९।।
स्थितप्रज्ञ हिमगिरी । शांत राहसी अंतरी ।
संकटांच्या त्या लहरी । न डुलविती ।।१०।।
तुकारामांच्या वाणीचा । गंध तुझ्या जीवनीचा ।
साधेपणाच्या फुलांचा । दरवळसे ।।११।।
निर्मळ गंगेचे पाणी । तसे तुझे शुभ्र मनी ।
द्वेष नसे अंत:करणी । कणभरही ।।१२।।
व्यवहाराचा तू ज्ञाता । माणुसकीचा खरा नेता ।
मनस्वभावाची कथा । जाणसी तू ।।१३।।
पुण्याचा मोठा ठेवा । सद्गुणांचा कुबेर वा ।
कळवळ्याचा जणू मेवा । लाभलासे ।।१४।।
विरक्त कमळापरी । राहोनी जगाच्या घरी ।
अलिप्त भाव अंतरी । जपलासी ।।१५।।
देतो तो देव खास । अर्थ कळला तुझिया मनास ।
हात दिला दु:खितांस । सावली होई ।।१६।।
फुले-आंबेडकरांचे । कर्म, धर्म नेले जगात ।
या नव्या युगात । समतेचा वारकरी ।।१७।।
संविधानाचा प्रकाश । उजळवी जनमनास ।
समतेचा अखंड श्वास । तुझ्यामध्ये ।।१८।।
ध्यासपर्व तुझे जीवन । आशावादाचे गगन ।
दुर्दम्य आशेचे किरण । झळकती ।।१९।।
सात्त्विक कुळातील बाळ।नित्य सत्कर्म अमृतकाल ।
दु:खितांचा जीव्हाळ । जपलासी ।।२०।।
जगन्मित्र तुझे नाते । प्रेम पेरिसी गावोगावाते ।
दारी तुझ्या सुख नांदे । मंगलते ।।२१।।
जयजयकार व्हावा । ऐसा तुझा जीव ।
संतपरोपकारी भाव । तुझ्यामध्ये ।।२२।।
विवेकाचा जागा दीप । विज्ञानदृष्टीचे रूप ।
अंधश्रद्धेवरी घाव । घालितसे ।।२३।।
आनंदी तुझे वदन । पहाटेचा जणू किरण ।
भगवंताचे चालते धन । दिसे जनी ।।२४।।
सांगे भीड भीकेची बहीण । स्वाभिमान, कष्टभूषण ।
जोतीरावांचे स्मरण । ठेविसी तू ।।२५।।
कर्मवीरांचा वारसा । जनसेवेचा धगधसा ।
दलितांचा प्रेमळ बाबा । झालासी तू ।।२६।।
शांतीप्रेमी जीव तुझा । चंदनाचा गंध साजा ।
निसर्गाशी स्नेह तुझा । हिरवागार ।।२७।।
कृपाळू पावसापरी । बरससी जनांच्या घरी ।
कोरड्या जीवनावरी । हिरवाई देशी ।।२८।।
जन्मा येउनी केले सिद्ध । होऊ नका कोणी क्रुद्ध
जीवन हे नित्य युद्ध । एकमेकाधारे जगावे ।।२९।।
रामशेठ समतेचा द्वीप । जनमनांच्या सदा समीप ।
भारतीय संविधानाचा प्रदीप । जगा उजळीतसे ।।३०।।

– डॉ. सुभाष वाघमारे

(लोकनेता मा.रामशेठ ठाकूर काव्यमय जीवनगाथा
प्रातिनिधिक काव्यसंग्रहातून साभार)